# माझें क्रीडाजीवन

१९४८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ८०३

पी. विठ्ठल

REFBK-0007005

भारती प्रकाशन, मुंबई

# माझें क्रीडाजीवन

REFBK-0007005

लेखक

पी. विठ्ठल

भारती प्रकाशन, मुंबई

सर्व हक्क स्वाधीन
प्रथमावृत्ति १९४८

मुखपृष्ठ
र. शं. मुळगांवकर

आंतील ब्लॉक्स
त्रिविध वृत्ताच्या सौजन्यानें

मुद्रक :
र. अ. मोरमकर
श्री लक्ष्मीनारायण प्रेस
३६४ ठाकुरद्वार, मुंबई २

किंमत पांच रुपये

प्रकाशक :
र. अ. मोरमकर
भारती प्रकाशन
३६४ ठाकुरद्वार, मुंबई २



# पी. विठ्ठल

लेखक
विजय मर्चंट

'विठ्ठल!'—सडपातळ, चापल्ययुक्त व डौलदार देहयष्टि, डोक्यावर ती प्रसिद्ध हिरवी ट्वीड हॅट, कमरेच्या कडेलाच हातांत रुबाबांत लटकणारी, पण विकेटपाशीं येतांना सहजच हेलकावे खात असलेली कसलेली बॅट—चालू शतकाच्या पहिल्या तीस वर्षांत क्रिकेटच्या पॅव्हिलियनमधून ही आकृति बाहेर पडतांना दिसली, कीं हजारों क्रिकेट-शोकिनांच्या तोंडून पडसाद उमटावयाचा–'विठ्ठल!— विठ्ठल आला!–'

'विठ्ठल!'—तें नांव उच्चारतांच त्या काळीं हजारों प्रेक्षकांच्या दृष्टी-समोर हिंदी बॅटिंगमध्यें भरलेला सारा डौलदारपणा, सारी आकर्षकता, सारी रम्यता उभी राहावयाची. आणि तो काळ असा होता, कीं ज्या वेळीं

क्रीडाप्रभु कसबी कलावंत होते, केवळ मजूर कावाडी नव्हते, ज्या वेळीं सहजाकर्षक मुलायम अशा डौलदारपणाची जागा सध्यांच्या कठोर कर्कश अशा कष्टाळुपणानें घेतली नव्हती. लवचिक मनगट, तरळ दृष्टि आणि चेंडूफेकीची दिशा सहज आगाऊ हेरून त्या अपेक्षेनें पाय वळविण्याचें आदर्शवत् असें चातुर्य यामुळें विठ्ठल यांनीं अचूक टायमिंगच्या कलेंत स्वामित्वच संपादन केलें होतें. यष्टीच्या समोर व मागें सारख्याच सहजसुलभतेनें ते फटके मारीत; पण माझ्या स्मरणांत राहिलेला त्यांचा हातखंडा व अत्युत्कृष्ट फटका म्हणजे 'कव्हर ड्राइव्' चा असे. ऑफच्या बाजूचें क्षेत्ररक्षकांचें कोंडाळें फोडण्यासाठीं सध्या परिश्रमपूर्वक, जादा जोर करून चेंडू टोलविण्यांत येत असतो. पण विठ्ठल यांच्या 'टायमिंग'मधील अचूकतेमुळें त्यांना फारसें बळ खर्चीं न घालतां केवळ मनगट व पाय यांच्या हालचालींत एकसूत्रता साधून याच बाजूकडे जास्तींत जास्त धांवा घेतां येत असत. किंबहुना चेंडूचा पल्ला जितका अधिक पूर्ण, तितका त्यांचा फटका अधिक मुलायम, अधिक आकर्षक व अधिक अनपेक्षित असा असे. क्षेत्ररक्षक नसेल त्या दिशेला चेंडू टोलविण्याच्या करामतीमुळें त्यांच्या धांवांत भराभर भर पडत असे; क्रीडाप्रभूच्या वैशिष्ट्यनिदर्शक अशा कौशल्याच्या सार्‍या खाणाखुणा त्यांच्या बॅटिंगमध्यें चटकन् दृष्टोत्पत्तीस येत.

सुप्रसिद्ध चौघां पालवणकर बंधूंपैकीं विठ्ठल हे तिसरे बंधू. इतर बंधू म्हणजे बाळू, शिवराम व गणपत हे होत. विठ्ठल यांनीं आपल्या बॅटिंगच्या कौशल्यानें त्या काळच्या प्रेक्षकांवर जितकी मोहिनी घातली होती, तशी ती इतर थोडेच बॅट्स्मन घालूं शकले असतील. आणि या बॅटिंगमधील कौशल्याइतकेंच त्यांचें क्षेत्ररक्षणांतील चापल्यही अप्रतिम असेंच होतें. विठ्ठलच्या कालानंतर पुढें आलेल्या खेळाडूंना या बाबतींतील त्यांच्या तंत्राचें अनुकरण करण्याची बुद्धि अथवा इच्छा होऊं नये ही माझ्या मतें खरोखर दुर्दैवाची गोष्ट होय. विठ्ठल यांची शैलि सहजमनोरम व चमकदार अशी होती,पण क्रिकेटचें शुष्क माळरान नेत्रदीपक अशा रंगाचा शिडकाव करून चैतन्यपूर्ण होऊं न शकलें, तर क्रिकेट हा क्रिकेट राहणार नाहीं; आणि अशा तऱ्हेनें रंग भरण्याचें काम फक्त क्रीडाप्रभूंनाच साधूं शकतें. हिंदी क्रिकेटचें सुवर्णयुग अशी संज्ञा ज्या काळाला देतां येईल, अशा त्या काळांत विठ्ठल यांची भूमिका अशा क्रीडाप्रभूचीच होती.

क्रिकेट व क्रिकेट क्षेत्रांतील नामवंत व्यक्ति यांच्याविषयींच्या ग्रंथांची आवड लोकांत फार वाढली आहे. अशा वेळीं विठ्ठल यांच्या क्रिकेट क्षेत्रांतील पराक्रमांना पुस्तकरूपानें प्रसिद्धि मिळावी हें योग्यच झालें आहे. ज्या काळीं क्रिकेट म्हणजे मूर्तिमंत करमणूक होती, क्रिकेट म्हणजे रोमांचक प्रसंगांची मेजवानीच होती, त्या जुन्या काळीं विठ्ठल यांना पाहिलेल्या जुन्या क्रिकेट-शोकिनाना, त्यांच्या या पराक्रमांची ही कथा वाचतांना त्या रम्य काळांत पुन्हा एकदां वावरत असल्याचा भास होईल यांत शंकाच नाहीं. विठ्ठल यांनीं हिंदी क्रिकेटची सेवा अत्यंत निष्ठापूर्वक, आदरपूर्वक केली. अधिक धडाडीच्या व चमकदार क्रीडापटूंना जी लोकप्रियता व प्रशंसा संपादन करतां आली नाहीं, ती विठ्ठल यांनीं आपल्या शांत, सौजन्यपूर्ण स्वभावामुळें व उमद्या खेळाडू वृत्तीनें संपादन केली. आज ते क्रिकेटनिवृत्त व सेवानिवृत्तही झाले आहेत. त्यांना दीर्घायुष्य व सुखाचें जीवन लाभो अशी मी प्रार्थना करतों व या माझ्या प्रार्थनेंत त्यांचे हजारों चाहतेही सहभागी होतील यांत मला किंचितही शंका वाटत नाहीं. आमच्या आयुष्यांतील अनेक आनंदाच्या क्षणांचा ज्या क्रिकेटपटूनें आम्हांला लाभ करून दिला, आमच्या स्मृतिपटलावर मनोरम अशी चित्रें ज्यानें कोरून ठेवलीं, त्यांचें हें अभीष्ट चिंतन करणें हा त्याच्या ऋणांतून मुक्त होण्याचा कमींत कमीच प्रयत्न होय !

# आभार

१९४५ सालीं **विविध वृत्त** साप्ताहिकांत ‘ माझें क्रीडाजीवन ’ ही माझी क्रिकेटविषयक आठवणींची लेखमाला क्रमशः प्रसिद्ध झाली होती. तीच, कांहीं आवश्यक ते फेरफार करून आतां पुस्तक रूपानें प्रसिद्ध होत आहे. ही लेखमाला पुनः प्रकाशित करण्यास **विविध वृत्ताच्या** चालकांनीं परवानगी दिल्याबद्दल व तसेंच भारती प्रकाशनानें प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल त्यांचा मी फार ऋणी आहें.

सुविख्यात हिंदी क्रिकेटपटु व हिंदी संघाचे कर्णधार श्री. विजय मर्चंट यांनीं वेळांत वेळ काढून पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली, तसेंच लेखमालेच्या लेखनाच्या कामीं **विविध वृत्ताचे** सहसंपादक श्री. भा. वि. नाडकर्णी, बी. ए., यांनीं मला बहुमोल साह्य केलें, याबद्दल या उभयतांचाही मी फार आभारी आहें. पुस्तकांतील नांवांची सूचि तयार करण्याचें किचकट काम श्री. विश्वनाथ पालेकर यांनीं हौसेनें पत्करून तें परिश्रमपूर्वक पार पाडलें याचाही येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें अवश्य आहे.

प्रस्तुत पुस्तकांत माझ्या आठवणींच्या रूपानें हिंदी क्रिकेटचा चालू शतकाच्या पहिल्या तीस वर्षांतील धांवता इतिहास संकलित झाला आहे. लेखमाला प्रसिद्ध होत असतांना अनेक क्रिकेटशोकिनांनीं गुणग्राहक पत्रें पाठवून मला उत्तेजन दिलें होतें; क्रिकेटप्रेमी जनतेकडून या पुस्तकाचेंही तसेंच स्वागत केलें जाईल, अशी मी आशा बाळगतों.

**पी. विठ्ठल**

ज्येष्ठ बंधू

**पी. बाळू**

यांस



पी. विट्ठल



दा. क्र. ६००५

## क्रिकेटचें वैभव

पावसाळा सुरू झाला कीं माझ्या मनाला एक प्रकारचा निराळाच आनंद जाणवूं लागतो. सारा कडक उन्हाळाभर पोतडींत बांधून ठेवलेलीं क्रिकेटचीं आयुधें या वेळीं भराभर बाहेर पडूं लागतात. बॅटींना ऑइलिंग वगैरे करून नव्या तयारीनिशीं क्रीडांगणावर उतरण्यासाठीं तुम्ही उतावीळ होऊं लागतां; पावसाची पहिली सर पडून जाते न जाते तोंच सारीं क्रीडांगणें नव्यानें उगवणाऱ्या हिरवळीप्रमाणेंच क्रिकेटच्या लहानथोर खेळाडूंनीं फुलून गेलेलीं दिसूं लागतात. क्रिकेटचा हंगाम सुरू झालेला असतो आणि या नव्या हंगामांत क्रिकेटची ती आल्हाददायक मौज आणखी पुन्हां एकदां अनुभविण्यास मिळणार आहे अशा विचारानें क्रिकेटपटूंचें व क्रिकेटप्रेमी प्रेक्षकांचेंही अंत:करण उल्हासित होत असतें.

उणेपुरे साठबासष्ट पावसाळे आजवर मीं पाहिले आहेत आणि खेळण्या-बागडण्याचें वय सुरू झाल्यापासून वरील तऱ्हेचाच सुखद अनुभव आतांपर्यंत दरवर्षी मी घेत आलों आहें. सुमारें दहा वर्षांपूर्वीपर्यंत क्रीडांगणावर जातीनें उतरून क्रिकेटच्या खेळाचा तो आनंद प्रत्यक्षच लुटण्याचें भाग्य मला लाभत असे. आज त्या रीतीनें जरी नाहीं, तरी त्या खेळाचा एक निस्सीम भक्त व रसिक मर्मज्ञ या नात्यानें तोच आनंद मी अजूनही अनुभवीत आहें.

आणि प्रेक्षक या नात्यानें मी आज हिंदी क्रिकेटकडे पाहत आहें तों एक नवेंच उत्साही दृश्य माझ्या दृष्टीस पडत आहे. एक वेळ ज्या क्रीडांगणावर आम्हीं उत्साहभरानें उतरत असूं, त्याच क्रीडांगणावर आज नवेनवे उत्साही चेहरे दिसूं लागले आहेत; क्रिकेटबद्दलचा जनतेंतील उत्साह आज किती तरी पटीनें वाढला आहे, क्रीडांगणांचीही पुष्कळच भर पडली आहे, व क्रिकेटनें आकर्षून घेतलेल्या छोट्यामोठ्या विद्यार्थ्यांचीही संख्या वाढलेली आहे. आजच्या या दृश्याकडे पाहिलें म्हणजे गतकालांतील माझ्या स्मृति सहजच जागृत होऊं लागतात आणि आमच्या देशांतील या क्रिकेटच्या खेळाच्या परिस्थितींत गेल्या पन्नास वर्षांच्या या कालांत किती फरक पडला आहे हा, असाही विचार मनांत येऊन जातो. माझ्या लहानपणीं नुक्तेंच मूळ धरूं लागलेलें क्रिकेटचें रोपटें आज मोठ्या वृक्षाचें स्वरूप धारण करूं पाहत आहे हें पाहिलें, म्हणजे मनाला फार समाधानही वाटूं लागतें. आणि त्या रोपाची जोपासना करण्यांत आपलाही अल्पसा कां होईना हातभार लागला आहे ही कल्पना मनांत येऊन थोडासा अभिमान व आनंदही वाटल्यावांचून राहत नाहीं.

सव्वीस सालचा पावसाळा

अलीकडच्या वर्षांतील १९२६ सालचा तो एक पावसाळा माझ्या कायमचा स्मरणांत राहून गेला आहे. पुण्याला सप्टेंबर महिन्यांत आम्ही चौरंगी सामने खेळण्यासाठीं गेलों होतों. शेवटचा सामना युरोपियन विरुद्ध हिंदु यांच्यामध्यें होता; हिंदु संघाचें कप्तानपद त्या वर्षी चवथ्या खेपेस माझ्याकडे आलें होतें; पावसानें त्या सामन्यांत गोंधळच उडवून दिला होता! युरोपियनांच्या हॉवलेट व मेयर या दोघां बोलर्सनीं आमच्या बॅटस्मनवर पहिल्या डावांत मात करून

आम्हांला १०० ची सुद्धां मर्यादा गांठूं दिली नाहीं. अवघ्या ९७ धांवा आम्ही करूं शकलों; पण आमचेही गोलंदाज कमी नव्हते. एस्. एम्. जोशी यांना त्यांच्या दुखावलेल्या गुडघ्यामुळें त्या वेळीं आपली करामत दाखवितां आली नाहीं; पण रामजींच्या तुफान गोलंदाजीपुढें युरोपियन बॅट्स्मनांनाही फारशा धांवा करतां आल्या नाहींत आणि १५९ धांवांतच त्यांचा अवतार संपला. दुसऱ्या डावांत आम्ही १७८ धांवा करूं शकलों. सामना जिंकण्यासाठीं युरोपियनांना फक्त ११६ धांवांची गरज होती. आमच्या गोलंदाजापैकीं एस्. एम्. जोशी यांना तर त्या दिवशीं गोलंदाजी करणें शक्यच नव्हतें. शेवटच्या दिवशीं खेळाला सुरुवात झाली, त्या वेळीं युरोपियनांचे दोन खेळाडू बाद होऊन २५ धांवा झाल्या होत्या. ८ खेळाडू शिल्लक होते व ९२ धांवा करावयाच्या होत्या. आणि त्या आपण सहज करूं शकूं अशी युरोपियनांना खात्री वाटत होती; एवढेंच नव्हे, पण विजय-समारंभ कसा साजरा करा-वयाचा याचेही बेत त्यांनीं आंखले होते !

त्या दिवशीं पावसामुळें दुपारीं ३–१५ पर्यंत खेळाला सुरुवात करतां येईना. क्रीडांगणावरील पाणी निपटून काढून खेळाची सुरुवात करावी लागली--आणि त्यानंतर मग जो खेळ झाला, तो बेफाम चुरशीचा झाला. तथापि खेळाच्या आरंभीं युरोपियनांच्या खेळाडूंनीं अधिक धाडस केलें असतें तर त्यांना बऱ्याच धांवा करणें शक्य झालें असतें. परंतु क्रिकेटच्या पाठानुसार धिम्मा खेळ खेळण्याचें तंत्र त्यांनीं आरंभिलें; आणि हीच गोष्ट आमच्या पथ्यावर पडली. स्कोअर करण्याची ही पहिली संधि गमावल्यानंतर मग पुढें विकेट अगदींच खराब झाल्यानंतर धांवा करणें अगदींच अशक्य होतें. रामजी यांनीं या वेळीं पुन्हां आपली करामत दाखविलीच; पण आमचे ' स्टॉक ' गोलंदाज चंदाराणा यांनींही ऐन वेळीं उत्तमच कामगिरी बजा-वली. आठवी विकेट युरोपियनांचे कॅप्टन होझी यांची पडली. मग पुन्हां पावसाची सर आल्यामुळें खेळ कांहीं वेळ थांबवावा लागला. प्रेक्षकांची अधीरता क्षणाक्षणाला वाढत होती ! सामना पुन्हा सुरू झाला त्या वेळीं युरोपियनांना अवघ्या वीस रन्स हव्या होत्या. पण त्यांपैकीं त्यांनीं ११ रन्स केल्या नाहीं, तोंच चंदाराणा यांच्या बोलिंगवर ग्रॅहम यांचा उडालेला झेल नवले यांनीं घेतला. हॉवलेट शेवटीं आले, पण चंदाराणा यांनीं एक सुंदर

बॉल टाकून त्यांची स्टंप हवेंत उडविली आणि ११ धांवांनीं हिंदूंचा विजय झाला ! अगदीं हातांत आलेला विजय युरोपियनांच्या हातून निसटला. आणि तो प्रसंग त्यांना इतका जाणवला, कीं कॅप्टन होझी यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिलेले मीं पाहिले !

मेहनतीचा कंटाळा करूं नका !

क्रिकेटच्या खेळाची जी गंमत आहे, ती अशा या चुरशींतच आहे. अनिश्चिततेमुळें या खेळाला खेळाडूंच्या त्याचप्रमाणें प्रेक्षकांच्याही दृष्टीनें अतिशय रंगत चढत असते. पण दैवाला या खेळांत आपली मौज दाखविण्याला थोडाफार अवसर मिळत असला, तरी या दैवभागावर विसंबून खेळाडूंचें मात्र कधींही चालावयाचें नाहीं. इतर कोणत्याही कलेप्रमाणें या खेळाचीही कला हस्तगत करण्यासाठीं त्याच्या तपस्येची फार आवश्यकता आहे. मेहनतीखेरीज यांतही फळ पदरांत पडणें अशक्यच होय; "*Practice makes the man perfect*" ही म्हण येथेंही खरी गेल्या होय. सुमारें ४५ वर्षांच्या माझ्या क्रीडाजीवनांतील अनुभवावरून होतकरू क्रिकेटरांना पहिली सूचना मला द्यावीशी वाटते ती हीच कीं या खेळांत शक्य असल्यास रोज मेहनत घेण्याचा कधींही कंटाळा करूं नका. आणि मेहनत घ्यावयाची ती खेळाच्या एकाच बाजूपुरती न घेतां बॅटिंगप्रमाणेंच बोलिंग आणि फिल्डिंग या इतर दोन बाजूंतही प्रावीण्य संपादण्यासाठीं तेवढीच मेहनत घ्या. या तीन्ही अंगांपैकीं फिल्डिंग अथवा क्षेत्ररक्षणाच्या बाजूचें काम होतकरू खेळाडूला कांहींसें कंटाळवाणें वाटत असतें. पण संघाच्या दृष्टीनें तेंच सर्वांत महत्त्वाचें असल्यामुळें प्रत्येक खेळाडू या खेळाच्या कोणत्या अंगांत विशेष तरबेज असणें जरूरीचें असेल, तर तें या क्षेत्ररक्षणाच्या बाबतींतच होय.

आमच्या लहानपणीं जो क्रिकेट खेळला जात असे, त्यांत फिल्डिंगच्या या अंगाला विशेषसें महत्त्व देण्याची प्रवृत्ति नव्हती. परक्या युरोपियन संघाची व आमची गांठ पडत असे त्या वेळीं आमच्या खेळाडूंना हा दुर्गुण फार मारक होत असे. अजूनही फिल्डिंगच्या अंगाचें हें महत्त्व खेळाडूंच्या मनावर ठसविण्याचा व्हावा तसा प्रयत्न होत नाहीं; आणि

खेळाडूंना या महत्त्वाची जाणीव करून दिली तरी त्यासाठीं योग्य तीं मेहनत घेण्याचा ते बहुशः कंटाळाच करीत असतात असा अनुभव आहे. प्रॅक्टिस नेटमध्यें बोलिंग व बॅटिंग यांचीच प्रॅक्टिस खेळाडू बहुधा घेत असतो; तेवढी प्रॅक्टिस संपली कीं फिल्डिंग म्हणून क्रिकेटच्या खेळाचें तिसरें तितकेंच महत्त्वाचें अंग आहे, याची त्याला दादही असल्याचें दिसत नाहीं ! फिल्डिंगचें हें महत्त्व मला स्वतःला ऑक्स्फर्ड ऑथेंटिक्स या नांवाचा जो युरोपियन संघ मुंबईंत सामने खेळण्यासाठीं १९०२ च्या सुमाराला आला होता, त्या वेळीं त्या संघाचा खेळ -पाहून पटून आलें. ह्या संघाचे मुंबईंत तीन सामने झाले; त्यांपैकीं पहिला सामना येथील युरोपियन संघाविरुद्ध झाला. त्यांत त्यावेळचे प्रसिद्ध युरोपियन खेळाडू कर्नल ग्रेग यांनीं २०४ नाबाद धांवा करून ऑक्स्फर्ड ऑथेंटिक्सला हार घ्यावयास लावली. ऑक्स्फर्ड संघाचा दुसरा सामना हिंदु जिमखान्याविरुद्ध झाला, तो अनिर्णीत राहिला. पण पारशी संघानें मात्र त्यांचा ८ विके- ट्सनीं पराजय केला. ऑक्स्फर्ड ऑथेंटिक्स संघाला याप्रमाणें मुंबईंत एकही सामना जिंकतां आला नाहीं खरा; पण एका बाजूंत हा संघ त्याच्या प्रतिपक्ष्यापेक्षां केव्हांही सरसच होता. ही बाजू म्हणजे फिल्डिंगची ! या संघांतील खेळाडूंचें क्षेत्ररक्षण अत्यंत कौतुकास्पद असें होतें. कितीही वेग- वान् चेंडू असो, ते गडी अगदीं सहज चपलतेनें तो हस्तगत करून ठरीव विकेटकडे तत्काळ फेकीत असत. कव्हर पॉइंटवरील खेळाडूनें तर अप्र- तिम क्षेत्ररक्षण केलें. गोलंदाजाच्या हातचा चेंडू सुटतांच हाही गडी चेंडू अडविण्यासाठीं तत्काळ हालचाल करी आणि चेंडू अचूक त्याच्या हातांत येई. या खेळाडूंच्या क्षेत्ररक्षणपद्धतीचा माझ्या मनावर बराच परिणाम झाला; आणि इतकें कौशल्य तरी आपल्या अंगीं यावयास हवेंच हवें, असें माझ्या मनानें घेतलें.

ऑक्स्फर्ड ऑथेंटिक्सचा हा दौरा माझ्या स्मरणांत राहून गेला आहे त्याचें दुसरें एक कारण म्हणजे त्या संघांतील एक गोलंदाज अंडरहॅंड बोलिंग करीत असे हें होय. 'अंडरहॅंड' बोलिंग क्रिकेटच्या या अशा सामन्यांत चालूं शकतें. ( क्रिकेटच्या नियमानुसार आणि बळी घेण्याच्या दृष्टीनेंही ) ही कल्पना त्या वेळपर्यंत मला नव्हती. त्यामुळें मला त्या गोलं-

दाजाच्या करामतीचें बरेंच कौतुक वाटलें. या गोलंदाजाचें नांव लॉकवूड असें असावें असें मला स्मरतें. त्यानें त्या सामन्यांत विकेटसही घेतल्या. त्याची बोलिंगची पद्धति पाहून हिंदु जिमखान्याचे खेळाडू श्री. कीर्तिकर यांनींही या संघाविरुद्ध सामना चालू असतां त्यांत तशाच पद्धतीनें दोन तीन ओव्हर्स टाकल्या. अर्थात् केवळ प्रयोगासाठीं केलेल्या त्या पहिल्याच प्रयत्नांत त्यांना तसेंच यश मिळूं शकलें नाहीं, हें सांगावयास नकोच !

माझें पहिलें कप्तानपद


ऑक्स्फर्ड संघाचे हे सामने १९०२-३ सालीं झाले. त्या वेळीं माझें वय सुमारें पंधरा-सोळा वर्षांचें होतें. परकी युरोपियन संघाचा माझ्या पाहण्यांतील हा पहिलाच दौरा होय. या वेळीं येथील एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें मीं शिकत होतों. या हायकूल्लांत माझा प्रवेश व्हावयाला मुख्य कारण क्रिकेट हेंच झालें. या हायस्कूलांत प्रवेश करण्यापूर्वीं मी रॉबर्ट मनी स्कूलचा विद्यार्थी होतों. रॉबर्ट मनी स्कूलमध्यें मीं सुमारें दीड-दोन वर्षें असेन. त्या वेळीं साधारणपणें सीझनमध्यें दर रविवारीं व सुट्टीच्या दिवशीं आमचे किरकोळ सामने व्हावयाचे. या सामन्यांमुळेंच मनी स्कूलचा फास्ट बोलर म्हणून विद्यार्थीवर्गांत माझी प्रसिद्धि झाली होती व त्यावरूनच एल्फिन्स्टन हायस्कूलच्या क्रिकेट टीमचे त्यावेळचे कॅप्टन श्री. के. ए. दाते यांचा व माझा परिचय व स्नेह जडला. एल्फिन्स्टन हायस्कूलच्या टीममध्यें माझा समावेश झाल्यास तो संघ अधिक बलवान् होईल असें दाते यांना वाटलें आणि त्यांनीं मला आग्रह करून त्या शाळेत माझें नांव दाखल करण्यास भाग पाडलें. श्री. दाते वरच्या वर्गांत शिकत होते; पण त्यामुळें आमच्या स्नेहांत खंड पडला नाहीं. या शाळेंत मी प्रवेश केला त्याच वर्षीं मला शाळेच्या ज्यूनियर टीममधून खेळण्याची संधि मिळाली. त्या वर्षीं बोलिंग व बॅटिंग या दोन्ही बाजूंकडे शाळेच्या सामन्यांत माझा प्रभाव पडल्यामुळें पुढच्याच वर्षीं शाळेच्या टीमचें नेतृत्वही माझ्याकडेच सोंपविण्यांत आलें. संघाच्या कप्तानपदाची जबाबदारी पत्करण्याचा पहिला विशेष असा प्रसंग मला आला, तो या वेळींच होय आणि ही जबाबदारी पार पाडण्यांत सुदैवानें मला चांगलेंच यशही मिळूं शकलें. माझ्या नेतृत्वाखालीं एल्फिन्स्टन हायस्कूलला त्या वर्षीं शील्ड

मिळालें. आणि शाळांच्या सामन्यांतील एक मोठा विजय मी संपादन करूं शकलों.

'मिलिटरी वि. सिव्हिलियन'

परंतु हा विजयही कांहीं सहज एकाद्या दुसऱ्या वर्षाच्या क्रिकेटच्या अभ्यासानें संपादन करतां आला नव्हता, हें येथें सांगणें अवश्य आहे. क्रिकेटची माझी उपजत आवड व त्या जोडीला, ज्या ज्या वेळीं संधि मिळूं शकली, त्या त्या वेळीं हा शौक पुरवून घेण्यासाठीं मीं केलेली धडपड यांचेंच हें फळ होतें असेंच मीं म्हणूं शकतों. अर्थात् आमच्या लहानपणीं ही हौस पुरवून घेण्याच्या संधीचा व साधनांचा बहुशः अभावच असे, हेंही सांगणें जरूर आहे. अगदीं आरंभीं मीं जी क्रिकेटची बॅट हातीं घेतली, ती म्हणजे एक साधें लांकडाचें फळकूटच होतें; त्याच्या जोडीला त्याच बॅटीला साजेसा चिंध्यांचा चेंडू आमची चेंडूची गरज भागवूं शकत असे! पुणें येथें लष्करमध्यें मिलिटरी कँपच्या बाजूला एका लहानशा घरांत आम्हीं त्या वेळीं राहत होतों. माझे वडील १८८० च्या सुमारास मिलिटरीमधून पेन्शन घेऊन या ठिकाणीं राहावयास आले होते, आणि या ठिकाणींच १८८६ सालीं ता. १ जानेवारी रोजीं माझा जन्म झाला. आमच्या कुटुंबांत त्या वेळीं वडील व मातुःश्री यांजखेरीज माझे दोघे बंधु रा. बाळू व कै. शिवराम व एक बहीण अशीं आम्ही पांचसहा माणसें होतों. १८९३ च्या सुमारास मी प्रथम शाळेंत जाऊं लागलों. प्रथम मला मिलिटरीच्या स्कूलमध्यें जावें लागलें व नंतर पुढें सिव्हिल शाळेमध्यें प्रवेश मिळाला. वर उल्लेखिल्या-प्रमाणें 'चेंडूफळी'चा आमचा खेळ याच सुमारास सुरू झाला. तेवढ्या सामग्रीनिशीं आम्ही आपसांत सामनेही खेळत असूं. विशेषतः मिलिटरींतल्या शिपायांचीं मुलें व आमच्यासारखीं सिव्हिलियनांचीं मुलें यांच्यामध्यें 'मिलि-टरी विरुद्ध सिव्हिलियन' असे आमच्या बालपणाच्या दृष्टीनें मोठे चुरशीचे सामने व्हावयाचे! यानंतर इंग्रजी शिक्षणाकरितां पंचहौद मिशनशेजारीं असलेल्या दामोदर हायस्कूलमध्यें जाऊं लागलों. सुमारें पन्नास वर्षांपूर्वींची ही गोष्ट आहे. अर्थात् त्या वेळीं जातिभेदाचें प्रस्थ किती होतें याची नव्यानें कल्पना करून द्यावयास नकोच! दलितवर्गातील लोकांना शिक्षणाबाबत

बऱ्याच अडचणी सहन कराव्या लागत; पण दामोदर हायस्कूलचे चालक श्री. आपटे व त्याच शाळेंतील दुसरे एक शिक्षक श्री. आगाशे यांच्या प्रगमनशील विचारांमुळें व सौजन्यपूर्ण वागणुकीमुळें सदर शाळेत प्रवेश मिळण्यास व इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीनें अभ्यासक्रम चालविण्यास मला मुळींच अडचण पडली नाहीं. पुण्यांत त्या वेळीं शाळांशाळांमध्यें सामने होत असत, पण ते अगदीं तुटपुंज्या सामग्रीनिशीं; आणि क्रीडांगणांच्या बाबतींतील परिस्थिति तर अगदींच केविलवाणी असे. तरीही तशा परिस्थितींतही या खेळाची हौस भागवून घेण्याचा एकही मोका मीं वायां जाऊं दिला नाहीं. परंतु माझ्या खेळाला पुणें येथें असतांना योग्य अशी दिशा अथवा पुरेसा अवसरही मिळूं शकला नाहीं. ही संधि मीं मुंबईंत येऊन राहूं लागल्यानंतर मिळाली. पुणें मला यानंतर लवकरच सोडावें लागलें. १८९६–९७ सालीं प्लेगनें पुण्याला कहर करून सोडला, आणि त्यामुळें पुण्याला कायमचा रामराम ठोकून आम्ही सर्वचजण मुंबईंत राहावयास आलों.



'आम्हीं पांच पालवणकर'

उभे : विठ्ठल, कृष्णा

बसलेले : बाळू, गणपत, शिवराम



बाळू व शिवराम



## आम्हीं पांच पालवणकर

क्रिकेटच्या खेळांतील पहिले धडे तुम्हांला कोणाकडून मिळाले असा प्रश्न मला केव्हां केव्हां विचारला जातो. या प्रश्नाचें उत्तर मला बहुतांशीं नकारार्थीच, म्हणजे हे पहिले धडे मला कोणाकडूनही मिळाले नाहींत, असेंच द्यावें लागेल. क्रिकेटच्या किंवा इतर कोणत्याही मैदानी खेळांतील पहिले धडे मिळण्याचें मुख्य ठिकाण म्हणजे अर्थातच शाळा-कॉलेजें हें होय. पण आमच्या वेळच्या बहुतेक शाळांची खेळांच्या बाबतींतील परिस्थिति मुळींच समाधान-कारक नसे. खेळांचें साहित्यही अपुरेंच आणि विद्यार्थ्यांना खेळाच्या बाबतींत उत्तेजन देणें हें आपल्या कर्तव्यापैकीं एक आवश्यक कर्तव्य आहे ही जाणीव त्यावेळच्या शिक्षकांना व पालकांनाही बहुधा नसेच. त्यांतल्या त्यांत, ज्या शाळा युरोपियन मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखालीं चालत असत, त्यांची स्थिति

या बाबतींत इतरांच्या मानानें थोडीशी बरी असे. खेळाची उपजत आवड व हौस असलेल्या विद्यार्थ्याला या खेळांचें तेथें योग्य असें शिक्षण जरी मिळूं शकलें नाहीं, तरी निदान आपली हौस पुरवून घेण्याची सोय व सवड थोडीफार तेथें मिळूं शकत असे आणि एकाद्या विद्यार्थ्यानें या बाजूकडे विशेष कांहीं तेज दाखविलें, तर तें गौरवाभावीं अगदींच वायां जात नसे. पुण्याहून मुंबईला आल्यावर शाळांच्या बाबतींत तरी या दृष्टीनें मी सुदैवीच ठरलों असें म्हटलें पाहिजे. रॉबर्ट मनी स्कूल, एल्फिन्स्टन हायस्कूल व (भर्डा) न्यू हायस्कूल या तीन शाळांत माझें मॅट्रिक-पर्यंतचें शिक्षण झालें. या तीन्ही शाळांत शिक्षकवर्ग व विद्यार्थी यांना क्रिकेटबद्दलची आवड होती, व क्रिकेटच्या साधनांची सोयही बऱ्यापैकीं होती. पण यापलीकडे, क्रिकेटसाठीं खास 'कोच' अथवा वस्ताद नेमून खेळाडूंना या खेळाचें शास्त्रोक्त शिक्षण देण्याचा उपक्रम या शाळांत अथवा इतर ठिकाणींही त्या वेळीं कोठेंच झाला नव्हता. यामुळें खेळाडूला या खेळांच्या पायाशुद्धतेसाठीं जे कांहीं प्राथमिक धडे मिळणें अवश्य आहे, ते त्या वेळीं मिळण्याची बहुधा पंचाईत असे. स्वतःच्या परिश्रमानें व अभ्यासानें खेळाडू जें कांहीं संपादन करील, तेवढेंच! मींही या परिस्थितींतच खेळत होतों; यामुळें अर्थात्च मलाही या खेळाची जी कांहीं कला अवगत करतां आली, ती प्रामुख्यानें माझ्या अभ्यासाच्या जोरावरच होय. आमच्या वेळच्या निरनिराळ्या मोठ्या खेळाडूंचा खेळ पाहणें व त्यांच्या खेळाची मख्खी लक्षांत घेऊन स्वतःचा खेळ सुधारण्याचा प्रयत्न करणें हेंच या खेळाच्या बाबतींत मला मिळालेलें मुख्य शिक्षण किंवा पहिले मुख्य धडे होत.

माझे गुरु

पण एवढ्यानेंच सुरुवातीच्या प्रश्नाचें उत्तर पूर्णपणें दिल्यासारखें होत नाहीं. आणि पृच्छकाचेंही तेवढ्यानें समाधान होऊं शकणार नाहीं, हेंही मी जाणून आहें. कारण पृच्छक हा प्रश्न करीत असतो, त्या वेळीं त्याच्या डोळ्यांपुढें साधारणपणें कोणत्या कल्पना उभ्या राहिल्या असतील, हें जाणणें कांहीं कठीण नाहीं. मी क्रिकेटचे धडे घेऊं लागलों होतों, त्या वेळीं

माझे पितृतुल्य ज्येष्ठ बंधु रा. बाळू हे हिंदुस्थानांतील एक नामांकित बोलर म्हणून प्रख्याति पावले होते. आणि माझे दुसरे बंधु कै. शिवराम यांच्याही क्रीडापटुत्वाबद्दलचा बोलबाला झालेला होता. त्यांचीच परंपरा मी पुढें चालवीत होतों; साहजिकच त्यांच्या तालमींत मी सुरुवातीपासून वाढलेला असेन व त्यांच्याकडूनच मला या खेळाचे प्राथमिक धडे मिळाले असले पाहिजेत अशीच कोणाचीही समजूत असणें स्वाभाविकच आहे. आणि ही समजूत कांहीं मर्यादेपर्यंत खरीही आहे; पण दुर्दैवानें ती सर्वस्वी मात्र खरी नाहीं. कारण आमच्या परिस्थितीमुळें सुरुवातीला कांहीं वर्षें या दोन्ही बंधूंच्या सहवासाचा लाभ मला फारसा मिळूं शकला नाहीं, आणि पुढें तो मिळाला तरी जातीनें मला ह्या खेळाचे धडे देण्याइतकी सवड त्यांच्या व्यवसायामुळें त्यांना मिळत नसे. त्यामुळें केवळ शाब्दिक सूचनांवर व उत्तेजनावर शिकवण्याचें हें काम भागवून घ्यावें लागे. तथापि या सूचनांचाही मला अत्यंत बहुमोल उपयोग झाला, हें येथें सांगणें अवश्य आहे. रा. बाळू यांनीं या खेळाचा प्रात्यक्षिक व तात्त्विक अशा दोन्ही दृष्ट्या कसून अभ्यास केला होता. बोलिंगमध्यें तर त्यांनीं अतिशय पारंगतता संपादन केली होतीच; पण त्या अभ्यासांत बॅटिंगच्याही खांचाखोंचा त्यांना अवगत झाल्या होत्या. त्यांच्या या ज्ञानाचा व अनुभवाचा आम्हां सर्व बंधूंना वेळोवेळीं फारच उपयोग होई आणि या दृष्टीनें पाहतां तेच माझे या खेळांतील खरे गुरु होत असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

## बॅाय-बोलर

रा. बाळू यांच्या क्रिकेटमधील प्रावीण्यामुळें या खेळांतील आमचा मार्ग बराच सुकर होऊं शकला. पण खुद्द त्यांना मात्र ही विद्या फार कष्टसायास करूनच संपादावी लागली. त्यांनीं या खेळासाठीं केलेल्या या तपस्येची अल्प माहिती येथें जातां जातां देणें अप्रस्तुत होणार नाहीं. रा. बाळू हे माझ्यापेक्षां दहा वर्षांनीं वडील आहेत. १८७६ सालीं धारवाड येथें त्यांचा जन्म झाला. आम्हीं पालवणकर मूळचे कोंकणांतले. रत्नागिरी जिल्ह्यांतील पालवण हें आमचें गांव. पण आमचे वडील व आजोबा यांनीं लष्करी खात्यांत नोकरी धरल्यामुळें त्या निमित्तानें निरनिराळ्या दूरच्या गांवीं जाऊन राहणें

भाग झाले. रा. बाळू व कै. शिवराम या दोघांनाही प्राथमिक शिक्षणासाठीं मिलिटरी स्कूलमध्येंच दाखल व्हावें लागलें. क्रिकेटच्या खेळाशीं उभयतांची प्रथम ओळख झाली ती मिलिटरींतील युरोपियन अंमलदारांचा खेळ पाहूनच ! युरोपियन जिमखान्यावर सामने सुरू असले कीं वडिलांच्या धाकाचीही पर्वा न करतां हा खेळ पाहण्यांतच ते दंग होऊन जात. युरोपियनांचा हा खेळ पाहून लष्करांतील पेन्शनरांच्या मुलांनींही क्रिकेटचें जुनें साहित्य जमवून एक क्लब स्थापन केला आणि येथेंच रा. बाळू यांनीं बोलिंगची प्रथम संवय केली. यापुढें मग पारशी जिमखान्यावर "अंडरहँड बोलर" म्हणून महिना ३ रु. पगारावर त्यांना नोकरी मिळाली. येथें ग्राउंड बॉयचेंही काम त्यांना करावें लागे. या क्लबांत पांच वर्षें नोकरी केल्यावर पुना व्हॉलंटियर्स जिमखान्यावर त्यांना बोलिंग टाकण्याच्या कामासाठीं ४ रु. पगारावर घेण्यांत आलें. आणि त्यांच्याबरोबरच कै. शिवराम यांनाही येथें रु. ३ पगारावर नोकरी मिळाली. येथें असतांना पुणें जिमखान्यावर युरोपियनांचा एक महत्त्वाचा सामना व्हावयाचा होता. त्या सामन्यापूर्वीं युरोपियन खेळाडूंना प्रॅक्टिसकरितां रा. बाळू हे बोलिंग टाकीत होते. पुना जिमखान्याचा कॅप्टन ट्रॉस याचें लक्ष त्यांच्या बोलिंगकडे वेधलें आणि त्यानें त्यांना महिना पंधरा रुपये पगार देऊं करून पुना जिमखान्यावर बोलिंग टाकण्यासाठीं मुद्दाम बोलावून घेतलें. त्या वेळीं बार्टन या नांवाचा डावखोरा मंदगति बोलर युरोपियन खेळाडूंत फार प्रसिद्ध होता. त्याची बोलिंगची पद्धति पाहून त्याच्यासारखीच बोलिंग टाकण्याचा रा. बाळू यांनीं प्रयत्न आरंभिला. ती तऱ्हा त्यांना अल्पावकाशांत चांगलीच साध्यही झाली. पण तेवढ्यावरच संतुष्ट न राहतां, कोणत्या तऱ्हेच्या बॅटस्मनला कोणत्या तऱ्हेनें चेंडू टाकला कीं चीत करतां येईल याचे स्वतःच्या निरीक्षणानें व प्रयोगांनीं त्यांनीं कांहीं आराखडे बसविले आणि त्यांचाही यशस्वी उपयोग ते करूं लागले. पुना जिमखान्यावरील नोकरीमुळें त्या वेळच्या अनेक नामांकित युरोपियन क्रिकेटपटूंना बोलिंग करण्याची संधि त्यांना मिळाली; आणि त्याच्या प्रयोगांना उत्तम क्षेत्र मिळूं शकलें. त्या वेळचा हिंदुस्थानांतील सर्वांत उत्कृष्ट युरोपियन बॅट्समन व हॅम्पशायरचा प्रसिद्ध खेळाडू मेजर ग्रेग हा तर रोज इतरांपेक्षां एक तास मुद्दाम लवकर

येउन रा. बाळूंच्या बोलिंगवर प्रॅक्टिस करीत असे. या सुमारास रा. बाळू व शिवराम या दोघांही बंधूंनीं लष्करांत सेकंड ग्रेनेडियर पलटणींत सोल्जर क्लार्क म्हणून नोकरी पत्करली होती. या णप नोकरीमुळें बाळूंनीं जिमखान्यावरील बोलिंगच्या प्रॅक्टिसमध्यें मुळींच खंड पडूं दिला नव्हता.

## पुना हिंदु क्लब

त्या वेळीं पुण्यांत यंग मेन्स हिंदु क्लब या नांवाचा एक नामांकित क्रिकेट क्लब होता. भिडे, दिवेकर, परांजपे, बापट, दाते वगैरे पुण्यांतील त्या वेळचे उत्कृष्ट क्रिकेटपटु या क्लबांत होते. याखेरीज नरसण्णा वगैरे कांहीं तेलगु जातीचेही खेळाडू त्यांत होते. या क्लबांत केवळ अस्पृश्य म्हणून रा. बाळूंना प्रवेश मिळूं शकत नाहीं हें कळतांच मेजर ग्रेग यानें स्वतःच्या सहीनें वृत्तपत्रांत एक लेख लिहून या क्लबाच्या जात्यंध धोरणावर सडकून टीका केली, व केवळ या संकुचित धोरणामुळें हिंदु संघ एका उत्कृष्ट बोलरला गमावून बसत आहे, याबद्दल हिंदूंना त्यानें दोषही दिला. या पत्राचा परिणाम झाल्यामुळेंच कीं काय बाळूंना क्लबमध्यें घेण्याबाबतचा निर्णय करण्यासाठीं क्लबाच्या सभासदांची एक खास सभा बोलावण्यांत आली. पण जातिभेदाची पकड सभासदांच्या मनावर इतकी होती कीं या सभेंतही बहुमत रा. बाळूंच्या विरुद्धच पडलें ! अखेरीस तेलगू खेळाडूंनीं, रा. बाळूंना न घेतल्यास आपण राजिनामा देऊं अशी निर्वाणीची भाषा काढतांच केवळ नाइलाजानें रा. बाळूना क्लबांत घेण्याचा ठराव मंजूर झाला. आणि पुण्याच्या हिंदु संघांत अशा रीतीनें रा. बाळूंचें नांव दाखल झालें. मेजर ग्रेग यांनीं म्हटल्याप्रमाणें बाळूंच्या सभासदत्वाचा पुना यंग मेन्स हिंदु क्लबाला फार फायदा झाला. क्लबच्या संघांत त्यांचा समावेश झाल्यानंतर गणेशखिंड संघ व पुना जिमखाना या युरोपियन संघांशीं क्लबचे महत्त्वाचे सामने झाले आणि त्या दोन्ही सामन्यांत रा. बाळू यांच्या बोलिंगच्या करामतीमुळें क्लबला विजय मिळूं शकला. लहानसहान क्लबांवर तर हा क्लब सहज मात करूं शके. बाळू व भिडे हे या क्लबाचे दोन प्रमुख गोलंदाज असत आणि त्यांच्या गोलंदाजीपुढें प्रतिपक्षाचा सहज धुव्वा उडत असे. कांहीं काल पुना हिंदु क्लबाचें नांव या द्वयीमुळें सर्वतोमुखीं गाजून राहिलें होतें.

### रानडे–टिळकांनीं केलेला गौरव

मुंबई–पुण्याखेरीज साताऱ्याला युरोपियन क्रिकेटपटूंचा त्या वेळीं बराच भरणा होता. सातारा जिमखाना संघांत त्या वेळीं डिआस, मार्टिन, विंग्रॅम, विल्किन्स वगैरे त्यावेळचे नामांकित युरोपियन क्रिकेटपटु होते. त्यांनीं पुना यंग मेन्स क्लबाला या अजिंक्य म्हणून मानलेल्या जिमखान्याशीं सामना देण्यासाठीं आमंत्रण दिलें आणि त्यांच्याच प्रयत्नानें हा सामना घडून आला. रा. बाळू यांना बोलिंग करणें अवघड व्हावें म्हणून जिमखान्याच्या खेळाडूंनीं एक आठवडाभर रूळ चालवून पीच कठीण करून ठेवलें होतें. पण इतकी काळजी घेऊनही बाळू यांच्या बोलिंगपुढें युरोपियनांचा या सामन्यांत टिकाव लागूं शकला नाहीं. अवघ्या ८४ धांवांत सारे खेळाडू बाद झाले व त्यांपैकीं ७ विकेट्स् रा. बाळू यांनीं घेतल्या होत्या. पुणें संघाचा या सामन्यांत विजय झाला आणि हा विजय संपादण्याला कारण झाल्याबद्दल न्या. मू. रानडे यांनीं रा. बाळू यांच्याशीं जाहीर सभेंत हस्तांदोलन करून त्यांचा अभिनंदनपूर्वक गौरव केला. स्पर्शास्पर्श विचाराचा पगडा त्या काळच्या हिंदु समाजावर फार असल्यामुळें या प्रसंगानेंही सनातनी मंडळींत त्या काळीं बरीच खळबळ उडवून दिली होती.

तथापि गुणाची कदर खऱ्या गुणग्राहकांकडून त्या वेळींही झाल्यावांचून राहत नसे, हेंही या प्रसंगावरून दिसून येतें. एका थोर राष्ट्रीय पुढाऱ्यांकडून गौरविलें जाण्याचें भाग्य रा. बाळू यांना वरील प्रसंगाशिवाय आणखीही एका दुसऱ्या प्रसंगीं लाभलें. रा. बाळू यांनीं नोकरीनिमित्त पुणें सोडलें, त्या वेळीं त्यांना निरोप देण्यासाठीं एक छोटासा समारंभ पुणेकर मंडळींनीं घडवून आणला होता. त्या समारंभांत कै. लोकमान्य टिळक यांनीं रा. बाळूंना स्वहस्तानें हार घालून त्यांच्या क्रिकेटमधील यशाबद्दल त्यांचें जाहीर अभिनंदन केलें. हाही त्यांच्या आयुष्यांतील एक मोठा संस्मरणीय असाच प्रसंग घडला.

पण स्पर्शास्पर्शविचारांच्या अपमानास्पद वागणुकीला यानंतरही त्यांना अनेकदां तोंड द्यावें लागलें. पुण्याहून मुंबईला त्यांची पलटण आल्यामुळें त्यांचीही बदली मुंबईला झाली; त्या वेळीं येथील हिंदु जिमखान्याचे कॅप्टन

कीर्तिकर यांनीं रा. बाळूंना खास बोलावून नेऊन जिमखान्याचे सभासद करून घेतलें. पण येथेंही खाण्यापिण्याच्या वेळीं त्यांचें ग्लास–ताट प्रथम निराळें ठेवण्यांत येऊं लागलें. ही तऱ्हा आपल्याला सहन होणार नाहीं असें रा. बाळू यांनीं सांगितल्यावर मग इतरांच्या बरोबरीनें त्यांना याही बाबतींत वागविण्यांत येऊं लागलें. ह्या गोष्टीचा येथें मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण असें कीं रा. बाळू यांनीं जिमखान्यांतील ही अडचण दूर करून घेतल्यामुळें पुढें आम्हां इतर बंधूंना त्या प्रकारचा त्रास केव्हांच भासूं शकला नाहीं. अर्थात् जातिभेदाची ही अडचण इतर कांहीं महत्त्वाच्या बाबतींत पुढें आल्यावांचून राहिली नाहीं; पण नेहमींच्या वागणुकीच्या बाबतींत तरी रा. बाळू यांनीं केलेल्या झगड्यामुळें हा त्रास कमी झाला यांत शंका नाहीं.

प्रभावाचा काल

मुंबईला आल्यावर रा. बाळू यांनीं क्रिकेटसंबंधींचीं पुस्तकें मिळवून बोलिंगच्या विषयाचा तात्त्विक ( *theory* ) बाजूनें विशेष अभ्यास केला. या पुस्तकांत सांगितलेल्या कांहीं कांहीं युक्त्यांचा त्यांनीं स्वतःच पूर्वी प्रयोग करून पाहिलेला होता- पण या नव्या वाचनानें या व इतर युक्त्यांची त्यांना विशेष माहिती होऊं शकली आणि आपल्या बोलिंगची परिणामकारकता वाढविण्यांत या वाचनाचा त्यांना बराच उपयोग झाला. १९०० ते १९१० पर्यंतचा काल हा रा. बाळू यांच्या बोलिंगच्या प्रभावाचा सर्वांत यशस्वी काल होय. 'हॅट्रिक' ची करामत त्यांनीं या कालांत अनेकदां करून दाखविली आहे आणि एका डावांत दहाही विकेट्स् घेण्याचें श्रेयही संपादन केलें आहे. वाय्. एम. सी. ए. क्लबविरुद्ध त्यांनीं एका सामन्यांत दहाही विकेट्स् घेतल्या होत्या, तो सामना माझ्या अजून स्मरणांत आहे. ऑक्सफर्ड ऑथेंटिक्सची टीम १९०२ सालीं मुंबईंत आल्याचा मीं यापूर्वी उल्लेख केला आहे. त्या टीमशीं झालेल्या हिंदु जिमखान्याच्या सामन्यांत रा. बाळू यांनीं ७ विकेट्स् घेतल्या होत्या. त्या काळांतील प्रेसिडेन्सी व तिरंगी सामन्यांत हिंदु संघाचे प्रमुख गोलंदाज नेहमीं तेच असत हें अर्थात्च

सांगावयास नकोच. पारशांचे प्रसिद्ध क्रिकेटपटु डॉ. एम्. इ. पावरी यांनीं त्यांना आपल्या क्रिकेटवरील पुस्तकांत 'हिंदुस्थानचे ऱ्होड्स्' म्हणून गौरविलें आहे व स्वत: ऱ्होडस् यांनीं विलायतेंत यॉर्कशायरच्या विरुद्ध चाललेल्या सामन्यांत त्यांची बोलिंग पाहून त्यांना जगांतील उत्कृष्ट बोलर्स-मध्यें तिसरा अनुक्रम दिला होता. पहिला ऑस्ट्रेलियाचा कार्टर, दुसरा इंग्लंडचा लिवलीन व तिसरे रा. बाळू असा हा अनुक्रम त्यांनीं लावला होता. इंग्लंडचे त्या वेळचे प्रसिद्ध बोलर बार्नस् यांनाही त्यांनीं या क्रमां-तून वगळून रा. बाळूंचा त्यांत समावेश केला होता, हें लक्षांत घेण्या-सारखें आहे.

रा. बाळू यांच्या बोलिंगच्या पद्धतींत सहजता हा चटकन लक्षांत येण्यासारखा मोठा विशेष होता. त्यांच्या हातांची हालचाल अगदीं सहज झाल्यासारखी दिसे, पण प्रत्येक बॉल विशिष्ट हेतूनें टाकलेला असे. मंदगति डावखोरे बोलर असें त्यांचें सर्वसाधारणपणें वर्णन केलें जात असे. पण गतींत वेळोवेळीं फरक करून कधीं कधीं तर मंदगतीचा आविर्भाव दाख-वीत असतांनाच मध्येंच एकदम जलद गतीनें चेंडू टाकून ते बॅटस्मनला घोटाळ्यांत पाडीत असत- 'राउंड दि आर्म' व 'ओव्हर आर्म' अशा दोन्हीं तऱ्हांनीं ते बोलिंग टाकूं शकत असत आणि लेग ब्रेक व ऑफ ब्रेक अशा दोन्हीं बाजूंनीं चेंडू वळविण्याची कला त्यांनीं साधलेली होती. अचूक पल्ला (लेंग्थ) साधण्यावर बोलिंगमध्यें विशेष भर दिला जातो. या बाबतींतही बाळूंची चेंडूवर पूर्ण हुकमत होती. नव्या चेंडूनें ते हटकून विकेट घेत. पण या सर्वांपेक्षांही बॅट्स्मनच्या खेळाची तऱ्हा पाहून त्याला कोणत्या रीतीनें फसवितां येईल, हें चटकन् ओळखण्याचें कसब त्यांना चांगलेंच साधलें होतें. कसलेल्या पट्टीच्या बॅट्स्मनशीं लढत होण्याचा प्रसंग येई, त्या वेळीं उभयतांमध्यें चाललेली झटापट पाहण्यासारखी असे. हस्तकौशल्याबरोबरच बुद्धिबलाचीही चढाओढ चालल्याचें तेथें दिसून येई. यामुळेंच विलायतेंत त्यांचें वर्णन करतांना 'डिसायडेडली "हेड" बोलर' असा त्यांचा निर्देश करण्यांत आला होता. याबाबत मला एक प्रसंग स्मरतो. आमच्या एका साम-न्यांत एक पट्टीचा बॅट्स्मन आउट कसा होईल याबद्दल आमची चर्चा चालू होती. रा. बाळू यांनीं, तो बॅट्स्मन ज्या बाजूला पूर्ण विश्वासानें खेळत आहे

त्याच बाजूला तो आउट होऊं शकेल असें मत व्यक्त केलें आणि झालेंही तसेंच. त्या बॅट्समनची जी प्रबल बाजू होती, तेथेंच तो अखेरीस फसून आउट झाला!

विलायतेस जाण्याचा योग

रा. बाळूंना बोलिंगमधील आपलें कौशल्य इंग्लंडमध्यें दाखविण्यास संधि मिळावी म्हणून त्यांना विलायतेला पाठविण्याचा बेत डॉ. पावरी व सर दोराब टाटा यांनीं चालविला होता. सरे काउंटीला एका स्लो लेफ्ट–हॅंड बोलरची गरज होती; त्या जागीं रा. बाळूंना पाठविण्यासाठीं ही खटपट चालू होती. रा. बाळूंची संमतिहो याबाबत घेण्यांत आली; पण मध्येंच कोठें तरी माशी शिंकली आणि हा बेत घरंगळला. पुढें एकदोन वर्षांनीं जानी मेहता या नांवाच्या पारशी खेळाडूला या योजनेचा फायदा मिळून त्याची रवानगी विलायतेला झाली. अशा रीतीनें ऐन 'फॉर्म' मध्यें असतां रा. बाळू यांना विलायतेला जाण्याचा आलेला मोका हुकला. हा योग पुढें १९११ सालीं पहिली प्रातिनिधिक हिंदी टीम विलायतेला रवाना झाली त्या वेळीं आला. पण यावेळीं त्यांच्या बोलिंगचें तेज ऐनभरांतल्याप्रमाणें राहिलें नव्हतें.

१९११ सालीं जो हिंदी क्रिकेट संघ विलायतेला पाठविण्यांत आला होता, त्यांत आम्हां बंधूंपैकीं रा. बाळू व कै. शिवराम या दोघांचाही समावेश करण्यांत आला होता. निवड समितीनें शिवराम यांना प्रथम राखीव खेळाडूंतच स्थान दिलें होतें; पण विलायतेला जाण्याकरितां ज्या पहिल्या १६ खेळाडूंना निमंत्रणें गेलीं होतीं, त्यांपैकीं काश्मीरचे प्रसिद्ध जलदगति गोलंदाज माणकचंद व बॅट्समन नूरइलाही हे दोघेही ऐन वेळीं येऊं न शकल्यामुळें संघ निघण्याच्या आदल्या दिवशीं सायंकाळीं पांच वाजतां शिवराम यांना विलायतेला निघण्याची तयारी करण्याविषयीं सूचना मिळाली. दुसऱ्या दिवशींच म्हणजे ता. ६ मे रोजीं पारशी जिमखान्यावर संघांतील सर्व खेळाडूंनीं एकत्र जमून निघावयाचें असें ठरलें होतें; त्यामुळें शिवराम यांना दोनचार तासांतच आपल्या विलायतेच्या प्रवासाची तयारी करून निघण्यासाठीं सिद्ध व्हावें लागलें. संघाला बोटीवर निरोप देण्याच्या वेळीं एक विचित्र प्रकार घडला. संघांतील सर्व खेळाडूंना हार घालून त्यांचा

सन्मान करण्यांत आला; पण या सन्मानांतून दोनच खेळाडूंना वगळण्यांत आलें आणि हे खेळाडू म्हणजे रा. बाळू व शिवराम हे होते. उच्चनीच-त्वाच्या वृत्तीमुळें म्हणा अथवा इतर कांहीं कारणामुळें म्हणा, हा जो प्रकार घडला, तो माझ्या उभय बंधूंना साहजिकच जाणवल्यावांचून राहिला नाहीं. पण या निरोपाच्या वेळीं साध्या फुलांचे हार त्यांच्या गळ्यांत पडूं शकले नाहींत, तरी विलायतेंत त्यांच्या कर्तृत्वामुळें त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षावच झाला ! आणि हा सन्मान खात्रीनें अधिक भूषणावह होता. रा. बाळू यांनीं हिंदी संघाची बोलिंगची बाजू इतक्या यशस्वीपणें सांभाळली, कीं हिंदी संघाची हीच बाजू तेवढी उत्तम आहे, असे उद्गार आर्. एच्. स्पूनर या त्या वेळच्या इंग्लंडमधील नांवाजलेल्या क्रिकेटपटूनें व चोखंदळ टीकाकारानें काढले. सर्व सामन्यांत मिळून सर्वांत अधिक विकेट्स् ( ११४ ) त्यांनींच घेतल्या; त्यांत सरासरीनें १८ धांवांना एक विकेट असें त्यांचें प्रमाण पडलें आणि त्यांत त्यांचाच अनुक्रम पहिला आला. पहिल्या प्रतीच्या सामन्यांत त्यांनीं ७५ विकेट्स् घेतल्या. संघांतील इतर गोलंदाजांपैकीं वॉर्डन यांनीं या सामन्यांत ४४, सलामउद्दीन यांनीं ३२ व वलसारा यांनीं २३ विकेट्स् घेतल्या होत्या. या पहिल्या प्रतीच्या सामन्यांत बाळू यांनीं ५०४ ओव्हर्स टाकल्या. दुसरा अनुक्रम ज्यांचा लागला, त्या वॉर्डन यांनीं ३२६ ओव्हर्स टाकल्या होत्या, यावरून रा. बाळू यांना बोलिंगचा हा भार अविश्रांतपणें कसा सहन करावा लागत होता, हें सहजींच दिसून येतें. ही अशी अविश्रांत मेहनत पडल्यामुळें त्यांच्या डाव्या खांद्याचा सायनोव्हिटीस (*Synovitis*)चा जुना विकार पुन्हां बळावला आणि अखेरीच्या कांहीं सामन्यांत त्यांना बोलिंग करणें कठीण पडूं लागलें. हा विकार या दौऱ्यापूर्वीं चारपांच वर्षें बोलिंगचा ताण सतत डाव्या हातावर पडल्यामुळें सुरू झाला होता व त्यामुळें एक वर्ष तर त्यांना बोलिंग करण्याचें सोडून देऊन विश्रांति घ्यावी लागली होती. या विश्रांतीनंतर त्यांनीं पुन्हां बोलिंग सुरू केली, पण दुखाव-लेल्या हातामुळें पूर्वीइतकाच त्यांच्या बोलिंगचा प्रभाव राहिला नव्हता. तरीही विलायतेंत हिंदुस्थाननें त्यांच्याविषयीं केलेल्या अपेक्षा त्यांनीं पूर्णपणें पार पाडल्या आणि हाताला त्रास पडत असतांही बहुतेक सामन्यांत बोलिंग टाकून संघाला बोलरची उणीव केव्हांही भासूं दिली नाहीं.

पिछाडीहून आघाडीवर

कै. शिवराम यांनीं तर या दौऱ्यांत सर्वांच्या अपेक्षेबाहेरच यश संपादन केलें. राखीव खेळाडू म्हणून त्यांचा संघांत समावेश झाला होता; पण संघाचा दौरा ज्या वेळीं पुरा झाला, त्या वेळीं या शेवटच्या नंबरावरून त्यांचें नांव पहिल्या दोन तीन नंबरांत झळकूं लागलें होतें आणि बॅटिंगच्या बाजूकडे तर, कर्नल मिस्त्री हे वगळल्यास ( आणि कर्नल मिस्त्री हे अवघ्या तीनच सामन्यांत खेळले होते ) पहिल्या प्रतीच्या सामन्यांतील धांवांच्या सरासरीमध्यें त्यांचाच अनुक्रम पहिला लागला होता. सर्वच सामने जमेला धरल्यासही कांगा व आर. पी. मेहेरोमजी या पट्टीच्या बॅट्स्मनखालोखाल शिवराम यांचेंच नांव धांवांच्या सरासरीमध्यें झळकत होतें. साऱ्या दौऱ्यांत व्यक्तिशः सर्वांत अधिक धांवा ( १७५ ) त्यांनींच केल्या हें शतक त्यांनीं लिंकनशायर विरुद्ध झालेल्या सामन्यांत काढलें होतें; पण त्यांनीं दुसरें शतक केलें तें सॉमर्सेट या पहिल्या प्रतीच्या संघाविरुद्ध होय. सॉमर्सेटचा हा सामना जिंकण्याचें बरेंचसें श्रेय कुचबिहारचे पारशी खेळाडू बजाना यांजखेरीज बाळू व शिवराम यांच्याकडेच जातें. हा सामना अतिशय चुरशीचा झाला. एका विकेटनें हा सामना हिंदी संघानें जिंकला ( पहिल्या प्रतीचे दोनच सामने या दौऱ्यांत संघानें जिंकले. त्यांतील हा एक होय. ) आणि या सामन्यांतील दुसऱ्या डावांत या संघानें ज्या २६५ धांवा केल्या, त्यांपैकीं शिवराम यांनीं ११३ ( नाबाद ) व बाळू यांनीं ५५ धांवा केल्या होत्या. सॉमर्सेटचा कॅप्टन जॉन डॅनियल यानें या सामन्याविषयीं अभिप्राय देतांना पुढील उद्गार काढले होते.

"*Bajana played a really fine start innings while Shivaram and Balu deserve great praise for their great effort in the second innings. Balu played extraordinarily well. Warden and Balu bowled very well...Balu is simply splendid—always trying.*"

शिवराम यांनीं या दौऱ्यांत वरील दोन सामन्यांखेरीज, यॉरिकशायर या त्या वर्षीच्या चॅम्पियन काउंटीविरुद्ध झालेल्या सामन्यांत ९१ धांवा काढल्या;

फॉस्टर व फिल्ड हे फास्ट बोलर या काउंटीमध्यें होते. या सामन्याविषयीं टाइम्स ऑफ् इंडिया पत्राचा क्रिकेटपटु बातमीदार ई. एच्. डी. सिवेल यानें लिहिलें होतें कीं,

*" Shivaram played Field better than any of the team have played fast bowling in their previous matches."*

याच सामन्यानंतर दुसऱ्या एका इंग्लिश क्रीडावार्ताहरानें हिंदी संघाच्या बॅटिंगबद्दल जे उद्गार काढले होते, तेही येथें निर्देश करण्यासारखे आहेत. तो लिहितो,

*" One unconsciously judges Indian cricket by Ranji's standard, but with the exception of the batting of Shivaram in the second innings which was reminiscent of the wilowy wristplay that Ranji used to delight us with, there was nothing to recall the great Indian cricketer."*

उत्कृष्ट क्षेत्ररक्षक

पण बॅटिंगपेक्षाही क्षेत्ररक्षणाबाबत शिवराम यांनीं या दौऱ्यांत विशेष लौकिक संपादिला. लँकेशायरविरुद्ध झालेल्या सामन्यांत वर उल्लेखिलेला प्रसिद्ध इंग्लिश बॅटस्मन स्पूनर याचा लाँगऑफवर पन्नास यार्डांवर धांवून येऊन त्यांनीं चपळाईनें घेतलेला झेल पाहून बॅटस्मनही स्तिमित झाला! ससेक्सविरुद्ध सामना चालू असतां प्रसिद्ध रेल्फ बंधूंपैकीं बॅट्स्मन म्हणून नांवाजलेला रॉबर्ट रेल्फ याचाही लाँग ऑनवर उडालेला झेल शिवराम यांनीं अशाच चपलतेनें पकडला होता! चेंडू अडवून तो विकेटकडे चपलतेनें फेकण्याच्या त्यांच्या कौशल्यामुळें हिंदी संघाला कैक धांवा वांचवितां आल्या.

उत्कृष्ट क्षेत्ररक्षण हें शिवराम यांच्या क्रिकेटगुणांपैकीं मुख्य वैशिष्ट्य होतें. किंबहुना हा गुण आम्हां सर्वच बंधूंना कमीअधिक प्रमाणांत साध्य होऊं शकला होता. आणि याचें कारण म्हणजे तितकें चापल्य अंगीं येण्या-

साठीं सुरुवातीपासूनच आम्हीं केलेली संवय हेंच होय. चपळपणा व जलद धांवण्याची संवय हे दोन गुण क्रिकेटरला माझ्या मतें अत्यावश्यकच आहेत. जलद हालचाल करतां आली नाहीं, तर कोणताही खेळाडू बॅट्स्मन म्हणून फारसें यश मिळवूं शकणार नाहीं; आणि क्षेत्ररक्षणांत तर तो कुचकामीच ठरेल! जलद धांवण्याच्या आमच्या अभ्यासामुळें मी व शिवराम या दोघांनाही सुरुवातीला नेहमीं ' लॅांग ' वर क्षेत्ररक्षणासाठीं ठेवण्यांत येई. अर्थात् इतर खेळाडूंकडून धांवण्याच्या बाबतींत दर्शविण्यांत येत असलेला कंटाळा व कुचराई हें एक याचें कारण होतेंच; पण तरी देखील यत्किंचितही आळस अथवा कुरकूर न करतां आम्हाला नेमून दिलेलें हें काम आम्ही तत्परतेनें आणि हौसेनें पार पाडत असूं. स्लिपमधील क्षेत्ररक्षकाइतकेंच किंबहुना त्यापेक्षांही अधिक महत्त्व लॅांगवरील क्षेत्ररक्षकाचें असतें, ही गोष्ट कांहीं कांहीं खेळाडूंना पटत नाहीं अथवा पटवून घेण्याचा ते प्रयत्न करीत नाहींत; पण संघनायकाला मात्र हें महत्त्व थोडयाशा अनुभवानें कळून येण्यास मुळींच उशीर लागत नाहीं. विशेषतः चार पावलें धांवतांना धांप टाकणारे, आणि बॅट्स्मनच्या नजीकच्या कांहीं स्थानांपलीकडे इतर ठिकाणीं ठेवल्यास प्रतिपक्षाला पुष्कळशा धांवांचा हटकून अहेर करणारे खेळाडू त्याच्या संघांत असले, म्हणजे लॅांगवरचा चपळ फिल्डर त्याला खरोखरच उपकारकर्ताच वाटूं लागतो. शिवराम, परदेशी, महाले यांसारख्या चपळ क्षेत्ररक्षकांचें महत्त्व कप्तानपदाची जबाबदारी वाहतांना मला स्वतःलाही अनेकदां फार वाटत असे, तेंही या अशाच तऱ्हेच्या परिस्थितीमुळें होय.

## क्रिकेट व हॅाकी

क्रिकेटप्रमाणेंच हॅाकीमध्येंही चपळाईची व धांवण्याची फार गरज असते. बॅटबॅाल हीं साधनें दोन्ही खेळांत असतात आणि मनगटांतील जोर व लवचिकपणा यांचा दोन्ही खेळांत फार उपयोग होत असतो. माझ्या स्वतःच्या अनुभवावरून मी असें म्हणूं शकतों कीं क्रिकेट व हॅाकी हे दोन्ही खेळ एकमेकांना पूरक आहेत. आम्ही चौघेही बंधु–बाळू, शिवराम, गणपत व मी—क्रिकेटप्रमाणेंच हॅाकीही खेळत असूं व त्या खेळांतही आम्हीं बरेंच प्रावीण्य संपादन केलें होतें. बॅाम्बे पायोनियर्स या

फॉस्टर व फिल्ड हे फास्ट बोलर या काउंटीमध्यें होते. या सामन्याविषयीं टाइम्स ऑफ् इंडिया पत्राचा क्रिकेटपटु बातमीदार ई. एच्. डी. सिवेल यानें लिहिलें होतें कीं,

"*Shivaram played Field better than any of the team have played fast bowling in their previous matches.*"

याच सामन्यानंतर दुसऱ्या एका इंग्लिश क्रीडावार्ताहरानें हिंदी संघाच्या बॅटिंगबद्दल जे उद्गार काढले होते, तेही येथें निर्देश करण्यासारखे आहेत. तो लिहितो,

"*One unconsciously judges Indian cricket by Ranji's standard, but with the exception of the batting of Shivaram in the second innings which was reminiscent of the wilowy wristplay that Ranji used to delight us with, there was nothing to recall the great Indian cricketer.*"

उत्कृष्ट क्षेत्ररक्षक

पण बॅटिंगपेक्षांही क्षेत्ररक्षणाबाबत शिवराम यांनीं या दौऱ्यांत विशेष लौकिक संपादिला. लँकेशायरविरुद्ध झालेल्या सामन्यांत वर उल्लेखिलेला प्रसिद्ध इंग्लिश बॅटस्मन स्पूनर याचा लाँगऑफवर पन्नास यार्डांवर धांवून येऊन त्यांनीं चपळाईनें घेतलेला झेल पाहून बॅटस्मनही स्तिमित झाला! ससेक्सविरुद्ध सामना चालू असतां प्रसिद्ध रेल्फ बंधूंपैकीं बॅट्समन म्हणून नांवाजलेला रॉबर्ट रेल्फ याचाही लाँग ऑनवर उडालेला झेल शिवराम यांनीं अशाच चपलतेनें पकडला होता! चेंडू अडवून तो विकेटकडे चपलतेनें फेकण्याच्या त्यांच्या कौशल्यामुळें हिंदी संघाला कैक धांवा वांचवितां आल्या.

उत्कृष्ट क्षेत्ररक्षण हें शिवराम यांच्या क्रिकेटगुणांपैकीं मुख्य वैशिष्ट्य होतें. किंबहुना हा गुण आम्हां सर्वच बंधूंना कमीअधिक प्रमाणांत साध्य होऊं शकला होता. आणि याचें कारण म्हणजे तितकें चापल्य अंगीं येण्या-

साठीं सुरुवातीपासूनच आम्हीं केलेली संवय हेंच होय. चपळपणा व जलद धांवण्याची संवय हे दोन गुण क्रिकेटरला माझ्या मतें अत्यावश्यकच आहेत. जलद हालचाल करतां आली नाहीं, तर कोणताही खेळाडू बॅट्स्मन म्हणून फारसें यश मिळवूं शकणार नाहीं; आणि क्षेत्ररक्षणांत तर तो कुचकामीच ठरेल ! जलद धांवण्याच्या आमच्या अभ्यासामुळें मी व शिवराम या दोघांनाही सुरुवातीला नेहमीं 'लॅांग' वर क्षेत्ररक्षणासाठीं ठेवण्यांत येई. अर्थात् इतर खेळाडूंकडून धांवण्याच्या बाबतींत दर्शविण्यांत येत असलेला कंटाळा व कुचराई हें एक याचें कारण होतेंच; पण तरी देखील यत्किंचित्ही आळस अथवा कुरकूर न करतां आम्हाला नेमून दिलेलें हें काम आम्ही तत्परतेनें आणि हौसेनें पार पाडत असूं. स्लिपमधील क्षेत्ररक्षकाइतकेंच किंबहुना त्यापेक्षांही अधिक महत्त्व लॅांगवरील क्षेत्ररक्षकाचें असतें, ही गोष्ट कांहीं कांहीं खेळांडूंना पटत नाहीं अथवा पटवून घेण्याचा ते प्रयत्न करीत नाहींत; पण संघनायकाला मात्र हें महत्त्व थोडयाशा अनुभवानें कळून येण्यास मुळींच उशीर लागत नाहीं. विशेषतः चार पावलें धांवतांना धांप टाकणारे, आणि बॅट्स्मनच्या नजीकच्या कांहीं स्थानांपलीकडे इतर ठिकाणीं ठेवल्यास प्रतिपक्षाला पुष्कळशा धांवांचा हटकून अहेर करणारे खेळाडू त्याच्या संघांत असले, म्हणजे लॅांगवरचा चपळ फिल्डर त्याला खरोखरच उपकारकर्ताच वाटूं लागतो. शिवराम, परदेशी, महाले यांसारख्या चपळ क्षेत्ररक्षकांचें महत्त्व कप्तानपदाची जबाबदारी वाहतांना मला स्वतःलाही अनेकदां फार वाटत असे, तेंही या अशाच तऱ्हेच्या परिस्थितीमुळें होय.

## क्रिकेट व हॅाकी

क्रिकेटप्रमाणेंच हॅाकीमध्येंही चपळाईची व धांवण्याची फार गरज असते. बॅटबॅाल हीं साधनें दोन्ही खेळांत असतात आणि मनगटांतील जोर व लवचिकपणा यांचा दोन्ही खेळांत फार उपयोग होत असतो. माझ्या स्वतःच्या अनुभवावरून मी असें म्हणूं शकतों कीं क्रिकेट व हॅाकी हे दोन्ही खेळ एकमेकांना पूरक आहेत. आम्ही चौघेही बंधु—बाळू, शिवराम, गणपत व मी—क्रिकेटप्रमाणेंच हॅाकीही खेळत असूं व त्या खेळांतही आम्हीं बरेंच प्रावीण्य संपादन केलें होतें. बॅाम्बे पायोनियर्स या

आमच्या हॉकी संघानें १९०८ सालीं आगाखान टूर्नमेंटमध्यें ऑल इंडिया चॅम्पियनशिप मिळविली होती. हिंदी टीमनें त्या टूर्नमेंटमध्यें मिळविलेली ही पहिलीच चॅम्पियनशिप होती. त्या वेळीं आम्ही चौघेही बंधु त्या सामन्यांत खेळलों होतों. हॉकीमधील खेळाडूंच्या जागा बहुधा ठरलेल्या असतात, त्याप्रमाणें आमच्या संघांत बाळू हे सेंटर फॉर्वर्डला असत, शिवराम इनसाइड राइट, गणपत इनसाइड लेफ्ट व मी राइट फुलबॅक अशा जागा आम्ही संभाळीत असूं. हॉकी खेळतांना खेळाडूंना परस्परांचें धोरण पटकन् उमगून घेऊन (ज्याला अंडरस्टँडिंग अशी इंग्रजींत संज्ञा दिली जाते) चेंडू चालवावा लागतो; सांघिक वृत्तीची येथें फार जरूरी असते. ही वृत्ति व हें 'अंडरस्टँडिंग' आमच्यामध्यें उत्तम जमून येत असे. क्रिकेटच्या खेळांत मी व शिवराम अशी आम्हां दोघांची जोडी बॅटिंग करीत असे, त्या वेळींही ह्याच वृत्तीचा प्रत्यय येई. अशी आमची जोडी पुष्कळ वेळां जमलेली आहे. यांपैकीं एकदोन प्रसंग मला विशेष स्मरतात. पतियाळाला रॉबिन्सन व ऱ्होड्स् अशा प्रसिद्ध गोलंदाजांविरुद्ध आम्ही खेळलों होतों, त्या वेळचा एक प्रसंग व सी. बी. फ्राय, ऱ्होडस् वगैरे प्रसिद्ध युरोपियन खेळाडू मुंबईंत खेळावयास आले होते, त्या वेळचा दुसरा प्रसंग. पहिल्या प्रसंगीं मी ९९ धांवा करून ऱ्होडस् यांच्या बॉलला आउट झालों होतों; शिवराम यांनीं त्या वेळीं ४५ पेक्षां अधिक धांवा केल्या नाहींत; पण त्यांनीं मला त्या वेळीं जो पाठिंबा (स्टँड) दिला, तो अविस्मरणीय होता. दुसऱ्या प्रसंगींही आमची जोडी उत्तम जमली होती. त्या प्रसंगीं याखेरीज शिवराम यांनीं सी. बी. फ्राय यांना 'शॉर्ट रन' घेतांना मिड ऑन वरून क्रिकेटवर अचूक चेंडू फेंकून पहिल्याच ओव्हरमध्यें रनआउट केलें होतें. हाही त्या सामन्यांत उल्लेखनीय प्रसंग घडला.

शिवराम हे माझ्यापेक्षां सुमारें तीन वर्षांनीं वडील होते. रा. बाळू यांच्याप्रमाणेंच त्यांनींही कांहीं काळ पूना जिमखान्यावर काम केल्यावर लष्करांत सोल्जरक्लार्क म्हणून नोकरी पत्करली. १९०१ च्या सुमारास त्यांच्या पलटणीची बदली महूला झाली व त्यांना व रा. बाळू या दोघांनाही पलटणीबरोबर महूला जावें लागलें. महूहून रा. बाळू यांनीं पलटणींतील

नोकरी सोडून बी. बी. अँड सी. आय्. रेल्वेंत नोकरी धरली. पण शिवराम यांची पुढें बदली होऊन त्यांना चीनमध्यें हाँगकाँगला जावें लागलें. तेथें कांहीं वर्षें काढल्यानंतर आजारी पडल्यामुळें ते मुंबईला परत आले. आणि मग ते जी. आय्. पी. रेल्वेंत नोकरीला राहिले. जी. आय्. पी. रेल्वेच्या क्रिकेट क्लबमधून आम्ही दोघेही अनेक वर्षें खेळत होतों. शिवराम हे या रेल्वेच्या नोकरींत अखेरपर्यंत होते. १९३९ सालीं वयाच्या ५६ व्या वर्षी त्यांचें निधन झालें.

गणपत व कृष्णा

माझे इतर दोघे बंधु गणपत व कृष्णा हे दोघे अल्प वयांतच निधन पावले. हे दोघेही उत्तम खेळाडू होते. गणपत हा एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें कांहीं दिवस शिकत होता. त्यानंतर कस्टम्समध्यें त्यानें नोकरी धरली होती. क्रिकेटमध्यें दणदणीत बॅटस्मन म्हणून त्यानें ख्याति मिळविली होती आणि हॉकीमध्येंही त्याचा खेळ धडाडीचा होई. चौरंगी सामन्यांत त्याचा हिंदु संघांत अनेकदां समावेश झाला होता. व त्यांत त्यानें वेळोवेळां चांगला स्कोअर केला आहे. ॲथ्लेटिक स्पोर्टस्मध्येंही त्यानें प्रावीण्य संपादलें होतें, आणि एका वर्षीच्या चढाओढींत हायजम्पमध्यें उच्चांक प्रस्थापित केला होता. कृष्णा हा न्यू हायस्कूलमध्यें शिकत होता आणि तेथें असतांनाच क्रिकेटमध्यें बोलिंग व बॅटिंग या दोन्ही बाजूंत त्यानें इतकें कौशल्य मिळविलें होतें कीं, प्रेसिडेन्सी सामन्यांतही त्याचा समावेश करण्याचें घाटत होतें. त्याचा खेळ पाहून तुम्हां सर्व भावांपेक्षां हा मुलगा या खेळांत अधिक नांव काढील असे उद्गार त्यावेळच्या कांहीं तज्ज्ञ क्रिकेटपटूंनीं माझ्यापाशीं काढले होते. पण निष्ठुर दैवानें तेवढा अवकाशच त्याला मिळूं दिला नाहीं. एके दिवशीं हायस्कूलचा सामना जिंकून तो सायंकाळीं घरीं आला तो तापानें फणफणतच ! तो ताप कांहीं कायमचा निघाला नाहीं आणि पुढें दोन महिन्यांनीं त्यांतच त्याचा अंत झाला ! त्या वेळीं त्याचें वय १५–१६ वर्षांचें असावें. गणपतचें निधन १९२० सालीं ऑक्टोबर महिन्यांत झालें. तो त्या वेळीं सत्तावीस वर्षांचा होता.



## रणजींच्या कालांत

१९०५ सालीं मीं न्यू हायस्कूल सोडलें आणि ‘ शालेय क्रिकेट ’ संपवून ‘ क्लब अथवा ऑफिस क्रिकेट ’ मध्यें प्रवेश केला. माझ्या ‘ शालेय क्रिकेट’च्या कालांत माझे जे क्रिकेटर सहाध्यायी माझ्याबरोबर खेळत होते, त्यांपैकीं डी. के. ऊर्फ डॉली कपाडिया, एस्. एम्. चोथिया आणि एलचीदाणा हे पुढें क्रिकेटपटु म्हणून विशेष प्रसिद्धि पावले. हे तिघेही न्यू हायस्कूलचे विद्यार्थी होते. डॉली कपाडिया हे एल्फिन्स्टन हायस्कूल-मध्यें मीं असतांना माझे प्रतिस्पर्धी कॅप्टन असत. आणि गंमतीचा योगायोग असा कीं विरोधी संघाचे कॅप्टन या नात्यानें समोरासमोर येण्याचा हा असा प्रसंग आमच्यावर चौरंगी सामन्यांत व इतरही सामन्यांच्या वेळीं पुढें अनेकदां आला. डॉली आणि मी एकाच संघांतूनही पुष्कळदां

खेळलों आहों, पण या अशा समयीं एरवीं हंसतखेळत मनमोकळेपणानें वागणारा डॉली कॅप्टनपदाची कॅप डोक्यावर चढवून समोर आला म्हणजे जो गंभीरपणाचा आव आणी, तो पाहून मला मोठी मौज वाटे. अर्थातच त्याचें हें सोंग फार काल टिकत मात्र नसे. धडाडीच्या दणदणीत खेळाबद्दल डॉली कपाडियाची फार ख्याति होती आणि त्या त्याच्या खेळावर प्रेक्षकही फार खूष असत. चौरंगी सामन्यांच्या इतिहासांतील तिसरें शतक ( १२५ नाबाद ) १९१७ सालीं डॉलीनें काढलें. (पहिलीं अनुक्रमें वॉर्डन ( ११५ ) व डॉ. कागा ( १५० ) यांचीं आहेत) आणि त्याच्या मागोमाग १९१९ सालीं चवथें शतक काढण्याचा मान मीं मिळवूं शकलों. या सामन्यांत आम्ही दोघेही सारख्याच इनिंग्ज ( ४३ ) खेळलों आहोंत, हाही एक योगायोग म्हणतां येईल. हजार धांवांची मर्यादा मात्र या सामन्यांत डॉलीला ओलांडतां आली नाहीं. पण वझिफदार ( ११६७ ) वगळल्यास या सामन्यांत पारश्यांतर्फे त्याच्याच धांवांची गोळाबेरीज ( ९९२३ ) सर्वांत अधिक झाली आहे. डॉलीखेरीज न्यू हायस्कूलमध्यें माझ्याबरोबर असलेले दुसरे पारशी क्रिकेटर एस्. एम्. चोथिया हे चांगल्यापैकीं बॅट्स्मन व उत्कृष्ट स्लिप फिल्डर म्हणून प्रसिद्ध होते. चोथिया व एलचीदाणा हे दोघेही चौरंगी सामन्यांत अनेकदां खेळले आहेत. पण ते पुढें फारसे चमकूं शकले नाहींत. एल्फिन्स्टन हायस्कूलमधील माझ्या सहाध्यायांपैकीं के. ए. दाते यांचा उल्लेख मीं यापूर्वी केलाच आहे. दाते हे चौरंगी सामन्यांत पहिल्याच वर्षी एकदांच खेळले. परंतु तत्पूर्वी तिरंगी सामन्यांत हिंदूंचे ते प्रमुख खेळाडू होते. दाते यांच्याखेरीज त्या हायस्कूलमधले डी. के. ऊर्फ दीनानाथ तेलंग हे माझ्याबरोबरीच्या क्रिकेटर विद्यार्थ्यांपैकीं पुढें मान्यता मिळविलेले दुसरे क्रिकेटपटु होत. तेलंग हे माझे वर्गबंधु होते आणि हिंदु जिमखान्यांत व बी. बी. सी. आय्. रेल्वेच्या क्रिकेट क्लबमध्यें ते माझे संघसहकारीही होते. याखेरीज गौड सारस्वत क्लबाचेही ते प्रमुख खेळाडू होते. तेलंग हे अष्टपैलू ( ऑल राउंडर ) क्रिकेटर आहेत. तिरंगी सामन्यांत ते खेळलेले आहेत. आणि क्लबसामन्यांत त्यांचें नांव अनेकदां चमकलेलें आहे. क्रिकेटर नसलेले पण क्रिकेटविषयीं फार आस्था वाटणारे एल्फिन्स्टन हायस्कूलमधील माझे एक सहाध्यायी म्हणजे

सर विठ्ठलराव चंदावरकर हे होत. हायस्कूलच्या संघाविषयीं त्यांना फार अभिमान असे, आणि त्यामुळें ते आणि मीं वेगवेगळया विभागांत होतों, तरी आमच्या संघाच्या प्रगतीविषयीं ते माझ्याशीं वरचेवर चौकशी करून जात.

त्या काळांतील क्रिकेट सामने

शाळा सोडल्यानंतर मी रॉयल इंडियन मरीन डॉकयार्डमध्यें नोकरी धरली. या डॉकयार्डच्या क्रिकेट टीमचे कॅप्टन विल्सन हे मुंबईच्या क्रिकेट क्षेत्रांतील एक उत्साही कार्यकर्ते होते. आमच्या या संघाचे सामने त्या वेळीं चर्चगेट स्टेशनच्या मागें असलेल्या ओव्हल मैदानावर होत असत व त्यांत माझा स्कोअर चांगला असे. या वर्षी ( १९०७ सालीं ) मुंबईतील प्रत्येक ऑफिस क्लबमधून एकेक चांगला खेळाडू निवडून त्यांचा एक संघ दिल्ली, आग्रा येथें सामने देण्यासाठीं पाठविण्यांत आला होता, त्यांत डॉकयार्ड संघातर्फे माझी निवड झाली होती. आग्रा येथें आम्ही दोन सामने खेळलों, त्यांत कॉलेज संघाविरुद्ध ६३ व टेलिग्राफ संघाविरुद्ध ५४ धांवा मीं केल्या होत्या. ऑफिस आणि क्लब क्रिकेटमध्यें त्या वेळीं उत्साहाचें नवें वारें खेळूं लागलें होतें आणि सध्याच्या टाइम्स ऑफ इंडिया शिल्डच्या धर्तीवर ऑफिस क्लबाचे शिल्ड सामने प्रतिवर्षी घडवून आणण्याची एक योजनाही घाटत होती. अशी योजना अंमलांत आल्यास आपल्या क्लबाला माझा फार उपयोग होईल, अशा हेतूनें जी. आय. पी. रेल्वे ऑफिसमधील एक अधिकारी मि. क्लार्क यांनीं मला आपल्या ऑफिसांत नोकरी देऊं केली. आणि त्यांची ती सूचना मान्य करून १९०८ सालीं मीं जी. आय. पी. रेल्वेच्या एजंटच्या ऑफिसांत व क्रि. क्लबांत प्रवेश केला. ह्या ऑफिसांत मीं सुमारें बारा वर्षें होतों, आणि माझ्या क्रिकेटमधील यशाच्या दृष्टीनें ही पुढील वर्षें बरींच महत्त्वाचीं गेलीं.

जी. आय्. पी. रेल्वे क्लबांत मी दाखल झालों. त्या पूर्वी एक वर्ष म्हणजे १९०७ सालीं हिंदु, पारशी व प्रेसिडेन्सी अशा तीन संघांचे तिरंगी सामने मुंबईत दरवर्षी खेळण्यास सुरुवात झाली होती. जी. आय्. पी.

रेल्वेच्या क्लबातर्फे त्या वर्षाच्या सीझनमध्यें हिंदु जिमखान्याविरुद्ध १०३ व बॉम्बे जिमखान्याविरुद्ध १०६ अशीं दोन शतकें मीं केलीं होतीं. बॅटिंग व बोलिंग या दोन्ही अंगांत त्या वर्षी मीं चांगलेंच कौशल्य प्रकट केलें होतें; (हातावर फार ताण पडूं लागल्यामुळें बोलिंग करण्याचें मीं यापूर्वीच मोडून दिलें होतें.) आणि त्या वर्षीचें माझें यश लक्षांत घेऊन तिरंगी सामन्यांतील हिंदु संघाचा एक नवीन खेळाडू अशाच दृष्टीनें क्रिकेट-क्षेत्रांतील सारे लोक माझ्याकडे पाहूंही लागले होते. हिंदु जिमखान्याच्या ट्रायल मॅचमध्येंही मला त्यावेळीं या अपेक्षेनुसार निमंत्रण मिळालें. पण माझी उमेदवारी प्रत्यक्ष खेळाच्या दृष्टीनें जरी यशस्वी ठरूं शकत होती, तरी संघाचे कॅप्टन (आतां) सर चुनिलाल मेहता यांच्या मतें माझ्या वयाच्या दृष्टीनें ही उमेदवारी अपुरीच ठरत होती! माझें वय त्या सुमारास बावीस वर्षांचें होतें. आज या वयाच्या होतकरू व यशस्वी क्रिकेटपटूला प्रातिनिधिक संघांत जुन्या खेळाडूंनाही वगळून स्थान दिलें जातें; पण त्या वेळीं हें कमी वयच माझ्या कसोटीच्या आड आलें! क्रिकेट गुणापेक्षांही वय व अनुभव यांनाच प्राधान्य देण्यांत आलें आणि अशा रीतीनें त्या पहिल्या तिरंगी सामन्यांत मला स्थान मिळूं शकलें नाहीं. या सामन्यांत प्रवेश मिळविण्याकरितां आणखी एक दोन वर्षें मला उमेदवारी करावी लागली.

### बहारीचें वर्ष

आणि ही उमेदवारी त्या वर्षी मी पहिल्या वर्षापेक्षांही अधिक कसोशीनें व चोखपणें पार पाडली. किंबहुना त्या सुमाराच्या कांहीं वर्षांत १९०९ सालचें तें वर्ष बॅटिंगमधील यशाच्या दृष्टीनें मला फारच उत्कृष्ट असें गेलें. बॅटीवर पूर्ण हुकमत चालत होती. आणि कशाही तऱ्हेच्या चेंडूला सफाईनें तोंड देऊन धांवामागून धांवा मिळविण्याचें कसब सहजगत्या तिच्याकरवीं मीं साधून घेत होतों. फ्रेंड्स् युनियन क्रि. क्लब व हिंदु जिमखाना या दोन संघांचा मीं आदल्या वर्षी सभासद झालों होतों; त्यांपैकीं फ्रेंड्स् युनियन क्लबचा त्या वर्षी पुण्याच्या युरोपियन जिमखान्याच्याविरुद्ध जो सामना झाला, त्यांत त्या संघातर्फे खेळून मीं १४० धांवा केल्या. पुण्याच्या युरोपियन जिमखान्यामध्यें त्या वेळीं प्रेसिडेन्सी संघांतील नामांकित

खेळाडूंचा भरणा असे, त्यामुळें हें माझें शतक माझ्या उमेदवारीच्या दृष्टीनें महत्त्वाचेंच होतें. या वर्षीं मीं आमच्या ऑफिसच्या क्लबतर्फे खेळून इस्लाम जिमखान्याविरुद्ध ११६ व टेलिग्राफ टीमविरुद्ध १३७ अशीं दोन शतकें केलीं. पुण्याला पुन्हां, युरोपियन जिमखान्याविरुद्ध हिंदु जिमखान्यानें सामना दिला; तेव्हां त्यांतही हिंदु जिमखान्यातर्फे मीं ११५ धांवा केल्या; एवढी कसोटी लागल्यानंतर तिरंगी सामन्यांतून मला वगळणें हिंदु निवड समितीला अशक्यच झालें. आणि अशा तऱ्हेनें महत्त्वाच्या प्रातिनिधिक सामन्यांतून खेळण्याची पहिली संधि (१९१०) मला एकदांची मिळूं शकली.

पण त्या पहिल्या संधीस मला अपेक्षेप्रमाणें यश मिळालें नाहीं. त्या पुढील वर्षीच्या (१९११) तिरंगी सामन्यांतील पहिला सामनाही पारशी विरुद्ध हिंदु असाच होता. पारशी संघ त्या काळीं इतर साऱ्यांहून अधिक बलाढ्य असे. बॉर्डन, बलसारा, पारेख हे त्यांचे गोलंदाज फार प्रसिद्ध होते; आणि मेहरोमजी, चोथिया, मुल्ला वगैरे त्यांचे बॅट्स्मन, बोलर्सनीं उरकलेली अर्धी अधिक कामगिरी पूर्णपणें शेवटाला नेण्याचें काम अगदीं चोखपणेंच पार पाडीत. त्यावेळचे हे तिरंगी (व त्यानंतरचे चौरंगीही) सामने सप्टेंबर महिन्यांत पावसाळ्यांतच होत असत. पावसामुळें ग्राउंड बहुधा ओलें असे आणि या ओल्या विकेटवर पारशी गोलंदाज फास्ट बोलिंग करून बॉल आपटून टाकीत; तो कोठें तरी हाताला किंवा बॅटीला लागे आणि कॅच् उडून आमच्या संघाचे बॅट्स्मन आउट होत. आमची दुसरी दुबळ बाजू म्हणजे क्षेत्ररक्षणाची. झेल सुटले नाहींत तर ती नवलाची गोष्ट मानावी लागे, अशी याबाबतची आमची केविलवाणी परिस्थिति होती! याचा परिणाम अखेरीस जो व्हावयाचा तोच होई आणि प्रतिपक्षी आमच्यावर मात करूं शके. पारश्यांविरुद्ध झालेल्या या सामन्यांतही हाच प्रकार घडून आला. आमचा पराजय झालाच, पण त्यांतल्या त्यांत समाधानाला मला जागा एवढीच कीं, या सामन्यांतील दुसऱ्या डावांत मी ६२ धांवा केल्या व एका इनिंग्जचा मारा आम्हांला बसणार होता, तो मीं वांचवूं शकलों! ह्याच वर्षीं प्रो. देवधर यांना आमच्या संघांत प्रथमच स्थान देण्यांत आलें असें मला स्मरतें.

रणजींचे प्रथम दर्शन

१९१० सालच्या तिरंगी सामन्यांत युरोपियन, अथवा प्रेसिडेन्सी संघ असें ज्याला त्या वेळीं म्हणत, त्या संघाविरुद्ध आम्हांला सामना द्यावा लागला. कर्नल ग्रेग, स्प्रॉट, मिलन् इत्यादि काउंटी लौकिकाचे खेळाडू त्या वेळच्या या युरोपियन संघांत होते. कर्नल ग्रेग हे सुरुवातीला खेळावयास येऊन निदान ३०-४० धांवा तरी हटकून करीत. मिलन् हा डावरा फास्ट बोलर होता आणि त्याला बऱ्याच विकेट्स् मिळत. या संघाविरुद्धही आम्हांला पराजय घ्यावा लागला. हें वर्ष एकदोन उल्लेखनीय घटनांमुळें माझ्या स्मरणांत विशेषच राहून गेलें आहे. यांपैकीं एक महत्त्वाची घटना म्हणजे सुविख्यात हिंदी क्रिकेटपटु रणजितसिंह यांचा खेळ पाहण्याचा व त्यांच्याविरुद्ध खेळण्याचा योग या वर्षी मला आला. रणजितसिंहांचें ऐन उमेदींतलें कौशल्य त्या वेळीं तितकें राहिलें नव्हतें हें खरें असलें, तरी त्यांची बॅटिंगची मनोवेधक शैलि, सहज पण जलद हालचाल, मनगटांतील जोर व कसब हीं त्या वेळींही प्रत्ययाला येत असत आणि तेवढ्यावरून किंग ऑफ् क्रिकेट ही इंग्लिश जनतेनें त्यांना दिलेली पदवी किती सार्थ असूं शकेल याची सहज खूण पटे.

रणजितसिंहांना त्यापूर्वी मुंबईंत झालेल्या एका सामन्याच्या वेळीं मी ओझरतें पाहिलें होतें. तो सामना १९०१ सालीं झाला असावा असें मला आठवतें. बॉंबे जिमखान्याच्या क्रीडांगणावर सुट्टी नसलेल्या एका वारीं तो सामना झाला होता; रणजितसिंह खेळत असल्याचें समजतांच त्यांचा खेळ पाहण्यासाठीं आम्ही त्या क्रीडांगणाकडे धांव ठोकली. रणजींनीं त्या सामन्यांत किती धांवा केल्या हें कांहीं मला स्मरत नाहीं; पण त्या वेळीं, आणि तत्पूर्वी १८९८ सालीं हिंदुस्थानांत त्यांचे कांहीं महत्त्वाचे सामने घडून आले, त्या वेळींही त्यांच्या बॅटीची करामत इकडील प्रेक्षकांना चांगलीच पाहावयास मिळाली होती. माझ्यापाशीं असलेल्या रेकॉर्डवरून असें दिसतें कीं रणजींनीं १८९८ सालीं पतियाळा वि. अंबाला या सामन्यांत २५७ धांवा केल्या होत्या. माझे बंधु रा. बाळू यांना रणजींविरुद्ध खेळण्याची पहिली संधि १८९८ सालींच, राजकोट येथें झालावाड व काठेवाड

संघांमध्यें जो सामना घडून आला, त्यांमध्यें मिळाली. रणजी हे त्या वेळीं काठेवाड टीममधून खेळले होते, व रा. बाळू, त्या वेळचे प्रसिद्ध काठेवाडी बोलर ओघडशंकर व शिवशंकर हे झालवाड संघांत होते. रणजितसिंह त्या सामन्यांत एकदां रा. बाळू यांच्या बोलिंगला व दुसऱ्यांदा शिवशंकर यांच्या बोलिंगला आउट झाले होते. तो सामना झालवाड संघानें अवघ्या सात-आठ धांवांनीं जिंकला होता, व तोही रा. बाळू यांनीं शेवटचे तीन खेळाडू आठ धांवांतच बाद केल्यामुळें जिंकतां आला होता. आम्हीं १९१० सालीं जो सामना रणजींच्या संघाविरुद्ध खेळलों, त्यांतही बाळू यांनीं या इतिहासाची पुनरावृत्ति करून रणजींना बाद करण्याचें पुन्हां श्रेय घेतलें.

नाटोर विरुद्ध जोधपूर

हा सामना कलकत्ता येथें नाटोर संघ विरुद्ध जोधपूर संघ यांच्यामध्यें झाला होता. नाटोरचे त्या वेळचे महाराज श्रीमंत जगदिंद्रनाथ रॉय हे क्रिकेटचे फार शौकीन होते. ते प्रथम फुटबॉल खेळत; पण त्यांत डोळ्याला इजा झाल्यामुळें ते क्रिकेटकडे अधिक लक्ष पुरवूं लागले होते. हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या नामांकित क्रिकेटपटूंना आपल्या संघांतून खेळण्यासाठीं निमंत्रण देऊन या संघाचे कलकत्त्याच्या युरोपियन व इतर संघांशीं ते दरवर्षी सामने घडवून आणीत असत. कुचबिहारच्या महाराजांनींही असाच उपक्रम सुरू केला होता; पण हिंदुस्थानांतील खेळाडूंपेक्षां त्या वेळीं ते विलायतेंतील प्रसिद्ध खेळाडूंना आणवीत असत. नाटोर महाराजांच्या संघाचे हे सामने साधारणपणें ता. १२ डिसेंबर ते १५ जानेवारी पर्यंत एक महिनाभर होत असत व दर आठवड्याला दोन सामने खेळावयाचे असा बहुधा कार्यक्रम ठरलेला असे. मुंबईच्या खेळाडूंपैकीं रा. बाळू यांना नाटोर महाराजांचें नेहमींच आमंत्रण यायचें. मला या संघांतून खेळण्यासाठीं प्रथम आमंत्रण मिळालें, तें १९०९ सालीं होय. तें वर्ष मला यशस्वी गेलें हें वर सांगितलेंच आहे. त्या वर्षी नाटोर संघांतूनही मी रंगून टीमविरुद्ध १०६, कुमारटोळी संघाविरुद्ध १००, कलकत्ता टाउन क्लबाविरुद्ध ११९ व मुसलमान टीमविरुद्ध ११४ अशीं चार शतकें केलीं होतीं. त्याखेरीज कोलंबो टीमविरुद्ध ७६ व बालिगंज टीमविरुद्ध ७८

धांवा केल्या होत्या. कलकत्ता क्रिकेट क्लब व बालिगंज क्रिकेट क्लब हे बंगालमधील नांवाजलेल्या युरोपियन खेळाडूंचे त्या वेळचे प्रसिद्ध संघ होते. प्रसिद्ध काउंटी खेळाडूही त्यांतून खेळत असत. जोधपूर संघाशीं आमचा जो सामना झाला, त्यांतही आमच्या नाटोर संघाला काउंटी खेळाडूंशींच दोन हात करावे लागले होते.


### रणजींचा खेळ

या जोधपूर संघांत खुद्द रणजीखेरीज, रणजी ज्या काउंटीचे कॅप्टन होते, त्याच ससेक्स काउंटीमधील ए. ई. व रॉबर्ट रेल्फ (त्यांतील ए. ई. हे बोलर व रॉबर्ट रेल्फ हे बॅट्स्मन होते,) हे रेल्फ बंधू, व किलिक हे डावरे बॅट्स्मन, हे खेळाडू होते. त्याशिवाय एच्. एल्. सिम्स हे प्रसिद्ध फास्ट बोलर व व्हिडलर हे मिडलसेक्स काउंटीचे 'चेकस्पिन' बोलर यांचाही त्या संघांत समावेश झाला होता. ओघडशंकर हेही त्या वेळीं जोधपूर संघांतून खेळले. आमच्या संघांत रा. बाळू, शिवराम, के. शेषाचारी, वॉर्डन, के. ए. दाते, कराचीचे गोलंदाज एच्. एल्. सेंप्रे, कलकत्त्याचे मुकर्जी व मी इत्यादि खेळाडू होतों. जोधपूर संघ आम्हाला अर्थातच भारी होता. मला आठवतें कीं किलिक यानें सेंप्रे यांची गोलंदाजी चांगलीच चोपून काढली. किलिक यान्चें कटिंग फार सुंदर असे; पण साऱ्या बॅट्स्मनपेक्षां रणजींची बॅटिंगची पद्धत मला फार वैशिष्ट्यपूर्ण व परिणामकारक वाटली. रणजी बहुतेक 'स्ट्रोक्स' करीत; पण लेग-ग्लान्सबद्दल त्यांची विशेष ख्याति होती. या वेळींही त्यांनीं बहुतेक चेंडू लेगलाच खेचले. त्यांच्या मनगटांतील जोरकसपणा व कौशल्य अप्रतिम होतें. चेंडू सहज वळल्यासारखा दिसे, पण तो सीमापार होई तो अगदीं वायुवेगानेंच ! रणजी बहुधा विकेट कव्हर करून खेळत असत; पण त्यांची सारी हालचाल अति चापल्यानें होत असल्यामुळें आणि दृष्टि तीक्ष्ण असल्यामुळें या तऱ्हेनें खेळूनही एल्. बी. डब्ल्यु.चा धोका ते सहज चुकवूं शकत; पण प्रस्तुत सामन्यांत मात्र हा धोका त्यांना टाळतां आला नाहीं. सुमारें २० रन्स काढल्यावर बाळू यांनीं टाकलेला शिताफीचा चेंडू त्यांची बॅट चुकवून पुढें घुसला आणि अंपायरचा हात लगेच वर गेला. रणजी एल्.

बी. डब्ल्यु. होऊन तंबूकडे परत वळले. हा निर्णय देणारे अंपायर हिंदूंचे पूर्व पिढींतले प्रसिद्ध दणदणीत बॅट्स्मन कै. प्रो. पंढरीनाथ तेलंग हे होते. रणजींच्या संघाविरुद्ध झालेला हा आमचा सामना अनिर्णीत राहिला.

१९१० सालीं झालेल्या या जोधपूर वि. नाटोर या सामन्यानंतर रणजित-सिंहांचा खेळ पाहण्याची संधि या देशांतील जनतेला फारशी कधीं मिळूं शकली नाहीं. १९११ सालीं विलायतेला गेलेल्या हिंदी संघाला त्यांच्या प्रभावी बॅटीचें साह्य मिळेल अशी तेथील जनतेची अपेक्षा होती. पण कांहीं कारणामुळें ती पुरी होऊं शकली नाहीं; आणि त्यानंतर मग थोड्याच कालावधींत त्यांच्या डोळ्याला दुर्दैवानें जो अपघात घडला, त्यामुळें तर क्रिकेट ह्या असामान्य क्रिकेटपटूला बहुतांशीं अंतरलाच ! हा अपघात कांहींशा चमत्कारिक तऱ्हेनेंच घडला असें म्हणतात. विलायतेंत यॉर्कशायरमध्यें कांहीं बड्या उमराव-मंडळीसह रणजितसिंहजी शिकारीला गेले होते. शिकारीची मंडळी एके ठिकाणीं बसली असतां मंडळींपैकीं कोणा तरी असामीची बंदुक अकस्मात उडाल्याचा आवाज ऐकूं आला आणि कांहीं छरे रणजितसिंहांच्या उजव्या डोळ्याकडील भागाला लागले. या अपघाताला कोणाची बंदुक कारणीभूत झाली हें कांहीं समजूं शकलें नाहीं. कसेंही असलें, तरी रणजींना या अपघातामुळें क्रिकेटची बॅट कायमचीच हातची सोडून द्यावी लागली, हें मात्र खरें ! ज्या तीक्ष्ण दृष्टीमुळें टर्नरसारख्या जगांतील अतिवेगवान् गोलंदाजालाही त्यांनीं हात टेका-वयास लाविलें होतें, ती दृष्टि आतां अधु झाली होती; त्यामुळें अर्थातच बॅट हातीं घेऊनही पूर्वीइतक्याच कौशल्यानें तिची चमक दाखविणें यापुढें त्यांना अशक्यच होतें. एकंदरींत, असामान्य हिंदी क्रिकेटपटु म्हणून रणजितसिंहांनीं आंतरराष्ट्रीय लौकिक संपादन केला खरा; पण दुर्दैवानें हिंदुस्थानांतील क्रिकेटला मात्र त्यांच्या कौशल्याचा प्रत्यक्ष असा कांहींच फायदा मिळूं शकला नाहीं. अर्थात् हिंदी क्रिकेटला उत्तेजन देण्याचें कार्य त्यांनीं वेळोवेळीं केलें यांत शंका नाहीं; पण हिंदी क्रिकेटप्रेमी लोकांनीं त्यांच्याकडे ज्या अपेक्षेनें पाहिलें होतें, ती अपेक्षा मात्र त्यांना पुरी करतां आली नाहीं.

१९११ सालचा विलायतचा दौरा–हिंदी संघ ( ससेक्स विरुद्ध सामन्यांत )



( उभे ) डावीकडून ( १ ) बॉर्डन, ( २ ) बाळू, ( ४ ) एच्. एफ्. मुला, ( ५ ) एम्. डी. पै. ( खुर्च्यांवर बसलेले ) बलसारा, सलामुद्दीन, के. शेषाचारी, डॉ. कांगा, प्रिन्स शिवाजीराव, दिवेचा (सेक्रेटरी), आर्. पी. मेहरोमजी. (जमिनीवर बसलेले) शिवराम, सय्यद हुसेन

"अरे, मै एक आंखसे अंधा हूं !"

अपघातामुळें नजर अधु झाल्या कारणानें व त्याचा परिणाम खेळावर होण्याची शक्यता असल्यानें रणजींनीं ह्या खेळांतून निवृत्ति पत्करली; पण अशीच एका डोळयाला अंधता प्राप्त झाली असतांही एका खेळाडूनें १९११ सालीं विलायतेला गेलेल्या हिंदी संघांतून बिनबोभाट दौरा केला होता, हा नवलपूर्ण इतिहास आज कितीजणांना ठाऊक असेल ? ह्या खेळाडूचें नांव शफकत हुसेन असें होतें. अलिगडचे एक पट्टीचे गोलंदाज म्हणून हे असामी नांवाजलेले होते आणि इतर अनेक लायक खेळाडूंना बाजूला सारून ह्या गोलंदाजांची वर्णी त्या संघांत लावण्यांत आली होती. पण त्यांच्या लौकिकाप्रमाणें गोलंदाजीच्या बाबतींत त्यांच्या हातून कांहींच कामगिरी पार पडेना आणि क्षेत्ररक्षणाच्या बाबतींत तर एकदां एक अपूर्वच प्रकार घडला ! त्या सामन्यांत त्यांना 'पॉइंट'वर ठेवण्यांत आलें होतें. कर्मधर्मसंयोगानें बॅट्समनचा पॉइंटवरच झेल उडाला. आणि तो इतका सुलभ होता कीं कोणाही नवख्यानें तो सहजीं पकडला असता. पण या गृहस्थांनीं तो झेलण्यासाठीं हातांची अशी कांहीं वेडीवांकडी हालचाल केली, कीं हा गृहस्थ चेंडू पकडतो आहे, कीं हवेशीं झगडतो आहे तेंच कांहीं कळेना ! चेंडू तर अर्थातच निसटलाच; पण त्या खेळाडूच्या चमत्कारिक हातवाऱ्यांमुळें सर्व खेळाडू क्षणभर स्तिमितच होऊन गेले ! संघाचे कॅप्टन डॉ. कांगा यांना मग राहवेनाच आणि विश्रांतीची वेळ भरतांच ह्या खेळाडूपाशीं जाऊन त्यांनीं त्याला विचारलें, "अहो, इतका हा क्षुल्लक झेल तुम्हीं हातोहात सोडून देऊं लागलांत, मग व्हायचं कसं ? चेंडू एका दिशेला न् तुम्हीं पाहतां दुसऱ्या दिशेला !"

डॉ. कांगांचे हे शब्द ऐकून त्या अलिगढच्या वीराला आपला भयंकर अपमान झाल्यासारखें वाटलें. स्वारी एकदम गरम झाली आणि स्वतःशींच ऊर्दूमध्यें एक शिवी हासडून गरजली, "अरे, मै तो एक आंखसे अंधा हूं ! ए कॅच मै कैसा पकड सकता था ?"

डॉ. कांगा त्या उत्तरानें थंड गारच झाले ! 'एक आंखसे अंधा' असणाऱ्या ह्या खेळाडूचा इतक्या महत्त्वाच्या दौऱ्यांत समावेश करण्याइतकी

निवडसमिति मठ्ठ कशी होऊं शकली, याचा त्यांना चमत्कार वाटला. केवळ खेळाडूंच्या पूर्वलौकिकावर विसंबून खेळाडूंना संघांत स्थान देणें केव्हां केव्हां किती धोक्याचें ठरतें याचें पुरें प्रत्यंतर त्यांना या वेळीं मिळालें. शफकत हुसेनच्या अंधत्वाची वर्तमानपत्रांतून वाच्यता झाल्यास संघाचाच दुर्लौकिक होईल, असा विचार करून त्यांनीं ह्या प्रकरणाची बाहेर कोठें परिस्फुटता होऊं नये अशी खबरदारी घेतली. पण त्या वेळेपासून, दौऱ्यांतील प्रत्येक सामन्यांत शफकत हुसेनला राखीव खेळाडूंत अखेरची जागा मिळूं लागली आणि अकरा खेळाडूंची भरती होण्याची शक्यता नसल्यावेळींच केवळ नाइलाजानें कांहीं मामुली सामन्यांत त्याचा समावेश करण्यांत आला.

## काशीयात्रेचें पुण्य

१९११ सालच्या ह्या संघाची निवड करतांना जातवार प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानेंही आपला बराच प्रताप गाजविला होता. सहा पारशी, सहा हिंदु व चार मुसलमान अशी या संघाची अखेर निवड झाली. पारशी क्रिकेटपटु त्या काळांत वरचढ होते ही गोष्ट खरी असली, तरी पारशी हिंदु 'पॅरिटी'च्या तत्त्वामुळें संघाच्या निवडींत दोष राहून गेले व ते संघाला ऐन वेळीं नडले हीही गोष्ट कांहीं खोटी नव्हे. दौऱ्यावर हा संघ येथून निघण्यापूर्वी एक दोन महिने तीन्ही जमातींच्या प्रमुख खेळाडूंना खेळाच्या विशेष शास्त्रीय सूचना देण्यासाठीं तीन्ही जिमखान्यांनीं आपसांत खर्चाची व्यवस्था करून डॉ. कफ नांवाच्या वोस्टरशायर काउंटीच्या एका खेळाडूला वस्ताद म्हणून नेमलें होतें. कफ हा डावरा मंदगति गोलंदाज होता आणि तो स्वतः बोलिंग टाकून, खेळाडूंनीं कोणत्या तऱ्हेचा बॉल कोणत्या प्रकारें खेळणें जरूर आहे, कोणत्या हालचालीनें अमुक एकादा ' स्ट्रोक ' सुलभतेनें करतां येतो, खेळाडूंचें बॅटिंग अथवा बोलिंग करतांना कुठें चुकत आहे, वगैरे बारकाव्यांसंबंधींच्या सप्रयोग सूचना देत असे. हिंदूंपैकीं रा. बाळू, शिवराम, पै, मी वगैरे खेळाडूंची या वस्तादजींच्या हाताखालीं प्रॅक्टिस करण्यासाठीं निवड झाली होती. पारशांपैकीं मेहरोमजी, वॉर्डन, बलसारा, डॉली कपाडिया वगैरेंना ही संधि मिळूं शकली होती. विलायतेला जाणाऱ्या हिंदी खेळाडूंची ही एक प्रकारें पूर्वतयारीच चालली होती. माझी खेळण्याची विशिष्ट

शैली पाहून कफ याचा माझ्याविषयीं फारच चांगला ग्रह झाला व मला व डॉली कपाडिया या दोघांही नव्या उदयोन्मुख खेळाडूंना हिंदी संघांत जरूर स्थान मिळावें अशी त्यानें जाहीर शिफारसही केली होती. पण पुन्हां अनुभवाचा व वर सांगितल्याप्रमाणें जातवार प्रतिनिधित्वाचा प्रश्न उपस्थित होऊन कफ याची ही शिफारस कागदांतच गुंडाळून ठेवण्यांत आली. त्या संघांतून विलायतेला जाण्याची आलेली ही प्रारंभींची संधि अशा रीतीनें आमच्या हातीं न लागतांच निसटून गेली. हा योग हुकल्यानंतर यानंतर पुढें कैक वर्षं हिंदी संघांचा हा असा दौरा निघण्याचा बनाव घडून आलाच नाहीं. अकरा सालानंतर २१ वर्षांनीं म्हणजे १९३२ सालीं हा योग ज्यावेळीं पुन्हां आला, त्या वेळीं 'जाणत्या' (व्हेटरन) खेळाडूंत आमचीं नांवें दाखल झालीं असल्यामुळें त्या वेळीं त्यांत समावेश होण्याचा प्रश्नच निकालांत निघाला होता. अशा रीतीनें साऱ्या हिंदुस्थानभर व सिलोनमध्येंही अनेक ठिकाणीं मी क्रिकेट खेळूं शकलों, येथें येऊं शकलेल्या परदेशच्या बहुतेक नामांकित खेळाडूंशीं क्रीडांगणावर माझी गांठ पडली, तरी क्रिकेटच्या या काशीयात्रेचें पुण्य कांहीं मला जोडतां आलें नाहीं. माझ्या एका विनोदी स्नेह्याच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'विठ्ठल'ला पंढरीची वारी कांहीं घडली नाहीं !

आणि या घटनेबद्दल माझ्यापेक्षांही माझे बंधु शिवराम यांना फार विषाद वाटे. विलायतेच्या त्या दौऱ्याहून परत आल्यानंतर तेथील एकेक अनुभव व गंमती सागतांना ते कैकदां मध्येंच स्वतःशींच चुटपुटत आणि उद्गार काढीत, "तुला तिथं यायची संधि मिळायला हवी होती; तुझ्या बॅटीचा प्रभाव तिथं खचित पडला असता; तिथल्या 'ग्राउंड्स्' वर चेंडू सहज दिसे, आणि तो सहज सुलभतेनें फटकावतां येत असे, संघाला तुझा खात्रीनें फार फार उपयोग झाला असता." त्यांच्या या उद्गारांप्रमाणें मला तेथें किती यश संपादतां आलें असतें हें अर्थातच निश्चितपणें स्वतः मीं सांगूं शकत नाहीं. पण एवढें मात्र खरेंच कीं क्षेत्ररक्षणाच्या बाबतींत संघाचा जो बदलौकिक झाला, तितका तरी आमच्यासारख्या दोनतीन ताज्या दमाच्या काटक खेळाडूंना त्यांत स्थान मिळालें असतें तर खचित होऊं शकला नसता. शिवाय खेळाडूंच्या अपुऱ्या

संख्येमुळें अकरा खेळाडू जमवावे कसे अशी जी पंचाइत पडे, ( एका सामन्यांत तर संघाचे वयातीत सेक्रेटरी श्री. दिवेचा यांनाही कमरपट्टा सांवरीत क्रीडांगणावर उतरावें लागलें होतें ! ) ती तरी खास पडूं शकली नसती. ही अशी पंचाइत पडण्याचें एक कारण म्हणजे संघाच्या अग्रगण्य सभासदांनीं त्याला मध्येंच सोडचिठ्ठी देऊन केलेला संघत्याग हें होय. पहिले तीन सामने झाल्यानंतर संघाचे कॅप्टन पतियाळाचे महाराज भूपेंद्रसिंग यांना कांहीं कारणामुळें पुढचे सामने खेळण्याची लहर लागेना. त्यांचीं इतर कामें मध्येंच उद्‌भवलीं आणि ते आपले सहचर कर्नल मिस्त्री यांच्यासह संघनायकत्वाची जबाबदारी डॉ. कांगांच्या शिरावर टाकून चालते झाले. कर्नल मिस्त्री यांच्यासारख्या कसलेल्या खेळाडूच्या साह्याला ह्यामुळें संघ मुकला ! संस्थानिकांच्या हौसेमुळें व पैशामुळें हिंदी क्रिकेटला जसें उत्तेजन मिळूं शकलें आहे, तसेंच त्यांच्या या अशा लहरीमुळें त्याचें कैकदां अपरिमित नुकसानही झालें आहे.

## राजेशाही क्रिकेट

संस्थानिकाच्या या लहरीपणाचे विचित्र अनुभव मलाही अनेकदां आले आहेत आणि एकदां तर या लहरीमुळें एक चमत्कारिक प्रसंग माझ्यावर ओढवला होता ! शिकार-शर्यतीप्रमाणेंच केवळ षोक म्हणून क्रिकेटच्या खेळाकडे बरेच संस्थानिक चालू शतकाच्या सुरुवातीपासून, विशेषतः रणजींचा लौकिक कानीं पडल्यापासून फार लक्ष पुरवूं लागले होते. संस्थानिकांनीं स्वतःचा जिमखाना व क्रिकेट संघ पदरीं बाळगण्याची जणूं काय एक लाटच चोहोंकडे उसळली होती. काश्मीर, अलवार इत्यादिकांचे संघ यावेळेपासूनच अस्तित्वांत आले होते. यांपैकीं अलवारनरेश सर जयसिंगजी बहादूर ( पूर्वीचे महाराज ) यांचा संघ मुंबईत १९१५ सालीं दौरा काढून गेला होता. हे महाराज स्वतः जो क्रिकेट खेळत, तोही अगदीं ‘ राजेशाही ’ च असे ! त्यांनीं प्रत्येक ‘ स्ट्रोक ’ साठीं एक अशा खास दहा बॅटी स्वतःसाठीं तयार करवून घेतल्या होत्या. आणि ज्या तऱ्हेनें चेंडू मारण्याची त्यांना लहर येई, त्याला योग्य अशी या दहा नंबरांतील बॅट मागवून त्या बॅटीनें ते टोले लगावीत. ओव्हर बाउंडरी मार-

ण्याची या महाराजांना फार हौस ! आणि पदरची मंडळी महाराजांची ही हौस पुरविण्यासाठीं जिवापाड मेहनत घेत हें सांगावयास नकोच ! एकदां या महाराजांची काय लहर लागली कोणाला ठाऊक; त्यांनीं दरबारी मंडळींना एकदम हुकुम सोडला कीं " विठ्ठलकु बुलाव !" मला त्याप्रमाणें लागलीच अलवारला निघून येण्याबद्दल मुंबईला तार आली. मला वाटलें कीं अलवारला कोणता तरी सामना घडवून आणण्याचा महाराजांचा बेत असेल आणि त्यासाठीं मला हें निमंत्रण मिळालें असेल. मी ऑफिसमधून आठ दिवसांची रजा काढून अलवारला निघालों. अलवार स्टेशनवर येऊन दाखल झालों, तर तेथें सारा शुकशुकाट ! दरबारकडून कोणी तरी इसम माझी दाद घेण्यासाठीं येईल अशी इतर ठिकाणच्या अनुभवावरून मीं अपेक्षा केली होती; पण तशी कांहींच विचारपूस झाली नाहीं. हें पाहतांच मी मुंबईला येणाऱ्या गाडीनें स्टेशनवरूनच परत फिरलों. मुंबईला आल्यावर अलवार नरेशांना तार दिली कीं मीं अनोळखी ठिकाणीं येऊन पडलों होतों; खाण्यापिण्याचे माझे हाल व्हायचा संभव होता; तेव्हां लगेच परत फिरणें मला भाग पडत आहे. मागाहून मला कळलें कीं महाराजांचा यामुळें माझ्यावर बराच रोष झाला होता. पण मला बोलावलें होतें, त्या वेळीं खरो-खरच सामना होता कीं नाहीं याचा पत्ता कांहीं अजून मला लागलेला नाहीं.

याच महाराजांच्या रोषाला मीं पुन्हां एकदां असाच कारणीभूत झालों होतों; पण हा प्रसंग कांहींसा वेगळा होता. बनारसला सामना खेळण्यासाठीं एकदां मला असेंच निमंत्रण मिळालें होतें. महाराजांना दुरून लवून कुर्नि-सात करण्याची पद्धत होती. आणि हा रिवाज दरबारी मंडळींनींच नव्हे, पण इतर सर्वांनींही पाळला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. अर्थात् ही गोष्ट इतक्या कडकपणें पाळली पाहिजे याची कांहींच कल्पना मला नव्हती. भेटीच्या वेळीं माझें नांव त्यांनीं उच्चारतांच मीं सरळ त्यांच्यासमोर गेलों आणि उभा राहिलों. त्यांनीं विचारलें, " तूंच विठ्ठल का ?" मी उत्तर केलें, " होय, महाराज. " त्यांनीं मग चटकन् हस्तांदोलनासाठीं हात पुढें केला आणि मीही मागेंपुढें न पाहतां नेहमीच्या रीतीप्रमाणें त्यांच्याशीं हस्तांदोलन करून मागें आलों. सहज माझी नजर महाराजांच्या सहचऱ्याकडे गेली त्यानें आ वासला होता. आणि कांहींशा भयभीत व चकित मुद्रेनें तो माझ्या

कडे पाहत होता. महाराजांच्या परिवारांतील इतर कांहीं मंडळींच्या चर्येवरही हाच भाव उमटला होता. साऱ्यांची अशी चर्या होण्याइतका काय प्रकार घडला हेंच मला कांहीं क्षण कळेना! मग एक इसम मला हळूच हिंदुस्थानींत म्हणाला, "अहो, तुम्ही काय केलंत हें?" मीं म्हटलें, "काय केलं?"

"महाराजांशीं हस्तांदोलन केलंत तें?"

"मग? त्यांत काय विशेष झालं? त्यांनीं हात पुढं केला, मीं हस्तांदोलन केलं!"

"अहो, कुणी जी गोष्ट करायला इथं धजत नाहीं, ती केलीत ना! महाराजांचा हात हातांत घेऊन तुम्ही त्यांचा अपमान केलात!"

मीं म्हणालों, "खरं? मग आतां यावर उपाय?"

"पाहावं काय होईल तें!—"

मागाहून प्रो. पंढरीनाथ तेलंग भेटले, तेही म्हणाले, "अरे, तूं काय केलंस हें? त्या तुझ्या हस्तांदोलनामुळं किती खळबळ उडाली ठाऊक आहे का? उद्धटपणाचा छाप त्यावर बसला आहे. असं कांहीं भलतंच करायला नको होतंस तूं!"

तेलंगांचे ते उद्गार ऐकतांच मात्र मीं कांहींसा बावरलोंच. मीं म्हणालों, "मीं स्वतः होऊन हात पुढं केला होता का? त्यांनीं हात पुढं केला. मीं तो अव्हेरला असता तर तें चमत्कारिक दिसलं असतं!"

त्यानंतर दोन दिवस माझे कांहींसे बेचैन मनःस्थितींतच गेले. पोलिटिकल एजंटच्या कानापर्यंत ती गोष्ट गेली आणि त्यांनींही मला बोलावून त्या प्रसंगाची हकीगत विचारली; पण सुदैवानें तें प्रकरण तितक्यावरच निभावलें आणि या संस्थानिकांशीं वागतांना फट् म्हणतां ब्रह्महत्या घडण्याचाही प्रसंग कसा उद्भवतो, याचें नवीन ज्ञान मला मिळालें.


### "चौत्रीस रन्स होगई"

संस्थानिकांच्या राजेशाही क्रिकेटचा एक मजेदार मासला काश्मीरच्या माजी महाराजांच्या (सर प्रतापसिंग) बाबतींत मला पाहावयास मिळाला.

ह्या महाराजांचाही एक क्रिकेट संघ होता व शिवाय इतर ठिकाणच्या खेळाडूंनाही आपल्या संघांतून खेळण्यासाठीं ते निमंत्रण देत असत. या काश्मीर महाराजांच्या संघाशीं नाटोर संघाचा एकदां सामना घडून आला होता. मुंबईहून मी व वॉर्डन त्या सामन्यांत नाटोर संघांतून खेळण्यासाठीं गेलों होतों. हे काश्मीरचे महाराज म्हणजे फार बडें प्रस्थ होतें. केवळ मानमतराबानें नव्हे, तर शरीर विस्तारानेंही ! क्रिकेटचे सामने खेळण्याच्या मर्यादेबाहेर त्यांच्या वयानेंही मजल मारली होती. पण महाराजांची स्वत: क्रिकेट खेळण्याची हौस मात्र जबरदस्त होती. त्या दिवशीं काश्मीर व नाटोर संघांत सामना सुरू झाला, तरी महाराजस्वारींचें आगमन तंबूंतही झालेलें नव्हतें ! वाड्यावरून निरोप आला कीं महाराजांची पूजा आटोपलेली नाहीं; उपाहाराच्या वेळेपर्यंत ती आटोपेल व त्यानंतर महाराजांची खेळण्याची पाळी आली कीं त्यांना फोन करण्यांत यावा. त्या सूचनाप्रमाणें त्यांनीं दिलेल्या वेळेवर फोन करण्यांत आला व महाराज क्रीडांगणावर शामियान्यांत येऊन दाखल झाले. दोघां तिघां हुजऱ्यांनीं त्यांच्या पायांना पॅड्स् बांधलीं; हातांवर हातमोजे चढविले व त्यांच्या हातांत बॅट दिली. आणि मग असा जामानिमा चढवून महाराज दोघां हुजऱ्यांच्या खांद्यावर रेलत क्रीडांगणावर उतरले. विकेटपाशीं येईपर्यंत ती एक छोटीशी मिरवणूकच दिसत होती ! नाटोर संघ अर्थातच क्षेत्ररक्षण करीत होता आणि वॉर्डन हे गोलंदाजी करीत होते. वॉर्डनना खास सूचना देण्यांत आली कीं महाराजांना अवघड अथवा जलद चेंडू टाकावयाचे नाहींत ! आम्हां क्षेत्ररक्षकांनाही सूचना मिळाल्या होत्या कीं महाराजांनीं फटकावलेला चेंडू शक्य तों सोडून देण्याचाच प्रयत्न करावयाचा ! अशा रीतीनें महाराजांच्या धांवांचा आंकडा धिमे धिमे वाढूं लागला.. त्यांत चौकारांखेरीज अर्थातच दुसरा फटका नव्हताच ! याप्रमाणें सहा चौकार महाराजांनीं फटकावले आणि मग चुकूनच गोलंदाजानें फेकलेला एक चेंडू विकेटवर जाऊन आदळला ! महाराजांच्या नजरेस आलें कीं आपण आउट झालों. मग मात्र ते थांबले नाहींत ! तंबूंत परत तशीच पुन्हां मिरवणूक निघाली. महाराजांनीं सहचऱ्याला जातां जातां प्रश्न केला, "कितनी रन्स होगई ?" त्यानें बोर्डावरील आंकड्याकडे पाहून उत्तर दिलें,

" चौवीस रन्स, सरकार ! " महाराजांना फार आश्चर्य वाटल्यासारखें दिसलें; ते म्हणाले, " चौवीस रन्स होगई ? "

महाराजांचें हें आश्चर्य हा आंकडा फार लहान दिसल्यामुळेंच होतें. काश्मीरमध्यें स्वतःच्या क्रीडांगणावर ते धांवांचें शतकही काढीत; पण येथें तर ' चौवीस रन्स ' मध्येंच त्यांना आटोपतें घ्यावें लागलें होतें ! त्यामुळें इतक्या थोडया धांवा कशा झाल्या याचें त्यांना आश्चर्य वाटल्यास तें अस्वाभाविक नव्हतें ! अर्थात त्यांच्या या कमी धांवांचा दोष स्कोअररला आमच्याप्रमाणें खास सूचना न दिल्यामुळेंच घडला होता, हें सांगणें नकोच !



## पतियाळांची ' सिकसर '

संस्थानिकांच्या क्रिकेटच्या षोकामुळें हिंदुस्थानांतील क्रिकेटला फार उत्तेजन मिळालें यांत शंका नाहीं. पण स्वतः संस्थानिकांमधून मात्र पैसा, सवड, शिक्षण व इतर सोयी यांची अनुकूलता असूनही पहिल्या प्रतीचे असे क्रिकेट-पटु या गेल्या पन्नास-साठ वर्षांत त्या मानानें फारच थोडे उदयाला आले. रणजींच्या पावलावर पाऊल टाकण्याचें श्रेय तर त्यांच्यापैकीं फक्त दोघेचजण काय तें थोडेफार मिळवूं शकले. रणजींनंतर इंग्लंड–ऑस्ट्रेलिया मधील टेस्ट सामन्यांमधून इंग्लंडतर्फें खेळण्याचा मान त्यांचे पुतणे राजकुमार दुलिप-सिंहजी व पतौडीचे नबाब या दोघांनीं संपादन केला आणि समाधानाची गोष्ट अशी कीं या दोघांही क्रिकेटपटूंनां आपल्या पहिल्याच टेस्ट सामन्यांत रणजींप्रमाणेंच एकेक शतक झळकवून रणजींची परंपरा यशस्वीपणें कायम

राखली. दुलिपसिंह हे रणजींप्रमाणेंच ' केंब्रिज ब्ल्यू ' म्हणजे केंब्रिज विद्यापीठाच्या संघांतून खेळण्याचा मान मिळालेले खेळाडू होते. दुलिपसिंहांनीं याखेरीज रणजींच्याच काउंटी संघांत ससेक्समध्यें प्रवेश मिळविला. पतौडीचे नबाब ऑक्स्फर्ड ब्ल्यू होते व वुर्स्टरशायर संघांतून खेळत असत. दुलिपसिंहांना हिंदी क्रिकेटच्या दुर्दैवानें आजारीपणामुळें ऐन उमेदींतच, वयाच्या २७ व्या वर्षी, क्रिकेट सोडून द्यावा लागला आणि ' गोष्टी सांगेन युक्तीच्या चार ' अशीच भूमिका त्यांना येथील खेळाच्या बाबतींत पत्करावी लागली. अल्पकाल एकादा तारा विशेष तेजानें चमकूं लागावा आणि त्याच्याकडे कुतूहलानें व हर्षभरानें तुम्ही पाहत असतांच तो अकस्मात अस्तंगत व्हावा, असाच कांहींसा प्रकार दुलिपसिंहांच्या क्रिकेटजीवनाबाबत घडला. १९२५ ते १९३२ सालपर्यंत विलायतेंत आठ क्रिकेट-हंगामांत ते खेळूं शकले. १९३० सालीं त्यांना ऑस्ट्रेलियांत टेस्ट सामन्यांत दाखल होण्याचा मान मिळाला व पहिल्याच डावांत १७३ धांवा करून वर सांगितल्याप्रमाणें स्वतःचा व रणजींच्या परंपरेचा लौकिक त्यांनीं कायम राखला. याच वर्षी ससेक्स विरुद्ध नॉर्थम्टनशायर या सामन्यांत त्यांनीं होव्ह येथें एका दिवसांत ३३३ धांवा केल्या. हा त्यांचा स्वतःच्या धांवांतील उच्चांक तर होताच, पण ससेक्स संघांतही इतक्या धांवा तत्पूर्वी एका खेळाडूनें एका डावांत काढल्या नव्हत्या. १९३१ सालीं ते ससेक्स संघाचे कॅप्टन झाले. हेंही वर्ष त्यांना यशाचेंच गेलें. ससेक्स संघांत धांवांच्या सरासरींत त्यांचाच अनुक्रम त्या वर्षी पहिला आला. पुढील वर्षी म्हणजे १९३२ सालीं मात्र त्यांची प्रकृति बिघडली आणि त्यानंतर पुन्हां ते क्रीडांगणावर बॅट घेऊन उतरले नाहींत.

दुलिपसिंहांचें क्रिकेट-कौशल्य

हिंदुस्थानांत ते फक्त एकाच वर्षी खेळूं शकले. १९२८ सालचा तो चौरंगी सामना अजूनही पुष्कळांना आठवत असेल. हिंदु संघाचें नेतृत्व त्या वर्षीही माझ्याचकडे होतें. त्या सालीं दुलिपसिंहांचें साह्य आम्हांला मिळाल्यामुळें आमचा संघ बॅटिंगच्या बाबतींत तरी इतरांपेक्षां खासच सामर्थ्यवान् झाला होता; पण क्रिकेटमधील अनिश्चिततेनें या सामन्यांत हळूच डोकें वर काढलें

आणि आमचा अपेक्षाभंग होऊन पहिल्याच सामन्यांत पारश्यांविरुद्ध आम्हांला पहिल्याच डावाच्या निकालावर हार खावी लागली. स्वतः दुलिपसिंहांनीं मात्र आपल्या खेळाच्या आवर्तांत आमची व प्रेक्षकांचीही मुळींच निराशा होऊं दिली नाहीं. पहिल्या डावांत ८४ व दुसऱ्या डावांत ३५ धांवा करून आपल्या प्रभावी बॅटीची चमक त्यांनीं चांगलीच प्रत्ययाला आणून दिली.

या सामन्याखेरीज हिंदु जिमखान्यावरही दोनतीन सामन्यांतून दुलिपसिंहजी खेळले व त्यांत त्यांच्या चमकदार खेळाचे वेगवेगळे पैलु विशेष पाहावयास मिळाले. दुलिपसिंहांनीं प्रत्येक 'स्ट्रोक'चा अतिशय मेहनत घेऊन अभ्यास केला होता; प्रॅक्टिसच्या वेळीं तोच तो 'स्ट्रोक' एकसारखा गिरवून, घोटवून त्यांनीं त्यावर प्रभुत्व मिळविलें होतें. असें सांगतात कीं या खेळाचा त्यांनीं इतका नाद घेतला होता कीं पटांगणांत रात्रीचे दिवे लावूनही ते खेळत राहत. दुलिपसिंहांच्या खेळाचें चटकन् लक्षांत भरण्यासारखें वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या पायांच्या हालचालींतील असाधारण चापल्य! इतरांना जो 'स्ट्रोक' अतिशय कठीण, किंबहुना अशक्यच वाटावयाचा, तो या 'फूटवर्क' मुळें ते सहजीं साधूं शकत असत. विशेषतः जलद्गति गोलंदाजाला चपलतेनें जमिनीसरपट 'ड्राइव्ह' करण्याची त्यांची विशिष्ट पद्धति पाहून मर्मज्ञ प्रेक्षक क्षणभर स्तिमितच होऊन जात असे. हा स्ट्रोक करतांना मनगट व पाय या दोहोंच्याही हालचालींचा समन्वय साधावयाचा असतो आणि तो ते अगदीं सहजतेनें पण अत्यंत परिणामकारकतेनें साधत असत. या सहजतेमुळें त्यांच्या ह्या हालचाली दृष्टीलाही फार मनोवेधक व लालित्यपूर्ण भासत. रणजींप्रमाणेंच दुलिपसिंहांची क्रीडाशैली त्यांची त्यांनाच साधून गेली होती. ही शैली त्यांनीं अभ्यासानें साध्य केली होती हें खरें; पण उपजत गुणांखेरीज हें इतकें कमालीचें कौशल्य साधणें शक्य नव्हतें हेंही तितकेंच खरें! अशा या अप्रतिम क्रिकेटपटूला या खेळाला अर्ध्यावरच विराम द्यावा लागला हें हिंदी क्रिकेटचें दुर्भाग्यच म्हटलें पाहिजे.

### नबाबांचे कसब

पातौडीच्या नबाबांनींही हिंदुस्थानांत पाय ठेवल्यापासून जवळ जवळ क्रिकेट-संन्यासच घेतला होता. पण गेल्याच वर्षीं (१९४६ सालीं) इंग्लंड-

मध्यें दौऱ्यावर गेलेल्या हिंदी क्रिकेट संघाचे कॅप्टन म्हणून त्यांची नेमणूक झाली आणि ते पुन्हां क्रिकेट क्षेत्रांत चमकूं लागले. विलायतेच्या या दौऱ्यांत त्यांनीं एकंदर ९८१ धांवा केल्या, त्यांत त्यांचीं चार शतकें होतीं. बॅटिंगच्या सरासरींत या दौऱ्यांतील खेळाडूंत त्यांचा अनुक्रम तिसरा आला व त्यांची धांवांची सरासरी ४६-७१ पडली. पण एकंदरींत पाहतां त्यांजकडून जेवढी अपेक्षा केली होती, तेवढी ते पुरी करूं शकले नाहींत. विशेषत: त्यांचें नेतृत्व क्रीडांगणावर यशस्वी करूं शकलें नाहीं. अनेकदां त्यांच्या हातून या बाबींत चुका घडल्या व क्रिकेट-टीकाकारांच्या टीकेलाही त्यांना पात्र व्हावें लागलें. या टीकेमुळेंच हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं हिंदी संघाचें नेतृत्व सोडून दिलें, असेंच नव्हे, तर खेळाकडेही पुन्हां पाठ फिरवल्याचें दिसतें. पातौडीच्या नबाबांना मीं प्रथम पाहिलें, त्या वेळीं ते इस्लाम जिमखान्यावर प्रॅक्टिस करीत होते. ऑस्ट्रेलियाहून टेस्ट सामना खेळून ते त्या सुमाराला नुकतेच परतले होते आणि त्यामुळें त्यांच्या खेळाविषयीं साहजिकच लोकांत फार कुतूहल निर्माण झालें होतें. पातौडीचे नबाब शरीरयष्टीनें किरकोळ व त्यांची खेळण्याची पद्धतिही इतकी सहज, कीं कांहीं प्रेक्षकांना प्रथमदर्शनीं त्यांचा खेळ सामान्यच वाटला. पण हा ग्रह त्या नेटप्रॅक्टिसच्या वेळींही फार क्षण टिकूं मात्र शकला नाहीं. कशाही प्रकारचा चेंडू असो, नबाबसाहेब चटकन् तो सरळ बॅटीच्या मध्यावर घेऊन ज्या तऱ्हेनें तो टोलवीत असत, ती तऱ्हा साधारण बॅट्स्मनच्या आंवाक्यांतली खासच नव्हती. नबाबसाहेबांच्या खेळांत शास्त्रशुद्धता अधिक असल्याचें मला दिसून आलें. त्यांचें 'टायमिंग' अचूक असतें व क्षेत्ररक्षक चुकवून चेंडू टोलविण्याचें सुंदर कसब (प्लेसिंग) त्यांच्याइतकें फारच थोड्यांना साधलेलें आहे. इस्लाम जिमखान्यावरील त्या भेटीनंतर नबाबसाहेबांबरोबर खेळण्याचा योग मला पतियाळा येथें आला होता; त्या वेळींही त्यांच्या खेळांतील हेंच कौशल्य प्रकर्षानें दिसून आलें. नबाबसाहेब त्या वेळीं फार वेळ खेळूं शकले नाहींत; पण नबाबसाहेबांचा जो खेळ मीं त्या वेळीं पाहिला, तेवढ्यावरूनही मीं असें बिनदिक्कत म्हणूं शकतों कीं, नबाबसाहेबांच्या विशिष्ट शैलीचा व तोलाचा बॅट्स्मन आज हिंदुस्थानांत तरी सांपडूं शकणार नाहीं.

## प्रिन्स शिवाजीराव

रणजींची परंपरा चालू ठेवणाऱ्या, राजघराण्यांतील या दोघां तरुण क्रिकेट-पटूंबरोबरच त्यांच्याच पंक्तींत बसण्याच्या योग्यतेच्या तिसऱ्या एका क्रिकेट-पटूची आठवण मला अनेकदां झाल्याशिवाय राहत नाहीं. हे क्रिकेटपटु म्हणजे बडोद्याचे कै. प्रिन्स शिवाजीराव ( सध्यांच्या श्रीमंत प्रतापसिंह महाराजांचे चुलते ) हे होत. प्रिन्स शिवाजीराव हे ऑक्स्फर्ड संघाचे प्रमुख खेळाडू होते आणि १९११ सालीं विलायतेस गेलेल्या हिंदी संघाच्या पहिल्याच सामन्यांत त्या संघाविरुद्ध ऑक्स्फर्डतर्फें ते खेळले होते आणि त्यानंतर पुढें ससेक्स व ग्लाव्स्टर या काउंटी संघांबरोबर हिंदी संघाचे जे दोन सामने शेवटीं झाले, त्यांत हिंदी संघाला त्यांनीं साह्य केलें होतें. ' दुसरे उदयोन्मुख रणजी ' म्हणून प्रिन्स शिवाजीरावांचा त्या वेळीं विलायतेंतील जाणत्या क्रीडावार्ताहरांकडून उल्लेख केला जाई; त्यावरून त्यांच्याविषयीं तज्ज्ञांनीं कोणत्या अपेक्षा बाळगल्या होत्या, याची सहज कल्पना येऊं शकते. त्यांचें नांव वृत्तपत्रांतून प्रथम प्रसिद्ध होऊं लागलें, त्या वेळीं एक गंमतीचा प्रकार घडला. एका वृत्तपत्रानें त्यांना " एच्. एच्. गायकवाड ऑफ बरोडा " असाच किताब दिला आणि " एच्. एच्. गायकवाड " ऑक्स्फर्ड संघांतून खेळत असल्याचें प्रसिद्ध करून थोडीशी खळबळ उडवून दिली. ( १९११ सालाच्या दौऱ्याच्या वेळींही हीच चूक एका वृत्तपत्रानें पुन्हां केल्याचें त्या वेळच्या रिपोर्टावरून दिसून येतें. तसेंच स्टार नांवाच्या एका पत्रानें संघाचे कॅप्टन पतियाळाचे महाराज यांचें वर्णन " पारशी पोटेंटेट " असें केलें होतें, तर दुसऱ्या एका पत्रानें कुचबिहारचे प्रिन्स हिटी यांना कुचबिहारचे एकमेव वारस ठरवून टाकलें होतें ! ) प्रिन्स शिवाजीराव यांच्याबरोबर खेळण्याची संधि मला एक दोनदां लाभली होती. ते विलायतेहून परत आले, त्या वेळीं ना. गव्हर्नरांच्या संघाचा एक सामना बॉम्बे जिमखान्यावर झाला होता. त्यांत गव्हर्नरांच्या संघांतून प्रिन्स शिवाजीराव खेळले होते व त्याच संघांत मी, डॉली कपाडिया इत्यादि खेळाडूंचाही समावेश झाला होता. शिवाजीरावांनीं आपल्या खेळानें त्या दिवशीं प्रेक्षकांवर उत्तम छाप पाडली. विशेषतः, ऑफ् साइडचा

ओव्हरपिच्ड् चेंडू ऑनकडे ज्या शिताफीनें ते खेंचीत, ती तऱ्हा अत्यंत वाखाणण्यासारखी होती. तो विशिष्ट स्ट्रोक पाहून मीं स्वत:ही त्याचा प्रयोग अनेकदां करून पाहिला होता व त्यांत थोडेफार यशही मिळवूं शकलों होतों. प्रिन्स शिवाजीरावांच्या खेळावरून त्या वेळच्या नव्या होतकरू खेळाडूंना अनेक गोष्टी शिकतां येण्यासारख्या होत्या आणि हिंदी क्रिकेटचा त्यांच्या खेळामुळें बराच फायदाही खचित होऊं शकला असता. पण हिंदी क्रिकेटचें दुर्दैव पुन्हां ओढवलें व शिवाजीरावांच्या अकाली निधनानें ही आशा विफलच ठरली !

## पतियाळांची 'सिक्सर'

निव्वळ ठणकेबाज खेळाबद्दल साऱ्या संस्थानिक खेळाडूंमध्यें नांव घ्याव-याचें तर तें प्रथम पतियाळाचे दिवंगत महाराज सर भूपेंद्रसिंग यांचेंच घ्यावें लागेल. किंबहुना माझ्या साऱ्या हयातींत, पतियाळाच्या या माजी महाराजां-इतका विलक्षण जोरकस फटके मारणारा बॅट्स्मन मीं पाहिला नाहीं. महा-राजांच्या मनगटांत विलक्षण ताकद होती; आणि त्याच्या जोडीला चेंडूला योग्य क्षणींच बॅट भिडविण्याचें कौशल्यही त्यांना चांगलेंच साध्य झालें होतें. महाराज खेळावयास आले कीं प्रेक्षक त्यांच्याकडून दणदणीत 'सिक्सर्स'ची अपेक्षा करीत आणि ही अपेक्षा बहुधा केव्हांच व्यर्थ जात नसे. सर्वांत लांब पल्ल्यावर फटका मारण्याचा विक्रमही याच महाराजांनीं केला आहे असें मला वाटतें. बॉम्बे जिमखान्याच्या त्या जुन्या इतिहासप्रसिद्ध क्रीडांगणावर कैक खेळाडूंनीं आजवर षट्काराचे फटके मारले असतील; पण मला पक्कें आठवतें कीं, टाटा पॅलेसच्या दिशेनें महाराजांनीं जो एकदां षट्काराचा एक जबरदस्त फटका हाणला होता, तो त्यांनीं फटकावलेला चेंडू बाउंडरीच्या सीमा-रेषेपलीकडे चांगला चाळीस–पन्नास–यार्डांवर जाऊन पडला होता. षट्कार मारणारा खेळाडू साधारणपणें चेंडू आकाशांत उंच टोलावतो आणि तो चेंडू सीमारेषेच्या पलीकडे कांहीं थोड्याच यार्डांवर जाऊन पडतो. असा चेंडू फटकावणें फारसें कठीण नसतें. पण महाराजांचा फटका आकाशाची उंची शोधण्याच्या फारसा भरीला न पडतां जमिनीचा जास्तींत जास्त पल्ला मागें टाकण्याचीच पराकाष्ठा करी आणि असा जोरदार फटका मारणें फक्त त्यांचें

त्यांनाच साधत असे. जोरदार पट्कार मारणारे खेळाडू म्हणून मेजर नायडू यांनींही उत्तम लौकिक मिळविला आहे. पण पतियाळाच्या महाराजांवर या बाबतींत त्यांना कधींच मात करतां आलेली नाहीं. गिलिगन यांच्या एम्. सी. सी. संघाविरुद्ध खेळतांना नायडू यांनीं टेट यांच्या गोलंदाजीवर एस्प्लनेड रोडच्या दिशेकडे एक जोराचा पट्कार मारला होता; माझ्या माहितीप्रमाणें तोच त्यांचा जास्तींत जास्त पल्ल्यावर गेलेला फटका होय; पण तोही सीमारेषे-पलीकडे पंधरा वीस यार्डांच्या पलीकडे कांहीं गेला नव्हता. सिमल्यापासून कांहीं अंतरावर चैल या ठिकाणीं पतियाळा महाराजांचें उंच पठारावर बांधलेलें खास क्रीडांगण आहे. या क्रीडांगणाच्या आजूबाजूला खोल दऱ्या आहेत. माजी पतियाळा महाराज या क्रीडांगणावर खेळावयास येत, त्या वेळीं अनेक चेंडू खेळण्यासाठीं तयार ठेवावे लागत; कारण महाराजांच्या बॅटीवर आलेले कैक चेंडू या दऱ्यांचा ठाव घेण्यासाठीं पळत असत आणि ते हाताला पुन्हां कधींच लागत नसत ! महाराजांखेरीज त्या क्रीडांगणावर खेळ-णाऱ्या इतर खेळाडूंच्या बाबतींत मात्र ही धास्ती करण्याचें फारसें कारण कधींच पडत नसे. कारण तितका पल्ला कोणींच बहुधा गांठू शकत नसे !

## ' इंग्लंड ' विरुद्ध ' हिंदुस्थान '

पतियाळाच्या या माजी महाराजांच्या संघांतून, त्यांच्या नेतृत्वाखालीं व त्यांच्या संघाविरुद्धही मीं अनेकदां खेळलों आहें. यांपैकीं अनेक दृष्टींनीं माझ्या या क्रीडाजीवनांत संस्मरणीय ठरलेला एक सामना म्हणजे १९१८ सालीं झालेला " इंग्लंड " वि. " हिंदुस्थान " हा सामना होय. हा सामना दुष्काळ फंडाच्या मदतीसाठीं खास घडवून आणला होता आणि ' इंग्लंड ' संघाचें नेतृत्व मुंबईचे त्या वेळचे क्रिकेटशौकिन गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनीं व हिंदुस्थान संघाचें नेतृत्व पतियाळानरेशांनीं स्वीकारलें होतें. " इंग्लंड " संघांत त्या वेळीं हिंदुस्थानांत असलेल्या बहुतेक नामांकित इंग्लिश क्रिकेटपटूंचा समावेश झाला होता व तशीच निवड आमच्या संघाचीही झाली होती. पतियाळाच्या महाराजांखेरीज आमच्या या " हिंदुस्थान " संघांत मी, डॉली कपाडिया, सी. के. नायडू, अब्दुस सलाम, युसफ बेग, एस्. एम्. जोशी, चोथिया, वशिफदार, मुराद इत्यादि खेळाडूंना

स्थान मिळालें होतें. याच्या अगोदर तीनच वर्षांपूर्वी–१९१५ सालीं झालेल्या अशाच तऱ्हेच्या एका सामन्याची स्मृति ताजीच होती. आणि त्या वेळीं झालेल्या पराजयाचें उट्टें काढण्याची ही एक संधि या सामन्यानें आणून दिली होती. १९१५ सालीं झालेला तो सामना युद्धफंडाच्या मदतीसाठीं झाला होता आणि त्या सामन्यांत कर्नल ग्रेग (२१६), व कॅ. गोल्डी (१०४) यांच्या तडफदार बॅटिंगमुळें इंग्लंड संघाच्या धांवांचा आंकडा ५६० या कमाल मर्यादेपर्यंत जाऊन पोंचला होता. हिंदुस्थान संघाला त्या वेळीं पहिल्या डावांत ११० व दुसऱ्या डावांत १९५ एवढ्याच धांवा करतां आल्या होत्या. पतियाळा नरेशांनीं यांपैकीं पहिल्या डावांत ३३ व दुसऱ्या डावांत ४१ धांवा केल्या होत्या. या दुसऱ्या डावांत पतियाळा महाराजांपेक्षां दोन अधिक धांवा करण्याचें श्रेय मीं घेतलें होतें व माझ्याच धांवांची संख्या त्या डावांत इतरांपेक्षां अधिक होती. त्या सामन्यांत टॅरंट यांच्या प्रभावी गोलंदाजीनें आमच्या खेळाडूंचे पटापट बळी घेतले व आम्हाला चांगला एक डाव व २६३ धांवांचा दणदणीत पराजय घ्यावा लागला. सामना संपल्यावर एक छोटासा समारंभ घडवून आणून त्यांत रणजींच्या हस्तें गव्हर्नरांच्या बॅटीचा लिलांव करण्यांत आला होता, व पतियाळाच्या महाराजांनीं ती बॅट २५०० रुपयांना खरेदी केली होती. १९१८ सालच्या सामन्यांत या तीन वर्षांपूर्वीच्या पराजयाची आम्हांला अगदीं सव्याज जरी फेड करतां आली नाहीं, तरी क्रिकेटच्या खेळांतील आमच्या संघाची पत पूर्ण शाबूत असल्याचा जोरदार पुरावा पुढें मांडण्याइतकी फेड आम्ही खासच करूं शकलों !

## तुफानी खेळ

त्या सामन्यांत इंग्लंड संघाला टॅरन्टचें साह्य लाभूं शकलें नव्हतें. पण हॅम्पशायरचा प्रसिद्ध फास्ट बोलर न्यूमन, एच्. ली, हीथ, लॅव्हर्टन, कॅ. पॅक वगैरे काउंटी लौकिकाचे पट्टीचे गोलंदाज त्या संघांत होते. कॅ. पॅक या मंदगति गोलंदाजानें त्याच वर्षी चौरंगी सामन्यांतील निर्णायक सामन्यांत पारश्यांच्या १२ धांवांत ७ विकेट्स् घेऊन त्यांचा पार धुव्वा उडविला होता. पण या सामन्यांत हिंदु बॅटिंगपुढें या सर्वांची गोलंदाजी निष्प्रभ



अमर कीर्तीचे हिंदी गोलंदाज

पी. बाळू



—आणि फलंदाज

रणजी

ठरली. महाराजांनीं टॉस जिंकला व कपाडिया व मी सुरुवातीला खेळावयास गेलों. कपाडिया लवकरच रनआउट झाला; त्यानंतर चोथिया व अब्दुस सलाम हे दोघेही थोडक्याच अवधींत बाद होऊन तंबूकडे परत फिरले. तीन खेळाडू बाद होऊन अवघ्या ४४ धांवा झाल्या होत्या. पूर्वीच्या सामन्याची पुनरावृत्ति होते कीं काय अशीही शंका कांहीं जणांच्या मनांत डोकावूं लागली होती. या परिस्थितींत पतियाळा महाराज चवथ्या अनुक्रमाला खेळावयास आले. आणि ते क्रीडांगणावर येतांच खेळाचा रंग ताबडतोब पालटला. महाराजांच्या बॅटीचा पट्टा अशा कांहीं दणक्यानें फिरूं लागला, कीं क्षेत्ररक्षकांना चेंडू अडविण्यासाठीं मध्यें हात घालणेंही धोक्याचें वाटूं लागलें! चेंडू वरचेवर सीमारेषा गांठूं लागला आणि धांवांचा आंकडा भराभर वाढूं लागला. मीही मधूम मधून धांवा करीत होतों; पण माझें मुख्य धोरण अशा समयीं जें ठेवणें जरूर असतें तेंच म्हणजे जोडीदाराला स्टॅंड देण्याचें होतें. सुमारें पंचेचाळीस तुफान धांवा केल्यावर महाराजांचा पहिला झेल उडाला. पण स्वतः गोलंदाज लॅव्हर्टन यानेंच तो सोडला. पण तो " ट्रेस्ट ड्राइव्ह" इतका जोराचा होता कीं तो झेल सुटला यांत मला कांहींच नवल वाटलें नाहीं. महाराज फटके मारीत ते बहुधा असेच सरळ 'स्ट्रेट ड्राइव्ह' च्या स्वरूपाचे असत; अशा वेळीं गोलंदाजाला तो फटका अडविणें मुष्किलीचेंच होई. चेंडूफेक केल्यानंतर पुष्कळ गोलंदाजांना पांचसहा पावलें पुढें येण्याची संवय असते. पण महाराज खेळत असतांना ही संवय पुष्कळदां घातुक ठरण्याचा संभव असे, व त्यामुळें या बाबतींत गोलंदाजाला फार जपून वागणें भाग पडे! महाराजांनीं त्या डावांत ८३ धांवा केल्या. त्यांत षट्काराचे चार व चौकाराचे दहा फटके होते. कॅ. पॅक यांच्या गोलंदाजीवर महाराज आउट झाले. ते पॅव्हिलियनकडे परत फिरले, त्यावेळीं हिंदुस्थान संघाच्या धांवांचा आंकडा १२८ नीं वाढला होता. आणि संघाच्या खेळाडूंत नवा उत्साह निर्माण झाला होता. मीं त्या दिवशीं १४० धांवा केल्या. त्यांत बाउंडरीचे २१ फटके मीं मारले होते. माझ्यानंतर नायडू खेळायास आले, त्यांनींही प्रथम धिम्मा खेळ खेळून पुढें जोराची टोलवाटोलवी सुरू केली व ६ सिक्सर्स व १३ बाउंड्स् लावून १२२ धांवा केल्या. हिंदुस्थान संघानें त्या

सामन्यांत बरोबर ५०० धांवांचा आंकडा फलकावर झळकावून खेळ संपविला. इंग्लंड संघाला दोन्ही डाव जवळजवळ पुरते खेळूनही हा आंकडा गांठतां आला नाहीं. पहिल्या डावांत एस्. एम. जोशी यांच्या फसव्या गोलंदाजीनें त्यांचे ६ बळी घेतले आणि जेमतेम १५८ धांवा त्यांना करतां आल्या. दुसऱ्या डावांत वझिफदार यांच्या गोलंदाजीचा प्रभाव पडून इंग्लंड संघाला आपला अवतार बहुतांशीं आटोपता घेण्याची पाळी आली होती. ६ खेळाडू बाद होऊन त्यांच्या ५६ धांवा झाल्या होत्या. पण यानंतर, कॅ. वायगल व विकेटकीपर लिव्हसे या दोघांनीं अतिशय चिवटपणें खेळून वेळ काढला व सामना अनिर्णित ठेवण्याचें श्रेय घेतलें. सामन्याच्या समाप्तीनंतर पुन्हां रणजींच्याच हस्तें पतियाळा महाराजांच्या बॅटीचा लिलांव करण्यांत आला. सामन्यांतील सर्वांत अधिक धांवा काढणाऱ्या खेळाडूची बॅट म्हणून माझ्याही बॅटीला हाच मान मिळाला आणि इस्लाम जिमखान्याच्या सेक्रेटरींनीं ती खरेदी केली. लेडी विलिंग्डन यांच्या हस्तें मला रौप्यचषकही या समारंभांत देण्यांत आला. एका डावांत जास्तींत जास्त धांवा मीं केल्या त्या ह्याच सामन्यांत होय.

## अत्यंत वेगवान् गोलंदाज

संस्थानांपैकीं पतियाळालाच, मला वाटतें, मीं सर्वांत अधिक सामने खेळलों असेन. १९२८-२९ सालापर्यंत बहुधा दरवर्षीं, कोणत्या ना कोणत्या संघांतून खेळण्यासाठीं पतियाळाला माझी एकादी खेप होत असे. पतियाळा महाराजांनीं क्रिकेटसाठीं खुद्द पतियाळा येथें एक व सिमल्यानजीक चैल येथें एक अशीं दोन क्रीडांगणें तयार करवून घेतलीं आहेत. पतियाळाच्या या माजी महाराजांचे पिताजी महाराजाधिराज राजेंद्रसिंग यांच्याच हौसेमुळें व परिश्रमांमुळें क्रिकेटच्या खेळाला पतियाळांत महत्त्व मिळूं शकलें आणि त्यांचेंच नांव पतियाळा येथील क्रिकेट-क्रीडांगणाला दिलें आहे. या महाराजांनीं ब्रॉकवेल आणि हर्न या इंग्लंडमधील प्रसिद्ध खेळाडूंना कांहीं दिवस आपल्या पदरीं वस्ताद म्हणून ठेवलें होतें. तीच वहिवाट सर भूपेंद्रसिंगांनींही टॅरन्ट, हर्स्ट, ऱ्होड्स, रॉय किल्नर, लीलंड, पारसन्स वगैरेंना बोलावून चालू ठेवली होती, यामुळें पतियाळाला जाण्याचा ज्या ज्या वेळीं योग येई,

६००५

त्या त्या प्रत्येक वेळीं बहुधा कोणा ना कोणा तरी नामांकित इंग्लिश अथवा ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूशीं गांठ पडत असे आणि त्यांच्या खेळांतील बारकावे व खांचाखोंचा प्रत्यक्षच निरीक्षण्याची संधि मिळे. पतियाळाच्या दौऱ्यापासून हा एक मोठाच फायदा पदरांत पडे. जगांतला एक अति वेगवान् गोलंदाज मीं पतियाळा येथेंच पाहिला. या गोलंदाजाचें नांव मिनन (*Mignon*) असें होतें आणि तो ऑस्ट्रेलियाचा खेळाडू होता. ‘जगांतील सर्वांत वेगवान् गोलंदाज’ असें त्याचें वर्णन करणें कितीसें अचूक होईल हें सांगतां येणें कठीण असलें, तरी मीं स्वत: आजवर जितके जलदगति गोलंदाज पाहिले, त्या सर्वांत मीं पाहिलेला हाच अत्यंत तुफान गोलंदाज होय एवढें तरी मी खासच सांगूं शकेन.

‘ त्यानें फेकलेल्या चेंडूवर नजर ठरणेंही अशक्य होत असे ’ असें नेहमीचें वर्णन करून मिननच्या तुफानी गोलंदाजीची यथार्थ कल्पना होणें शक्य नाहीं. बॅट्स्मन तर त्याच्या गोलंदाजीला तोंड देण्यास कचरत असेच, पण स्लिपमधील क्षेत्ररक्षकांनाही बॅटस्मनच्या बॅटीला लागून उडालेला झेल पकडतांना धाकधूक वाटत असे. चेंडू बॅटीला चाटून गेल्यामुळें स्लिपमध्यें किंवा इतर ठिकाणीं उडालेले झेल केवळ चेंडूच्या जबरदस्त वेगामुळेंच सुटून जात व मोठमोठ्या चपल क्षेत्ररक्षकांनाही अक्षरश: हात टेकण्याची पाळी येई ! मिननच्या या गोलंदाजीवर खेळतांना बॅट बहुधा निकालांतच निघत असे; आणि स्वत: महाराज खेळावयास आले, म्हणजे तर चारपांच बॅट्स् फुटल्याखेरीज या उभयतां तुल्यबल वीरांचें द्वंद्व संपत नसे. नाटोर संघामधून पतियाळा विरुद्ध एकदां आम्हीं खेळत होतों, त्या वेळीं मला आठवतें कीं, मिननच्या एका जलद चेंडूनें ओघडशंकर यांच्या लेगगार्ड-सचें बकलच मुळांत साफ तोडून कुठच्या कुठें उडवून लावलें होतें ! या प्रकारानें ओघडशंकर यांनीं मिननची इतकी धास्ती घेतली कीं, पुन्हां त्याच्या बोलिंगला खेळण्याचा धीर त्यांना करवेना ! मिननची गोलंदाजी इतकी तुफानी असे, तरी ‘बॉडीलाइन’ नांवाचें जें तंत्र पुढें सुरू झालें होतें, त्याचा अंशही त्याच्या गोलंदाजींत नव्हता. स्वभावानें व वृत्तीनेंही तो सौजन्यपूर्ण, मनमोकळा व खेळाडू वृत्तीचाच गडी दिसला. शरीरयष्टीनें मात्र ही स्वारी उंच, भव्य आणि आडदांड दिसे. असें म्हणतात कीं मिननच्या गोलंदाजी-

मुळें अपघात घडण्याची भीति वाटल्यामुळें त्याला इंग्लंड–ऑस्ट्रेलिया टेस्ट सामन्यांत स्थान मिळूं शकलें नाहीं. मिननच्या गोलंदाजीवर नाटोर-पत्याळा या सामन्यांत मीं सुमारें साठ धांवा करूं शकलों. पण त्याच्या गोलंदाजीला पूर्ण यशस्वीपणें टक्कर देऊन धांवांचें एक शतक करण्याची करामत आम्हां बंधूंपैकीं गणपत यानें एल्फिन्स्टन कॉलेजसंघांतून पतियाळा विरुद्ध खेळतांना एकदां करून दाखविली होती. त्या वेळीं तो इतक्या कांहीं विश्वासानें व तडफदार रीतीनें खेळला, कीं स्वतः मिनन यानें शतक पुरें होतांच त्याचें मुद्दाम पुढें येऊन अभिनंदन केलें. मिनन पतियाळाला फक्त दोन सीझनपुरताच होता. आणि पतियाळाखेरीज हिंदुस्थानांत इतरत्र तो कोठें फारसा खेळलाही नाहीं.

## आभाळांतील क्रिकेट

पतियाळाला राजेंद्र जिमखान्याचें जें क्रीडांगण आहे, तें हिरवळीचें असून हिंदुस्थानांतील उत्कृष्ट क्रीडांगणांत त्याला सहज स्थान देतां येईल. याउलट चैल येथील क्रीडांगणावर 'मॅटिंग' वर खेळावें लागतें. चैल हीं जगांतील सर्वांत उंच क्रिकेट ग्राउंड आहे. सिमल्याहून काल्का स्टेशन मागें टाकल्यावर कांडाघाट म्हणून एक स्टेशन लागतें, तेथून चैलपर्यंत मोटर रस्ता काढण्यांत आला आहे. हा रस्ता फार वळणावळणाचा व ठिकठिकाणीं अरुंद असून रस्त्याच्या दोन्हीं बाजूंना खोल दऱ्या आहेत. यामुळें मोटर अपघात होण्याची या रस्त्याला नेहमींच भीति असते. चैलचें जें मैदान आहे, त्यावर वाळू पसरलेली आहे आणि तें अशा प्रकारें बांधून काढलेलें आहे कीं कितीही पाऊस पडला, तरी पावसाचें पाणी ताबडतोब त्यावरून वाहून जावें व मैदान कोरडें राहावें. मध्यभागीं क्रिकेटचें 'पीच' आहे, तें सिमेंटचें पक्कें केलेलें असून त्यावर 'मॅट' पसरण्यांत येतें. ग्राउंडवर रोलिंग करण्यासाठीं एक हत्ती खास नेमलेला असे व सबंध दिवस त्याला काम करावें लागे, त्यामुळें ग्राउंडवर एकसुद्धां खडा दिसत नसे. पतियाळा येथील क्रिकेटचा हंगाम नोव्हेंबर महिन्यांत सुरू होऊन साधारणपणें जानेवारी महिन्याच्या अखेरीस समाप्त होतो; याउलट चैल येथें फक्त सप्टेंबर महिन्यांतच क्रिकेटचे सामने होऊं शकतात आणि यावेळीं हवामान केव्हां

केव्हां इतकें मजेदार असतें कीं जणूं अस्मानांतच खेळ चालला आहे, असेंच पुष्कळदां भासत असतें. वर मैदानावर खेळ चालला असतांना खालीं दऱ्यांमध्यें मेघांचा गडगडाट व विजलीचा चमचमाट चालू असतो. दृष्टि फेकावी तेथें धूसर रंगाचे ढग पसरलेले, खुद्द क्रीडांगणावरही कधीं कधीं इतकें धुकें कीं एका बाजूच्या क्षेत्ररक्षकाचें दुसऱ्या टोंकाच्या क्षेत्ररक्षकाला दर्शन होणेंही दुरापास्तच ! चेंडू नजीक आल्यानंतरच क्षेत्ररक्षकाच्या दृष्टीला तो पडावयाचा आणि अमुक एका बॅस्टमननें धांव घेतली हें अंपायरनें गर्जून सांगावें, तेव्हांच तें स्कोअररला कळावयाचें ! अंपायरला स्वतःच्या कामाखेरीज प्रत्येक धांवेगणिक ललकारी देण्याचें हेंही वेगळें काम त्या परिस्थितींत करावें लागे ! चैलचा तो क्रिकेट म्हणजे एक वेगळाच गंमतीदार पण तितकाच रोमांचकारी अनुभव असे. चैलखेरीज इतरत्र असा आभाळांतला खेळ कुठें होत असेल कीं काय याची शंकाच आहे.

चैलखेरीज पतियाळा महाराजांचें दुसरें एक खास वस्तीचें ठिकाण म्हणजे पिंजोर हें होय. पतियाळापासून चारपांच तासांच्या मोटर प्रवासानंतर हें ठिकाण लागतें. आजूबाजूला सारा प्रदेश जंगल झाडी यांनींच भरलेला आहे. हें ठिकाण पतियाळा नरेशांनीं मृगयेकरितांच खास राखून ठेवलें आहे. आणि तेथें खाशा स्वाऱ्यांखेरीज कोणाही इसमाला जाण्यास बंदी आहे. निदान माजी महाराजांच्या वेळीं तरी ही अशी बंदी होतीच. आम्हा क्रिकेटपटूंना मात्र पिकनिकसाठीं एकदोनदां तेथें मुद्दाम नेण्यांत आलें होतें. पिंजोर हें अतिरम्य वनश्रीचें स्थान आहे. पण आसपासच्या भागांतून वाघ, चित्ते यांची बरीच वस्ती असल्यामुळें निसर्गरम्यतेबरोबरच त्या स्थानाच्या धोक्याचीही जाणीव झाल्यावांचून राहत नाहीं. पतियाळा येथें मी महाराजांच्या निमंत्रणावरून १९१९ सालच्या क्रिकेट हंगामांत दोन महिने जाऊन राहिलों होतों. इंग्लंड-ऑस्ट्रेलियांतील नामांकित क्रिकेटपटु त्या वर्षी येऊं न शकल्यामुळें महाराजांनीं त्या हंगामांत हिंदुस्थानांतील क्रिकेटपटूंना निमंत्रण देण्याचें ठरवून त्याप्रमाणें मला निमंत्रण दिलें होतें. पतियाळाला महत्त्वाचे असे सामने बहुश: डिसेंबर महिन्यांतच होत असत. बाकी सीझनमध्यें नेहमींच प्रॅक्टिस चालत असे किंवा मधून मधून स्थानिक सामने व्हावयाचे.

## माझी नेमणूक

तो सीझन आटोपतांच मी परत मुंबईला जाण्याची तयारी करून महाराजांचा निरोप घेण्यापूर्वी महाराजांचे सहचर कर्नल मिस्त्री यांना जाऊन भेटलों, तों ते माझ्याकडे नवलानें पाहून म्हणाले, " का हो, चाललांत कुठं ? तुमची तर इथं गेम सुपरिंटेंडंट म्हणून अपॉइंटमेंट सुद्धां झाली आहे !"

मला या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. ह्या जागेवर मला नेमण्यांत आल्याचें कांहींच वर्तमान त्या क्षणापर्यंत मला कळलें नव्हतें अथवा ही जागा पत्करण्याविषयीं मला कोणाकडून विचारणाही झाली नव्हती. शिवाय त्या जागेवर असलेला बुड्ढा शीख अधिकारी तिथें अद्याप तसाच चिकटून होता. आणि त्या सर्व दरबारी मंडळीचा एकंदर रागरंग पाहतां, परकी इसमाला तेथें ते सुखासमाधानानें दिवस काढूं देतील असें मुळींच लक्षण दिसत नव्हतें. त्यामुळें कर्नल मिस्त्री यांचा तो प्रश्न ऐकतांच मीं कांहींसा घोटाळ्यांतच पडलों. महाराजांनीं मजवर मेहेरबानी केली होती हें तर दिसत होतेंच, पण तेथें राहणें मला खर्चाच्या व इतर दृष्टींनींही कितपत परवडेल याचाही प्रश्न होताच ! माझा गोंधळलेला चेहरा पाहून कर्नल पुन्हा म्हणाले, " महाराजांना वाटतंय तुम्ही ताबडतोब स्वीकाराल ही जागा !–म्हणून त्यांनीं तुमची नेमणूक सुद्धां करून टाकली !–"

मी त्यांना म्हणालों, " महाराजांच्या या मेहेरबानीबद्दल मीं फार आभारी आहें. पण याबाबत घरच्या मंडळीचा सल्ला घेतल्याखेरीज मला कांहीं करतां येणार नाहीं. तिथची नोकरी सोडून सारा संसार घेऊन इथं यायचा हा प्रश्न आहे ! तेव्हां मुंबईला गेल्यावर यासंबंधीं तुम्हांला निश्चित काय तें कळवतों." त्यांनीं रुकार देतांच त्यांचा निरोप मीं घेतला आणि महाराजांच्याही भेटींत त्यांच्या कानीं हेंच कारण घालून मी मुंबईला परत आलों. मुंबईहून मीं त्या नेमणुकीबाबत नकार कळविला, हें सांगणें नकोच. महाराजांची यामुळें माझ्यावर कदाचित् अवकृपा होईल कीं काय अशी भीति तें उत्तर देतांना मला वाटत होतीच. पण सुदैवानें तसें कांहीं घडलें नाहीं. माझ्या सांसारिक अडचणींचें जें कारण मीं पुढें केलें, तेवढ्यानें महाराजांचें समाधान झालेसें दिसलें. दुसऱ्यांदा यानंतर आमची मुलाखत झाली, त्या वेळीं माझ्याशीं वागतांना महाराजांच्या वर्तनांत कांहीं फरक झालेला आढळून आला नाहीं.

पतियाळाचे हे माजी महाराज क्रीडांगणावर असतांना आमच्याशीं मिळून मिसळून वागत. इतर वेळीं अर्थातच त्यांचा आमचा फारसा संबंधही येऊं शकत नसे. सध्यांचे महाराजही (त्यावेळीं ते युवराज होते) फार सौजन्यशीलतेनें वागत. त्यांची चर्या सदा प्रसन्न आणि हंसतमुख असे. त्यामुळें त्यांच्याशीं बोलतां चालतांना एक प्रकारचा मोकळेपणा वाटे. संस्थानिकांच्या या वागणुकीसंबंधीं वेगवेगळे नमुने माझ्या पाहण्यांत आले आहेत. प्रिन्स दुलिपसिंग हे मितभाषी व कांहींसे 'रिझर्व्हड्' अशाच वृत्तीनें वागत. स्वतः होऊन ते संभाषण करावयाचे नाहींत. पण तुम्हीं खेळांतील एकादा प्रश्न केल्यास तेवढ्यापुरते मात्र ते मोकळेपणानें विवरण करतील. सध्याचे पतियाळाचे महाराज हेही एक चांगल्यापैकीं बॅट्स्मन आणि बोलर आहेत. क्रिकेटचे धडे त्यांना फ्रँक टॅरन्ट यांजकडून मिळाले आहेत. आणि त्यांनींही या खास शिक्षणाचा चांगला उपयोग करून घेतला आहे. पण त्यांच्या खेळांतील एक मोठी कमकुवत बाजू म्हणजे बचावाच्या (डिफेन्स) खेळाचा अभाव ही होय. चढाईचा खेळ त्यांना जितका साधूं शकतो, त्या मानानें बचाव करणें त्यांना साधत नाहीं आणि यामुळेंच पुष्कळदां फार काल झुंज देत राहणें त्यांना अवघड होत असते. क्रिकेटरला साजेशीच त्यांची शरीरयष्टि असली, तरी जलद धांवणें अथवा वांकणें त्यांना प्रयत्न करूनही जमत नाहीं. कदाचित् त्यांच्या विशेष उंचीमुळेंच हा दोष निर्माण झाला असावा; पण या दोषाचा परिणाम त्यांच्या बॅटिंगवर तसाच क्षेत्र-रक्षणावरही झालेला आहे. तथापि चढाईचा त्यांचा खेळ मात्र बरेचदा प्रेक्षणीय होत असतो व त्यांचे कांहीं कांहीं फटके तर फार सफाईदार अस-तात. आजच्या इतर अनेक संस्थानिक क्रिकेटपटूंहून हे महाराज पुष्कळच चांगले खेळूं शकतात, हें तरी खासच सांगतां येईल. १९३२ सालीं विलाय-तेला गेलेल्या संघाचे कॅप्टन पोरबंदरचे महाराज किंवा ३६ सालच्या संघाचे कॅप्टन महाराजकुमार विजयानगरम् यांनीं संघनेतृत्व स्वीकारण्याबाबत माजी पतियाळानरेशाची परंपरा राखली असली, तरी प्रत्यक्ष खेळाच्या बाबतींत मात्र तीच परंपरा त्यांना राखतां आली नाहीं. नजरेंत भरण्यासारखें वैशिष्ट्य त्यांच्या खेळांत मला केव्हांच दिसूं शकलें नाहीं. लिमडीचे घनःश्यामसिंहजी, डोंगरपूरचे महाराज यांच्याबाबतही असेंच थोड्याफार फरकानें सांगतां


येईल. त्यांतल्या त्यांत घनःश्यामसिंहजी यांचा अनुक्रम अधिक वर लागूं शकेल.

कुचबिहार संघ

संस्थानी संघाशीं माझा प्रथम संबंध आला तो नाटोर महाराजांच्या संघाशीं होय, याचा उल्लेख यापूर्वी एकदां मीं केलाच आहे. हे महाराज स्वभावानें निगर्वी आणि मनमिळाऊ होते. युरोपियन संघांचा खेळांतील वरचष्मा त्यांना खपत नसे व युरोपियनांना त्यांच्याच खेळांत हिंदी संघाकडून हार घ्यावयास लावावी अशा ईर्ष्येनें हिंदी खेळाडूंच्या संघाचे युरोपियनांशीं सामने ते घडवून आणीत. आणि हिंदी खेळाडू त्यांची ही मनीषा बहुधा सफलही करून दाखवीत. नाटोर महाराजांनीं कलकत्ता येथें खास स्वतःचें क्रीडांगण तयार करवून घेतलें होतें. हें क्रीडांगण फार सुंदर होतें. कलकत्त्यांत कलकत्ता क्लबचें 'ईडन गार्डन्स्,' कुचबिहार महाराजांचें 'वुडलँड्स्' व हें नाटोरचें क्रीडांगण हीं तीन क्रीडांगणें महत्त्वाच्या सामन्यांच्या दृष्टीनें विशेष प्रसिद्ध आहेत, किंवा होतीं असें आतां म्हटलें पाहिजे. कारण नाटोरच्या महाराजांच्या निधनानंतर नाटोरतर्फे सामने होण्याचें बंद झालें आणि कुचबिहारचे महाराज जितेंद्र नारायण (गायकवाडांचे जामात) यांच्या निधनानंतरही कुचबिहार संघाच्या बाबतींत असाच खंड पडला. कलकत्त्यांतील सारींच क्रीडांगणें मुंबईप्रमाणेंच हिरवळीचीं आहेत. ईडन गार्डन्सचें क्रीडांगण पुना जिमखान्याच्या क्रीडांगणाप्रमाणेंच बोलरपेक्षां बॅट्स्मनला अनुकूल असेंच आहे. पण क्रिकेट हंगामाच्या दिवसांत तेथें दंव पडत असल्यामुळें खेळाच्या प्रारंभीं साधारणतः एक दीड तासपर्यंत ग्राउंड ओलें असतें आणि दोन तीन विकेटस् या अवधींत हटकून पडूं शकतात. 'वुडलँड्स्' च्या ग्राउंडचें स्वरूप कांहींसें आमच्या येथील पूर्वीच्या हिंदु जिमखान्याच्या ग्राउंडसारखें आहे. १९१९ च्या जानेवारी महिन्यांत कुचबिहार संघांतून खेळण्यासाठीं मला निमंत्रण मिळालें. त्या वेळीं ईडन गार्डन्सवर एम. सी. बर्ड यांच्या संघा विरुद्ध आमचा एक खास सामना झाला होता. स्वतः बर्ड हे सरे काउंटीचे खेळाडू होते. याशिवाय त्यांच्या संघांत एच्. ली, होझी, न्यूमन,

लिव्हसे, इव्हान्स वगैरे त्यावेळचे प्रसिद्ध युरोपियन खेळाडूही घेण्यांत आले होते. आमच्या कुचबिहार संघांत माझ्याखेरीज, डॉली कपाडिया, गणपत, एस्. एम्. जोशी, हे मुंबईचे खेळाडू आणि मणिदास, बी. मुकर्जी, हे कलकत्याचे प्रसिद्ध खेळाडू होते. कुचबिहारचे नेहमीचे कॅप्टन, महाराजांचे बंधु महाराजकुमार व्हिक्टर नारायण हे असत; पण ते त्या दिवशीं आजारी असल्यामुळें महाराजांचे दुसरे कनिष्ठ बंधु राजकुमार हितेंद्र नारायण अथवा प्रिन्स हिटी यांनीं त्या सामन्यांत आमच्या संघाचें नेतृत्व स्वीकारलें होतें. कुचबिहार राजघराण्यापैकीं प्रसिद्धि पावलेले क्रिकेटपटु म्हणजे हे दोघेच राजकुमार होत. हे दोघेही दणदणीत बॅटस्मन होते. प्रिन्स हिटी हे विलायतेंत सॉमरसेट संघांतून खेळत असत आणि १९११ सालीं गेलेल्या हिंदी संघाला त्यांचें साह्य मिळूं शकेल अशी अपेक्षा होती; पण त्या दौऱ्याच्या वेळीं बादशहांच्या राज्यारोहणाच्या समारंभाची धामधूम असल्यामुळें पतियाळा महाराजांप्रमाणेंच प्रिन्स हिटी यांचाही वेळ त्या धामधुमींतच गेला. कुचबिहारचे पारशी खेळाडू एम. पी. बजाना हे मात्र त्या संघांतून कांहीं सामन्यांत खेळूं शकले होते. सॉमर्सेट संघाचे एक कॅप्टन जॉन डॅनियल हे पूर्वीच्या महाराजांच्या कारकीर्दीत म्हणजे सुमारें १९०९–१० सालच्या सुमारास कुचबिहार संघाचेही कॅप्टन असत. त्यांच्याखेरीज सॉमर्सेटचेच लेविस व रॉबसन हेही दोन खेळाडू कुचबिहार संघांतून खेळण्यासाठीं खास बोलावून घेतले होते. त्या महाराजांच्या निधनानंतर कुचबिहार संघाचें पुनरुज्जीवन महाराज जितेंद्र नारायण यांनीं केलें. १९१८ सालीं मार्च महिन्यांत त्यांचा संघ प्रिन्स व्हिक्टर यांच्या नेतृत्वाखालीं मुंबईला लॉर्ड विलिंग्डन यांच्या संघाशीं सामना देऊन गेला होता. टॅरन्ट, ली, बर्ड, हे खेळाडू या कुचबिहार संघांत होते. या सामन्यांतही लॉर्ड विलिंग्डन यांच्या संघांतून भाग घेण्याचा मान मला मिळाला होता. तो सामना मोठा चुरशीचा झाला आणि आमच्या गव्हर्नर संघाचा त्यांत एका विकेटनें विजय झाला होता. त्या सामन्यांतील व तसेंच त्यानंतरच्या इंग्लंड–हिंदुस्थान या सामन्यांतील माझें बॅटिंगमधील प्रावीण्य लक्षांत घेऊनच कुचबिहारतर्फें खेळण्यासाठीं वर सांगितल्याप्रमाणें खास निमंत्रण मला मिळालें होतें.

आणि त्याही सामन्यांतील कसोटीला मी पूर्णपणें उतरूं शकलों. एम. सी. बर्ड यांच्या संघाविरुद्ध आमच्या संघानें २७७ धांवा केल्या, त्यांत मी १२६ व डॉली कपाडिआ यानें ६२ धांवा केल्या होत्या. न्यूमन व ली या दोघांही गोलंदाजांनीं मला तंबूकडे लवकर परत पाठविण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला, पण त्यांचे सारे डावपेंच मी त्या दिवशीं फसवूं शकलों. मीं त्या दिवशीं कांहीं ‘ हाफकट हाफड्राइव्ह ’ अशा तऱ्हेचे अवघड फटके मारले; तो विशिष्ट स्ट्रोक पाहून मि. बर्ड यांनीं नवल व्यक्त करून माझें अभिनंदन केलें. पण तो सामना मात्र आम्हीं जिंकूं शकलों नाहीं. एस्. एम्. जोशी यांची गोलंदाजी त्या दिवशीं बरीच महाग पडली. त्यांनीं ४ विकेटस् घेतल्या खऱ्या; पण होझी व ली या दोघांनीं शतकें लावून संघाच्या धांवांचा आंकडा ४१४ पर्यंत नेला. दुसरा डाव चालू होण्यापूर्वींच मला कपुर्थळा येथून लगेच तेथें सामन्यासाठीं निघून येण्याविषयीं तांतडीची तार आली, कुचबिहार महाराजांच्या परवानगीखेरीज मला तो सामना अर्ध्यावर सोडून जाणें शक्य नव्हतें; पण महाराजांनीं तार पाहून लगेच मला परवानगी दिली आणि मी त्याच रात्रीं कपुर्थळ्याला जाण्यासाठीं निघालों. यामुळें त्या सामन्यांतील दुसरा डाव मी खेळूं शकलों नाहीं. कुचबिहारचा हा दौरा मला फार चांगला गेला. मोहन बागन संघाविरुद्ध मीं ११२ धांवा केल्या होत्या; त्या सामन्यांत वॉर्डन यांनीं मोहन बागनच्या २० धांवांत ९ विकेट्स् घेतल्या होत्या! गव्हर्नर-संघाविरुद्धही झालेल्या सामन्यांत माझ्या धांवा बऱ्याच होत्या; एकंदरींत महाराजांनीं माझ्याविषयीं ज्या अपेक्षा केल्या होत्या, त्या मी यशस्वीपणें पार पाडूं शकलों आणि हें पाहून मला स्वतःलाही आनंद व अभिमान वाटल्यावांचून राहिला नाहीं.



## चौरंगी सामने

हिंदी क्रिकेटमधील आमच्या काळांतील सर्वांत मोठें आकर्षण म्हणजे मुंबईचे चौरंगी सामने ! या सामन्यांची ( नंतर अर्थात्च पंचरंगी ) लोकप्रियता अजूनपर्यंत टिकून होती; या सामन्यांच्या जातीय स्वरूपावर भर देऊन त्यांना त्याज्य ठरविण्याचा खटाटोप कांहीं विशिष्ट गटांकडून गेलीं कांहीं वर्षें चालू आहे. पण केवळ जातीय तत्त्वावर हे सामने खेळले जातात, म्हणून त्यामुळें जातिवैमनस्याला त्यांनीं उत्तेजन मिळतें हा निष्कर्ष काढणें चुकीचेंच ठरेल. निदान माझ्या स्वतःच्या अनुभवावरून तरी असा निष्कर्ष काढायला मला कांहींच जागा दिसूं शकत नाहीं. १९१२ सालापासून चौरंगी सामन्यांना सुरुवात झाली; तत्पूर्वीं कांहीं वर्षें खेळण्यांत येणारे तिरंगी सामनेही अर्थातच जातीय तत्त्वावरच होते; मीं या सामन्यांत

१९०९ सालापासून १९२९ सालपर्यंत मधलें एक १९२२ साल वगळतां दरवर्षी नियमितपणें भाग घेत होतों. त्या वीस वर्षांच्या अवधींत या सामन्यांमुळें जातीजातीमध्यें वितुष्ट निर्माण झाल्याचें एकही उदाहरण केव्हांच घडलें नाहीं. किंबहुना मीं तर उलटपक्षीं असेंच म्हणेन कीं, या सामन्यांमुळें निरनिराळ्या जातींतील खेळाडूंमध्यें खेळाडूपणाची भावना निर्माण होण्यास व तिची जोपासना होण्यासच अधिक मदत झाली. प्रतिपक्ष्याला आदरानें लेखून त्याच्याशीं सन्मानपूर्वकतेनेंच सामना द्यायचा अशी खऱ्या क्रिकेटपटूची वृत्ति असते व असावी लागते. अशा वृत्तीनें जो खेळाडू अथवा संघ खेळ खेळत नाहीं, तो 'क्रिकेटच खेळत नाहीं' (*He is not playing cricket*) असेंच म्हणावें लागेल. अपवादात्मक कांहीं कांहीं प्रसंग सोडून दिल्यास चौरंगी सामन्यांतील क्रिकेट याच भावनेनें खेळला जात असे. आणि कोणत्याही पक्षाचा विजय झाला, तरी गुणग्राहक दृष्टीनें परस्परांचे गुण ओळखण्यास व त्याबद्दल त्यांचें त्यांना वाजवी श्रेय देण्यास प्रत्येकाची बहुधा तयारी असे.

अपेश आलें असतां खेद होणें आणि विजयाच्या प्रसंगानें हर्ष वाटणें हें मनुष्यस्वभावाला धरूनच आहे आणि प्रस्तुत सामन्यांतही याच अनुभवाची प्रचीति आल्यास त्यांत नवल वाटावयास नको. पण या खेदाचें रोषांत किंवा आनंदाचें उद्धटपणांत रूपांतर झाल्याचा प्रकार मात्र क्वचितच अनुभवाला येई. खेळ संपल्यानंतर क्रीडांगणावरील प्रतिस्पर्ध्याचें नातें विसरून हिंदु खेळाडू मुसलमानांशीं व मुसलमान खेळाडू हिंदूंशीं खेळीमेळीनेंच वागत; तीच तऱ्हा पारशी युरोपियन खेळाडूंचीही असे. विशेष परिचयाचे खेळाडू असले म्हणजे तर पुष्कळदां क्रीडांगणावरही परस्परांची थट्टामस्करी करीत अतिशय खेळीमेळीनें खेळ चालत असे. बहुतेक पारशी खेळाडू मुंबईचेच असल्यामुळें ते बहुधा आमच्या चांगल्या परिचयाचे असत. आणि त्यांच्याशीं खेळतांना गोलंदाजीच्या फैरीबरोबर "आवो आवो, हुं तमारी विकेट लइशुं" अशाही थट्टेच्या आव्हान–प्रतिआव्हानाच्या फैरी झडत. प्रेक्षकगणांतही "तात्या पायलास काय ?" "काकाजी जुवो, नायडू केम रमेछे !" अशा परिहासपूर्ण उद्गारांचे ध्वनिप्रतिध्वनि उमटत असत. क्वचित् एकदा पक्षाभिनिवेशी प्रेक्षक खळबळीच्या भरांत

क्षुब्धही होत असे; नाहीं असें नाहीं. पण प्रेक्षकांचा हा पक्षाभिनिवेश त्या समयापुरताच क्षणिक असे. मैदानाबाहेर पडल्यावर त्याचा मागमूसही राहात नसे. चौरंगी सामन्यांचा आमच्या वेळचा सर्वसाधारण प्रेक्षक गुण-ग्राहक दृष्टीनें या खेळाची मौज चाखीत असे. आणि " जातीय " " जातीय " म्हणून आज या सामन्यांबद्दल ओरड चालू असली तरी आजही सर्वसामान्य प्रेक्षकाची दृष्टि जातीयतेपेक्षां खेळांतील मौज अनु-भविण्याकडेच अधिक केंद्रीत झालेली असते, हें सहज दिसून येण्यासारखें आहे. शिवाय स्वपक्षीय संघाबद्दलची पक्षपाती वृत्ति चौरंगी सामन्यांतच केवळ दृष्टोत्पत्तीला येते व अलीकडे सुरू झालेल्या प्रांतिक व इतर साम-न्यांत तिला अवसर मिळूं शकत नाहीं. असें मुळींच म्हणतां यावयाचे नाहीं. किंबहुना, दोन संघ आहेत तेथें प्रेक्षकांतही त्या त्या संघाच्या पाठी-राख्या प्रेक्षकांचें दोन गट निर्माण व्हावयाचेच ! चौरंगी सामन्यांत हे गट अधिक सहजपणें लक्षांत येण्यासारखे असत, एवढाच काय तो फरक ! पण यामुळेंच सामन्यांविषयींचें लोकांचें कुतूहल व उत्सुकताही वाढलेली असे.

## सालाबादचा क्रीडा-महोत्सव

आणि हें कसेंही असलें, तरी या चौरंगी सामन्यांमुळेंच हिंदी क्रिकेटला उत्तेजन मिळूं शकलें व त्या खेळाची प्रगति व प्रसार या देशांत होऊं शकला हें या सामन्यांच्या टीकाकारांना देखील कबूल करावें लागेल. मुंबई-पुणें येथील जनतेचा क्रीडोत्साह तर या सामन्यांनींच राखला व वाढविला. केवळ क्रीडाप्रेमी लोकांच्याच दृष्टीनें नव्हे, पण सर्वसामान्य जन-तेच्या दृष्टीनेंही हे सामने म्हणजे प्रतिवर्षी येणारा एक क्रीडामहोत्सवाचा प्रसंगच गणला जात असे. एरवीं कधींही खेळांच्या बातम्या चुकून देखील न वाचणारा कारकून या सामन्यांच्या वेळीं ऑफिसला टाळा देऊन क्रीडां-गणाकडे धांव घेण्यासाठीं धडपडतांना दिसून येई. छोट्या शाळकरी मुलांपासून तों पेन्शनर वृद्धांपर्यंत सर्वांचे कान " स्कोअर काय झाला ?" हें समजून घेण्यासाठीं उत्सुक असावयाचे. सामन्याचा स्कोअर लोकांना झटपट समजावा म्हणून येथील धोबी तलावावरील वेलिं-

ग्टन सिनेमाच्या बाहेरच्या फलकावर स्कोअरचे आंकडे लावण्याची कांहीं वर्षें व्यवस्था केलेली असे. पुण्याला १९२६ सालीं युरोपियनांविरुद्ध आमचा अखेरचा निर्णायक सामना चालू होता, त्या वेळीं या ठिकाणीं केवळ स्कोअर ऐकण्यासाठीं तासान् तास खोळंबून राहिलेल्या लोकसमुदायाची अधीरता किती वाढलेली होती याचें वर्णन मला त्यानंतर एका मित्राच्या तोंडून ऐकावयाला मिळालें होतें. जणूं काय प्रत्यक्ष सामनाच समोर चालू आहे अशा कल्पनेनेंच, फलकावरील आंकडे बदलले कीं लोक टाळ्या देऊन त्यांचें स्वागत करीत! शेवटीं शेवटीं तर लोकांची अधीरता इतकी वाढली आणि सामन्याचा निकाल समजतांच लोकांनीं इतक्या हर्षभरानें त्याचें स्वागत केलें कीं तसा देखावा खुद्द क्रीडांगणावरही दिसूं शकला नसेल, असें माझ्या मित्रानें मला सांगितलें. खुद्द क्रीडांगणावरची ती खळबळ अर्थातच त्या वेळीं आम्ही प्रत्यक्ष अवलोकन करीत होतों. ती त्या क्षणाला इतक्या पराकोटीला गेली होती कीं प्रेक्षकांच्या त्या प्रचंड गलक्यांत खेळाडूंना त्यांच्या फिल्डिंगच्या जागा नेमून देणेंही मला फार मुष्कीलीचें होऊं लागलें होतें!

आरडाओरड करण्यांत पुण्याच्या प्रेक्षकांना मुंबईकरांपेक्षां खात्रीनें वरचा अनुक्रम द्यावा लागेल. मुंबईंत तुम्हाला थोडासा निराळा देखावा दिसूं शकेल. उत्सवाचें वातावरण या ठिकाणीं अधिक नजरेला पडतें. 'ओव्हर' संपली कीं मध्येंच एकाद्या तंबूतून ब्युगलाची सलामी ऐकू यावयाची; मध्येंच फटाक्यांचा कडकडाट कानीं पडावयाचा; स्टॅंपिंगचा ताल धरलेला मधूनच कानावर आदळावयाचा; केवळ खोडकरपणाची हौस भागवून घेण्यासाठीं कांहीं कारण नसतांना मध्येंच एकादी टाळ्यांची फैर झडावयाची! यामध्यें केव्हां केव्हां गमतीचे, तर केव्हां केव्हां अशिष्ट खोडसाळपणाचेही प्रकार घडत. क्रीडांगणावर हळूंच कुठून तरी मध्येंच एखादें कुत्रें सोडून दिलेलें असावयाचें, आणि चेंडूच्या मागें धांव घेण्याऐवजीं या कुत्र्याचीच शिकार साधण्यासाठीं चारदोन क्षेत्ररक्षकांचा व पोलिसांचा तांडा त्याच्याच मागें धांवत असल्याचा देखावा क्रीडांगणावर दृष्टीस पडावयाचा! तितक्या अवधींत खेळांत अर्थातच खंड पडे आणि 'फॉर्मा'त असलेल्या बॅट्स्मनला तेवढा वेळ ताटकळत चडफडत जागच्या जागीं थंड उभें राहणें भाग पडे!

एकदां एका सामन्याच्या वेळीं तर-( १९१९ सालचा तो सामना असावा ) क्रीडांगणावर बंदोबस्तासाठीं ठेवलेल्या एका पोलिस स्वाराच्या घोड्याला एकाएकीं शर्यतीच्या घोड्याचा आवेश चढला आणि क्रीडांगणाभोंवती तुफान वेगानें रंगण घेण्यास त्यानें सुरुवात केली, साऱ्या क्रीडांगणभर एकच खळबळ माजून राहिली. पांच रंगणें पुरीं होईपर्यंत घोडा कांहीं काबूंत येईना. अखेरीला हा रेस कोर्स नसून क्रिकेट-क्रीडांगण आहे अशी कल्पना त्याची त्यालाच आली कीं काय कोण जाणे ! पांचव्या रंगणानंतर त्याचा आवेश कांहींसा ओसरला आणि त्याला क्रीडांगणाबाहेर काढून लावून खेळ पुढें सुरू करणें एकदांचें शक्य झालें ! २५ सालच्या सामन्यांत एका खोडकर पारशी पोरानें आरशांतून 'पिच' वर किरण पाडून बॅट्‌स्मनला चकविण्याचा उपद्व्याप आरंभला होता. एल्. पी. जय हे त्या वेळीं खेळत होते; दृष्टीपुढें मध्येंच अकस्मात् हे किरण नाचूं लागतांच त्यांनीं अर्थात्‌च त्याबाबतच्या बंदोबस्ताची मागणी केली. पण तेवढ्यांत एका सोल्जरानें त्या पोराला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केलें आणि त्याच्या त्या खोडकर लीला बंद पडल्या. पण असा एकादा प्रकार सोडल्यास सामन्यांचें एकंदर वातावरण सर्वसामान्यतः खेळीमेळीचें आणि गंमतीचेच असे. आमच्यासारख्या खेळाडूंना तर हे दिवस अतिशय उत्साहाचे व मौजेचे वाटत. यामुळेंच अनेक इतर सामन्यांपेक्षांही त्या सामन्यांच्याच स्मृति माझ्या अंतःकरणावर कायमच्याच कोरून राहिल्या आहेत.


### अखिल भारतीय स्वरूप

मुंबईच्या या सामन्यांना इतर ठिकाणच्या चौरंगी सामन्यांहून विशेष महत्त्व येण्याचें एक मोठेंच कारण म्हणजे या सामन्यांचें अखिल भारतीय स्वरूप. हिंदुस्थानांतील ठिकठिकाच्या खेळाडूंना या सामन्यांत भाग घेण्यासाठीं निमंत्रण दिलें जाई आणि येथेंच त्यांच्या कौशल्याची खरी कसोटी लागे. मुसलमान संघाला तर बहुधा बाहेरच्याच खेळाडूंवर अवलंबून राहावें लागे; याउलट पारशी संघांत स्थानिक खेळाडूंचाच बहुधा भरणा होत. असे युरोपियन संघांत वरचेवर नवे खेळाडू दिसत. परप्रांतांतील उत्कृष्ट

खेळाडूंना त्याजकडून या सामन्यांसाठीं आमंत्रण मिळत असेच. पण विलायतेंतील धंदेवाईक काउंटी खेळाडूंचा हिंदुस्थानांत त्या सुमारास मुक्काम असल्यास त्यांचेंही साह्य युरोपियन संघाला मिळूं शकत असे आणि यामुळेंच युरोपियन संघ अनेकदां इतरांहून फारच प्रबळ झालेला दिसून येई. धंदेवाईक खेळाडूंचें हें असें साह्य घेऊन सामना जिंकण्याची ही प्रथा पुढें पुढें फारच बोकळूं लागली, आणि तुल्यबलत्वामुळें या सामन्यांत जी चुरस निर्माण व्हावयाची तीही कमी होऊं लागली. १९२१ सालीं ऱ्होड्स्, हर्स्ट या प्रसिद्ध इंग्लिश धंदेवाईक खेळाडूंच्या साह्यामुळें युरोपियन संघाला जो सहजीं विजय मिळवतां आला, त्यामुळें धंदेवाईक खेळाडूंना या सामन्यांत भाग घेण्यास मुभा द्यावी कीं काय या प्रश्नाचा विचार करणें भाग झालें आणि अशा खेळाडूंना बंदी करावी, असा नियम सामना समितीनें मंजूर करून घेतला. पण पुढें पुन्हा या नियमांत कांहींसा फरक करण्यांत आला. यामुळें युरोपियन संघाची मोठीशी हानि झाली असें म्हणतां येत नाहीं. शिवाय काउंटी संघांतून खेळलेल्या हौसी (ॲमेच्युअर) खेळाडूंचें साह्य घेण्याची शक्यता या नियमानें दुरावलेली नव्हतीच. आणि हा नियम झाल्यानंतर जे युरोपियन संघ या सामन्यांत उतरले तेही इतर संघाच्या मानानें चांगलेच बलिष्ठ होते. हिंदु संघापुरतें पाहिल्यास त्यांत अर्ध्यापेक्षां अधिक खेळाडूंचा भरणा स्थानिक खेळाडूंतूनच करावा लागे. कांहीं ठराविक खेळाडू बाहेरून येत. परप्रांतांतील नव्या प्रसिद्ध खेळाडूंना सामन्यांत भाग घेण्यासाठीं वेळोवेळीं बोलावलें जाई; पण असे नवे खेळाडू बॉम्बे जिमखान्याच्या क्रीडांगणावर बहुधा अपेशीच ठरत. हिरवळीवर खेळण्याच्या संवयीचा अभाव हें एक या अपेशाचें कारण असेच; पण मुंबईतील प्रचंड प्रेक्षकसमुदायापुढें व वर वर्णन केलेल्या गडबडीच्या वातावरणांत पहिल्यांदाच खेळण्याचा प्रसंग असल्यामुळेंही त्यांच्या खेळावर त्याचा परिणाम होत असावा, असा माझा तर्क आहे. पुण्याचे एक प्रसिद्ध क्रिकेटपटु गायकवाड, राजकोटचे ठाकूर लखाजीराव इत्यादि अनेक चांगले खेळाडू असेच पहिल्या कसोटींत अपेशी ठरले.

चौरंगी सामन्यांतील १९१२ सालचा पहिलाच सामना बॉम्बे जिमखान्याच्या नेहमींच्या क्रीडांगणावर न होतां मरिन लाइन्सच्या मैदानावर

## पहिला चौरंगी सामना १९१२–हिंदु विरुद्ध पारशी



रांग १ ली (उभे) (डावीकडून) डि. ड्रायव्हर, पी. वेलकर, गझदर, एलाव्हिया. रांग २ री (उभे) के. ए. दाते, एस्. सप्रे, डॉ. पिळगांवकर, डि. कापडिया, ओघडशंकर, के.शेषाचारी, पारेख, पी.गणपत, राजाराम, दुबाष. रांग ३ री (बसलेले) पी. बाळू, डॉ. कांगा, राजकोटचे ठाकोरसाहेब, डॉ. पावरी, सर सी. व्ही. मेहता, दिवेच्या, एम्. डो. पै, वॉर्डन. रांग ४थी (बसलेले) मेहेंदळे, पी. विठ्ठल, आर्. मेहरोमजी, जे. एल्. चीदाना.

खेळावा लागला. बॉम्बे जिमखान्याच्या दुरुस्तीचें काम त्या वर्षी चालू असल्यामुळें तें क्रीडांगण त्या सालीं सामन्यांकरितां मिळूं शकलें नाहीं. आम्हांला या वर्षी पारश्यांविरुद्ध सामना द्यावा लागला आणि पारश्यांचे गोलंदाज एम्. डी. पारेख व एलाव्हिया यांनीं मरिन लाइन्सच्या त्या ओल्या हिरवळीवर आम्हांला फार धांवा करूं दिल्या नाहींत; अवघ्या चौसष्ट धांवांत आमचा पहिला डाव खलास झाला; या चौसष्ट धांवांपकीं मीं २२ धांवा करूं शकलों होतों. एम्. डी. पारेख यांनीं या सामन्यांत आमचे कॅप्टन सी. व्ही. मेहता, राजकोटचे ठाकोरसाहेब, व के. ए. दाते यांना लागोपाठ आउट करून 'हॅट्रिक' करण्याचें श्रेय घेतलें! दुसऱ्या डावामध्येंही आमच्या धांवांची संख्या ७९ पेक्षां अधिक होऊं शकली नाहीं. पारश्यांनीं आपल्या पहिल्याच डावांत १८३ धांवा केल्या; त्यांपैकीं वॉर्डन याच्याच ११५ धांवा होत्या. वॉर्डन यांचें हें शतक म्हणजे या सामन्यांतील पहिलेंच शतक होय. आमच्या संघांत पुण्याचे जलदगति गोलंदाज मेहेंदळे यांचा समावेश झाला होता. व त्यांच्याखेरीज राजकोटचे लखाजीराव हेही संघाचे दुसरे फास्ट बोलर होते. पण या दोघांचीही गोलंदाजी परिणामकारक ठरूं शकली नाहीं. रा. बाळू यांनीं या सामन्यांत पारश्यांचे ३६ धांवांत ६ खेळाडू बाद केले; पण आमच्या बॅटिंगमधील अपयशामुळें एक डाव व ४० धांवा अशा मोठ्या फरकानें आम्हाला सणसणीत पराजय घ्यावा लागला. हाच प्रसंग निर्णायक सामन्यांत मुसलमानांवरही ओढवला आणि पारशी संघानें चौरंगी सामन्यांतील पहिल्याच वर्षीचें विजेतृत्व संपादन केलें. या शेवटच्या सामन्यांत पारशी कॅप्टन डॉ. कांगा यांनीं १५० धांवा केल्या; याप्रमाणें चौरंगी सामन्यांतील पहिलीं दोन शतकें या पहिल्याच सामन्यांत झडलीं. तिसरें शतक झळकण्यासाठीं मात्र आणखी सहा वर्षें वाट पाहावी लागली.

हिंदु जिमखान्याचा जन्म

या पहिल्या सामन्यांत भाग घेतलेल्या हिंदु संघामध्यें दोन तीन खेळाडू वगळल्यास जुन्यापैकींच प्रसिद्ध हिंदु खेळाडूंना स्थान मिळालें होतें. या ठिकाणीं जातां जातां आमच्या पूर्व पिढींतील हिंदू खेळाडूंचा अल्पसा

परिचय करून देणें अप्रस्तुत होणार नाहीं. मुंबईच्या हिंदु जिमखान्याचे हे बहुतेक खेळाडू होते. मुंबईंत पहिला "हिंदु क्रिकेट क्लब" १८७८ सालीं स्थापन झाला. आणि याचेंच पुढें सोळा वर्षांनीं १८९४ सालीं "पी. जे. हिंदु जिमखाना" या प्रसिद्ध संस्थेंत रूपांतर झालें. मुंबईचे त्या वेळचे सुप्रसिद्ध क्रिकेटपटु गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्याच हस्तें या जिमखान्याचें उद्‌घाटन झालें आणि जिमखान्याकरितां जागाही त्यांच्याच कृपेमुळें मिळूं शकली. शेठ परमानंददास जीवनदास यांनीं रु.१०,००० व शेठ गोकुळदास तेजपाल व शेठ गोवर्धन खटाव यांनीं प्रत्येकीं रु.२५०० अशा देणग्या देऊन जिमखान्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप दिलें. १८९४ सालींच हिंदुसंघाचा बॉम्बे जिमखान्याच्या संघाशीं पहिला सामना झाला. त्यांत युरोपियनांनीं २१७ धांवा केल्या व हिंदु संघाच्या २ खेळाडू बाद २८ धांवा होऊन सामना अनिर्णीत राहिला. देवीदास मेहता या हिंदु बोलरनें या सामन्यांत १६ धांवांत ६ विकेटस् घेतल्याचा उल्लेख आढळतो. पुना जिमखान्याशीं हिंदु संघाचा पहिला सामना १८९६ सालीं झाला. त्यांतही हिंदु संघाला फारसें यश मिळूं शकलें नाहीं. पण या आरंभींच्या काळानंतर पुढें हिंदु खेळाडूंचें तेज बरेंच पडूं लागलें आणि तिरंगी सामन्यांना सुरुवात होण्यापूर्वी चांचणीखातर म्हणून १९०६ सालीं जेव्हां प्रेसिडेन्सी संघाशीं हिंदु संघाचा सामना घडून आला, त्या वेळीं हिंदु संघानें प्रेसिडेन्सी संघाला चांगलीच हार घ्यावयास लाविली आणि १९०७ सालीं तर २३८ धांवांनीं प्रेसिडेन्सी संघाचा हिंदूंनीं दणदणीत पराजय केला. मुंबईंतील प्रसिद्ध हिंदु खेळाडूंत त्या वेळीं सी. व्ही. मेहता, पंढरीनाथ तेलंग, पी. बाळू, शिवराम, जी. आर. बंडा, डी. एम. चोणकर, के. ए. दाते, एम्. डी. पै, एल्. एस्. भांडारे, एस्. के. दिवेकर, आर्. व्ही. आगासकर, जी. आर्. कीर्तिकर इत्यादि नांवें चमकत होतीं. यांखेरीज पुण्याचे मेहेंदळे, खंडाळ्याचे फास्ट बोलर इराशा, काठेवाडचे बॅटसमन ओघडशंकर व शिवलाल आणि मद्रासचे विख्यात विकेटकीपर के. शेषाचारी यांचेंही साह्य विशेष सामन्यांच्या वेळीं हिंदु संघाला मिळत असे.

हिंदु जेसप

या हिंदु खेळाडूंपैकी जी. आर्. वंडा हे हिंदु संघाचे सलामीचे बॅटस्मन होते. हिंदु जिमखान्याच्या स्कोअर बुकांत १८९९ ते १९०९ सालपर्यंतच्या काळांत त्यांच्या नांवापुढें तीन शतकें झळकलेलीं दिसून येतील. चोणकर यांचींही दोन शतकें या काळांत लागलेलीं आहेत. हे संघाचे एक दणदणीत बॅटस्मन व जलदगति बोलर होते. चोणकर हे लवकरच निधन पावल्यामुळें हिंदु संघाचें मोठेंच नुकसान झालें. के. ए. दाते यांचा उल्लेख यापूर्वी मीं एकदोनदां केलाच आहे. तेही एक भरंवशाचे चांगले बॅटस्मन व बोलर होते. स्कोअर बुकाचीच साक्ष काढावयाची झाल्यास के. ए. दाते यांनीं वर उल्लेखिलेल्या दहा वर्षांच्या काळांत ५ शतकें काढलेलीं आढळून येतील. कीर्तिकर हे हिंदु जिमखान्याचे कांहीं वर्षें कॅप्टन होते व हिंदूंपैकीं एक चिवट बॅटस्मन म्हणून त्यांची प्रसिद्धि होती. १९०२ सालच्या ऑक्स्फर्ड ऑथेंटिक्सच्या सामन्यांत त्यांनीं व के. शेषाचारी यांनीं चिवटपणें खेळून सामना अनिर्णीत ठेवण्याचें श्रेय घेतलें होतें. आगास्कर हेही हिंदूंचे एक प्रमुख भरंवशाचे बॅटस्मन होते. यष्टिरक्षक म्हणून दिवेकरांचें संघांतील स्थान कायम असे. दिवेकर हे चौरंगी सामन्यांतही खेळले होते. एल्. एस्. ऊर्फ भाचू भांडारे हे हिंदूंचे त्या काळांतील प्रसिद्ध डावखोरे बॅटस्मन होते. हे बोलिंगही डाव्या हातानें करीत. जुन्या काळांतील कुशल पेटीवादनपटु म्हणून ज्यांची गायकवर्गांत प्रसिद्धि आहे, ते हेच भांडारे होत. हार्मोनियमच्या पट्ट्यांवरून हळुवारपणें फिरणारे त्यांचे हात दणदणीत फटके लगावण्यांतही तितकेच कुशल असत. ' थर्ड मॅन स्ट्रोक ' चा त्यांचा फटका वाखाणण्यासारखा असे. त्या काळच्या बहुतेक बॅटस्मनचा खेळ तडफदार व चमकदार असाच व्हायचा; धिम्मेपणाचा बहुतेक अभावच असे. कै. पंढरीनाथ तेलंग ( कै. न्या. मू. तेलंगांचे चिरंजीव ) हे या तऱ्हेच्या बॅटस्मनमध्यें अग्रभागींच चमकत. हिंदु जिमखान्याच्या स्कोअरबुकांत त्यांच्या नांवें वर उल्लेखिलेल्या काळांत आठ शतकें लागलेलीं आहेत. सर चुनिलाल यांचा या बाबतींत पहिला व कै. पंढरीनाथ तेलंग यांचा दुसरा अनुक्रम लागला आहे. तेलंगांच्या दणकेबाज खेळामुळें " हिंदु जेसप " म्हणून त्यांचा

नेहमींच उल्लेख केला जाई. मला स्मरतें कीं एका सामन्यांत, जॉय या नांवाच्या युरोपियन बोलरच्या 'स्वर्ह' बोलिंगला कोणीही खेळाडू तोंड देऊं शकला नाहीं; त्या वेळीं तेलंगांनींच त्याची बोलिंग मोठ्या कौशल्यानें झोडपून काढली होती. तेलंगांचा आम्हा बंधूंना जिमखान्यांत मोठाच पाठिंबा असे. याबाबतच्या एका आठवणीचा मला येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो. १९१६–१७ सालचा तो प्रसंग असावा. हिंदु जिमखान्याच्या एका स्थानिक सामन्यांत मी व श्री. दीनानाथ तेलंग हे खेळत होतों. माझें शतक व्हायला चार पांच धांवांची जरूरी होती. तितक्यांतच जिमखान्यांतून सूचना आली कीं मी रिटायर होऊन दुसऱ्या बॅटस्मनला जागा करून द्यावी. प्रेक्षकांचा आग्रह मीं माझें शतक पुरें करावें असाच असल्याचें दिसून आलें; म्हणून मीं दोन चार फटके आणखी पुढें खेळलों एवढ्याच कारणावरून जिमखान्याचे कॅप्टन व सेक्रेटरी यांनीं शिस्तभंगाचें प्रायश्चित्त मला देण्याचा घाट घातला. मला एक पत्र पाठवून माझ्याकडून माफीची मागणी करण्यांत आली. वास्तविक हें प्रकरण अगदीं क्षुल्लक होतें; पण त्याला भलतेंच मोठें स्वरूप देऊन जिमखान्यांतून मला काढून टाकण्याचीही धमकी देण्यांत आली ! ही धमकीची भाषा निघतांच मात्र मी व माझे बंधु रा. बाळू या दोघांनींही हें प्रकरण अखेरपर्यंत शक्य तर कोर्टापर्यंतही लढविण्याचें ठरविलें. अखेरीस जिमखान्याच्या कमिटीपुढें हें प्रकरण विचारासाठीं आलें आणि त्यांत कै. पंढरीनाथ तेलंग यांनीं सेक्रेटरींना चार कानपिचक्या देऊन सदर प्रकरण सामोपचारानें मिटतें घेण्यांतच शहाणपणा आहे असा सल्ला दिला. तेलंग हे कमिटींतील एक वजनदार सभासद होते व त्यांच्या शब्दाला जिमखान्यांतही मान दिला जात असे. त्यांच्या सल्ल्याविरुद्ध जाण्याचें धाडस सेक्रेटरीला झालें नाहीं आणि माझें माफीप्रकरण तेवढ्यांतच जिरवून टाकण्यांत आलें. तेलंग हे पुढें बनारसला प्रोफेसर म्हणून गेले व त्यामुळें हिंदु जिमखान्याचा त्यांचा प्रत्यक्ष संबंध तुटला.

### हिंदूंचे पहिले कर्णधार

सर चुनिलाल व्ही. मेहता हे चौरंगी सामन्यांतील हिंदु संघाचे पहिले कॅप्टन होत. मेहता हे त्या वेळीं क्रीडांगणावर तसेंच क्रीडांगणाबाहेरही

हिंदु संघाचे एक आधारस्तंभच गणले जात. तिरंगी सामन्यांतही हिंदु संघाचें नेतृत्व त्यांच्याचकडे असे, आणि याखेरीज स्वतःचा खास संघ जमवून ते क्वचित् महत्त्वाचे सामनेही घडवून आणीत असत. क्रिकेटर म्हणून मेहतांनीं यश संपादन केलें तें मुख्यतः बॅटिंगच्या बाजूकडेच होय. हिंदु जिमखान्याच्या स्कोअर बुकांत त्यांच्या नांवें १९१९ सालपर्यंतच्या कालांत सर्वांत अधिक म्हणजे १२ शतकें झळकलीं आहेत. त्यांनीं एका सामन्यांत २०२ धांवा केल्या आहेत, हाच माझ्या माहितीप्रमाणें त्यांचा एका डावांतील अधिकाधिक स्कोअर होय. पण मेहता हे पट्टीचे बॅटस्मन म्हणून या काळांत चमकले, तरी त्यांची साशंकतेची विशिष्ट मनोवृत्ति त्यांना पुष्कळदा दगा देत असे. स्थानिक सामन्यांत ही वृत्ति तितकीशी जाचक होत नसे, पण मोठ्या प्रातिनिधिक सामन्यांत आत्मविश्वासाच्या अभावामुळें स्थानिक सामन्याइतकेंच यश त्यांना मिळणें दुर्लभच होई. संघनेतृत्वाची कामगिरी पार पडतांना तर हा दुर्गुण त्यांना विशेषच नडत असे. 'बिग मॅच टेंपरॅमेंट' अशा शब्दांनीं ज्या वृत्तीचा उल्लेख केला जातो, ती त्यांच्या ठायीं नव्हतीच. बॅटस्मनचा अनुक्रम लावतांना कोणीं खेळावयास जावें हें अगदीं शेवटच्या क्षणापर्यंतही निश्चित होत नसे ! क्रीडांगणावरही याच साशंकतेची प्रचीति येत असे. झेल त्यांच्याकडे येऊं लागला कीं प्रथम त्यांचे हात चष्मा सांवरण्यासाठीं आपोआपच वळत, हीएक प्रकारची त्यांची लकबच बसून गेली होती. पण तेवढ्या त्या लकबीवरून त्यांच्या घाबरट स्वभाववृत्तीची खूण चटकन मिळे. खेळाडूंच्नें सहकार्य संपादण्याचाही विशेष प्रयत्न ते करीत नसत. मेहतांचें नेतृत्व १९१४ सालपर्यंत हिंदु संघाला लाभलें होतें; पण प्रत्यक्ष क्रीडांगणावर हिंदु क्रिकेटला त्यांचा जेवढा उपयोग झाला, त्यापेक्षांही क्रीडांगणाबाहेरच्या क्रिकेटविषयक बाबतींतच त्यांचें नेतृत्व विशेष लाभदायक ठरलें. या बाबतींत त्यांच्या सामाजिक दर्जाचा त्यांना बराच फायदा झाला हें अर्थातच सांगावयास नकोच.

मेहतांच्या नेतृपदाचा वारसा पुढें श्री. एम्. डी. पै यांजकडे आला. जुन्या खेळाडूंतील हिंदूंचे एक उत्कृष्ट बॅटस्मन म्हणून पै यांची ख्याति होती. चौरंगी सामन्यांत पै यांचा अधिकांत अधिक स्कोअर ७५ आहे. पण पूर्व-

वयांत त्यांचीं अनेक शतकें झळकलीं आहेत. विशेषतः १९०३ सालीं अलिगड कॉलेज संघाविरुद्ध त्यांनीं चमकदार खेळ खेळून केलेल्या १५० धांवांची आठवण जुने खेळाडू पुढें अनेक वर्षें देत असत. तो सामना फार चुरशीचाच झाला. अलिगढ संघानें ४३५ धांवा केल्या, त्याला हिंदु जिमखान्यानें ४४० धांवा करून प्रत्युत्तर दिलें व ५ धांवांनीं सामना जिंकला. इतका मोठा स्कोअर त्या काळीं क्वचितच होई. त्याचप्रमाणें खेळाडूंच्या व्यक्तिशः धांवांचा आंकडाही शतकाच्या मर्यादेपर्यंत फार थोडे वेळां जाई. याचें कारण म्हणजे बहुतेक खेळाडूंतील धिम्मेपणाचा अभाव हें एकदां वर सांगितलेंच आहे. सावकाश खेळून वेळ काढण्यापेक्षां फटके मारून दणदणीत खेळ करण्याकडे प्रवृत्ति जास्त असे आणि त्या काळच्या प्रेक्षकांनाही असाच चमकदार खेळ पसंत असे. जुन्या काळच्या खेळाडूंत क्षेत्ररक्षणाच्या बाजूकडे दुर्लक्षच होत असे हें मी एकदां पूर्वी सांगितलेंच आहे; पण या बाबतींत कांहीं उल्लेखनीय अपवादही होते आणि त्या अपवादांत पै त्यांना प्रामुख्यानेंच स्थान द्यावें लागेल. स्लिपमधील क्षेत्ररक्षणांत पै यांचा हातखंडा होता आणि १९११ सालच्या विलायतेंतील दौऱ्यांत आजारीपणामुळें ते चमकूं शकले नाहींत, तरी ज्या ज्या वेळीं ते क्रीडांगणावर उतरूं शकले, त्या त्या वेळीं क्षेत्ररक्षणाच्या बाबतींत संघाला त्यांचा फार उपयोग झाला. हिंदूंचे त्यावेळचे उत्कृष्ट बॅटस्मन म्हणूनच पै यांचा या संघांत समावेश झाला होता. पण विलायतेंतील आहार व हवा त्यांना मानवूं न शकल्यामुळें ह्या दौऱ्यांत आजारीपणांतच दिवस काढून व अपेक्षेप्रमाणें हातून कांहींच कामगिरी न घडतां त्यांना परत यावें लागलें.

### हिंदूंचा पहिला विजय

१९२० सालपर्यंत हिंदु संघाचें नेतृत्व श्री. पै यांजकडेच होतें. त्यांच्या नेतृत्वाखालीं चौरंगी सामन्यांत हिंदु संघाला विजेतृत्व मिळण्याचा प्रथम योग आला. हा १९१९ सालचा सामना होय.

त्या सामन्यांत चौरंगी सामन्यांतील माझें पहिलेंच शतक मीं केलें; यामुळें तो सामना साहजिकच माझ्या विशेष स्मरणांत राहिला आहे. आमचा तो निर्णायक सामना मुसलमानांशीं झाला; त्यांत आमच्या संघाच्या पहिल्या

डावांत २५२ धांवा झाल्या; यांपैकीं १०८ धांवा मी केल्या होत्या व सी. के. नायडू यांनीं ४५ धांवा केल्या. मुसलमानांची बॅटिंगची बाजू फारशी मजबूत नव्हती, पण बोलिंगमध्यें मात्र ते खासच प्रबल होते. अब्दुस सलाम या सियालकोटच्या तडफदार व कुशल गोलंदाजाची मदत या वर्षीं पुन्हां त्यांना मिळाली होती; आणि पहिल्या फेरींत युरोपियनांवर सलाम यांच्याच प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर त्यांनीं विजय मिळविला होता. अब्दुस सलाम यांना गोलंदाजीचे धडे अलिगड येथें तेथील कॉलेजचे क्रिकेटशिक्षक केंटचे प्रोफेशनल खेळाडू फेअरसर्व्हिस यांच्याकडून मिळालेले होते. सलाम हे मध्यम गतीचे गोलंदाज होते व उजव्या हातानें बोलिंग करीत. चेंडूच्या गतीमध्यें फरक करून बॅटस्मनला चकविण्यावर त्यांच्या गोलंदाजीच्या डावपेंचांचा मुख्य भर असे. साधारणपणें सराईत बॅटस्मनला गोलंदाज चेंडूफेक करण्याच्या तयारींत असतांना त्याच्या एकंदर आविर्भावावरून व चेंडू हातांत धरण्याच्या पद्धतीवरून तो किती गतीनें व कोणत्या तऱ्हेनें चेंडू वळविणार आहे, याचा चटकन् अंदाज बांधतां येतो व त्या तऱ्हेच्या चेंडूला योग्य अशा पद्धतीनें तोंड देण्याची तोही तत्क्षणींच तयारी करतो; सरावानें ही विशिष्ट दृष्टि तयार होते आणि त्या दृष्टीनें दिलेल्या संदेशानुरूप त्वरित हालचाल करण्याचेंही तंत्र साधून जातें. पण कांहीं कांहीं गोलंदाज एकाच तऱ्हेचा आविर्भाव करून पण वेगवेगळ्या गतीनें चेंडूफेक करूं शकतात, व पल्ल्यांतही तसाच फरक करूं शकतात. अशा वेळीं, चेंडू पुढ्यांत येईपर्यंत कोणत्या तऱ्हेनें तो टाकला आहे याचा अंदाज घेणें बॅटस्मनला अखेरच्या क्षणापर्यंत शक्य होत नाहीं आणि त्याच्या हातून बॅट व चेंडू यांचा अचूक मेळ बसविण्याबाबत चूक होण्याचा फार संभव असतो. अब्दुस सलाम यांच्या गोलंदाजीला बरेच बॅटस्मन बळी पडत ते याच तऱ्हेनें होय. मध्येंच एखादा चेंडू विशेष जलद गतीनें यावयाचा आणि त्या चेंडूला बॅट लावण्याचा बॅटस्मनला मोह पडून स्लिपमध्यें त्याचा हटकून झेल उडावयाचा ऑफ साइडकडेच अब्दुस सलाम यांच्या चेंडूफेकीचा फार करून कल असे आणि पुष्कळदां असे चेंडू तसेच सोडून दिल्यास अनपायकारकच ठरत. सलाम यांच्या गोलंदाजीला याप्रमाणें फार सावधगिरीनें व जपून खेळावें

लागे. यामुळेंच त्यावेळचें माझें तें शतक करतांना सुमारें पांच तास मीं खेळत होतों. सलाम यांची व माझी जणूं काय झुंजच त्या प्रसंगीं लागली होती. कारण तेही एका बाजूनें एका ओव्हरचाही खंड पडूं न देतां सारखे गोलंदाजी करीत होते. या दृष्टीनें सलाम यांची कामगिरी त्या दिवशीं खरोखरच अत्यंत कौतुकास्पद अशीच झाली. न थकतां सतत चेंडूफेक करणें आणि तेंही जलद गतीनें व गोलंदाजीचा प्रभाव कमी होऊं न देतां करणें याला गोलंदाजाच्या अंगीं तसाच काटकपणा असावा लागतो. जलद-गति गोलंदाज तर सहसा अविश्रांत बोलिंग टाकूं शकत नाहीं, असाच अनुभव येत असतो. अब्दुस सलाम यांचा या बाबतींतील काटकपणा खासच जबर होता. आणि त्याचें प्रत्यंतर प्रस्तुत सामन्याखेरीज पुढेंही अनेक सामन्यांत पाहावयास मिळालें. अब्दुस सलाम बॅटिंगही चांगली करीत. चौरंगी सामन्यांत १९२७ सालीं त्यांनीं एक शतकही काढलें आहे. प्रस्तुतच्या सामन्यांतही ते ३० धांवा करूं शकले. आणि १०९ धांवांत त्यांनीं ७ विकेट्स् घेतल्या. पण त्यांची ही कामगिरी सामन्यांतील यशाच्या दृष्टीनें फळाला आली नाहीं. मुसलमानांच्या पहिल्या डावांत ९५ धांवा होऊन त्यांचा एक डाव व ६ धांवा यांनीं आम्हीं पराजय केला.

जुन्या हिंदु क्रिकेटपटूंपैकीं ज्यांचें क्रीडापटुत्व विशेष संस्मरणीय ठरलें, असे एक नामांकित क्रिकेटपटु म्हणजे के. शेषाचारी हे होत. हिंदु यष्टिरक्ष-कांची यशस्वी परंपरा शेषाचारी यांच्यापासून सुरू झाली आहे आणि त्यांतही कालानुक्रमाप्रमाणेंच गुणानुक्रमांतही शेषाचारी यांनाच अग्रस्थान द्यावें लागेल असें मला वाटतें. शेषाचारी हे, त्यांच्यामागून त्यांची परंपरा चालविणाऱ्या नवले-हिंदळेकरांप्रमाणें विकेटकीपर-बॅटस्मन नव्हते. ऑस्ट्रे-लियाचे ओल्डफिल्ड किंवा इंग्लंडचे स्ट्रडविक यांच्याप्रमाणेंच केवळ विकेट-कीपर म्हणून त्यांना संघांत स्थान मिळे. बॅटिंग करावयास ते बहुधा शेव-टींच येत; आणि केव्हां केव्हां चिवटपणें खेळून आणीबाणीच्या प्रसंगीं बाजू सांवरून धरण्यासही ते हातभार लावीत. पण बॅटिंगमधील ही उणीव यष्टि-रक्षणांतील आपल्या असाधारण कौशल्यानें ते सहजीं भरून काढूं शकत. शेषाचारी यांच्या यष्टिरक्षणांत गोंधळ, गडबड, दिखाऊपणा यांना यत्किं-

चित्‌ही थारा नसे. तीक्ष्ण दृष्टि, अचूक अवधान, अतिशय चपळ हालचाल यांवरच त्यांचा सारा भर असे. शेषाचारी विकेटमागें असतांना रेषेच्या बाहेर पाय टाकण्याचेंच नव्हे, पण रेषेवरून पाय उंचावण्याचेही बॅटस्मनला सहसा धाडस करवत नसे. लेगच्या बाजूचे चेंडू ते सफाईनेंच झेलीत. चेंडू अलगत उचलणें, झेलणें, पकडणें आणि तो विकेटपाशीं नेणें या सार्‍याच हालचालींत शेषाचारींइतकी सफाई इतर कोणत्याच यष्टिरक्षकांत मला दिसून आली नाहीं. शेषाचारी हे मद्रासच्या युनायटेड क्लबांतून प्रथम खेळूं लागले. त्यांच्या यष्टिरक्षणांतील प्रावीण्यामुळें हिंदुस्थानांतील बहुतेक महत्त्वाच्या सामन्यांसाठीं त्यांना निमंत्रण मिळत असे. विलायतेस १९११ सालीं गेलेल्या हिंदी संघाचे तर ते प्रमुख यष्टिरक्षक होते. आणि तेथें त्यांच्या यष्टिरक्षणांतील कौशल्याबद्दल सार्‍याच टीकाकारांनीं प्रशंसोद्गार काढले होते. चौरंगी सामन्यांत शेषाचारी पहिल्याच वर्षीं फक्त खेळूं शकले. त्यानंतर त्यांच्याबरोबर खेळण्याचा योग कुचबिहार वगैरे संघांतून अनेक वेळां आला; पण मुंबईला मात्र ते फारसे आले नाहींत.

## भुताराम प्रकरण

के. शेषाचारी यांच्यानंतर व श्री. नवले यांचा हिंदु संघांत समावेश होईपर्यंतच्या काळांत श्री. भुसारी व श्री. एस्. के. दिवेकर यांनीं हिंदु संघाच्या यष्टिरक्षणाची जबाबदारी सांभाळली होती. श्री. दिवेकर यांचा उल्लेख यापूर्वीं एकदां येऊन गेलाच आहे. श्री भुसारी हे पुण्याचे त्या काळांतील प्रसिद्ध क्रिकेटपटु होते. दिवेकर यांजप्रमाणेंच ते विकेटकीपर–बॅटस्मन होते. आणि त्यांच्याचप्रमाणें सलामीचे बॅटस्मन म्हणून त्यांचा बॅटिंगमध्यें अनुक्रम लावण्यांत येई. भुसारी यांनीं एका सामन्यांत ५२ धांवा केल्या होत्या. हाच त्यांचा चौरंगी सामन्यांतील अधिकांत अधिक स्कोअर होय. दिवेकर यांचा या सामन्यांतील अधिकांत अधिक स्कोअर ४७ आहे. पण हे दोघेही चौरंगी सामन्यांत विशेष चमकले नाहींत. विकेटकीपर–बॅटस्मन म्हणून नवले यांच्या-सारखा या दोघांपेक्षांही वरचढ खेळाडू हिंदु संघाला लाभतांच संघांतील तें स्थान त्यांना खालीं करून द्यावें लागलें आणि त्या स्थानाचा अधिकारी नंतर जवळ जवळ कायमचा ठरूनच गेल्यासारखा झाला. भुसारी हे पुढें

काठेवाडांतील एका संस्थानांत कांहीं दिवस क्रिकेटपटु म्हणून नोकरीला राहिले होते. पण या नोकरीचा एकंदरींत त्यांना समाधानकारक अनुभव आला नाहीं, असेंच मला कळलें. दिवेकर व भुसारी यांच्याखेरीज सरदार भुताराम हे पतियाळचे त्या काळांतील एक प्रसिद्ध विकेटकीपर १९१६ सालच्या चौरंगी सामन्यांत खेळले होते. ह्या वर्षी हिंदूंना युरोपियन संघाविरुद्ध सामना द्यावा लागला होता. वर उल्लेखिलेले श्री. दिवेकर यांच्याकडे या वर्षी हिंदु संघाचें नेतृत्व सोपविण्यांत आलें होतें. कर्नल सी. के. नायडू यांचें चौरंगी सामन्यांत प्रथम पदार्पण झालें, तें याच वर्षी होय. नायडू हे त्या वेळीं बॅटस्मनपेक्षां बोलर म्हणूनच विशेष प्रसिद्ध होते. मुंबईच्या तेलगु क्रिकेट संघांतून त्या वेळीं ते कधीं कधीं खेळत. त्यांतील त्यांचें प्रावीण्य लक्षांत घेऊन व हिंदु जिमखान्याचे एक प्रसिद्ध तेलगु बॅटस्मन श्री. के. आर्. स्वामी यांच्या शिफारशीवरून नायडू यांना हिंदु संघांतून खेळण्यासाठीं निमंत्रण मिळालें होतें. पण हा सामना विशेष गाजला तो अंपायरच्या एका निर्णयामुळें आणि या निर्णयांत भुताराम व नायडू या दोघांचाही संबंध आला होता.

'भुताराम प्रकरण' म्हणून हें प्रकरण त्या काळीं एकदोन वर्षें क्रिकेटप्रेमी लोकांच्या चर्चेचा एक मोठाच विषय होऊन राहिलें होतें. श्री. एम्. डी. पै हे त्या सामन्यांत अंपायर होते आणि ज्या प्रसंगीं वर उल्लेखिलेला निर्णय त्यांनीं दिला, त्या वेळीं युरोपियनांचे कॅप्टन कर्नल ग्रेग हे बॅटिंग करीत होते. नायडू हे बोलिंग टाकीत होते आणि भुताराम हे अर्थात् यष्टिरक्षक होते. नायडूंनीं टाकलेला एक विशेष वेगवान् चेंडू ग्रेग यांची बॅट चुकवून भुताराम यांच्या हातीं आला आणि भुताराम यांनीं झटकन् विकेटवर तो चेंडू उडवून अपील केलें. अंपायरचा हात वर झाला आणि तो पाहतांक्षणींच कर्नल ग्रेग यांना आउट म्हणून तंबूकडे परत फिरणें भागच झालें. पण त्यांना अंपायरचा तो निर्णय चुकीचाच वाटला. त्यांनीं अंपायरच्या या निर्णयाबद्दल निषेध व्यक्त केला एवढेंच नव्हे, पण असे चुकीचे निर्णय देणाऱ्या व क्रिकेटचे नियम ठाऊक नसलेल्या अंपायरला चौरंगी सामन्यांत केव्हांच पुढें हें स्थान देऊं नये अशीही बॉंबे जिमखान्याच्या कमिटीकडे मागणी केली! त्यांचें म्हणणें

असें झालें कीं भुताराम यांनीं चेंडू विकेटला लावला, त्या वेळीं त्यांनीं 'बेल्स' उडविल्या नव्हत्या व जोंपर्यंत बेल्स उडविल्या गेल्या नाहींत, तोंपर्यंत बॅटस्मन आउट झाला असा अंपायरला निर्णय देतां येत नाहीं. स्वतः भुताराम यांना याबाबत खरा प्रकार काय घडला हें विचारतां त्यांनीं सांगितलें कीं 'बेल्स' उडविल्या होत्या कीं काय हें आपल्याला निश्चित कांहींच स्मरत नाहीं; तथापि 'बेल्स' हलल्या असाव्यात असेंच आपल्याला स्मरतें. या 'नरो वा कुंजरो वा' थाटाच्या उत्तरानें कांहींच सिद्ध होण्यासारखें नव्हतें. सदर प्रकार घडला, त्या वेळीं मी स्वतः 'थर्ड मॅन'च्या जागेवर क्षेत्ररक्षण करीत होतों. त्या स्थानावरून मला दिसलें तें असें कीं भुताराम यांच्या हातांत चेंडू आणि उडालेली बेल दोन्ही एकदम पडली व त्यांनीं बेल पुन्हां पटकन् स्टंप्सवर ठेवून चेंडू उडविला. हा सारा प्रकार अगदीं निमिषार्धांतच घडला. मला असेंही निश्चित स्मरतें कीं मीं त्या प्रसंगीं विकेटपाशीं येऊन स्टंपवरील बेल खालीं टाकून भुताराम यांना असाही प्रश्न केला होता कीं "तुम्ही अशी ही खालीं पडलेली बेल वर उचलून ठेवलीत कां?" पण ते गोंधळल्यासारखेच झाले. माझी साक्ष घेण्यांत आली, त्या वेळीं मीं मला दिसलेला वरील प्रकार वर्णन करून सांगितला. पण स्वतः भुताराम हे निश्चित कांहींच सांगूं शकत नसल्यामुळें या साक्षीचा उपयोग नव्हता. पण हें कांहींही असलें, तरी स्वतःतर्फेच्या अंपायरचा अपमान करून घेणें हिंदु जिमखान्याला स्वाभाविकच मुळींच प्रशस्त वाटलें नाहीं. बॉम्बे जिमखान्याची मागणी हिंदु जिमखान्याच्या कमिटीनें साफ धुडकावून लाविली आणि यामुळें दोन्ही प्रमुख जिमखान्यांत वादांग माजून मोठाच पेंचप्रसंग उद्भवला. अखेर हें सारें प्रकरण निर्णयासाठीं मुंबईचे क्रिकेटप्रेमी गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्यापुढें ठेवण्यांत आलें. लॉर्ड विलिंग्डन यांनीं उभय पक्षांचें म्हणणें ऐकून घेतलें आणि 'अंपायरचा निर्णय बरोबर असो वा नसो, खेळाडूंनीं तो मान्य केलाच पाहिजे,' असें मत प्रकट करून या प्रकरणावर पडदा पाडण्याची दोन्ही पक्षांना विनंती केली. गव्हर्नरांच्या म्हणण्याचा अनादर करणें कोणालाही अर्थातच शक्यच नव्हतें आणि त्यामुळें "भुताराम प्रकरणा"चा तेवढ्यावरच शेवट झाला.

अंपायरच्या निर्णयाबद्दल मतभेद होण्याचे प्रसंग चौरंगी सामन्यांत अनेकदां उद्भवले आहेत; पण हे मतभेद इतक्या विकोपाला गेल्याचा प्रसंग मात्र हाच एक मला विशेष स्मरतो. उभय पक्ष समजुतदार असल्यास हे असे प्रसंग जागच्या जागींच निभावून नेणें अशक्य नसतें. हिंदु संघाचें नेतृत्व माझ्याकडे असतां युरोपियनांविरुद्ध झालेल्या एका सामन्यांत असाच एक प्रसंग माझ्यापुढें उद्भवला होता. बहुधा १९२५ सालचा सामना असावा तो. युरोपियनांचे कॅप्टन ट्रॅव्हर्स हे बॅटिंग करीत होते. त्यांनीं एक बाउंडरीचा उंच फटका मारला आणि तो उडालेला झेल पॅव्हिलियनच्या बाजूला सीमारेषेकडे क्षेत्ररक्षण करीत असलेले श्री. महाले यांनीं अचूक झेलला. चेंडू झेलला गेला, ही सार्‍या प्रेक्षकांच्या डोळ्यांपुढेंच घडलेली गोष्ट होती. अर्थात् ट्रॅव्हर्स हे आउट झाले होते हेंही स्पष्टच होतें. पण महाले जेथें उभे होते, त्या बाजूला पॅव्हिलियनमध्यें बसलेल्या युरोपियन खेळाडूंनीं अशी साक्ष पुढें आणली कीं महाले यांनीं चेंडू झेलला, त्या वेळीं त्यांचा पाय सीमारेषेच्या बाहेर पडला होता; आणि त्यामुळें त्यांचा झेल नियमबाह्य होता. ट्रॅव्हर्स पॅव्हिलियनमध्यें येत असतां त्यांनीं क्रीडांगणावरच त्यांना थोपवून धरलें आणि झेल नियमबाह्य असल्याचें सांगून अंपायरकडे अपील करण्यास त्यांना सांगितलें. त्याप्रमाणें ट्रॅव्हर्स हे अपील करण्यासाठीं परत मागें फिरले. स्वतः महाले यांचें म्हणणें असें होतें कीं झेल झेलल्यानंतरच आपला पाय सीमारेषेच्या बाहेर पडला. चेंडू झेलण्याच्या वेळीं महाले यांचा पाय अचूक कुठें होता, हें अंपायरलाही त्याच्या स्थानावरून स्पष्ट दिसलें नव्हतें. शिवाय त्या ठिकाणची सीमारेषाही स्पष्ट आंखण्यांत आली नव्हती. अशा परिस्थितींत त्यालाही प्रश्न पडला कीं बॅट्समनला आउट द्यावें कीं नॉट आउट द्यावें? अंपायर मि. दावर हे होते; ते हलकेच मला म्हणाले, "हें पाहा विठ्ठल, खरा प्रकार काय घडला हें इतक्या लांबून मलाही सांगणें शक्य नाहीं; यामुळें मोठा विचित्रच प्रसंग माझ्यापुढें उद्भवला आहे. काय निर्णय द्यावा हेंच मला कोडं पडलं आहे." बॅटस्मन आउट कीं नॉटआउट अशा या वादामुळें खेळांत कांहीं मिनिटें अगोदरच खंड पडला होता; आणखी वाद घालीत राहिल्यास उभय पक्षांत तेढ निर्माण होण्याचा रंग दिसत होता. आणि प्रेक्षकांचाही निष्कारण

खोळंबा होणार होता. या परिस्थितींत आपणच पडती बाजू घेऊन ट्रॅव्हर्स यांना पुन्हां खेळूं देण्यांत जी आमची हानि झाली असती, ती सोसावी, असाच मीं विचार केला. आणि दावर यांना मी म्हणालों, "त्यांचे खेळाडू जर तशी साक्ष देताहेत तर त्यांचा शब्द मी खोटा मानत नाहीं; ट्रॅव्हर्स हे पुन्हा खेळावयास आल्यास माझी कांहीं हरकत नाहीं." त्याप्रमाणें दावर यांनीं ट्रॅव्हर्स यांचें अपील मान्य करून त्यांना खेळावयास परवानगी दिली. ह्या माझ्या निर्णयामुळें मी कच्च्या दिलाचा म्हणून मला माझ्याच स्नेही मंडळीपैकीं अनेकांनीं बोल लावला; क्रीडांगणावरही प्रो. देवधर, जोशी, चंदाराणा हे मला म्हणूं लागले, "तुम्हीं आक्षेप घेतला नाहींत, ही मोठी चूक केलीत; ते खरेच आउट झाले होते." मीं उत्तर केलें, "आपण त्यांना पुन्हा आउट करूं.–गडबडतां कां?" आणि चंदाराणा यांजकडे वळून मीं म्हणालों, "तुम्हीच घ्याल आतां ही विकेट! पाहा तर खरं!" आणि झालेंही तसेंच! ट्रॅव्हर्स खेळावयास आले तरी फार धांवा करू शकले नाहींत आणि आमची मोठीशी हानिही त्यामुळें होऊं शकली नाहीं. मीं म्हटल्याप्रमाणेंच चंदाराणा यांनींच त्यांचा त्रिफळा उडविला व तो सामना अखेरीस आम्हींच जिंकलों. पण माझ्या धोरणामुळें एक अटीतटीचा प्रसंग मात्र टळला.

### बॉंबे जिमखान्याचा बंदीहुकुम

क्रिकेट हा इंग्रजांचा खेळ आणि त्या खेळाला अनुरूप अशी खेळाडू वृत्ति त्यांच्याकडून अधिक प्रकट व्हावी अशीच कोणाचीही अपेक्षा असणें स्वाभाविकच आहे. ही अपेक्षा बहुधा खरीही होत असे; पण कांहीं कांहीं वेळां असेही प्रसंग येत कीं त्या वेळीं खेळाडूची खेळाडू वृत्ति तर लोपून जाईच; पण वर्णद्वेषाचीही वृत्ति नकळत डोकें वर काढी. एकदां एका सामन्याच्या प्रसंगीं क्षुल्लक कारणावरून साऱ्या हिंदु-मुसलमान खेळाडूंना बॉम्बे जिमखान्यांतील नळपाणी वगैरे सोयींचा फायदा घेण्याची बंदी करण्यापर्यंतही तेथील अधिकाऱ्याची मजल गेली होती. मुसलमानांपैकीं एक-दोन खेळाडूंना पानतंबाखू खाण्याची संवय होती. आणि त्यांच्याचपैकीं एकानें जिमखान्याच्या 'वॉश बसिन' मध्यें बाहेर पडतां पडतां

विडयाची पिंक टाकली. ' बसिन ' अर्थातच त्यामुळें अस्वच्छ दिसूं लागलें. जिमखान्याच्या अधिकाऱ्यांच्या नजरेला तेथील सभासदांनीं ही गोष्ट आणून दिली. आणि अधिकाऱ्यांनीं लगेच नोटिस काढली कीं हिंदु-मुसलमान खेळाडूंना जिमखान्याच्या नळपाणी वगैरे सोयींचा फायदा यापुढें मिळूं शकणार नाहीं; त्यांच्यासाठीं जिमखान्याच्या मागें वेगळ्या तंबूंत सोय केली आहे, तेथें त्यांनीं आपले मुखप्रक्षालनादि कार्यक्रम उरकावे. या नोटिसीमुळें खेळाडूंची अर्थातच गैरसोय होणार होती; आणि ही गैरसोय सहन करणें स्वत्वाच्या व स्वाभिमानाच्या दृष्टीनेंही त्यांना शक्य नव्हतें. एका खेळाडूच्या अस्वच्छपणाबद्दल साऱ्याच हिंदु-मुसलमान खेळाडूंना एकदम अशी ही बंदी करण्यांत यावी हें अयोग्य तर होतेंच; पण अत्यंत अपमानकारकही होतें. हें प्रकरण यामुळें कांहींसें चिरडीवर जाण्याचाच रंग दिसूं लागला होता. पण डॉ. कांगा यांना ह्या नोटिशीची बातमी कळतांच त्यांनीं ताबडतोब मध्यस्थी करून जिमखान्याच्या अधिकाऱ्यांची समजूत घातली आणि त्यांना आपली नोटिस मागें घेण्यास भाग पाडलें. अशा रीतीनें ही मध्येंच एका दिवसांत उपस्थित झालेली वावटळ त्याच दिवशीं जिरली आणि युरोपियनांच्या अरेरावीचा कांहीं विपरीत परिणाम होऊं शकला नाहीं.


## एम्. सी. सी. प्रकरण

१९२६ सालीं एम्. सी. सी. संघ मुंबईंत आला, त्या वेळीं युरोपियन खेळाडूंच्या अरेरावीचा अगदीं मासलेवाईक अनुभव आम्हाला मिळूं शकला. आमच्याशीं त्या संघांतील खेळाडूंनीं एका सामन्यांत जें वर्तन केलें, तें खेळाडू वृत्तीला खास शोभेसें नव्हतें. हिंदु-मुस्लिम संघ वि. एम्. सी. सी. हा सामना त्या वेळीं चालू होता. सी. के. नायडू व मी खेळत होतों व एम्. सी. सी. संघांतील ग्लामोर्गन काउंटीचे गोलंदाज मर्सर हे बोलिंग टाकीत होते. एम्. सी. सी.चे विकेटकीपर ब्राउन यांना मध्येच अकस्मात मर्कटचेष्टा करण्याची लहर येई. त्याप्रमाणें, मर्सर यांचा एक ऑफ साइडकडून वळलेला चेंडू नायडू यांची बॅट चुकवून ब्राउन यांच्या पॅड्सला लागून विकेटवर पुन्हा मागून आदळला, त्याबरोबर ब्राउन यांनीं एकदम " क्लीन बोल्ड " असाच पुकारा केला ! मला बोलरच्या विकेट-

कडून सारी हालचाल स्पष्ट दिसत होती आणि ब्राउन यांच्या पॅड्सला लागून चेंडू उडाला हें मीं स्पष्ट पाहिलें होतें; माझ्या शेजारीं उभे असलेले अंपायर वॉर्डन यांचेंही माझ्यासारखेंच मत पडलें आणि त्यांनीं नायडू 'नॉट आउट' असल्याचा निर्णय दिला. एम्. सी. सी.च्या खेळाडूंना हा निर्णय रुचला नाहीं. ही नापसंती उघड व्यक्त करणें त्यांना शक्य नव्हतें; पण ज्या ज्या अन्य रीतींनीं ती दर्शवितां येण्यासारखी होती, त्या साऱ्या तऱ्हांनीं ती त्यांनीं प्रकट केली. ब्राउन यांनीं तर मधूनमधून हात-पाय आपटण्यास व बडबड करण्यास सुरुवात केली. संघाचे कॅप्टन मि. चिचेस्टर कॉन्स्टेबल यांच्या नजरेस मीं हा प्रकार आणून दिला व त्यांनीं ब्राउन यांना गप्प राहण्याची सूचना केली. पण एवढ्या सुचनेनें वातावरण शांत झालें नाहीं; खेळाडूंचा गवगवा चालूच राहिला. आणि तशा वातावरणांत खेळणें अशक्य झाल्यामुळें नायडू यांच्या मनाचा तोल सुटून त्यांनीं फटके लगावण्यास सुरुवात केली आणि त्यांत ते लवकरच आउट झाले. नायडू आउट झाले तरी एम्. सी. सी.च्या खेळाडूंचा आमच्यावरील रोष शांत झाला नाहीं. लंचच्या वेळीं त्यांनीं वेगळ्या रीतीनें पुन्हां त्याचें प्रदर्शन करण्याची संधि साधली. टेबलांपाशीं कोणकोणत्या खुर्च्यांवर कोणत्या इसमानें बसावयाचें याचीं कार्डस् लावलेलीं असतात. तीं या समयींही लावलेलीं होतीं; पण आमच्या खेळाडूंसह मीं तेथें गेलों, त्या वेळीं एम्. सी. सी.चे खेळाडू या कार्डांची दखलगिरी न घेतां व कांहीं ठिकाणीं तीं पालथीं करून एका रांकेंत जाऊन बसले होते. मी माझ्या खुर्चीवर जाऊन बसल्यावर हा प्रकार लक्षांत आला. एम्. सी. सी. संघाचे कॅप्टन व सेक्रेटरी हेही उपस्थित राहिले नव्हते. आमचा पाण-उतारा करण्यासाठींच हा असा बनाव घडवून आणला होता, हें माझ्या तत्क्षणींच ध्यानांत आलें. ह्या अपमानाला प्रत्युत्तर म्हणून आपण तत्काळ उठून निघून जावें असें माझ्या मनांत एकदां येऊन गेलें; पण तसें केल्यास केवढा मोठा गवगवा होईल व हें प्रकरण कोणत्या भलत्याच थराला जाईल असाही दुसरा विचार माझ्या मनांत आला. माझ्याशेजारीं इस्लाम जिमखान्याचे अध्यक्ष सर इब्राहिम रहिमतुल्ला हे बसले होते; त्यांच्याकडे वळून मीं म्हणालों, "सर, मामलो बहु गंभीर छे!" त्यावर ते मान हालवून म्हणाले, "हां, छे खरो, पण विठ्ठल, आपणें सुबुरी राखुं! पछी जोइशुं!"

आमचा हा गुजराथींत चाललेला संवाद, इंप्रुव्हमेंट ट्रस्टचे युरोपियन चेअरमन (बहुधा हे मि. इन्स असावेत) समोरच बसले होते, त्यांच्या कानीं पडला. त्यांना गुजराथी येत असावेंसें दिसलें; कारण लगेच मला उद्देशून इंग्रजींत ते म्हणाले,

"या वेळीं चालवून घ्या कसंही करून! आपण नंतर पाहूं काय करायचं तें!" या दोघांही मोठ्या व्यक्तींचा हा सल्ला मीं प्रमाण मानला आणि आमच्या खेळाडूंना जागा मिळेल तेथें बसण्याची सूचना करून आम्ही लंचचा कार्यक्रम उरकून घेतला. सायंकाळीं वर्तमानपत्रांत या प्रकाराची वाच्यता झाली. आणि आमच्या जिमखान्यांतही मोठी खळबळ उडाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं खेळ सुरू होण्यापूर्वी तासभर राहिला असतांना मीं आमच्या जिमखाना–तंबूत गेलों, तर तेथें एम्. सी. सी. च्या निषेधाची मोठीच तयारी चालू असल्याचें दिसून आलें. निषेधाचा एका मसुदा तयार करण्यांत आला होता आणि कॅप्टन या नात्यानें माझी त्यावर सही होण्याचाच तेवढा अवकाश होता. मला पाहतांक्षणींच कै. तेरसी मला म्हणाले, "चल, विठ्ठल, सही कर यावर!" मीं तो मसुदा पाहिला आणि म्हणालों "एवढं मोठं गंभीर प्रकरण हें, मला थोडा विचार करायला तर अवधी हवा!—" माझ्यापुढें मोठाच चमत्कारिक प्रसंग उद्भवला होता. त्या मसुद्याची भाषा कडकच दिसली. मीं मसुदा पुन्हा एक-दोनदां वाचून पाहिला व सूचना के ी कीं बॉम्बे जिमखान्यांत उलट बाजूचा कसा काय रागरंग आहे हें पाहावें आणि मगच निषेधासंबंधींचा निर्णय घ्यावा; कदाचित् आज निराळाच प्रकार दिसण्याचा संभव आहे. माझी ही सूचना सर इब्राहिम रहिमतुल्ला व पारशी जिमखान्याचे सेक्रेटरी मि. लाम यांना पसंत पडली. सर चुनिलाल मेहता यांनीही होकार दिला आणि मीं आमच्या खेळाडूंसह खेळण्यासाठीं क्रीडांगणावर उतरण्याच्या तयारीनें उभा राहिलों. त्या वेळींच एम् सी. सी. चं कॅप्टन मि. चिचेस्टर कॉन्स्टेबल हें धांवतच तेथें आले आणि मला म्हणाले, "काल घडलेल्या प्रकाराबद्दल क्षमा करा अन् तो विसरून जा!—" ही समक्षच माफी त्यांनीं मागितली होती. अर्थात् निषेधाचा आतां कांहीं प्रश्नच उरत नव्हता. त्या दिवशीं लंचचा थाट वेगळाच दिसून आला. आणि आमची सरबराई चांगल्या रीतीनें राखण्यांत आली. ही सारी कळ इंप्रुव्हमट ट्रस्टच्या चेअरमननीं केलेल्या कानउघाडणीमुळेंच फिरली असावी असें वाटतें. पण एकंदरींत हाही प्रकार थोडक्यांतच निभावला.



## " संभालो, वो आउट करता है अबी "

क्रिकेटचे सारे नियम अंपायर व खेळाडू या दोघांनाही चांगले अवगत असले पाहिजेत हें खरेंच आहे; पण केव्हां केव्हां या नियमांत न बसणारीही नवी विचित्र परिस्थिति अचानक निर्माण होत असते, व त्या वेळीं मग योग्य निर्णय देणें अंपायरलाही कठीण होत असतें. क्रिकेटचे जे नियम सुरुवातीपासून ठरवून देण्यांत आले आहेत, ते अशा या अनुभवांवरच आधारले आहेत. एका बहाद्दरानें विकेटपेक्षांही रुंद असें फळकूट घेऊन खेळण्यास सुरुवात करतांच बॅटीची रुंदी किती असावी, हें ठरविणें भागच झालें. दुसऱ्या एका बहाद्दर गड्यानें विकेटसमोर चीनच्या भिंताडाप्रमाणें आडवें राहून स्वतःच्या शरीरानेंच चेंडू अडविण्याची करामत करून दाखवितांच एल्. बी. डब्ल्यु.चा नियम पटावर दाखल करावा लागला. आमच्या

पाहण्यांतही असे एक दोन नियम बदलावे लागले आहेत. एकदां एका सामन्यांत खेळाडूनें चेंडू फटकावला तो अचूक अंपायरच्या खिशांत पडला! इंग्लंडचे प्रसिद्ध बॅटस्मन जॅक हॉब्स हे एकदां खेळत असतांना त्यांच्या बॅटीला लागून उडालेला चेंडू त्यांच्या पॅडमध्यें अडकून पडला आणि ते त्या चेंडूसह धांवा घेण्यासाठीं पळूं लागले! चेंडू क्षेत्ररक्षकाच्या हातीं त्या स्थितींत लागूं देणें म्हणजे तो झेलच ठरला असता! या दोन्ही प्रसंगीं चेंडू कसा हस्तगत करावयाचा हा प्रश्न क्षेत्ररक्षकांना उपस्थित झाला. अशा परिस्थितींत चेंडू थांबला आहे किंवा गतिमान आहे हें कसें ठरवावें याबद्दलचा निश्चित नियम कांहींच नसल्यानें अंपायरलाही काय निर्णय द्यावा हें कोडेंच पडलें. यानंतर मग याबाबतचा नियम बदलण्यांत आला, व अशा तऱ्हेच्या परिस्थितींत चेंडूची गति थांबली आहे असें समजण्यांत यावें असा नियम करण्यांत आला.

गोलंदाजाच्या अशिष्ट युक्त्या

अंपायरच्या निर्णयामुळें युरोपियन खेळाडूंनीं कांहीं प्रसंगीं कसा गवगवा केला, याबद्दलचे एक दोन अनुभव गेल्या प्रकरणांत मीं सांगितले. पण याबाबतच्या त्यांच्या त्या वर्तनापेक्षांही मला विशेष नवल वाटलें तें त्यांच्यापैकीं जे कांहीं कांहीं गोलंदाज गोलंदाजी करतांना अशिष्ट व अन्याय्य मार्गांचा अवलंब बेदरकारपणेंच करीत, त्या प्रकाराचें! 'पिच'वर हळूच बूट घसटून चेंडूला मनासारखी दिशा व गति देण्यासाठीं एकदा ठराविक 'स्पॉट' निर्माण करून ठेवावयाचा, चेंडू पटकन् फिरवितां यावा म्हणून त्याच्यावरील पॉलिश नखांनीं खरवडून काढावयाचें, चेंडूची शिवण उसवून टाकण्याचा प्रयत्न करावयाचा, इत्यादि युक्त्या त्यांजकडून अनेकदां योजल्या जात. गोलंदाजानें फेकलेला चेंडू सुर्रर् असा आवाज करीत उशी घेऊं लागला कीं गोलंदाजाच्या नखांचा त्यावर प्रयोग झाला आहे असें नक्की समजावें. इतर वेळीं चांगल्या क्रीडांगणावर चेंडूचा असा आवाज ऐकूं येत नाहीं. चौरंगी सामन्यांत एकदां कॅ. ह्युजेस हॅलेट या मंदगति गोलंदाजानें अशीच करामत करण्यास सुरुवात केली होती व त्या वेळीं अंपायरकडून त्यांना समजही द्यावी लागली होती. इतर वेळीं चेंडू कुरकुरत नसतांना त्या सामन्याच्याच वेळीं

तो असा कां 'कुरकुर' करूं लागावा याचें मला त्या वेळीं आश्चर्य वाटलें आणि विशेष बारकाईनें पाहतां सदर गोलंदाजाची वर उल्लेखिलेली करामत माझ्या चटकन् लक्षांत आली. १९२६ सालच्या गिलिगन यांच्या एम्. सी. सी. संघानंतर १९३३ सालीं जार्डिन यांच्या नेतृत्त्वाखालीं जो एम्. सी. सी. संघ आला, त्यांतील गोलंदाज क्लार्क यांनीं अगदीं उघडउघडपणेंच या युक्त्यांचा अवलंब केल्यामुळें त्या वेळीं वर्तमानपत्रांतूनही त्याचा केवढा गाजावाजा झाला होता हें अनेकांच्या स्मरणांत असेलच! 'बॉडी लाइन' म्हणून जें तंत्र त्या वेळीं सुरू झालें होतें, त्याचाही उपयोग क्लार्क करीत असे. तें त्याचें तंत्र एका सामन्याच्या वेळीं पाहून फ्रँक टॅरन्ट यांना मीं म्हणालों, "हे लोक गोलंदाजी करण्यासाठीं आले आहेत कीं मारामारी करण्या-साठीं? ही गोलंदाजीची तऱ्हा नियमबाह्य नव्हे का? अन् ती हे अंपायर चालूं कशी देतात?" टॅरन्ट माझ्या या उद्गारांवर मान हालवून म्हणाले, "आमचा जमाना आतां राहिला नाहीं, विठ्ठल! आम्हीं निषेध केला तरी आमचं म्हणणं कोण ऐकून घेणार? आमची मात्रा इथं कांहींच चालणं शक्य नाहीं! तेव्हां गप्प बसून काय होतंय् तें पाहावं हेंच बरं!"—

पण मुंबईंत किंवा हिंदुस्थानांत क्लार्क यांच्या या करामतीला अवसर मिळूं शकला, तरी सिलोनमध्यें मात्र तेथील खेळाडूंनीं या गोलंदाजाच्या गोलंदाजीवर खेळण्याचें साफ नाकारलें. या बहिष्काराची मात्रा लागू पडली आणि क्लार्कला तेथील सामन्यांत आपला प्रताप गाजविण्याची संधि नंतर मिळूं शकली नाहीं.

## गव्हर्नरांची नापसंती

युरोपियन खेळाडूंची वर निर्दिष्ट केलेली ही विशिष्ट वृत्ति युरोपियन प्रेक्षकांनाही पुष्कळदां नापसंत असे. याचा एक उल्लेखनीय अनुभव, ट्रॅव्हर्स यांच्या झेलप्रकरणासंबंधींचा जो प्रसंग गेल्या प्रकरणांत वर्णिलेला आहे, त्या प्रसंगीं आला. त्या दिवशीं मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन हे सामना पाहण्यासाठीं आले होते. जिमखान्याच्या गच्चीवर त्यांनीं चहापाना-साठीं मला खास बोलावून घेतलें आणि त्या समयीं ह्या झेलप्रकरणासंबंधींचें

खेळणें त्यांनींच काढलें. ट्रॅव्हर्स यांना पुन्हा खेळण्याची सवलत कां देण्यांत आली असा प्रश्न त्यांनीं मला केला आणि युरोपियन खेळाडूंच्या साक्षीमुळेंच मीं ही तयारी दर्शविली असें माझें उत्तर ऐकतांच ते म्हणाले कीं " ट्रॅव्हर्स यांचा झेल जिमखान्याच्या आंत पाऊल टाकून तर कांहीं झेलला नव्हता ना ?—बाउंडरीची रेषा जिमखान्याच्या पायरीलाच जवळ जवळ लागून आहे. अर्थात् ज्या अर्थी त्या पायरीला क्षेत्ररक्षकाचा पाय लागला नाहीं, त्या अर्थी तो झेल बाउंडरीच्या आंतच झेलला गेला होता, हें उघडच आहे. ट्रॅव्हर्स हे खरोखरीच आउट होते असें मला वाटतें. इतर ठिकाणीं अशा परिस्थितींत त्यांना कोणीच खेळण्याची सवलत दिली नसती. एवढेंच नव्हे, पण विलायतेंत अशा प्रसंगीं प्रेक्षकांनींही एकच गिल्ला करून बॅटस्मनची हकालपट्टीच केली असती." सर लेस्ली विल्सन यांनीं हें मत इतक्या सडेतोडपणानें बोलून दाखविलें कीं त्यावरून युरोपियन खेळाडूंच्या अनुदारपणाविषयीं त्यांना त्या प्रसंगीं कांहींशी चीडच आली होती, हें सहज दिसून येण्यासारखें होतें !

फ्रँक टॅरन्ट

चौरंगी सामन्यांतील युरोपियन गोलंदाजांपैकीं, वर ज्यांचा उल्लेख केला आहे ते फ्रँक टॅरन्ट हे बरींच वर्षें व विशेष चमकलेले गोलंदाज होत. चौरंगी सामन्यांत युरोपियन गोलंदाजांमध्यें त्यांनींच अधिक विकेट्स् (७०) घेतल्या आहेत. टॅरंट हे प्रथमचे मिडलसेक्स काउंटीचे धंदेवाईक खेळाडू होते. पतियाळा महाराजांच्या निमंत्रणावरून ते हिंदुस्थानांत आले. पतियाळाखेरीज कुचबिहार संघांतूनही ते खेळत; किंबहुना हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं महत्त्वाच्या सामन्यांतून टॅरन्ट यांच्याइतका भाग घेतलेला दुसरा युरोपियन खेळाडू विरळाच सांपडेल असें मला वाटतें. चौरंगी सामन्यांत १९१५ सालीं टॅरन्ट यांचा प्रथम प्रवेश झाला आणि त्यानंतरही कांहीं वर्षें त्यांच्या गोलंदाजीचें तेज उत्तम पडलें. पंधरा सालीं त्यांच्या व सिम्स यांच्या प्रभावी गोलंदाजीमुळें अवघ्या २१ धांवांत मुसलमान संघाला आपला अवतार आटोपावा लागला होता ! चौरंगी सामन्यांत कमींत कमी झालेला स्कोअर असा हाच

होय. टॅरन्ट यांनीं पहिल्या डावामध्यें ६ धांवांत ५ व दुसऱ्या डावांत ९ धांवांत ५ अशा या सामन्यांत विकेट्स् घेतल्या होत्या. सिम्स यांनीं १५ धांवांत ५ विकेट्स् घेतल्या. सिम्स हे फास्ट बोलर होते. याउलट टॅरन्ट हे डावखोरे व साधारण मंदगतिचे गोलंदाज होते आणि बॅटस्मनच्या खेळ-ण्याच्या पद्धतीनुरूप आपल्या गोलंदाजींत फरक करून त्याला ते अचूक पेंचांत पाडीत त्यांच्या ओव्हरपैकीं प्रत्येक चेंडू वेगवेगळ्या तऱ्हेनें टाकलेला असे; त्यामुळें बॅटस्मनला त्यांच्या गोलंदाजीवर अतिशय सावधगिरीनेंच खेळावें लागे. अचूक पल्ला हें त्यांच्या गोलंदाजीचें एक मोठेंच वैशिष्ठ्य होतें; या बाबतींत त्यांची चेंडूवरील हुकमत अप्रतिमच होती. बॅटस्मनचें मर्म-स्थान दोन-चार चेंडूंतच ते अचूक हेरीत असत आणि त्याप्रमाणें ठराविक 'स्पॉट' वर अचूक चेंडू आदळून ते बॅटस्मनला नामोहरम करीत. या त्यांच्या कौशल्याबद्दलचा एक प्रसंग अजूनही माझ्या चांगला स्मरणांत आहे. १९१८ सालीं पुण्याला युरोपियन संघाविरुद्ध आमचा सामना चालू होता. सी. के. नायडू आणि मी खेळत होतों आणि टॅरन्ट हे बोलिंग टाकीत होते. नायडूंना दोनतीन बॉल टाकल्यावर टॅरन्ट माझ्याकडे वळून चटकन् बोलून गेले, "पाहा मीं आतां यांची विकेट घेतों." टॅरन्ट यांनीं वरकरणी विनोदानेंच हे उद्गार काढले होते. पण नायडूंचें कुठें चुकत आहे हें त्यांच्या खास लक्षांत आलें असावें असाच मीं त्यांच्या या उद्गारांवरून तर्क बांधला आणि नायडूंना याबाबतची सूचना देण्यासाठीं मी म्हणालों, "संभालो, वो आउट करता है अबी-" त्यावर "अच्छा" एवढेंच उद्गारून नायडूंनीं अस्तन्या आणखी मागें सारल्या आणि टॅरन्ट यांच्या गोलंदाजीला तोंड देण्याची त्यांनीं तयारी केली. दोनतीन बॉल ते निर्भयपणें खेळूं शकलेही; पण चवथा चेंडू त्यांच्या बॅटीला झटकन् बगल देऊन सरळ विकेटवर जाऊन आदळला! आणि नायडू "क्लीन बोल्ड" झाले!

### बोलर्संचा सामना

टॅरन्ट यांची गोलंदाजी १९१८ सालच्या या सामन्यांत चांगलीच प्रभावी ठरली. त्यांच्या जोडीला त्यांना त्या वर्षीं हीथ हे नवीन उत्कृष्ट बोलर मिळाले

होते. हीथ यांनीं पहिल्या डावांत ५ विकेट्स घेतल्या आणि आम्ही त्या डावांत जेमतेम ६८ धांवा अरूं शकलों. हीथ हे "लेगथिअरी" चा उपयोग करीत असत; शिवाय त्यांना अनुकूल विकेट्चाही फायदा मिळूं शकला. दुसऱ्या डावांत आम्हीं १४८ धांवा केल्या; त्यांत सर्वांत अधिक म्हणजे ४८ धांवा मी करूं शकलों. आणखी ३६ धांवा आम्हांला करतां आल्या असत्या, कीं आम्ही तो सामना जिंकूं शकलों असतों; पण टॅरन्ट यांनीं या डावांत ६ विकेट्स् घेतल्या आणि आमचा सामना जिंकण्याचा मोका हिरावून घेतला. हाही सामना फार चुरशीचाच झाला. आमचे गोलंदाज चंदाराणा हे या वर्षीं 'फॉर्म'मध्यें होते; त्यांनीं दोन्हीं डावांत मिळून एकंदर ११ विकेट्स् या सामन्यांत घेतल्या. या दृष्टीनें बॅटस्मनपेक्षां हा सामना बोलर्सचाच होता असें म्हणतां येईल आणि त्यांत टॅरन्ट व हीथ यांनींच अखेरीला मात केली! चेंडूप्रमाणेंच बॅटवरही टॅरन्ट यांची चांगलीच हुकमत चालत असे; चिवट व भरंवशाचे बॅटस्मन असाच त्यांचा लौकिक होता. पुणें येथें १९१९ सालीं कुचबिहार संघांतून खेळतांना त्यांनीं १८७ नाबाद धांवा केल्या होत्या आणि एका डावांत दहा विकेट्स् घेण्याचाही विक्रम केला होता.

### ऱ्होड्स् यांचा विक्रम

युरोपियन संघाशीं वरील सामन्यानंतर आमची गांठ पुन्हां पडली, ती १९२१ सालीं होय. या वर्षीं, यॉर्कशायर व इंग्लंडचे प्रसिद्ध टेस्ट क्रिकेटपटु विल्फ्रिड ऱ्होड्स् यांचें साहाय्य युरोपियन संघाला मिळूं शकलें होतें. ऱ्होड्स् यांच्याखेरीज जॉर्ज हर्स्ट, कॅ. जे. एच्. पार्सन्स, हे नामांकित काउंटी खेळाडू आणि फ्ला. कमांडर लिस्टर के, हिगिन्स, होझी वगैरे इतर निष्णात क्रिकेटपटु या युरोपियन संघांत होते. हा संघ त्या वर्षींच्या इतर तीन्ही संघांहून फार प्रबळ होता आणि त्यामुळें त्या वर्षींचें विजेतृत्व त्या संघाला सहजींच मिळूं शकलें. हिंदूंना त्या वर्षीं १ डाव व १०८ धांवांनीं अपयश घ्यावें लागलें. आणि निर्णायक सामन्यांत पारशी संघालाही असाच एक डाव व २०४ धांवांचा सगसणीत मार खावा लागला. ऱ्होड्स् यांनींच हे दोन्ही सामने जिंकले असेंच म्हटलें पाहिजे. हिंदूंविरुद्ध त्यांनीं १५६ धांवा

केल्या आणि हिंदूंच्या पहिल्या डावांत २६ धांवांत ७ विकेट्स् घेतल्या. पारश्यांविरुद्ध तर त्यांनीं १८३ धांवा केल्या आणि पारश्यांच्या पहिल्या व दुसऱ्या डावांत अनुक्रमें २६ धांवांत ५ व ३३ धांवांत ७ असे बळी घेऊन पारश्यांचा साफ धुव्वा उडविला. १९२२ सालीं रेडक्रॉस फंडा-साठीं मुंबईत इग्लंड विरुद्ध हिंदुस्थान व पारशी–युरोपियन विरुद्ध हिंदु–मुसलमान असे खास सामने घडवून आणण्यांत आले; त्यांपैकीं एका सामन्यांत ऱ्होड्स् यांनीं २८० धांवा केल्याचें मला स्मरतें. ऱ्होड्स् यांचा खेळ धिम्मेपणानेंच चालत असे. बचावावरच त्यांचा अतिशय भर असे. अतिशय चिवट बॅट म्हणून त्यांचा लौकिक मीं ऐकला होता. त्याचें पूर्ण प्रत्यंतर वर उल्लेखिलेल्या साऱ्याच सामन्यांत मिळलें. त्यांचे फटके बहुधा लेगच्याच बाजूला असत; पण मधूनमधून ते 'प्लेसिंग' ही अतिशय कुशलतेनें करीत. ऱ्होड्स् हे टॅरन्ट यांजप्रमाणेंच डावखोरे मंदगति गोलं-दाज होते. चेंडूवर त्यांचीहो हुकमत विलक्षणच होती. रेडक्रॉस फंडाच्या उपरिनिर्दिष्ट सामन्यांत ऱ्होड्स् यांच्याखेरीज इंग्लंडचे दुसरे एक प्रसिद्ध मंदगति गोलंदाज रॉय किल्नर यांचाही समावेश झाला होता. या दोघांच्या जोडगोळीपुढें हिंदी संघाचा त्या सामन्यांत विशेषसा टिकाव लागूं शकला नाहीं, यांत कांहींच नवल नाहीं. मीं या सामन्यांत ६० धांवा केल्या होत्या, असें मला स्मरतें. याच सामन्यांत मला एक विचित्रच तक्रार करण्याचा प्रसंग आला होता. इंग्लंड संघांतील जलदगति गोलंदाज फ्लाइट कमांडर लिस्टर के हे फार उंच खेळाडू होते. बोलिंग करतांना त्यांचा हात उंचावत असे, तो बॅटस्मनच्या जागेवरून बोलरमागच्या स्क्रीनच्या वरच गेलेला दिसे. यामुळें बॅटस्मनला बोलरच्या हाताची हालचाल स्पष्ट दिसावयास हवी, तशी ती दिसूं शकत नसे आणि बॅटस्मन कांहींसा घोटाळ्यांतच पडे. मी खेळत असतांना ही परिस्थिति मलाही फार जाणवूं लागली आणि अंपायरच्या नज-रेला हा प्रकार मला आणून द्यावा लागला. माझी तक्रार योग्य असल्याचें त्यांना पटलें आणि यानंतर विकेटमागील दोन्ही पडद्यांची उंची वाढविण्यांत आली.


कप्तानपदाचा वाद

चौरंगी सामन्यांत युरोपियनांविरुद्ध आम्हीं विशेष महत्त्वाचा व संस्मरणीय असा विजय मिळविला तो १९२३ सालीं होय. सार्‍या चौरंगी सामन्यांत हा सामना अतिशय अटीतटीचा व अनेक दृष्टींनीं चिरस्मरणीय असाच झाला. माझ्या स्मृतिपटलावर या सामन्यानें चिरस्थायीच स्थान पटकावलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं; कारण या सामन्यांतील विजयी हिंदु संघाचें नेतृत्व माझ्याकडे होतें आणि माझ्या नेतृत्त्वाचें तें पहिलेंच वर्ष होतें. पण ह्या सामन्याच्या स्मृति त्या वेळच्या अनेक प्रेक्षकांनाही अजून आल्हाददायक वाटतात, हेंही माझ्या अनुभवाला आलें आहे. दोन तीन वर्षांपूर्वी एका नियतकालिकाच्या दिवाळी अंकांत श्री. व. शां. देसाई या प्रसिद्ध लेखकांनीं या सामन्यानें निर्माण केलेल्या कुतूहलाचें व खळबळीचें सुंदर चित्र रेखाटलेलें माझ्या वाचनांत आलें होतें. माझ्या म्हणण्याचें प्रत्यंतर या लेखनावरूनच मिळूं शकतें. पण या महत्त्वाच्या सामन्याचें वर्णन करण्यापूर्वी माझ्या नेतृत्वपदाबावत मध्यंतरींच्या एक दोन वर्षांत जो वाद उपस्थित झाला होता, त्या वादाशीं माझा संबंध असल्यामुळें त्याचा थोडासा निर्देश येथें करणें जरूर आहे.

ह्या वादाला प्रथम कारण १९२० सालीं झालें. त्या सालीं हिंदु संघाचे नियोजित कॅप्टन श्री. एम्. डी. पै हे ऐन वेळीं आजारी झाल्यामुळें त्यांच्या जागीं नवा कॅप्टन निवडण्याचा प्रश्न उपस्थित झाला. संघांतील खेळाडूंमध्यें श्री. शिवराम व मी हे सीनियर होतों. आणि क्रीडागुणाच्या दृष्टीनेंही संघांतील प्रमुख खेळाडूंतच आमचें स्थान होतें; अर्थातच संघाचें नेतृत्व आम्हां दोघांपैकीं एकाकडे यावें, अशी अपेक्षा करणें वाजवीच होतें. हिंदु जिमखान्यांतील बर्‍याच सभासदांची अपेक्षाही तशीच होती; पण निवडसमितीनें आमचा हा हक्क डावलून टाकून प्रो. देवधर यांच्याकडे नेतृत्व सोंपवावें असा निर्णय घेतला. हिंदु विरुद्ध मुसलमान असा पहिला सामना त्या वेळीं व्हावयाचा होता; पण सामन्याच्या आदल्या दिवशीं सायंकाळपर्यंत समितीनें याबाबतचा निश्चित निर्णय जाहीर केला नव्हता. आम्हांला तर असेंही कळविण्यांत आलें कीं, याबाबतचा निर्णय खेळाच्या वेळींच जाहीर

करण्यांत येईल; त्याप्रमाणें आम्ही सामन्याच्या दिवशीं सकाळीं खेळण्याच्या तयारीनें जिमखान्यावर गेलों; तेथें आम्हांला कळविण्यांत आलें कीं, समितीनें कॅप्टन म्हणून प्रो. देवधरांची नेमणूक केली आहे. हा निर्णय ऐकतांच आम्ही दोघांही बंधूंनीं निषेधार्थ सामन्यांत भाग घेण्याचें नाकारलें. आम्ही उभयतां जिमखान्यांतून तसेंच उठून बाहेर पडलों. आमचें हें वर्तन पुष्कळांना चमत्कारिक भासलें. खेळाडू वृत्तीला सोडून आम्ही वागलों, असाही आरोप आमच्यावर करण्यांत आला आणि टीकेची खूप झोडही उलट बाजूकडून आमच्यावर उठविण्यांत आली. पण त्याचप्रमाणें आम्हीं योग्य तेंच केलें, अशींही आम्हांला पाठिंबा देणारीं पत्रें आलीं. क्रॉनिकल, ॲडव्होकेट इत्यादि वृत्तपत्रांनींही आमचीच बाजू उचलून हिंदु निवडसमितीच्या अन्याय्य वर्तनाबद्दल तिचा निषेध केला. आमच्यावर होणाऱ्या टीकेला उत्तर देण्यासाठीं व आमची बाजू स्पष्ट करण्यासाठीं आम्हीं उभयतांच्या सहीनें एक पत्र वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें. समितीनें आमचा हक्क डावलला याचें मुख्य कारण आमचा कनिष्ठ सामाजिक दर्जा हेंच होतें. समितीनें याबाबत जातीचा प्रश्न उपस्थित केला होता आणि हें कारण समितीच्या निर्णयामागें असल्यामुळेंच आमच्या स्वाभिमानाखातर आम्हांस बहिष्काराचा मार्ग पत्करण्याखेरीज गत्यंतरच उरलें नव्हतें. या प्रकरणीं व्यक्तीचा प्रश्न मुळींच उपस्थित होत नव्हता. त्या विशिष्ट परिस्थितींत खेळाडूपणाच्या नेहमींच्या व्याख्याही लावणें अगदींच चुकीचें होतें. आमच्या वर्तनानें आमच्या खेळाडूपणाला कोणत्याही प्रकारें बाध येऊं शकत नव्हता, असेंच आम्हांला प्रामाणिकपणें वाटत होतें आणि अजूनही माझी तीच समजूत आहे. कै. तेरसी, कै. तेलंग वगैरे हिंदु जिमखान्यांतील थोर मंडळींनींही त्या परिस्थितींत आमच्याचबद्दल स्पष्ट सहानुभूति व्यक्त केली. एवढेंच नव्हे, पण कै. तेरसी यांच्या खटपटीनें आम्हां उभयतां बंधूंच्या हिंदु क्रिकेटविषयक सेवेचें चीज करण्यासाठीं एक लहानसा फंडही त्या वेळीं उभारण्यांत आला. आमची बाजू न्याय्य असल्याची खात्री असणारा मोठाच वर्ग हिंदु जिमखान्याच्या सभासदांत होता, हें या सक्रिय सहानुभूतीवरून असंदिग्धपणेंच व्यक्त होऊं शकलें. पण हिंदु जिमखान्याच्या निवडसमितीकडून या अन्यायाचें निराकरण

होण्यापूर्वी आणखी दोन वर्षें जावीं लागलीं. मध्यंतरींच्या या कालांत श्री. एस्. एम्. दळवी, डॉ. प्रभाकर वगैरे खेळाडूंकडे हिंदु संघाचें नेतृत्व निवडसमितीनें सोंपवून पाहिलें. अखेरीस १९२३ सालीं या बाबतींतील उरलासुरला विरोधही नाहींसा झाला व हें नेतृत्व माझ्याकडेच सोंपविण्यांत यावें, असा एकमतानेंच ठराव करण्यांत आला. आणि अशा प्रकारें १९२३ सालच्या डिसेंबर महिन्यांत चौरंगी सामन्यांतील हिंदु संघाचा कॅप्टन म्हणून बॉम्बे जिमखान्याच्या क्रीडांगणावर मी उतरलों.



## जोशीबुवांची ' भैरवी '

" काय जोशीबुवा, करायची ना भैरवी सुरू ? "—जोशीबुवांकडे गोलंदाजी साठीं चेंडू फेकतांना अनेकदां हेही उद्गार माझ्या तोंडून बाहेर पडत आणि जोशीबुवाही त्यावर हंसून होकार देऊन " बॅटस्मनची भैरवी " करण्याच्या तयारीला लागत. आमचे हे जोशीबुवा अथवा हिंदूंचे सुप्रसिद्ध निष्णात गोलंदाज श्री. एस्. एम्. जोशी यांचा परिचय आम्हाला क्रिकेटपटू याखेरीज, गायक व तबलावादनपटु म्हणूनही झाला होता. क्रीडांगणावरही मधूनच गर्रकन् एकादी तान घेतांना स्वारी दृष्टीस पडावयाची. गायनाची बैठक भैरवीनें बहुधा समाप्त करण्याचा प्रघात आहे. तोच संकेत वरील उद्गारांत अभिप्रेत असे. आणि जोशीबुवाही तो यशस्वीपणें पाळण्यांत बहुधा चुकत नसत. अवधीं चारपांच पावलें टाकून जोशीबुवा चेंडू फेकीत आणि

मंद गतीनेंच तो चेंडू बॅटस्मनच्या विकेटकडे धांव घेई. पण 'पिच' पडतांच इतक्या तीव्रतेनें उशी घेऊन तो स्टंपकडे वळे कीं पट्टीचा बॅटस्मनसुद्धां चमकून घोटाळ्यांत पडे. पुष्कळ वेळां चेंडूच्या 'पिचिंग' मध्येंही बदल करून जोशी हे बॅटस्मनचा गोंधळ उडवून देत. आफ् व लेग या दोन्हीं बाजूंनीं ते चेंडू वळवूं शकत, आणि कांहीं वेळां "लेगब्रेक"चा आविर्भाव दाखवून त्यांनीं टाकलेला चेंडू ऑफकडून चटकन् वळण घेऊन स्टंपवर येई ! या दृष्टीनें कांहींसें गुगली गोलंदाजाचेंच तंत्र ते अवलंबीत असत असें म्हणावयास हरकत नाहीं. टोलवाटोलवी करणाऱ्या बॅटस्मनला जोशीबुवा हां हां म्हणतां चकवीत असत; मात्र विकेटकीपर व लँगवरचा क्षेत्ररक्षक हे दोघेही अशा वेळीं दक्ष असावे लागत. पण कधीं कधीं 'विकेट'च्या प्रतिकूलतेमुळें जोशीबुवांनाही हात टेकण्याची पाळी येई आणि मार देणारे जोशीबुवा अशा वेळीं सपाटून मारही खात; तथापि अशा प्रसंगींही त्यांची हिम्मत केव्हांच खचत नसे. प्रतिपक्षाला थोड्या अधिक धांवा मिळत खऱ्या; पण 'विकेट' ते हटकून घेत. एकाद्या क्षेत्ररक्षकाच्या हातून झेल सुटला किंवा कांहीं चूक झाली आणि त्याचा परिणाम गोलंदाजाला भोगावा लागला, तरी ते कधीं चरफडत नसत, किंवा त्याबद्दल खेदही करीत बसत नसत. ही त्यांची वृत्ति अत्यंत प्रशंसनीय व संघशक्तीच्या दृष्टीनें फार उपकारकही होती. दुखऱ्या पायामुळें त्यांना धांवण्याचे श्रम झेपत नसत आणि यामुळें क्षेत्ररक्षणाच्या दृष्टीनें त्यांचा संघाला फारसा उपयोग होत नसे; तथापि ही उणीव ते आपल्या अप्रतिम गोलंदाजीनें सहज भरून काढीत. पूर्ववयांत एका सामन्यांत बोलिंग करतांना पाय मुरगळल्यामुळें व त्यावर योग्य उपचार करण्यांत दिरंगाई झाल्यामुळें त्यांची पायाची दूख कायमचीच राहून गेली होती. फार बोलिंग टाकल्यावर ही दुखी त्यांना जाणवूं लागे व मग विश्रांति घेणें त्यांना भागच पडे. पण असें असूनही जोशी हे संघाला मोठा आधारच वाटत. त्यांच्या गोलंदाजीच्या जोरावर अनेक संघांनीं मोठमोठे सामने जिंकले; अनेक लढायांचा वीर असें त्यांचें वर्णन करणें समर्पकच ठरेल. पण या अनेक लढायांपैकींही १९२३ सालच्या त्या चौरंगी सामन्यांत त्यांनीं जी लढाई मारली, ती खरोखरच अनुपमेयच होती !

संस्मरणीय सामना

त्या सामन्यांत आम्हीं जो संघ निवडला होता, तो सर्व बाजूंनीं परिपूर्ण असाच होता. सी. के. नायडू, प्रो. देवधर, चंदाराणा, एस्. एम्. जोशी, नवले, शिवराम व मी हे आम्ही जुने खेळाडू त्यांत होतों; रामजी व एस्. एस्. जोशी हे त्याच वर्षी घेण्यांत आलेले नवे खेळाडू होते. परदेशी आणि जय यांना या सामन्यांत प्रवेश करून दोन वर्षें झालीं होतीं. चंदाराणा, रामजी हे दोघे जलदगति गोलंदाज, एस्. एम्. जोशी हे मंदगति गोलंदाज आणि एस्. एस्. जोशी व शिवराम हे बदली गोलंदाज, ही आमची गोलंदाजीची बाजू उपेक्षणीय खास नव्हती. सी. के. नायडू, देवधर, नवले, परदेशी, एस्. एस्. जोशी, जय, शिवराम व मी इतक्याजणांकडून कांहींना कांहीं धांवांची सहज अपेक्षा करतां येण्याजोगी होती. त्या वर्षी आमचा पहिला सामना मुसलमानांविरुद्ध झाला, तो आम्हीं एक डाव व १३६ धांवांनीं सहज जिंकलों. मी व परदेशी यांनीं अनुक्रमें ६४ व ६९ धांवा या सामन्यांत केल्या व एस्. एम्. जोशी यांनीं ४३ धांवांत ६ विकेटस् घेतल्या. पण मुसलमानांचा संघ जितका दुर्बल होता, तितकाच युरोपियनांचा पारश्यांवर मात करून आमच्याशीं दोन हात करण्यास आलेला संघ बॅटिंग व बोलिंग या दोन्ही बाजूंत प्रबळ होता. कलकत्त्याहून ए. एल्. होझी हे त्यांचे भरंवशाचे प्रसिद्ध बॅटस्मन, एस्. ई. वेस्ट हे दुसरे नामवंत बॅटस्मन व आर्. एल्. डी बुडहाउस हे मंदगति बोलर त्यांनीं आणले होते; कराचीचे प्रसिद्ध विकेटकीपर बॅटस्मन सी. बी. रुबी व जलदगति गोलंदाज कॅ. पोकॉक यांचेंही साह्य त्यांना मिळालें होतें. याखेरीज मुंबईचे एफ्. जी. ट्रॅव्हर्स ( कॅप्टन ), जी. सी. फिलिप्स, जे. हिगिन्स व मॅक्डोनल्ड हे उत्कृष्ट बॅटस्मन संघांत होतेच. यांशिवाय कमांडर जिलेस्पी व कॅ. बॅटरस्बी हे लष्करांतील क्रिकेटपटु त्यांनीं बोलावले होते. १९२१ सालच्या ऱ्होडस, पार्सन्स इत्यादि खेळाडूंच्या संघाइतका हा संघ सामर्थ्यवान नव्हता हें खरें; पण चौरंगी सामन्यांतील विजेतृत्व संपादण्याचा विश्वास वाटण्याजोगें त्याचें सामर्थ्य खासच होतें आणि ही अपेक्षा या संघानें जवळ जवळ खरीही करून दाखविली. पण आम्हीही तेवढ्याच ईर्ष्येनें व

निकरानें युरोपिनाशीं झुंज केली आणि त्यांची विजयाची आशा तर साफ धुळीला मिळविलीच, पण डाव त्यांच्यावर सपशेल उलटवूनही टाकला !

ओलीसुकी जिंकण्यांत ट्रॅव्हर्स यांनीं माझ्यावर मात केली. विकेट कठीण होती आणि त्याचा फायदा युरोपियन बॅटस्मननीं उत्तम तऱ्हेनें करून घेतला. होझी व रूब्री ही त्यांची पहिली जोडी आमच्या गोलंदाजांना किती तरी वेळ मुळींच दाद देईना, अखेरीस एस्. एस्. जोशी यांना ही जोडी फोडण्यांत यश मिळालें. त्यांनीं होझी यांना त्रिफळाचीत केलें. पुन्हां ट्रॅव्हर्स-फिलिप्स या जोडीनें आमची कसोटी पाहिली. ट्रॅव्हर्स यांनीं १०७ धांवा केल्या आणि फिलिप्स यांनीं ९३ ची भर घातली. होझी व रूब्री यांनीं अनुक्रमें ७५ व ८४ धांवा केल्या व या सर्वांनीं मिळून ४८१ धांवांचा प्रचंड आंकडा फलकावर लावून ठेवला. एवढा प्रचंड स्कोअर चौरंगी सामन्यांत तत्पूर्वी एकदांच झाला होता व तो १९२१ सालीं ऱ्होड्स्, पार्सन्स, हर्स्ट यांच्या साह्याच्या जोरावर पारश्यांविरुद्ध युरोपियनांनीं केला होता. प्रतिपक्ष्याच्या धांवांचा हा पांचशेंपर्यंत गेलेला आंकडा आम्हांला कितपत गाठतां येऊं शकेल याबद्दलच्या शंका-कुशंका आमच्याच गोटांत सुरू झाल्या. युरोपियनांना तर खात्रीच वाटूं लागली होती कीं आपल्या यशाचा पाया अगदीं पक्काच रोंवला गेला आहे. त्यांचा डाव आटोपतांच मीं ' विकेट'ची पाहणी केली; ती त्यावेळींही पक्की होती. दोन दिवसांच्या खेळानंतरही फारसे ओरखडे त्यावर निघाले नव्हते. विकेट पाहून मला विश्वास वाटूं लागला कीं, युरोपियनांइतकीच मर्यादा जरी आपण गाठूं शकलों नाहीं, तरी अशा विकेटवर चार-साडेचारशें धांवा आमच्या बॅटस्मनच्या खास आवाक्याबाहेरच्या नाहींत; फक्त तेवढा विश्वास आणि हिंम्मत मात्र हवी ! क्रिकेटच्या खेळांत खेळाडूंच्या मनःस्थितीवरही यशापयशाचा बराचसा भाग अवलंबून असतो. धीर जितका खचूं द्यावा, तितकेंच यश दूर पळत असतें. याउलट आणीबाणीच्या वेळीं मनाचा तोल कायम ठेवून आत्मविश्वासानें व हिम्मतीनें खेळणारा खेळाडू पराङ्मुख होत असलेल्या विजयश्रीलाही मागें सहजीं खेंचून आणूं शकतो. १९२३ सालच्या त्या सामन्यानें कोणता एक मोठा धडा दिला असेल तर तो हाच ! कशाही परिस्थितींत खंबीर वृत्ति कायम राखावयाची. अशा तऱ्हेच्या

प्रसंगीं गांवांतील गप्पाटप्पांचाही खेळाडूंच्या उमेदीवर परिणाम होण्याचा संभव असतो. आणि हेंच लक्षांत घेऊन, युरोपियनांचा डाव संपल्यावर सायंकाळीं जेव्हां आमचे खेळाडू घरीं जाण्याकरितां बाहेर पडले, त्या वेळीं मीं सर्वांना हेंच सांगितलें कीं, जिमखान्याकडे जाण्याच्या भानगडींत न पडतां सरळ घरीं जा, स्वस्थ मनानें विश्रांति घ्या आणि उद्यां ताजेतवाने होऊन पुन्हां सरळ इथेंच या !

## अभिमान खोटा ठरविला !

आमचा डाव सुरू झाला, तेव्हां आमच्यापुढील पहिला मुख्य प्रश्न युरोपियनांचे फास्ट बोलर पोकॉक यांना दमवून टाकणें हाच होता. वीस पावलें नागमोडीं वळणें घेऊन झपाट्यानें विकेटपाशीं पळत येत चेंडू त्याच जोरासरशीं फेंकावयाचा अशी पोकॉक यांची गोलंदाजीची पद्धत होती. चेंडूला योग्य क्षणीं बॅट भिडवितां न आल्यास स्लिपमध्यें झेल उडण्याचा फार संभव असे. कांहीं बॉल स्पर्श न करतां सोडून देण्यांतच बॅटस्मनचें हित असे ! आमची पहिली जोडी नवले व परदेशी यांनीं खेळास सुरुवात तर पूर्ण आत्मविश्वासानेंच केली. पहिल्या अर्ध्या तासांतच २० धांवांचा आंकडा फलकावर झळकला. पण ३४ धांवा झाल्या, त्या वेळीं नवले व परदेशी यांच्यामध्यें दुर्दैवानें धांव घेण्याबाबत गैरसमजूत होऊन नवले रन-आउट झाले. नवले यांनीं चेंडू कव्हरवर टोलावला व ते चोरटी धांव घेण्यास धांवले. परदेशीही त्यांच्या हांकेसरशीं धांवले. पण अखेरच्या क्षणीं परदेशी यांनीं घोटाळून मागें फिरून आपली ' क्रीझ ' गांठली. कव्हरवर क्षेत्ररक्षण करणारे होझी यांनीं चपळाईनें चेंडू उचलून विकेटकीपरपाशीं फेंकला व नवले कांहीं यार्डांनीं आउट झाले. नवले पॅव्हलियनकडे परत फिरले, त्या वेळीं परदेशी यांनीं आपल्या चुकीबद्दल त्यांच्याकडे क्षमायाचना केली. परदेशी यांच्या चुकी-विरुद्ध हिंदु प्रेक्षकांतूनही ओरडा झाला आणि त्याचा परिणाम परदेशी यांच्या खेळावर होऊन, मी तिसऱ्या अनुक्रमास खेळावयास आल्यानंतर ९९ वर धांवांचा आंकडा आला,त्या वेळीं पोकॉक यांच्या गोलंदाजीवर ते हीबाद झाले !


पण त्यानंतर माझी व नायडू यांची जोडी जमली आणि आम्ही धिम्मे-पणानें व विश्वासानें खेळून युरोपियन गोलंदाजांना निष्प्रभ करण्याचा आमचा

हेतु साधला. यानंतर मग एकदां चेंडूवर दृष्टि बसल्यावर गोलंदाजीचा धुव्वा उडविणें आम्हांला फारसें कठीण नव्हतें. नायडू जोडीला असले कीं आम्हां उभयतांच्याही धांवा अगदीं भराभर होत. आमच्या जोडीनें १३८ धांवांची भर टाकल्यावर नायडू बाद झाले आणि देवधर खेळावयास आले. त्यांनींही आपलें हत्यार प्रभावीपणानें चालू केलें. मला आठवतें कीं, पोकॉक यांनीं ५६ ओव्हर्स या डावांत टाकल्या. त्या विकेटवर त्यांचीच गोलंदाजी परिणामकारक ठरण्यासारखी होती. आणि त्यांनीं त्या डावांत ५ विकेट्स् घेतल्याही ! पण त्यांना त्यासाठीं १३६ धांवांचें मोल द्यावें लागलें ! माझें शतक लागतांच त्यांनीं माझें अभिनंदन केलें आणि नंतर एकदां बोलतां बोलतां माझ्यापाशीं असेंही उद्गार काढले कीं 'इतक्या अचूकतेनें माझ्या गोलंदाजीवर येथील बॅटस्मन खेळूं शकतील असें मला वाटलें नव्हतें; पण तुम्हीं मात्र हा माझा अभिमान खोटा ठरविला.' मीं या सामन्यांत १०१ धांवा केल्या; चौरंगी सामन्यांतील हें माझें दुसरें शतक होय. नायडू यांनीं ७६ व देवधर यांनीं ७८ धांवा केल्या. त्याशिवाय एस्. एस्. जोशी यांनींही २० धांवांची भर टाकली. आमचा स्कोअर युरोपियन स्कोअरइतकाच जवळ जवळ झाला; फक्त सहाच धांवा त्यांची बरोबरी करण्यास कमी पडल्या. पण आमची कामगिरी आम्ही चोखपणेंच बजावली, हें समाधान कांहीं कमी नव्हतें.

## 'भैरवी'ची करामत

हा पहिलाच डाव पुरा होण्यास तीन दिवसांचा अवधि लागला होता. आणखी एका दिवसांतच खेळ आटोपावयाचा होता. या एका दिवसांतच युरोपियनांचा डाव संपवून, सामना जिंकण्याकरितां किंवा अनिर्णीत ठेवण्या-करितां आम्हांला कांहीं धांवा करणें प्राप्त होतें. ही गोष्ट त्या डावाच्या सुरुवा-तीला तर अशक्यच वाटत होती. युरोपियनांचे कॅप्टन ट्रॅव्हर्स हे तर माझ्या-पाशीं असेंही बोलून गेले कीं "आतां सामना पुढें चालविण्यांत तरी काय अर्थ आहे ? त्यांत कांहीं आतां स्वारस्यच राहिलेलें नाहीं !" मीं उत्तर केलें, "तें खरें; पण सामना पाहण्यासाठीं एवढे प्रेक्षक पैसे भरून आलेले आहेत

## १९२३ सालचा विजयी हिंदु संघ



डावीकडून ( उभे ) आर्. व्ही. पालेकर (स्कोअरर), के. जी. परदेशी, एस्. एस्. जोशी, एल. रामजी, एल्. पी. जय, एम्. एच्. चंदाराणा, के. ए. दाते (अंपायर). (खुर्च्यांवर बसलेले) एस्. एम्. जोशी, प्रो. डी. बी. देवधर, पी. विठ्ठल. (कॅ.), सी. के. नायडू, पी. शिवराम ( जमिनीवर बसलेले ) बी. डी. जोग ( राखीव ), जे. जी. नवले

त्यांच्यासाठीं तरी अखेरपर्यंत खेळणें प्राप्तच आहे ! ”–विकेट तीन दिवसांच्या खेळानें खराब झाली होती याची ट्र्व्हर्स यांनाही जाणीव होती. तसे त्यांनीं आपल्या खेळाडूंकडेही उद्गार काढले होते, पण त्यांची तसेंच बहुतेक प्रेक्षकांची व आमच्या हितचिंतकांचीही अपेक्षा होती, कीं फार फार तर आम्हीं सामना अनिर्णीत ठेवण्याचें श्रेय घेऊं; त्यापलीकडे अधिक साधणें अशक्यच होय. पहिल्या डावांत ज्या संघानें ४८१ धांवा केल्या, तो दुसऱ्या डावांत २५०–३०० धांवा सहज करूं शकेल, हीच सर्वांना खात्री वाटत होती आणि या दृढ अपेक्षेमुळें या सामन्याच्या यशापयशाबाबत ज्या पैजा लागल्या होत्या, त्या युरोपियनांना अनुकूल अशाच होत्या.

पण हा सारा विचार करतांना जोशीबुवांच्या ‘ भैरवी ’ चें स्मरण कुणाला राहिलें नव्हतें. जोशीबुवांनीं आपल्या भात्यांतले एक दोन विशिष्ट बाण बाहेर काढल्यास त्या विकेटवर ते प्रभावी ठरण्याची आशा वाटत होती; त्यामुळें त्यांचा स्वतःचा आत्मविश्वासही वाढला होता. चंदाराणा व रामजी हे आमचे दोघेही जलदगति गोलंदाज आपल्या कौशल्याची पराकाष्ठा करण्याच्याच ईर्ष्येनें बाहेर पडले होते. आणि त्यांनीं आपल्या परीनें आपली कामगिरी बजावलीही. पहिल्या डावांतील यशस्वी बॅट्स्मन रूबी यांना एकही धांव करूं न देतां चंदाराणा यांनीं त्यांचा त्रिफळा उडवून तंबूंत परत पाठविलें आणि बॅटरस्बी हे टिकणार असें लक्षण दिसूं लागतांच रामजी यांच्या ‘ बम्पर ’ नें त्यांचाही बळी घेतला. जय यांनीं ‘ लेग ’ ला बॅटरस्बी यांचा एका हातानें झेल घेतला तो प्रेक्षणीयच होता. पण खरी करामत जोशी यांनींच केली. होझी, फिलिप्स, वुडहाउस हे तिघेही त्यांच्या “ लेग स्पिनर्स ” पुढें फशी पडले. हिगिन्स यांना त्यांनीं अचूक ‘ क्रीझ ’ बाहेर ओढलें आणि नवले यांनीं चपळाईनें आपली कामगिरी पार पाडली. ट्र्व्हर्स व वेस्ट यांनीं थोडा वेळ टिकाव काढण्याचा प्रयत्न केला; पण जोशी यांनीं त्यांनाही बेमालुमपणें जाळ्यांत ओढलें. जोशी यांनीं एकंदर ७ बळी घेतले. आणि तेही अवघ्या ३९ धांवांत ! युरोपियनांचा दुसरा डाव १५३ धांवांत पुरा झाला आणि खेळाचा सारा रंग एकदम पालटून गेला ! प्रेक्षकांच्या उत्साहाला पराकाष्ठेची भरती आली व खेळाला अपूर्व रंग चढला !


खेळ संपावयाला अवघा अडीच तासांचा अवधि राहिला होता. तेवढ्या वेळांत सामना जिंकण्यासाठीं १६१ धांवा आम्हांला करायच्या होत्या. हें साधणें शक्य आहे का, असा विचार माझ्या मनांत आला; पण लगेच, संघांतील बॅट्स्मनची रांक डोळ्यांपुढें उभी राहतांच, यांत काय अशक्य आहे अशीही दुसऱ्या विचारानें उसळी घेतली. हा उद्देश साधावयाचा तर अर्थात्च जलद धांवा करणें अवश्यच होतें आणि यामुळेंच परदेशी यांच्या जोडीला नवल्यांऐवजीं नायडू यांनाच पहिल्या जोडींत खेळण्याची मीं विनंती केली. त्यांनींही ही जबाबदारी मोठ्या आनंदानेंच पत्करली आणि इतक्या यशस्वीपणें आणि तडफदार रीतीनें त्यांनीं ती पार पाडली, कीं जमलेला सारा प्रचंड प्रेक्षकसमुदाय त्या क्रीडानंदानें बेहोषच होऊन गेला. पन्नास धांवांत पहिली विकेट पडेल अशी ट्रॅव्हर्स यांची अपेक्षा होती; पण पन्नासनंतर शंभराचा आंकडा फलकावर झळकला, तरी विकेट पडण्याचें चिन्ह दिसेना आणि दोघेही बॅट्स्मन धिटाईनें बोलिंग सारखी चोपून काढीत होते. परदेशी यांनीं अपेक्षेबाहेरच कामगिरी बजावली आणि नायडूंच्या टोलेबाजीनें तर त्या दिवशीं परिसीमाच गांठली! वॅाडबी रोडवर त्यांनीं मारलेली सिक्सर जबरदस्तच होती. दुसरा षट्काराचा त्यांचा फटका पॅव्हिलियनवर जाऊन पडला. नायडू ७६ धांवा करून बाद झाले, त्या वेळीं आमच्या १३६ धांवा झाल्या होत्या. सामना जिंकण्यास आणखी २५ धांवांची जरूरी होती आणि अर्धा पाउण तासाचा अवधि अजूनही उरला होता. नायडूंची जागा मीं घेतली आणि यानंतर पंधरा–वीस मिनिटांतच १६० धांवांची मर्यादा आम्ही गांठली. परदेशी यांच्या व्यक्तिशः ७१ धांवा झाल्या होत्या. सामना जिंकण्यास आणखी एकाच धांवेची जरूरी होती. चौकाराचा एक फटका मारून मीं आंकडा पुरा केला आणि आम्ही विजयी झालों!

### तो क्षण

तो त्या वेळचा क्षण मीं कदापि विसरणें शक्य नाहीं. प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी तंबूंतून भराभर उड्या घेत विकेटपाशीं धांवल्या, त्यांच्या-पैकीं कांहीं जवानांनीं आम्हा दोघांही बॅट्स्मनना, आपल्या हातांची

खुर्ची करून त्यावर बसविलें आणि आनंदाच्या आरोळ्या ठोकीत पॅव्हिलियन-पर्यंत आम्हाला मिरवीत नेलें. तंबूंत पोहचतांच जो तो माझ्याशीं हस्तांदोलन करण्यास व माझें अभिनंदन करण्यास धांव घेऊं लागला; पाठीवर पडलेल्या थापांनीं पाठ दुखून येऊं लागली. " ओ विठ्ठल, वेल् प्लेड, विठ्ठल, कॉंग्रेच्युलेशन्स विठ्ठल " असे उद्गार काढीत कांहीं युरोपियन महिलांनींही भोंवतीं गराडा घातला. त्यांचा आनंद अगदीं मनापासून होता असें आढळून आलें, आणि याचें कारण म्हणजे ( हें मला नंतर समजलें, ) सामन्यांतील यशापयशाबद्दलची पैज जिंकून आपल्या पुरुष वर्गावर त्या बाबतींत त्यांनीं विजय मिळविला होता !

या अपूर्व विजयाबद्दल आमचा जाहीर सन्मान ठिकठिकाणीं करण्यांत आला व आम्हांला मानचिन्हेंही अर्पण करण्यांत आलीं. येथील फ्रेंड्स् युनियन क्लबानें प्रत्येक खेळाडूला सोन्याचें घड्याळ नजर केलें. बार जिमखान्यानें आमचा सत्कार करून प्रमुख खेळाडूंना रौप्यचषक अर्पण केले. सुप्रसिद्ध ललितकलादर्श नाटक मंडळीनें आमच्या सत्कारार्थ ' सत्तेचे गुलाम ' नाटकाचा खास प्रयोग करून त्या प्रसंगीं आम्हांला बॅट्स् अर्पण केल्या. हिंदु जिमखान्याचे एक तहाहयात सभासद श्री. गोपालदास नथुभाई यांनीं, सामन्याच्या दिवशीं सायंकाळीं आम्ही जिमखान्यांत गेलों, त्या वेळीं तेथल्या तेथेंच नायडू, जोशी, चंदाराणा, देवधर, परदेशी व मीं यांना प्रत्येकीं रु.५० रोख पारितोषिकादाखल दिले. हिंदु जिमखान्यानें मेजवानीचा मोठा समारंभ घडवून आणला आणि एक खास फंड उभारून आम्हांला १२०० ते २०० पर्यंतच्या रकमांचीं रोख पारितोषिकें दिलीं. मला या पारितोषिकांत १००० रु.चें. पारितोषिक मिळालें आणि जोशी यांना १२०० रु. चें मिळालें. क्रिकेटच्या सामन्यांतील कामगिरीबद्दल मला मिळालेलें हें पहिलें व शेवटचेंच रोख पारितोषिक होय. यशस्वी खेळाडूला हजारों रुपयांचीं पारितोषिकें मिळूं शकणाऱ्या आजच्या या काळांत एका हजाराच्या पारितोषिकाचा हा आंकडा छोटासाच भासेल; पण तो त्यावेळचा आमचा गौरव आम्हांला त्यापेक्षांही किती मोलाचा व अभिमानास्पद वाटला, याचें वर्णन करतां येणें अशक्यच आहे.



## "फॉलो ऑन !—"

१९२३ सालच्या चौरंगी सामन्यांतील त्या संस्मरणीय विजयानंतर पुढच्याच वर्षी हिंदु संघाला या सामन्यांत जो फटका बसला, तो तितक्याच दृढपणें लक्षांत राहण्यासारखा होता. हा फटका अनपेक्षितपणें व अनपेक्षित बाजूकडून मिळाला होता, व जी आमची बाजू प्रबळ असल्याचा लौकिक आम्हीं संपादन केला होता, व त्या सामन्याच्या पहिल्या फेरींत ज्याबद्दलची उत्कृष्ट प्रतीतिही आम्हीं आणून दिली होती, तीच बॅटिंगची बाजू ऐन वेळीं ढांसळून पडल्यामुळें आम्हांला हा फटका खावा लागला, हें त्याचें एक मोठेंच वैशिष्ट्य होतें. चौरंगी सामन्यांचें हें वर्ष—१९२४ साल इतरही कांहीं दृष्टींनीं उल्लेखनीय ठरलें आहे. पारश्यांखेरीज बाकी तीन्ही संघांतील प्रमुख बॅट्समननीं या सालीं धांवांचीं शतकें केलीं. ए. एल्. होझी यांनीं

आमच्या विरुद्ध पहिल्या फेरींत द्विशतक करून या सामन्यांतील व्यक्तिशः धांवांचा विक्रम प्रस्थापित केला. वजीरअली यांनींही निर्णायक फेरींत आमच्याविरुद्ध १९७ धांवा केल्या आणि नायडू यांनीं युरोपियनांविरुद्ध १३५ व जय यांनीं मुसलमानांविरुद्ध १५६ धांवा केल्या. युरोपियनांविरुद्ध झालेल्या आमच्या ह्या पहिल्या फेरींतील सामन्यांत आम्ही पुन्हां जवळ जवळ साडे-चारशें धांवांची मर्यादा गांठली आणि हिंदु बॅटिंगच्या प्रभावाची खूण पुन्हां एकदां पटविली. १९२३ सालच्या संघापैकीं तीन खेळाडू आमच्या संघांतून या वेळीं गळले होते. परदेशी, एस्. एम्. जोशी, व चंदाराणा यांच्या जागा एस्. एस्. डोंगरे, ओघडशंकर व एस्. आर्. गोडांबे यांनीं घेतल्या होत्या. एस्. एम्. जोशी यांना त्यांच्या गुडघ्याच्या व्याधीमुळें खेळतां आलें नाहीं आणि त्यांच्याऐवजीं ओघडशंकर या जुन्या प्रसिद्ध काठेवाडी क्रिकेटपटूंना खास पाचारण करून या सालच्या संघांत स्थान देण्यांत आलें. ओघडशंकर हे जुन्या काळीं मंदगति डावखोरे गोलंदाज व सलामीचे चिवट बॅटस्मन म्हणून फार प्रसिद्ध होते. पण ह्या लौकिकाला साजेशी कांहींच कामगिरी प्रस्तुत सामन्यांत त्यांच्या हातून होऊं शकली नाहीं. याचा परिणाम त्यांच्या गोलंदाजीवर तसाच बॅटिंगवरही झालेला दिसला. चंदाराणा व एस्. एम्. जोशी यांच्या अनुपस्थितीमुळें आमची गोलंदाजीची बाजू कमकुवतच झाली. रामजी व गोडांबे या उभयतांवरच आम्हांला बहुतांशीं अवलंबून राहणें भाग झालें आणि ही दुर्बलता दोन्ही सामन्यांच्या वेळीं आम्हांला जाणवल्यावांचून राहिली नाहीं. बॅटिंगची बाजू अनपेक्षितपणें ढांसळल्यामुळें मुख्यतः आम्हांला हार खावी लागली हें खरें असलें, तरी गोलंदाजीच्या कमकुवतपणामुळें विरुद्ध बाजूला आपला धांवांचा आंकडा विशेष वाढवितां आला हेंही कांहीं खोटें नाहीं. पण या सर्वांपेक्षांही, के. जी. परदेशी यांच्यासारख्या अष्टपैलु ( ऑलराउंडर ) खेळाडूला ह्या संघांतून वगळण्यांत आलें, ही तर माझ्या मतें निवडसमितीची सर्वांत मोठी चूक झाली. परदेशी यांनीं आदल्याच वर्षींच्या सामन्यांत सलामीचे बॅटस्मन म्हणून कौतुकास्पद कामगिरी बजावली होती. बदली गोलंदाज म्हणूनही त्यांचा उपयोग होत असे. शिवाय हिंदूंचे एक अत्यंत चपळ व दक्ष क्षेत्ररक्षक म्हणून त्यांनीं मान्यता मिळविली होती. केवळ क्षेत्ररक्षक म्हणूनही त्यांना संघांत स्थान मिळूं शकलें असतें,

तरीही त्याचा थोडाथोडका फायदा झाला नसता. परदेशी यांची अनुपस्थिति या बाबतींत तर त्या वर्षीच्या दोन्ही सामन्यांत अत्यंत तीव्रतेनें जाणवल्यावांचून राहिली नाहीं.

सलामीची जोडी

श्री. परदेशी यांना वगळण्यांत आल्यामुळें नवले यांच्या जोडीला डावाला सुरुवात करण्यासाठीं त्या वर्षीं ओघडशंकर यांना पाठवावें लागलें. पण नवले–परदेशी ही जोडी जशी यशस्वी ठरे, तशी ही नवी जोडी यशस्वी ठरूं शकली नाहीं. आरंभींच्या जोडीवर डावांतील यशापयशाबाबतच्या बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. लढाईच्याच भाषेंत बोलायचें म्हणजे शत्रूची फळी फोडण्याचें काम या त्रिनीच्या वीरांकडे सोंपविलेलें असतें. गोलंदाजांना दमवून टाकणें व त्यायोगें मागाहून येणाऱ्या बॅट्स्मनचें काम कांहींसें हलकें करणे, ह्या गोष्टींची अपेक्षा सुरुवातीच्या बॅटस्मनकडून करण्यांत येत असते. नवले हे या दृष्टीनें हिंदु संघाला लाभलेले एक अत्युत्कृष्ट बॅट्स्मन होते. त्यांच्या जोडीला पूर्वीं व्ही. व्ही. कंटक हे चमकदार बॅट्स्मन खेळत असत. १९२० सालीं कंटक–नवले या जोडीनें १२८ धांवा केल्या होत्या. कंटक हे हिंदूंचे एक अत्यंत भरंवशाचे व तडफदार बॅट्स्मन होते. ते जगते वांचते, तर अखिल भारतांतील एक अग्रगण्य बॅट्स्मन म्हणून सहज चमकूं शकले असते. पण दुर्दैवानें १९२१ सालीं तरुणपणींच त्यांचें निधन झालें आणि हिंदु संघ एका श्रेष्ठ प्रतीच्या बॅट्स्मनला मुकला. पण कंटक यांच्याही क्रिकेटनैपुण्यांत एक मोठीच उणीव होती; ती म्हणजे त्यांचें ढिलाईचें क्षेत्ररक्षण! या उलट नवल्यांचे नवे जोडीदार परदेशी हे वर उल्लेखिल्याप्रमाणें क्रिकेटच्या या अंगांत फार वाकबगार होते. हिंदूंची सलामीची जोडी म्हणून नवले–कंटक ही जोडी गाजली; तशीच नवले–परदेशी हीही जोडी नंतरच्या वर्षांत गाजली. प्रस्तुतच्या सामन्यांत मात्र निवडसमितीच्या अदूरदर्शीपणामुळें ही जोडी जमूं शकली नाहीं. या सामन्यांत नवले यांच्याबरोबर खेळण्यासाठीं सुरुवातीला पाठविलेले बॅट्स्मन लवकरच आउट झाले. आणि मग नवले व मी यांची जोडी या वेळीं जमून आली. आमच्या या जोडीनें १२५ धांवा केल्या. आमच्याप्रमाणें युरोपियनांच्या संघांतही या वर्षीं कांहीं

फेरफार झाले होते. पूर्ववर्षांतले गोलंदाज पोकॉक यांची जागा लॉइड् या नव्या जलदगति गोलंदाजांनीं घेतली होती आणी ग्लावस्टर काउंटीचे त्याच सुमारास हिंदुस्थानांत आलेले बॅट्स्मन लेफ्टनंट एफ्. रॉजर्स यांचेंही साह्य युरोपियनांना मिळालें होतें. लॉयड्ची अवस्था कांहींशी पोकॉक-सारखीच झाली. त्यांना १०० धांवांत ६ विकेटस् मिळाल्या. आमच्या बॅट्स्मननीं त्यांची फारशी मुर्वत राखली नाहीं. नवले यांनीं ६१ धांवा केल्या आणि माझें शतक पुरें व्हावयाला सहाच धांवांची जरूरी असतांना मीं बाद झालों. नवल्यांच्या व माझ्या जोडीनंतर नायडू व देवधर यांची जोडी जमली; या जोडीनें अत्यंत सफाईदार व आकर्षक रीतीनें खेळून पांचव्या विकेटकरितां १९७ धांवांचा नवा विक्रम प्रस्थापित केला. नायडू यांनीं १३५ व देवधर यांनीं ७९ धांवा केल्या. नायडूंचें हें चौरंगी सामन्यांतील दुसरें शतक होय. पहिल्याच दिवशीं आमच्या ४०३ धांवा झाल्या, यावरून आमचा खेळ किती जल्द झाला हें सहज लक्षांत येईल. या डावांत आमच्या एकंदर ४३८ धांवा झाल्या आणि सामना जिंकण्याची भक्कम आशा आम्हांला वाटूं लागली.

होझी यांचें द्विशतक

युरोपियन संघापैकीं सुरुवातीचे खेळाडू धिटाईनें खेळले नाहींत; रामजी यांनीं त्यांच्या मनांत चांगलीच भीति निर्माण केल्याचें दिसलें. त्यांचे सहा खेळाडू बाद झाले त्या वेळीं १४६ धांवा झाल्या होत्या. त्यानंतर मात्र होझी आणि रॉजर्स यांची सुंदर जोडी जमली आणि होझी यांनीं चौफेर फटके लगावून धांवांची संख्या भराभर वाढविण्यास सुरुवात केली. होझी हे मूळचे हॅम्पशायर काउंटीसंघाचे बॅट्स्मन होते; कलकत्त्यास ते व्यवसायानिमित्त स्थायिक झाले होते. हिंदुस्थानांतील युरोपियन बॅट्स्मनमध्यें त्यांच्या तोलाचा बॅट्स्मन त्या काळांत तरी दुसरा कोणीच नव्हता. होझी आणि रॉजर्स या जोडीनें १७६ धांवा केल्या आणि एकंदर ३७८ धांवा झाल्यानंतर होझी हे सर्वांच्या शेवटीं, स्लिपमध्यें नायडू यांजकडे झेल उडून बाद झाले. त्यांच्या खेरीज लायन्स यांनींही टोलेबाजी करण्यास सुरुवात करून आमच्यापुढें लहा-

नसा पेंचप्रसंग निर्माण केला होता. कारण लायन्स हे दणकेबाज ब्रॅट्स्मन होते; आडव्या बॅटीनें जबरदस्त टोले ते हाणीत. थोडा वेळही ते टिकूं शकले असते, तरी धांवांची संख्या भराभर वाढली असती. ओघडशंकर यांच्या बोलिंगवर लॅागवर त्यांचा एकदां झेल उडाला; पण तो जोराचा असल्यामुळें तेथील क्षेत्ररक्षकानें बावरून जाऊन तो सोडून दिला. अखेरीस आडव्या बॅटीनें खेळण्याची त्यांची पद्धति लक्षांत घेतां स्लिपमध्यें झेल उडून त्यांना बाद करतां येईल, असा विचार करून ओघडशंकर यांना या तऱ्हेनें चेंडू फेकण्याची मीं सूचना दिली. स्लिपमधील क्षेत्ररक्षक देवधर, नायडू यांनाही याबाबत इषारा देऊन ठेवला; लायन्स यांनीं एकदोन फटके आणखी मारले; पण नंतरच्या चेंडूला आमची मात्रा अचूक लागू पडली आणि स्लिपमध्यें झेल देऊन ते आउट झाले. होझी यांनीं २०० व रॅाजर्स यांनीं ९४ धांवा केल्या होत्या. पण आमचा पहिल्या डावाचा स्कोअर त्यांना गांठतां न आल्यामुळें व दुसरा डाव अपुराच राहिल्यामुळें प्रथम डावाच्याच् निकालावर निर्णायक सामन्यांत उतरण्याचा हक्क आम्हांला प्राप्त झाला. याप्रमाणें या वर्षीही सुरुवातीला आम्ही उत्तम यश संपादन केलें होतें.

पण क्रिकेटच्या सनातन अनिश्चिततेनें निर्णायक सामन्यांत आम्हांला चांगलाच हात दाखविला ! तथापि याबरोबरच हेंही कबूल करणें अवश्य आहे कीं या वर्षीचा मुसलमानांचा संघ नेहमींपेक्षां पुष्कळच प्रबळ व सर्वांगपरिपूर्ण असाच होता. आणि आमची बोलिंगची बाजू जितकी कमकुवत, तितकीच त्यांची हीच बाजू बळकट होती. अलिगडचे प्रो. वझिरअहमद, सियालकोटचे अब्दुस सलाम, व रांदेरचे ए. यु. बोटावाला ही प्रभावी गोलंदाजत्रयी त्यांच्या संघांत होती. त्याखेरीज नाझीरअली हे जालंदरचे नवे ताज्या दमाचे जलद गोलंदाज त्यांना मिळाले होते. स्थानिक सामन्यांत नांवाजलेले एक गोलंदाज गुलाम रसूल हेही त्या संघांत होते. वझीरअली, फेरोझखान, हसनशहा, एम्. ई. शेख, नाझीरअली हे त्यांच्या बाजूकडील प्रमुख ब्रॅट्स्मन होते. वझीरअली यांनीं याच सामन्यांत १९७ धांवा केल्या आणि आपल्या भावी यशाची मुहूर्तमेढच रोवली. गोलंदाजीची दुर्बलता या वेळींही आम्हांला जाणवली. नायडू यांनीं त्यांना अखेरीस एल्. बी. डब्ल्यु. नियमानुसार बाद केलें. मुसलमानांच्या एकंदर ३६८ धांवा झाल्या.

हा आंकडा तसें पाहिलें तर आमच्या बॅट्समनच्या शक्तीबाहेरचा नव्हता. पण बोटावाला यांच्या 'स्वर्व्ह' गोलंदाजीनें या वेळीं पुरीच मात केली आणि प्रथमच्या सामन्यांत ४०० ची मर्यादा गांठलेले सारे हिंदु बॅट्समन अवघ्या १२० धांवांतच कच खाऊन तंबूकडे परतले !

बोटावाला हे यापूर्वीं चौरंगी सामन्यांत एकदां उतरले होते. पण या वर्षीं गोलंदाजीच्या बाबतींत त्यांनीं विशेषच तयारी केली होती. विलायतेहून या सामन्याकरितां त्यांनीं खास उत्कृष्ट प्रतीचे चेंडू मागविले होते आणि ते चेंडू आकार व वजन या बाबतींत नियमांच्या कसोटीला उतरण्यासारखे असल्यामुळें ते वापरण्याची परवानगी मिळण्यास त्यांना अर्थातच अडचण पडली नाहीं. बोटावाला हे डावखोरे मंदगति गोलंदाज असल्यामुळें ऑफकडून चेंडू फिरता सोडणें (स्वर्व्ह) त्यांना फारसें कठीण पडत नसे. चेंडू विशिष्ट तऱ्हेनें बोटांत पकडून उलट दिशेनें वाहणाऱ्या वाऱ्याच्या प्रतिकारानें त्याला सहजीं वळण मिळूं शकेल, अशा रीतीनें तो फेकणें या करामतीला 'स्वर्व्ह' अशी संज्ञा दिली जाते. १९२१ सालीं चौरंगी सामन्यांत खेळलेल्या जॉर्ज हर्स्ट या इंग्लंडच्या टेस्ट गोलंदाजानें या विशिष्ट पद्धतींत अप्रतिम कौशल्य संपादन केलें होतें. इंचाइंचानें चेंडूच्या वळणांत तो फरक करूं शकत असे. साधारणतः चेंडूवरील तकाकी कायम असेपर्यंतच ही करामत करणें शक्य होत असतें; पण हर्स्ट याला ही करामत साधण्यासाठीं नव्या चेंडूचीही तितकीशी गरज भासत नसे ! हर्स्ट यानें १९२१ सालच्या त्या सामन्यांत हिंदूंचे ४३ धांवांत सहा खेळाडू या पद्धतीनें बाद केले होते. बोटावाला यांनींही प्रस्तुत सामन्यांत जवळ जवळ याचीच पुनरावृत्ति केली. ४८ धांवांत त्यांनीं नवले, डोंगरे, नायडू, देवधर, एस्. एस्. जोशी, व शिवराम यांचे बळी घेतले. राहिलेल्या तीन विकेट्स्–(जय, ओघडशंकर व मी)––वझिर अहंमद यांनीं घेतल्या व एक नाझीरअली यांनीं घेतली. नायडू (५२), मी (२२) व शिवराम (२८) हेच काय ते या डावांत थोडेबहुत खेळूं शकलों. मुसलमानांच्या धांवांचा आंकडा २४८ धांवांनीं आमच्यापेक्षां अधिक असल्यामुळें आमच्यावर साहजिकच "फॉलो ऑन"चा नामुष्कीचा प्रसंग ओढवला !

दुसऱ्या डावांत बॅटिंगच्या अनुक्रमांत मीं किंचित् बदल केला. आणि शिवराम–नवले ही जोडी सुरुवातीला पाठवून तिसऱ्या अनुक्रमाला डोंगरे यांच्याऐवजीं जय यांना पाठविलें. पहिली जोडी, बोटावाला व वझिर अहमद यांच्या माऱ्यापुढें चीत होऊन परतली; पण जय यांनीं एक बाजू उत्कृष्ट रीतीनें संभाळून धरली. नायडू व मी हे दोघेही नाझीरअल्ली यांच्या जलद चेंडूवर झेल उडून बाद झालों; पण यानंतर देवधर यांनीं प्रसंगोचित खेळ खेळून हिंदूंची आशा पुनरपि जागृत केली. दुसऱ्या दिवशीं बोटावाला हे आजारी झाल्यामुळें खेळूं शकले नाहींत; पण वझिर अहमद, नाझीरअल्ली इत्यादि मुसलमान गोलंदाजही कांहीं कमी प्रभावी नव्हते. जय व देवधर या जोडीनें त्यांच्या डावपेंचांना दाद न देतां या दिवशीं जो तडफदार खेळ केला, तो अनेक दिवस स्मरणांत राहण्यासारखा होता. विशेषतः बाजू ढांसळत असतां धीरानें, चिकाटीनें त्यांनीं ही झुंज केली, यामुळें त्यांच्या या खेळाचें महत्त्व विशेषच होतें. या जोडीनें १९१ धांवा केल्या. जय यांनीं चौरंगी सामन्यांतील आपलें पहिलेंच शतक (१५६) या डावांत झळकविलें. देवधर हे ६६ धांवा करून बाद झाले. जय-देवधर यांच्या जोडीनंतर रामजी यांनाही आवेश चढून त्यांनींही दणदणीत टोलेबाजीला आरंभ केला. त्यांना पाठिंबा देण्याची जबाबदारी एस्. एस्. जोशी यांनीं उत्तम तऱ्हेनें पार पाडली. या जोडीनें १०४ धांवांची भर घातली; रामजी यांनीं ७० व जोशी यांनीं ३७ धांवा केल्या. ३७३ धांवा होऊन आमचा हा डाव पूर्ण झाला. पण मुसलमानांना सामना जिंकण्यासाठीं अवघ्या १२६ धांवांची गरज होती. आमच्या गोलंदाजांनीं व क्षेत्ररक्षकांनीं ती मर्यादा त्यांना गांठूं न देण्यासाठीं कसून खटपट केली. पण गोलंदाजीची आमची दुर्बल बाजू आम्हांला पुन्हां जाणवली आणि या कामीं आम्हीं असमर्थ ठरलों. मुसलमानांचे पांचच खेळाडू आम्ही बाद करूं शकलों ५ आणि विकेट्स् व ३ धांवांनीं आम्हाला पराजय पदरीं घेणें भाग पडलें. चौरंगी सामन्यांतील पहिलाच विजय मुसलमानांनीं याप्रमाणें संपादन केला आणि आपला संघ उपेक्षणीय नाहीं याची खात्री पटवून दिली !

## एक मजेदार प्रसंग

१९२४ सालच्या या सामन्याच्या वेळीं एक मोठा गंमतीचा प्रसंग घडला. आज तो प्रसंग आठवतांच माझें मलाच हंसूं येतें आणि व्हाइसरॉयां-सारख्या एवढ्या बडया व्यक्तीशीं मी त्या क्षणीं इतक्या धिटाईनें वागलों कसा याचेंही कांहींसें नवलच वाटूं लागतें ! पण क्रिकेटर हा कांहींसा बेडरच असावा लागतो; खेळामधील कोणत्याही प्रसंगांतून न डगमगतां तोड काढण्याची त्याची तयारी असावीच लागते. संघनायकत्वाची जबाबदारी मीं स्वीकारली होती; अर्थात् क्रीडांगणावर प्रत्यक्ष खेळामध्यें जशी ती जबाबदारी योग्य तऱ्हेनें पार पाडणें माझें कर्तव्य होतें, तशीच क्रीडांगणाबाहेर सभासमारंभांतूनही त्या त्या प्रसंगींच्या शिष्टाचारांना कोण-त्याही तऱ्हेनें बाध येऊं न देतां ती भूमिका सहजतेनें सजविणें अवश्यच होतें. अनेक मोठमोठे सामने व त्या वेळचे समारंभ माझ्या दृष्टीखालून गेलेले असल्यामुळें व त्या प्रसंगींच्या विशिष्ट शिष्टाचारांचा चांगलाच सराव झालेला असल्यामुळें ही भूमिका साधण्यास मला कांहींच अडचण पडत नसे. पण अशा समारंभादिकांतून क्वचित् असाही एकादा प्रसंग अकस्मात उपस्थित होत असतो कीं त्यांतून त्या क्षणीं सुचेल त्या रीतीचा अवलंब करून मार्ग काढण्याशिवाय गत्यंतरच नसतें. व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांचा मुक्काम १९२४ सालच्या या सामन्याच्या वेळीं मुंबईत होता; आणि युरोपियनांविरुद्ध आमचा जो त्या सालीं पहिला सामना झाला, त्या सामन्यांत लंचच्या वेळीं त्यांच्या पंक्तीचा मान आम्हांला मिळाला होता. गव्हर्नर-व्हाइसरॉय असे बडे सन्माननीय पाहुणे उपस्थित असले कीं, त्यांना खेळाडूंचा व आपल्या संघांपैकीं इतर प्रमुख मंडळीचा औपचारिक रीत्या परिचय करून देण्याचा विधि अशा प्रसंगीं संघनायकाला पार पाडावा लागतो. ज्यांचा परिचय करून द्यावयाचा, ती मंडळी रांगेनें उभी असते; त्यांपैकीं एकेकानें पुढें यावयाचें व मग कॅप्टननें “ हे अमुक अमुक ” म्हणून व्हाइसरॉयांना ( अथवा गव्हर्नरांना ) त्यांची ओळख करून द्याव-याची आणि व्हाइसरॉयांनीं त्याच्याशीं हस्तांदोलन केल्यावर त्या व्यक्तीनें पुढें जावयाचें, असा हा सारा थाट असतो. आमच्या विरुद्ध बाजूचे संघ-

नायक त्या वेळीं उपस्थित नव्हते; त्यांच्या मंडळींचा परिचय करून देण्याचें काम त्यांच्या सेक्रेटरीनें स्वीकारलें आणि आमच्या मंडळींचा परिचय रीतसर मीं करून द्यावा असें ठरलें.

"चलो, हादीसाहेब, जलदी चलो"

त्याप्रमाणें व्हाइसरॉयांची स्वारी लंचसाठीं उपस्थित झाल्यानंतर रीतीप्रमाणें ह्या परिचयविधीला सुरुवात झाली. सर्व मंडळींचा परिचय करून दिला आणि व्हाइसरॉयांची स्वारी आपल्या स्थानाकडे जाण्यासाठीं वळली. तितक्यांतच परिचय करून द्यावयाच्या मंडळींपैकीं इस्लाम जिमखान्याचे सेक्रेटरी हादीसाहेब हे मागें राहिलेले माझ्या दृष्टीला पडले. या गृहस्थांचा परिचय करून न द्यावा तर तें अयोग्यच दिसलें असतें व त्यामुळें विनाकारण कुरबुरीलाही कारण मिळालें असतें आणि व्हाइसरॉय तर परिचयविधि संपला या समजुतीनें जाण्यास निघाले होते व त्यांची पाठही फिरली होती. अशा परिस्थितींत व्हाइसरॉयांना थांबविण्यासाठीं चटकन् मीं त्यांच्या खांद्याला हळूच बोटानें स्पर्श केला. त्यासरशीं एकदम दचकून व्हाइसरॉय मागें वळले. त्यांनीं प्रश्न करण्यापूर्वीच मीं अदबीनें म्हणालों, "सर, अजून एक सद्गृहस्थ राहिले आहेत!" "असं होय?" असें उद्गारून व्हाइसरॉय त्या सद्गृहस्थांची वाट पाहत उभे राहिले. हादीसाहेब अजूनही बावरल्यासारखी मुद्रा करून मागेंमागेंच राहत होते. "चलो, चलो, हादीसाहेब जलदी चलो!" असें म्हणून त्या स्वारीला मीं जवळ बोलावून घेतलें आणि "हे इस्लाम जिमखान्याचे सेक्रेटरी, हादी तय्यबजी," असा त्यांचा व्हाइसरॉयांना एकदांचा परिचय करून दिला. आणि मग माझें लक्ष दोघां तिघां युरोपियन खेळाडूंच्या चेहऱ्यांकडे गेलें; जणूं काय कांहीं तरी विलक्षणच प्रकार घडला असाच संभ्रमयुक्त भाव त्यांच्या मुद्रेवर उमटला होता. व्हाइसरॉय निघून जातांच त्यांच्यापैकीं होझी माझ्याकडे वळून अर्धवट थट्टेच्या स्वरांत म्हणाले, "कां हो! व्हाइसरॉयांची काय चेष्टा आरंभिली होतीत तुम्ही? त्यांच्या खांद्यावर चापट्या मारून त्यांना थांबविलंत तें!" मीं उत्तर केलें, "हो, जरा चमत्कारिकच झालं तें! पण हादीसाहेब पुढंच येईनात,

काय करायचं ?" पण स्वतः व्हाइसरॉयांना मात्र या प्रकारांत कांहीं वावगें वाटल्याचें दिसलें नाहीं. लंचच्या समयीं त्यांच्याच शेजारीं बसण्याचा मान मला मिळाला होता, आणि त्या वेळीं मधूनमधून ते मला क्रीडाविषयक बाबीसंबंधीं प्रश्न विचारीत व स्वतःचीही मतें व्यक्त करीत. त्यांच्या बोलण्यांत एकंदरींत बराच मोकळेपणा व विनोदी वृत्तिही आढळून आली. लॉर्ड रीडिंग यांचे आवडते खेळ गॉल्फ व टेनिस हे असल्याचें मीं ऐकलें होतें; पण या प्रसंगींच्या संभाषणांत त्यांनीं आपण एका काळीं "बॉक्सर"ही होतों, अशी नवी माहिती आम्हांला करून दिली. नायडू समोर बसले होते, त्यांना त्यांनीं पृच्छा केली, कीं क्रिकेटखेरीज आणखी कोणत्या क्रीडाप्रकारांची तुम्हांला आवड आहे ? त्या पृच्छेला उत्तर देतांना नायडू यांनीं बॉक्सिंगचा उल्लेख केला. तें ऐकतांच व्हाइसरॉयसाहेब स्मितपूर्वक उत्तरले, "अहो, मीं सुद्धां एक वेळ बॉक्सिंगचे धडे घेत होतों !" आणि नंतर माझ्याकडे वळून ते म्हणाले, "तुम्हीं आतां म्हणालांत, क्रिकेटमध्यें मनाचा समतोलपणा व शांत वृत्ति राखणें अत्यंत जरूरीचें असतें, तीच तऱ्हा बॉक्सिंगची आहे, तिथंही "पंचेस" देतांना आणि घेतांना असाच शांतपणा व भान राखायला हवें; तुम्ही जरा का बेभान झालां, कीं प्रतिपक्षानें तुमच्यावर मात केलीच म्हणून समजा !—"

क्रिकेटप्रेमी गव्हर्नर

लॉर्ड रीडिंग यांच्याखेरीज लॉर्ड हार्डिंज या व्हाइसरॉयांना जवळून पाहण्याचा योग मला एकदां आला होता. तोही प्रसंग आठवणींत राहण्या-सारखाच घडला. कलकत्त्याला आम्ही सामन्यासाठीं गेलों असतांना त्या वेळीं या व्हाइसरॉयांची स्वारी सामना पाहण्यासाठीं आली होती. बंगालमध्यें क्रांतिकारकांची चळवळ त्या सुमारास जोरांत सुरू असल्यामुळें व्हाइस-रॉयांच्या आसपास पोलिसांचा अगदीं कडक बंदोबस्त असे. व्हाइसरॉयांच्या जवळ तर कोणालाच फिरकूं देत नसत; अशा परिस्थितींत माझें नांव कुणी तरी पुकारतांच मीं सरळ बेधडक व्हाइसरॉयांच्या समोर जाऊन उभा राहिलों, त्या वेळीं भोंवतालच्या मंडळींत किती गडबड उडाली असेल, याची

कल्पनाच करावी! हार्डिंजसाहेब दिसावयाला भव्य आणि कांहींसे ऊग्रच दिसत; बोलणेंही असेंच कडक भासे. निदान माझ्या मनावर तरी असाच ठसा उमटलेला आहे. पण त्यांचें व्यक्तित्व असें मनांत दरारा उत्पन्न करण्याजोगें होतें, तरी प्रत्यक्ष वागण्यांत मात्र त्यांच्या सौजन्याचाच प्रत्यय येई. माझ्या त्या ओझरत्या भेटींतही याची साक्ष मिळाली. लॉर्ड विलिंग्डन हे मीं पाहिलेलें तिसरे व्हाइसरॉय. त्यांच्या सहवासाची संधि मला मिळाली त्या वेळीं ते मुंबईच्या गव्हर्नरपदावर होते. लॉर्ड विलिंग्डन यांच्या संघांतून व त्यांच्या नेतृत्वाखालीं मीं अनेकदां खेळलों आहें. क्रीडांगणावर व क्रीडांगणाबाहेरही लॉर्ड विलिंग्डन हे आम्हां खेळाडूंशीं फार सौजन्यपूर्णतेनें आणि मोकळेपणानें वागत. लॉर्ड विलिंग्डन यांच्याबरोबर लेडी विलिंग्डन यांचाही उल्लेख करणें अवश्य आहे. त्याही क्रिकेटविषयक समारंभांतून मोठ्या हौसेनें भाग घेत असत. लॉर्ड विलिंग्डन यांच्यानंतर सर जॉर्ज लॉइड (नंतर बॅरन लॉइड) हे मुंबईचे गव्हर्नर झाले; पण हे गव्हर्नर आमच्या या खेळाविषयीं बहुधा उदासीनच असत. त्यांच्यानंतर आलेले गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांच्या कारकीर्दींत मात्र मुंबईच्या क्रिकेटला राजाश्रयाचे पूर्वीचे दिवस पुन्हा प्राप्त झाले. लॉर्ड हॅरिस व लॉर्ड विलिंग्डन यांच्याप्रमाणेंच सर लेस्ली विल्सन हे स्वतः क्रिकेट खेळत. तसेंच स्वतःचा संघ जमवून पुण्याला ते दरवर्षी सामनेही करवीत असत. चौरंगी सामन्यांना सन्माननीय प्रेक्षक म्हणून जातीनें उपस्थित राहून खेळाडूंच्या कौशल्याची ते गुणग्राहक वृत्तीनें पारख करीत. खेळाडूंशीं वागण्याची व बोलण्याची त्यांची तऱ्हाही स्नेहपूर्ण, आकर्षक व बोलणाऱ्याला विश्वास व आदर वाटावा अशीच असे. सर लेस्ली विल्सन यांच्याशीं ट्रॅव्हर्स झेल प्रकरणीं माझें जें संभाषण झालें, त्याचा उल्लेख यापूर्वीं एकदां येऊन गेलाच आहे. तो सामना आम्ही ज्या वेळीं जिंकलों, त्या वेळीं त्यांनीं स्वहस्ताक्षरांत मला एक खास पत्र पाठवून आमच्या संघाचें अभिनंदन केलें होतें; ह्या पत्राचा ठसा करून येथील बॉम्बे क्रॉनिकल पत्रानें ता. १२ डिसेंबर १९२५ च्या अंकांत त्याचा ठसा प्रसिद्धही केला होता. हें पत्र पुढीलप्रमाणें होतें.

" प्रिय विठ्ठल,

काल सामना संपल्यानंतर तुम्हांला भेटण्याची संधि मला साधतां आली नाहीं, याबद्दल मला खेद वाटतो; कारण तुमच्या संघाच्या विजयाबद्दल व त्याचप्रमाणें तुमच्या स्वतःच्या खेळाबद्दल मला तुमचें जातीनें अभिनंदन करावयाचें होतें, पण तें आतां मीं या पत्रद्वारें करीत आहें. प्रस्तुत सामना, मला मिळालेल्या सवडींत जितका पाहणें शक्य होतें, तितका मीं तो पाहिला; जगाच्या अनेक विभागांत अनेक सामने आजवर मीं पाहिले आहेत; पण इतक्या खेळाडू वृत्तीनें दोन्ही पक्ष खेळले असा सामना माझ्या पाहण्यांत या व्यतिरिक्त विरळाच आला असेल. दोन्ही पक्षांत बलाबलाच्या दृष्टीनें फारसें अंतर नव्हतें; पण दुसऱ्या डावामध्यें तुमच्या संघानें अशा ह्या ऊष्ण हवेंतील तीन दिवसांच्या परिश्रमपूर्वक खेळानंतरही जी मेहनत केली, ती खरोखरच वाखाणण्यालायक होती आणि तुम्हाला जो महद् विजय मिळाला, त्याला तुमचा संघ सर्वस्वी पात्र आहे यांत शंकाच नाहीं. युरोपियन संघानेंही शेवटच्या चेंडूपर्यंत निकराचा झगडा केला, याबद्दल तुमचें दुमत होणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

आपला,

(सही) **लेस्ली विल्सन**

या पत्राला मींही समयोचित प्रत्युत्तर लिहून गव्हर्नरसाहेबांच्या या कळकळीच्या शब्दांबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले, हें अर्थात सांगणें नकोच !

सर लेस्ली विल्सन यांचें वरील पत्र ज्या सामन्याबद्दल आहे, त्या १९२५ सालच्या युरोपियन वि. हिंदु या निर्णायक सामन्याकडे वळण्यापूर्वी तत्पूर्वीच्या पहिल्या फेरींत पारशांविरुद्ध आमचा जो सामना झाला त्या सामन्याचा थोडासा निर्देश करणें अवश्य आहे. या वर्षी चंदाराणा व एस्. एम्. जोशी हे आमचे दोन्ही ' स्टॉक ' गोलंदाज आम्हाला पुन्हा मिळाले होते. याखेरीज लाला हंसराज ह्या पंजाबच्या गोलंदाजांनाही ह्या वर्षी आम्ही बोलावून घेतलें होतें. पण हंसराज यांचें तेज या प्रथम सामन्यांत फारसें कांहींच पडूं शकलें


नाहीं; त्यामुळें दुसऱ्या सामन्यांत आम्हांला त्यांना अकरा जणांतून रजा देणें भाग पडलें. हा पहिला सामना आम्ही बोलिंगपेक्षां बॅटिंगच्याच जोरावर जिंकला असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि त्यांतही प्रो. देवधर, एल्. पी. जय यांनीं त्यांत उत्कृष्ट कामगिरी केली. पारश्यांकडे जमशेटजी, काला-पेसी, वझिफदार, एलाव्हिया हे गोलंदाज होते. यांपैकीं जमशेटजी हे तर त्या वर्षीं स्थानिक सामन्यांत फार चमकले होते. जमशेटजी हे हिंदी गोलंदाजां-पैकीं एक उत्कृष्ट डावखोरे मंदगति 'स्पिन' गोलंदाज होऊन गेले. ओल्या पीचवर त्यांचें तेज विशेषच पडे आणि बॅट्स्मनला त्यांच्या गोलं-दाजीवर खेळणें फार मुष्किलीचें होई. एक दोन चेंडू टाकल्यावर मध्येंच ते एक झुलता (हँगिंग) चेंडू सोडून देत, आणि तेंच त्यांचें मुख्य परिणाम-कारक अस्त्र होतें. याच चेंडूला त्यांना बहुधा विकेट मिळे. या वर्षीं त्यांनीं आमच्या ७ विकेट्स् घेतल्या; पण त्यासाठीं १४२ धांवा त्यांना द्याव्या लागल्या. त्या दिवशीं विकेट चांगली होती आणि जय यांनीं आरंभापासूनच या गोलंदाजांना झोडपून काढण्याचा सपाटा सुरू केला; लंचपूर्वींच त्यांनीं आपलें शतक पुरें केलें. जय हे या वर्षीं चांगलेच फॉर्ममध्यें होते. या वर्षींच्या दोन्ही सामन्यांत त्यांचा खेळ फार चांगला झाला. या पहिल्या सामन्यांत जय हे १०४ धांवा काढून बाद झाले. त्यांच्यानंतर प्रो. देवधर यांनीं आपल्या नेहमींच्या सफाईदार शैलीनें १३५ धांवा केल्या व चौरंगी सामन्यांतील आपलें पहिलेंच शतक फडकाविलें. आमच्या एकंदर ३७५ धांवा झाल्या. पारश्यांनीं ही मर्यादा गांठण्याचा आटोकाट प्रयत्न केला व तीनशेंची पायरी त्यांनीं मागेंही टाकली; पण ३१७ धांवा झाल्यानंतर त्यांचे सर्व खेळाडू बाद झाले. आमच्या गोलंदाजांना क्षेत्ररक्षकांकडून योग्य पाठिंबा मिळाला असता, तर इतकीही संख्या गांठणें पारश्यांना शक्य झालें नसतें. या पहिल्या सामन्यांत आमचें क्षेत्ररक्षण बरेंच ढिलाईचें झालें. दुसऱ्या सामन्यांत ह्या कामीं कांहींशी सुधारणा झाली म्हणून बरें, नाहीं तर तो सामना जिंकणें आम्हाला बहुतांशीं अशक्यच झालें असतें. या पहिल्या सामन्यांतही दुसरा डाव पुरा होऊं शकला नाहीं व पहिल्या डावाच्या निर्णयावर आम्हीं निर्णायक सामन्यांत उतरलों.



महाराष्ट्राचे दोघे अग्रगण्य बॅट्स्मन

प्रो. देवधर　　　　　　　　　　　　　　　पी. विठ्ठल

[ १९२५ ]



## जयापजय

१९२५ सालीं युरोपियनांविरुद्ध आमचा जो निर्णायक सामना झाला, त्या सामन्यानें १९२३ सालच्याच सामन्याची कांहींशी आठवण करून दिली. त्या सालापेक्षांही युरोपियनांचा या वर्षीचा संघ विशेष सामर्थ्यवान् होता. युरोपियन निवड समितीनें हिंदुस्थानांत असलेल्या उत्कृष्ट युरोपियन क्रिकेटपटूंची जितकी जमवाजमव करतां येणें शक्य होतें, तितकी ती प्रयत्नपूर्वक केली होती. ट्रॅव्हर्स, होझी, फिलिप्स, हे त्यांचे नेहमींचे निष्णात बॅट्स्मन या वेळींही होतेच, त्यांच्याखेरीज कलकत्त्याला त्याच वर्षी व्यवसायानिमित्त येऊन राहिलेले सरे काउंटीचे खेळाडू आय्. पी. एफ्. कॅम्बेल, इंदूरच्या मेयो कॉलेजचे प्रिन्सिपल व ग्लावस्टर काउंटीमध्यें खेळलेले बॅट्स्मन एम्. सी. सॅाल्टर, मद्रास येथें स्थायिक झालेले ऑक्स्फर्ड

व यॉर्कशायर संघांतील प्रसिद्ध बॅट्स्मन विकेटकीपर एच्.पी. वॉर्ड व स्कॉटलंड-तर्फे खेळलेले लष्करांतील क्रिकेटपटु कॅ. अलेक्झांडर या पट्टीच्या बॅट्स्मनचतुष्टयाचीही जोड त्यांना मिळाली होती. त्याखेरीज पुण्याच्या लष्करांतील कॅ.एन्. एम्.ह्यूज हॅलेट व मुंबईचे पी. टी. हॅरिसन यांचाही बॅटिंगमध्यें त्यांना चांगला उपयोग होण्यासारखा होता. गोलंदाजीच्या बाजूकडे लेफ्टनंट बी. हॉवलेट हे पुण्याच्या लष्करांतले जलदगति गोलंदाज, त्यांच्या जोडीला मुंबईचे पी.टी. हॅरिसन हे जलदगति गोलंदाज, कॅप्टन ह्यूज हॅलेट हे मंदगति लेगब्रेग गोलंदाज, व याशिवाय कॅ. अलेक्झांडर व कॅंबेल ही गोलंदाजांची जोडगोळी ही त्यांच्या मान्याची बाजूही फार प्रभावी होती. लेफ्टनंट हाव्लेट हे एकवीस पावलांची धांव घेऊन बोलिंग टाकीत आणि त्यांच्या गोलंदाजीचा एक विशेष म्हणजे न थकतां गोलंदाजीचा पल्ला व वेग ते एकसारखा कायम राखूं शकत. या नव्या युरोपियन खेळाडूंपैकीं कॅंबेल यांचा थोडा अधिक उल्लेख करणें अवश्य आहे. इंग्लडमध्यें "जंटलमेन वि. प्लेअर्स" असा जो प्रमुख खेळाडूंचा वार्षिक सामना व्हावयाचा, त्यांपैकीं "जंटलमेन" संघांत कॅंबेल यांना अनेकदां स्थान मिळालेलें होतें. "गुग्ली" गोलंदाजीची तऱ्हा कॅंबेल यांनीं या सामन्यांत थोडीशी दाखविली; पण कॅंबेल यांचा विशेष लौकिक होता तो 'कव्हर'वरील एक अत्युत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून होय. आमच्या सामन्याच्या वेळींही, या आपल्या लौकिकांत अतिशयोक्तीचा काडीमात्र अंश नाहीं, हें त्यांनीं पूर्णपणें प्रत्ययाला आणून दिलें. कव्हरवरील क्षेत्ररक्षकाला अतिशयच दक्ष व चपळ असावें लागतें. कारण बहुतेक वेळां सर्वसाधारण बॅट्स्मनचा फटका कव्हरवर नाहीं तर मिडऑफवर यावयाचा हें ठरलेलें असतें. या ठिकाणचे क्षेत्ररक्षक चपळ नसल्यास बॅट्स्मनला चोरट्या धांवा घेणें सहज शक्य असतें. कॅंबेल यांचें कव्हरवरील क्षेत्ररक्षण खरोखरच अप्रतिम असे. त्यांच्या बाजूकडे चेंडू गेला कीं बॅट्स्मनला धांव घेण्याचा सहसा धीर करवत नसे. जुन्या पिढींत जार्डीन (डी. आर्. जार्डीन यांचे वडील) हेही एक असेच, मीं पाहिलेले 'कव्हर'वरील उत्कृष्ट क्षेत्ररक्षक होते. हिंदु संघांत कव्हरवरील क्षेत्ररक्षकाची कामगिरी पूर्वी अनेक वर्षें माझ्याकडेच असे आणि माझ्या चपळ हालचालींमुळें या बाबतींत टीकाकारांच्या कसोटीला मीं बहुधा नेहमींच उतरतही असें. 'कव्हर'वर

क्षेत्ररक्षण करीत असतां माझा एक नियम ठरलेला असे; नुसतें बॅटस्मनच्या बॅटीकडे तेथें लक्ष ठेवून भागत नाहीं. तर गोलंदाजाच्या हातून चेंडू सुटला कीं तत्काळ आपणही आपल्याकडे चेंडू येईल अशाच अपेक्षेनें तो पकडण्या-साठीं पुढें धांव घेतली पाहिजे, म्हणजे चेंडू अचूक आणि चटकन् हातीं येऊं शकतो. अर्थात् माझा हा नियम मला जसा फायदेशीर होत होता, तसाच इतरांनाही तो पडेल कीं काय हें निश्चित सांगतां येणें कठीण आहे. कारण, याही गोष्टी तुमच्या हालचाली कितपत चपलतेनें होतात व वरखालीं झटकन् वांकण्याची कसरत तुम्हाला कितपत साधूं शकते याच्यावरच अवलंबून आहेत.

ट्रॅव्हर्सचा काळ !

१९२३ सालच्या सामन्याप्रमाणेंच याही वेळीं ट्रॅव्हर्स यांनींच ओली-सुकी जिंकून पहिल्यांदा बॅटिंग घेतलें. सॉल्टर-फिलिप्स ही त्यांची पहिली जोडी खेळावयास आली. त्यांपैकीं सॉल्टर हे चंदाराणा यांच्या गोलंदाजीवर नवले यांच्या हातांत झेल देऊन लवकरच आउट झाले. पण मग मात्र फिलिप्स-होझी यांची जी जोडी जमली, ती धांवांचा आंकडा १७० वर जाईपर्यंत टिकली. चंदाराणा व एस्. एम्. जोशी या आमच्या दोन्ही गोलंदाजांना चांगलाच मार खावा लागला. पण नंतर होझी हे रनआउट झाले आणि फिलिप्स हे ९४ धांवा काढल्यानंतर चंदाराणा यांच्या जलद चेंडूला सपशेल बळी पडले. यानंतर कॅ. अलेक्झांडर यांनीं कांहीं वेळ आकर्षकपणें खेळून ४६ धांवा केल्या, आणि कॅ. ह्यूज हॅलेट यांनींही धिम्मेपणानें टिकाव काढून ४१ धांवा केल्या. इतर बॅट्स्मन फारसे खेळूं शकले नाहींत व युरोपियनांचे कॅप्टन ट्रॅव्हर्स हेही एस्. एस्. जोशी यांच्या बोलिंगवर एल्. बी. डब्ल्यू. झाले. ट्रॅव्हर्स हे एस्. एस्. जोशी यांच्या गोलंदाजीला हटकून बळी पडत अशी सर्वसाधारण प्रेक्षकांची समजूत असे व ट्रॅव्हर्स खेळावयास आले कीं 'एस्. एस्. जोशींना बोलवा' अशी हांकही प्रेक्षकांतून दिली जाई. पण ह्या समजुतीप्रमाणेंच वस्तुस्थिति सर्वस्वी होती असें म्हणतां येत नाहीं. ट्रॅव्हर्स हे प्रो. जोशी यांच्याप्रमाणेंच चंदाराणा, गोडांबे, एस. एम्. जोशी, रामजी यांच्याही गोलंदाजीवर आउट झाले

आहेत. ट्रॅव्हर्स हे, " फास्ट बॅट " म्हणून ज्यांना संबोधिलें जातें अशा तऱ्हेच्या बॅट्स्मनपैकीं होते. अशा बॅट्स्मनवर मंदगति डावखोऱ्या गोलंदाजाची मात्रा पुष्कळ वेळां चांगली लागू पडते आणि प्रो. जोशी हे अशाच तऱ्हेचे गोलंदाज होते. शिवाय ट्रॅव्हर्स हे खेळावयास बहुधा पांचवे सहावे येत, त्या वेळीं प्रमुख गोलंदाजांना विसावा देऊन बदली गोलंदाजांचा मारा सुरू झालेला असे. प्रो. जोशी हे नवा चेंडू सहसा हातीं घेत नसत. ' चेंडूवरील तकाकी कमी झाली कीं मला बोलिंग द्या,' असेंच ते सांगत आणि तकाकी उडालेला चेंडू ते सांगितल्याप्रमाणेंच उत्तम रीतीनें वळवूं शकत. याच त्यांच्या अचूक निशाणबाजीमध्यें ट्रॅव्हर्स हे अनेकदां सांपडत. यावेळींही त्यांची शिकार प्रो. जोशी यांनीं साधली व ट्रॅव्हर्स यांना ८ धांवा करून तंबूकडे फिरावें लागलें. युरोपियनांच्या या डावांत ३५२ धांवा झाल्या. इतक्या धांवा आम्हाला करतां येणें फारसें कठीण नव्हतें.

पण १९२३ सालच्या सामन्याची या बाबतींत मात्र पुनरावृत्ति होऊं शकली नाहीं; आमचा पहिला डाव पुरा झाला, त्या वेळीं ९७ धांवांनीं युरोपियनांच्या मागें आम्हीं पडलों होतों. युरोपियनांचा डाव पहिल्या दिवशीं सायंकाळीं समाप्त झाला, त्या वेळीं थोडा वेळ उरल्यामुळें नवल्यांच्या जोडीला चंदाराणा या आमच्या संघातील एकच एका डावखोऱ्या बॅट्स्मनना मीं खेळावयास पाठविलें. नवले हे हॅावलेट यांच्या गोलंदाजीवर झेल देऊन परतले, पण नंतर गोडांबे यांनीं हॅावलेट यांना यशस्वीपणें तोंड दिलें व दुसऱ्या दिवशीं गोडांबे ( ६२ ) व जय ( ८० ) या जोडीनें डावाचा आरंभ चांगलाच केला. गोडांबे आउट झाल्यानंतर त्यांची जागा मीं घेतली; पण मीं ४५ धांवा केल्यानंतर ट्रॅव्हर्स यांनीं अलेक्झांडर यांना चेंडू दिला आणि त्यांच्या दोन ओव्हर्समध्यें जय, मी आणि देवधर असे तिघेही आउट झालों. यानंतर नायडू यांनीं एक बाजू संभाळण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना कोणी पाठिंबा देऊं न शकल्यामुळें २५ धांवा काढून व नाबाद राहून त्यांना परतावें लागलें. सुमारें शंभर धांवांनीं आम्हीं याप्रमाणें मागें पडल्यामुळें युरोपियनांना सामना जिंकण्याची दृढ आशा वाटूं लागली.

" मारतो आहे का लेकाचा ? "

पण पुन्हां तेवीस सालच्या सामन्याप्रमाणेंच जोशीबुवांनीं ठेवणींतील अस्त्रें बाहेर काढलीं. " मारतो आहे का लेकाचा " असें म्हणत म्हणत सहा प्रमुख युरोपियन खेळाडूंना त्यांनीं तंबूची वाट दाखविली. सॉल्टर, फिलिप्स, होजी, ह्यूज हॅलेट, हॅरिसन व वेझी एवढ्यांचे बळी जोशीबुवांनीं घेतले; पण या वेळीं त्यांना यासाठीं ९८ धांवांचें मोल द्यावें लागलें. बाकीच्या विकेट्स्पैकीं चंदाराणा व प्रो. एस्. एस्. जोशी यांनीं प्रत्येकीं दोनदोन विकटस् घेतल्या आणि युरोपियनांचा दुसरा डाव २५७ धांवांतच आटोपला. सामना जिंकण्यासाठीं आम्हांला युरोपियनांच्या पहिल्या डावाइतक्याच किंवा अचूकच म्हणजे ३५५ धांवा करावयाच्या होत्या व दीड दिवसाचा भरपूर अवधि आम्हाला यासाठीं मिळाला होता.

या दुसऱ्या डावांत नवले ( ७५ ) व जय (७१ ) या जोडीनें आमच्या बाजूची सुरुवात उत्तमच केली. शेवटच्या दिवशीं डावाला सुरुवात झाली, त्या वेळीं नवले व आदल्या दिवशीं सायंकाळीं पाठविलेले महाले ही जोडी खेळत होती व परदेशी व जय हे दोन खेळाडू बाद होऊन दीडशें धांवा झाल्या होत्या. १८४ धांवा झाल्यावर महालेही बाद झाले, व त्यांच्या जागीं मीं खेळावयास गेलों; पण नंतर २३१ धांवा होईतों नवले, देवधर व नायडू हे आमचे तीन प्रमुख बॅट्स्मन तंबूकडे परतले. माझ्या जोडीला गोडांबे आले. विजयश्रीचा मार्ग खुला करण्यासाठीं सव्वाशें धांवांचा खड्डा आम्हांला अजून भरून काढावयाचा होता. आमच्यावरच यात्राव्रतची बहुतेक सारी मदार होती; कारण मागें जोशीद्वय व चंदाराणा ही त्रयीच काय ती उरली होती.

आम्हीं दोघेही धिम्मेपणें खेळूं लागलों. संयम राखून योग्य दिसेल तोच चेंडू फटकावयाचा असेंच धोरण मीं ठेविलें होतें, कारण वेळाचा प्रश्न या वेळीं आमच्यापुढें निकडीचा नव्हता. आस्ते आस्ते धांवांची संख्या वाढूं लागली आणि लंचनंतर हा वेग विशेष वाढला. हॉवूलेट व हॅरिसन या दोघांही जलदगति गोलंदाजांनीं पराकाष्ठा केली; पण त्यांचे प्रयत्न व्यर्थच ठरले. सुमारें ४॥ वाजण्याच्या सुमारास ३५० चा आंकडा फलकावर झळकला,

त्या वेळीं माझ्या ९० व गोडांबे यांच्या ५० धांवा होऊन गेल्या होत्या. हॅरिसन यांनीं अखेरची ओव्हर टाकली; त्यांत दोहोंचा विजयाचा फटका मीं मारला आणि मग पुढची एक शेवटची धांव काढली नाहीं तोंच विजयाची आरोळी ठोकीत प्रेक्षकसमुदाय क्रीडांगणावर भराभर उतरला आणि आम्हांला त्यांना चुकविण्यासाठीं तंबूकडे पळ काढणें भागच झालें! जिमखान्यांत त्या वेळीं रणजी हे सामना पाहण्यासाठीं आले होते. त्यांनीं पुढें येऊन माझें खास अभिनंदन केलें. ना. गव्हर्नरांचेंही अभिनंदनपर पत्र आलें; तें गेल्या प्रकरणांत दिलेंच आहे. या सामन्यांत दुसरीही एक उल्लेखनीय बाब माझ्या बाबतींत घडून आली होती, ती म्हणजे चौरंगी सामन्यांतील माझ्या सहस्र धांवा या सामन्यांत पुऱ्या झाल्या होत्या.

### आमच्याविरुद्ध झालेलें "बेटिंग"—

या विजयानंतर पुढच्या वर्षी म्हणजे १९२६ सालीं आम्ही फिरून चौरंगी सामन्यांतील विजेतृत्व संपादन केलें आणि त्याही प्रसंगीं निर्णायक सामन्यांत युरोपियनांशींच आमची पुन्हा गांठ पडली. १९२६ सालच्या या सामन्याचा विशेष निर्देश पहिल्याच प्रकरणांत एकदां येऊन गेलाच आहे. हा सामना पुणें येथें पावसांत झाला होता आणि तेथें त्या वर्षी आम्ही जे दोन्ही सामने खेळलों, त्या दोन्हीमध्यें ओल्या विकेटमुळें बॅट्समनपेक्षां उभय पक्षांतील गोलंदाजांचाच फार प्रभाव पडला. मुसलमानां-विरुद्ध आमचा पहिला सामना झाला, त्यांत तर पावसामुळें एकच डाव तेवढा होऊं शकला. या डावांत आमच्या १११ व मुसलमानांच्या १०२ धांवा झाल्या. मीं यापूर्वी एकदां ज्यांचा विशेष उल्लेख केला आहे ते मुसलमानांचे सियालकोटचे गोलंदाज अब्दुस सलाम यांनीं २८ धांवांत ७ विकेट्स् घेतल्या. आमचे गोलंदाज चंदाराणा यांनींही या वर्षी दोन्ही सामन्यांत फार चांगली कामगिरी केली. मुसलमानांविरुद्ध त्यांनीं ५४ धांवांत ६ व युरोपियनांविरुद्ध दुसऱ्या डावांत ६२ धांवांत ५ विकेट्स् घेतल्या. युरोपियनांच्या या दुसऱ्या डावांत शेवटचा हॉवलेट यांचा बळी अगदीं ऐन आणीबाणीच्या वेळीं त्यांनींच घेतला व तो सामना आम्ही ११ धांवांनीं

जिंकलों. फार चुरशीचा असा हा सामना झाला. तो सामना आम्ही हरूं अशाच अपेक्षेनें अनेकांनीं आमच्याविरुद्ध "बेटिंग" केलें होतें. आमचा पहिला डाव झाला, त्यांत ९७ धांवा आम्हीं केल्या. युरोपियनांनीं याउलट या डावांत १५९ धांवा केल्या. दुसऱ्या डावांत आम्ही अधिक विश्वासानें खेळून १७८ धांवा केल्या; त्या वेळीं युरोपियनांना सामना जिंकण्यास अवघ्या ११६ धांवांची गरज होती; पण अवघ्या १०५ धांवांतच त्यांचे सारे बॅट्स्मन बाद झाले. या केवळ आंकड्यावरूनही सामन्यांत चढउतार कसा होत होता, याची कल्पना येण्यासारखी आहे. प्रत्यक्षतः तर अतिशय खळबळीच्याच वातावरणांत हा सामना झाला.

मेयर यांची गोलंदाजी

युरोपियनांना या सामन्यांत हॅाव्लेट यांच्याशिवाय आर्. जे. ओ. मेयर व जी. ॲस्टे या दोघां गोलंदाजाचें साह्य मिळालें होतें. मेयर हे मुख्यतः लेगब्रेक बोलर होते. नव्या चेंडूनें त्यांची गोलंदाजी अधिक परिणामकारक होई. पण त्यांतही त्यांचें एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या गोलंदाजी करण्याच्या पद्धतीवरून चेंडू कोणत्या दिशेनें फेंकला जाणार आहे याची कांहींच कल्पना बॅट्स्मनला होऊं शकत नसे आणि त्यामुळें बॅट्स्मन घोटाळ्यांत पडे. पुणें येथें झालेल्या या सामन्यांत हॅावलेटइतकी मेयर यांची गोलंदाजी प्रभावी ठरली नाहीं. पण पुढील वर्षी म्हणजे १९२७ सालीं मुंबई येथें युरोपियनांविरुद्ध पहिल्या फेरींत आमचा जो सामना झाला, त्यांत मेयर यांच्याच गोलंदाजीमुळें आम्हांला ५४ धांवांनीं अपयश पदरीं घ्यावें लागलें. १९२३ सालपासून युरोपियनांनीं केलेला हा आमचा पहिलाच पराजय होय. यापूर्वीच्या चारही वर्षांत युरोपियनांविरुद्ध आम्हीं मात केली आणि यांपैकीं १९२३-२५-२६ या तीन्हीं सालीं निर्णायक सामन्यांत युरोपियनांशींच आमची गांठ पडून आम्हीं विजेतृत्व संपादन केलें. माझ्या नेतृत्वाखालीं हिंदु संघाला चौरंगी सामन्यांत जें तीनदां विजेतृत्व लाभलें, तें, तीन्ही वेळीं युरोपियनांना जिंकूनच होय, हा एक उल्लेखनीय योगायोग म्हणतां येईल. १९२७ सालच्या सामन्यांत मात्र युरोपियनांनीं आमचा ५४ धांवांनीं अनपेक्षित पराजय करून,

सतत चार वर्षे आमच्या हातून होत असलेल्या पराजयाचें उट्टें काढलें! आमच्या नेहमींच्या संघांपैकीं सी. के. नायडू व एस्. एम्. जोशी हे दोघेही आमचे प्रमुख खेळाडू या वेळच्या आमच्या संघांत नव्हते. सी. के. नायडू यांना घोड्यावरून पडून अपघात झाल्यामुळें त्यांना त्या वर्षी खेळतां आलें नाहीं. आणि जोशी यांना निवडसमितींत त्यांच्याविरुद्ध बहुमत झाल्यामुळें संघांत स्थान मिळूं शकलें नाहीं. त्यांच्याऐवजीं कराचीचे नवमल जेउमल व स्थानिक खेळाडूंपैकीं एस्. एम्. दळवी यांचा समावेश करण्यांत आला.

एस्. एम्. जोशी यांचा या वर्षी संघांत समावेश करण्यांत यावा म्हणून निवडसमितीमध्यें मी व पुण्याचे प्रतिनिधि श्री. गोडबोले यांनीं बरीच खट पट केली. रामजी, चंदाराणा, गोडांबे व एस्. एस्. जोशी हे आमचे या वर्षीचे प्रमुख गोलंदाज होते; एस्. एम्. जोशी यांच्यासारखा मंदगति व कावेबाज गोलंदाज यांच्या जोडीला असता कीं संघांच्या गोलंदाजीमध्यें विविधता निर्माण झाली असती आणि गोलंदाजांमध्यें बदल करणें त्यामुळें अधिक सोयीचें झालें असतें. डावाच्या सुरुवातीला एका बाजूनें जलदगति व दुसऱ्या बाजूनें मंदगति गोलंदाज अशीच बहुधा मीं योजना करीत असें. यामुळें बॅट्स्मनला दोन प्रकारच्या माऱ्याला तोंड देणें भाग पडून तो घोटाळ्यांत पडण्याचा अधिक संभव असे. एस्. एम्. जोशी हे यामुळें आरंभापासूनच उपयोगी पडत असत. जोशी यांना या वर्षी खेळण्याची संधि देणें दुसऱ्याही एका कारणामुळें उचितच झालें असतें. चौरंगी सामन्यांत त्यांनीं घेतलेल्या विकेट्स्ची संख्या त्या वर्षापर्यंत ९६ भरली होती. या बाबतींतील शतकाचा आंकडा पूर्ण करण्याचा मान, त्यांना ही संधि साधतां आली असती, तर सहजीं मिळूं शकला असता. चंदाराणा यांच्याही ९६ विकेट्स् या वर्षापर्यंत झाल्या होत्या व त्यांना विकेट्स्चें शतक गांठ-ण्याचा मान याच सामन्यांत मिळूंही शकला. पण जोशी यांना मात्र तो मान दूरावला तो कायमचाच! कारण यानंतर चौरंगी सामन्यांमध्यें जोशी हे पुन्हां १९२९ सालीं एकदां खेळूं शकले तरी शतक पुरें करण्याइतकी त्यांच्या विकेट्ची संख्या त्या वर्षी भरूं शकली नाहीं!

रामजींची कामगिरी

या सामन्यांत आमच्या गोलंदाजांपैकीं रामजी यांनीं फारच चांगली कामगिरी बजावली. किंबहुना मेयर यांनीं आमची जितकी हानि केली, त्यापेक्षांही अधिक हानि रामजी यांनीं युरोपियन संघाची केली. पहिल्या डावांत रामजी यांनीं ९२ धांवांत ६ विकेट्स् घेतल्या, याउलट मेयर यांना आमच्या पहिल्या डावांत ९४ धावांमध्यें ५ विकेट्स् मिळाल्या. दुसऱ्या डावांत रामजी यांनीं ४१ धांवांत ७ विकेट्स् घेतल्या; यांपैकीं ५ विकेट्स् त्यांनीं तिसऱ्या दिवशीं सकाळीं अवघ्या१२ धांवांत घेतल्या होत्या ! मेयर यांनाही दुसऱ्या डावामध्यें ४४ धांवांत ७ विकेट्स् मिळाल्या. तिसऱ्या दिवशीं सकाळीं विकेट ओली असल्यामुळें गोलंदाज प्रभावी ठरले हें खरें असलें, तरी त्या सामन्यांतील अपयशाचा थोडाफार दोष आमच्या बॅट्स्मनकडे ही येऊं शकतो. युरोपियनांनीं पहिल्या डावांत २६८ धांवा केल्या, त्याला आम्ही २१९ धांवा करून प्रत्युत्तर दिलें. दुसऱ्या डावांत रामजी यांच्या परिणामकारक गोलंदाजीमुळें अवघ्या १०१ धांवांतच युरोपियनांचा धुव्वा उडाला. आम्हांला सामना जिंकण्यासाठीं १५१ धांवा करावयाच्या होत्या आणि युरोपियनांचा डाव साडेअकरा वाजतांच आटोपल्यामुळें चांगला पावणेपांच तासांचा भरपूर अवधि आम्हांला यासाठीं मिळाला होता. पण युरोपियनांची बाजू जशी रामजी यांनीं ढांसळून टाकली, तशीच गत मेयर यांच्या गोलंदाजीपुढें आमचीही झाली आणि अवघ्या ९६ धांवांत आमचे सारे बॅट्स्मन बाद झाले. फक्त गोडांबे यांनींच थोडा वेळ झुंज केली. त्यांनीं ३१ धांवा केल्या; पण पंचवीस सालची पुनरावृत्ति कांहीं आम्हांला करतां आली नाहीं. माझ्याही हातून खेळतांना थोडीशी चूक घडली. मेयर यांचा जो चेंडू टोलविणें धोक्याचें होतें, तोच टोलविण्याच्या मोहाला बळी पडून मॅकिनन यांच्या हातीं झेल देऊन मी बाद झालों. चौरंगी सामन्यांतील या वर्षीचें विजेतृत्व निर्णायक सामन्यांत मुसलमानांचा चार विकेट्स्नीं पराजय करून युरोपियनांनींच संपादन केलें आणि त्यांतही मेयर यांच्याच प्रभावी गोलंदाजीचाच त्यांना फार उपयोग झाला.

अखेरचें वर्ष

१९२८ साल हें चौरंगी सामन्यांतील माझें शेवटचें वर्ष, आणि महत्त्वाच्या प्रातिनिधिक सामन्यांतीलही तेंच माझें अखेरचें वर्ष होय असें म्हणावयास हरकत नाहीं. १९२९ सालीं हिंदूंच्या संघनायकत्त्वासाठीं प्रो. देवधर यांची निवड झाली व तो सामना हिंदूंनींच जिंकला. त्यापुढील वर्षीं देशांतील राजकीय चळवळीमुळें चौरंगी सामन्यांत जो खंड पडला, तो चौतीस सालपर्यंत तसाच चालू होता. या अवधींत व यानंतरही कांहीं दिवस क्लब क्रिकेटमध्यें मीं मधून मधून भाग घेत असें; पण पुढें क्रिकेट–कोच म्हणून मधून मधून काम करण्यापलीकडे या खेळाशीं प्रत्यक्ष खेळाडू असा माझा संबंध राहिला नाहीं. एकंदरीनें पाहतां १९३० सालपासून मीं या खेळांतून निवृत्त झालों असें म्हणावयास हरकत नाहीं.

१९२८ सालच्या माझ्या त्या शेवटच्या चौरंगी सामन्यांत पारश्यांविरुद्ध आम्हांला प्रथमच्या खेळींत झुंज द्यावी लागली आणि हा सामना अनिर्णीत राहून पहिल्या डावाच्या निकालावर पारश्यांना निर्णायक सामन्यांत खेळण्याचा हक्क मिळाला. या वर्षीचें विजेतृत्व अनेक वर्षांनीं त्यांनाच मिळालें. त्या सालच्या आमच्या संघांतून राजकुमार दुलिपसिंह हे खेळले होते. या सामन्यांतील त्यांच्या खेळाविषयींचा उल्लेख पूर्वीं एकदां येऊन गेलाच आहे. संघनायकत्व या वर्षीं त्यांनाच द्यावें असेंही घाटत होतें; पण येथील खेळ व खेळाडू ह्या दोन्ही गोष्टी त्यांना अपरिचित असल्यामुळें त्यांनींच ही जबाबदारी स्वीकारण्याचें नाकारलें व ती माझ्याकडेच सोंपविण्यांत यावी असेंही मत त्यांनीं प्रदर्शित केलें. आमच्या या संघांत दुलिपसिंहाखेरीज पुण्याचे जलदगति गोलंदाज एम्. ए. देशमुख यांचाही समावेश करण्यांत आला होता. त्यांच्याखेरीज रामजी व चंदाराणा हे आमचे जलदगति गोलंदाज या संघांत होतेच. मध्यगति गोलंदाज म्हणून फक्त एस्. एस्. जोशी हेच या संघांत होते. गोडांबे यांचा या वेळीं संघांत समावेश झाला नव्हता; त्यामुळें गोलंदाजीची विविधता या संघांत नव्हतीच. ही गोष्ट आम्हांला बाधक ठरलीच; पण त्याशिवाय ओलीसुकी जिंकल्यानंतर आम्हीं प्रथम बॅटिंग घेतलें, तीही एक चूक झाली. ओली-सुकी जिंकतांच मीं विकेटवर

जाऊन नेहमीच्या संवयीप्रमाणें पायाचा दाब देऊन विकेट पाहिली तों ती दबत असलेली मला भासली; त्यामुळें अशा विकेटवर बॅटिंग घेणें फायदेशीर होणार नाहीं असें मला वाटलें. पण जिमखान्यांतील आमच्या जाणत्या सल्लागारांचा अभिप्राय वेगळा पडला! जाणत्या मंडळींचें बहुमत माझ्याविरुद्ध जात आहे असें दिसल्यावर त्यांच्या अनुभवाला मान देण्याचें ठरवून मीं बॅटिंग घेतलें. पण माझ्या अपेक्षेप्रमाणें पालिया व पल्सेटिया यांची गोलंदाजी खेळणें अवघड पडूं लागलें. नवले व परदेशी दोघेही लवकर आउट झाले आणि आमची सुरुवात कांहीं चांगली झाली नाहीं.

पारशी खेळ

पण यानंतर मात्र दुलिपसिंह-जय या जोडीनें बाजू सांवरली आणि त्यांच्यानंतर देवधर व मी यांनीं कांहीं धांवांची भर टाकली. पण आमच्या धांवांचा आंकडा २६० पुढें जाऊं शकला नाहीं. या उलट पारश्यांच्या ३९६ धांवा झाल्या. दुसऱ्या डावांत आम्हीं जलद खेळ करून २५९ धांवांत ७ खेळाडू बाद झाल्यावर आमचा डाव समाप्त केला व पारश्यांना दुसरा डाव खेळण्याची संधि दिली. सामना जिंकण्याकरितां पारश्यांना फक्त १२५ धांवांची गरज होती. आणि तितक्या धांवा करण्यास पुरेसा वेळही होता; पण पारश्यांनीं बचावाचेंच धोरण पत्करून खेळांतील चुरस नष्ट करून टाकली. पहिल्या डावांत फली कापडिया यांच्या जोडीला दुसऱ्या बाजूला 'दगडी भिंत' उभी करण्याकरितां केवळ गोलंदाज म्हणूनच प्रसिद्ध असलेले जमशेदजी यांना पाठविलें होतें. तें त्यांचें धोरण त्या डावांत कांहींसें यशस्वीही ठरूं शकलें होतें. दुसऱ्या डावांत जलद खेळून त्यांना आमच्यावर विजय संपादतां आला असता. पण पुन्हां जमशेदजी व फली कापडिया हीच जोडी खेळावयास आली आणि नंतरही कोल्हा यांच्या जोडीला जे. एफ्. हवेवाला हे खेळावयास येऊन विजयसंपादनाची संधि साधण्यासारखी असतांना व बाजू बळकट असतांनाही फक्त ८७ धांवा करून सामना अनिर्णीत ठेवण्याचेंच श्रेय त्यांनीं घेतलें! या मित्रेपणाच्या धोरणाबद्दल पारश्यांमधील कांहीं जाणत्या खेळाडूंनीं त्यांना दोष दिला. पण पारशी

खेळाडूंचें हें विशिष्ट धोरण याच वेळीं प्रथम अनुभवाला आलेलें नव्हतें. किंबहुना याच धोरणाबद्दल त्यांची विशेष प्रसिद्धि होती. मला आठवतें कीं १९२० सालीं झालेल्या चौरंगी सामन्यांत कांगा व एलाव्हिया ह्या पारशी जोडीनें सुमारें चार तास अतिशय चिवटपणें खेळून तो सामना अनिर्णीत ठेवण्याचें असेंच श्रेय घेतलें होतें. मारलेला फटका लांब गेला तरी धांव घ्यायची नाहीं असा क्रम त्यांनीं आरंभला होता ! त्या वर्षी सामना जिंकण्याची आम्हांला आलेली संधि त्यांच्या या धोरणामुळें दुरावली होती व त्यामुळें एका दृष्टीनें त्यांचा हा चिवट खेळ क्षम्यच नव्हे, पण त्यांच्या दृष्टीनें प्रशंसनीयही ठरूं शकला होता. एलाव्हिया यांना त्या खेळाबद्दल पारशी जिमखान्यांतील कांहीं सधन गृहस्थांनीं परितोषिकही दिलें होतें ! पण हें चिवट खेळाचें धोरण नेहमींच पत्करल्यानें खेळांतील मौज व चुरस यांवर पाणी पडतें, ह्या गोष्टीकडे त्यांच्याकडून सहेतुक म्हणा वा अहेतुक म्हणा दुर्लक्षच होत असे व चिवट नीरस खेळ म्हणजे पारशी खेळ, अशी जणूं व्याख्याच ठरून गेल्यासारखी झाली होती !! तडफदार खेळ खेळणारे कोल्हा–कापडियासारखे खेळाडू त्यांच्याकडे नव्हते असें नाहीं; पण त्यांच्याही खेळावर ह्या सर्वसामान्य बचावाच्या धोरणाची सांवट पडलेली आढळून येई व त्यांचा स्वतःचाही त्यामुळें विरस होई.

### एक वाद-प्रसंग

१९२८ सालच्या या सामन्यांत दुलिपसिंह हे खेळत असतां एक लहानसा वादाचा प्रसंग उद्भवला. दुलिपसिंहांनीं एक चेंडू बॅटीच्या दुसऱ्या बाजूनें मारण्याचा आविर्भाव केला आणि त्या रीतीनेंही चेंडू आपल्याला फटकावतां येईल असें दर्शविलें. यावर पारशी संघनायक डॉली कापडिया यांनीं सदर पद्धति नियमबाह्य असल्याच्या मुद्द्यावर अंपायरकडे अपील केलें. पण अंपायरनीं अपील फेंटाळून लावून बॅट्स्मन नाबाद असल्याचा निर्णय दिला. पारशी क्रिकेटर मंडळींत यामुळें थोडीशी खळबळ उडाली आणि दुसऱ्या दिवशींच्या टाइम्स पत्राच्या अंकांत पारशी अंपायर पी. एच्. दावर यांनीं एम्. सी. सी. नें याबाबत १९२४ सालीं बॅट्स्मनच्या विरुद्धच निर्णय दिला

असल्याचा दाखला पुढें मांडला. यॉर्कशायर क्रिकेट कौन्सिलनें हा निर्णय एम्. सी. सी. कडे मागितला होता. सदर प्रकरणीं ए. डेनेंबी नांवाच्या डावखोऱ्या बॅट्स्मननें ऑफ्कडील चेंडू बॅट फिरवून उजकुऱ्या बॅट्स्मनच्या तऱ्हेनें मारला होता व अंपायरनें त्याचा हा खेळ अरास्त व खेळांत व्यत्यय निर्माण करणारा असल्याचें ठरवून त्याला बाद केलें होतें. एम्. सी. सी. नें हा निर्णय मान्य केला होता. हा दाखला प्रस्तुत पारशी–हिंदु सामन्यांतील अंपायरला माहित नसल्यामुळें त्यानें चुकीचा निर्णय दिला असें दावर यांचें म्हणणें होतें. पण एम्. सी. सी. च्या या निर्णयाचा दाखला दुलिपसिंहांच्या खेळाच्या बाबतींत लावणें एका दृष्टीनें चुकीचेंच ठरलें असतें; कारण दुलिप-सिंहांनीं प्रथम वरील दाखल्यांत दर्शविल्या तऱ्हेनें चेंड् फटकावला नव्हता आणि अरास्त मार्गानें चेंड् अडविण्याचा त्यांचा त्यांत मुळींच इरादा नव्हता अथवा तशी कृतिही नव्हती. यामुळें केवळ त्यांच्या तेवढ्या आविर्भावामुळें त्यांना बाद ठरविणें अयोग्यच झालें असतें. एम. सी. सी.चा हा वरील निर्णय लागू ठरण्याजोगा एक प्रसंग बडोदें येथें मात्र आमच्या अनुभवाला एकदां आला. तेथील संघाविरुद्ध सामना खेळण्यासाठीं आम्ही गेलों अस-तांना जाल मर्चंट नांवाच्या खेळाडूनें लेगच्या बाजूचा एक चेंडू बॅटीच्या उलट बाजूनें अशा कांहीं जोरानें फटकाविला कीं त्या बाजूला शॉर्ट लेगला परदेशी हे क्षेत्ररक्षणासाठीं उभे होते, त्यांना जीव बचावण्यासाठीं तेथून पळ काढणेंच भाग पडलें ! पण इतका हा असा प्रकार होऊनही तेथील अंपायरनें बॅट्स्मन नाबाद असल्याचाच त्या वेळीं निर्णय दिला होता !

एम्. एच्. चंदाराणा

१९२८ सालच्या त्या सामन्यानंतर माझ्याप्रमाणेंच आम्हां जुन्या खेळाडूंपैकीं एम्. एच्. चंदाराणा हेही हिंदु संघांतून गळाले. डावखोरे जलदगति गोलंदाज म्हणून चंदाराणा हे हिंदुसंघाचा कैक वर्षें आधारस्तंभ होते. त्यांच्या गोलंदाजीची पद्धत सहज व आकर्षक असे. चेंडूची दिशा व पल्ला या बाबतींत क्वचित कांहीं वेळां चेंडूवर त्यांची राहावी तशी हुकमत राहत नसे आणि अशा वेळीं बॅटस्मनला या त्यांच्या दोषाचा फायदा मिळू

शके; पण इतर वेळीं जेव्हां ही हुकमत त्यांना साधणें शक्य होई, त्या वेळीं त्यांच्या गोलंदाजीला तोंड देणें पट्टीच्या बॅट्स्मनला सुद्धां फार अवघड जात असे. कांहीं कांहीं वेळां तर त्यांची चेंडूफेक अत्यंत अप्रतिमच होई. त्यांच्या गोलंदाजीचा मारा बहुधा ऑफसाइडच्या रोखानें व्हावयाचा; पण ऑफपेक्षांही लेगच्या रोखानें चेंडू फेकल्यास त्यांची गोलंदाजी अधिक परिणामकारक ठरूं शकेल असा अभिप्राय दुलिपसिंह यांनीं व्यक्त केला होता. ही सूचना खरोखरच फार उपयुक्त व ग्राह्य होती. तत्पूर्वी तसा फारसा प्रयोग करून पाहण्याची कल्पना चंदाराणा यांना स्वतःला व आम्हांलाही सुचली नाहीं, ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे. चंदाराणा यांच्या यशांत त्या पद्धतीनें अधिक भर खचित पडूं शकली असती. चंदाराणा यांच्या जोडीला वेगवान् गोलंदाज म्हणून एल्. रामजी यांचाही आम्हाला चौरंगी सामन्यांत फार उपयोग झाला. उंच धिप्पाड शरीरयष्टि व विलक्षण जोर यांमुळें त्यांच्या गोलंदाजीबद्दल बॅट्स्मनच्या मनांत पाहतां-क्षणींच सहजच दरारा निर्माण होई. चौरंगी सामन्यांत चंदाराणा व जोशी यांच्या खालोखाल त्यांनींच अधिक विकेट्स घेतल्या आहेत. १९२६ सालच्या एम्. सी. सी. संघाविरुद्ध रामजी यांची गोलंदाजी अनेक ठिकाणीं परिणामकारक ठरूं शकली. चांगल्या वेगवान् गोलंदाजांची हिंदी क्रिकेटमध्यें बहुधा वाणच भासत असते. १९२६ सालच्या एम्. सी. सी. संघावेळीं रामजी व नाझिरअली यांनीं ही बाजू संभाळली होती. यानंतर निस्सार बानर्जी ह्या जोडीनें ती उणीव कांहीं वर्षें भरून काढली. पण त्यांची जागा भरून काढण्याला अजून कोणी पुढें येऊं शकलेला नाहीं. हीच परिस्थिति थोडीफार इतर प्रकारच्या गोलंदाजांबाबतही दिसून येते. श्री. बाळू, एस्. एम्. जोशी यांच्या तऱ्हेचे कुशल गोलंदाज, आज क्रिकेटचा प्रसार ठिक-ठिकाणीं होऊनही व पूर्वीपेक्षां सोईसाधनें वाढलेलीं असूनही विरळाच पाहावयास मिळत आहेत. रामजींचे बंधु कै. अमरसिंग यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या स्पिन गोलंदाजाचीही जागा भरून निघालेली नाहीं. अमरसिंग यांच्या गोलंदाजीवर पतियाळा येथें १९३२ सालीं चांचणी सामन्यांत मी खेळलों होतों. अचूक 'पिचिंग' हें त्यांच्या गोलंदाजीचें एक

मोठेंच वैशिष्ट्य होतें. त्यामुळें बॅटस्मनला त्यांच्या गोलंदाजीवर खेळतांना अतिशय सावधगिरीनें व जपून खेळावें लागे व धांवाही फार मिळत नसत. अमरसिंगांच्या अकालीं निधनानें हिंदी क्रिकेटची फार हानि झाली त्यांत शंका नाहीं. विशेषतः उत्कृष्ट गोलंदाजांच्या अभावामुळें ही हानि आज विशेषच जाणवूं लागली आहे. श्री. बाळू प्रभृति जुन्या खेळाडूंच्या अमदानींत बॅटिंगमध्यें आम्ही कमकुवत होतों, पण त्याउलटच आज आमच्या क्रिकेटची स्थिति झाली असून बोलिंगमध्येंच आमचें दुर्बलत्व अधिक जाणवत आहे. पद्धतशीर शिक्षण व मेहनत यांचा अभाव हेंच या दुर्बलत्वाचें मुख्य कारण सांगतां येईल. तरुण होतकरू गोलंदाजांना या कलेंत खास शिक्षण देण्याची सोय झाल्यास ही लंगडी परिस्थिति सुधारण्यास विलंब लागणार नाहीं.



## सिलोनवर स्वारी !

हिंदुस्थानबाहेर दौऱ्यावर जाण्याचा योग मला आला तो म्हणजे सिलोनच्या दौऱ्याचा होय. अर्थात् सिलोन हा हिंदुस्थानपासून कांहीं फारसा दूरचा प्रदेश नव्हे, अथवा क्रिकेटच्या खेळाचा तेथील इतिहासही हिंदुस्थानपेक्षां फारसा जुना नाहीं! पण तेथील क्रिकेट व हिंदुस्थानांतील क्रिकेट यांमध्यें एका बाबतींत मला विशेषच फरक दिसून आला. ही बाब म्हणजे क्रीडांगणांविषयींची होय. आमच्या येथील शाळाकॉलेजांना किंवा इतर क्रिकेट क्लबांना चांगल्या क्रीडांगणाची फार वाण भासत असते. हा दुष्काळ सिलोनमध्यें भासत नाहीं आणि या सोईमुळें क्रिकेटची प्रगति तेथें साधणें बरेचसें सुलभ झालें आहे. सिलोनमध्यें स्थायी ऋतू म्हणजे पावसाळा. त्यामुळें सुंदर हिरवळीचीं क्रीडांगणें तेथें सर्वच ठिकाणीं पाहा-

वयास मिळतात. त्यांतल्या त्यांत सी. सी. सी. ( सिलोन क्रिकेट क्लब ), एन्. सी. सी. ( नॉंडिस्क्रिप्टस् क्रिकेट क्लब ) इत्यादि प्रमुख क्लबांचीं क्रीडांगणें तर खरोखर दर्शनीयच आहेत. जणूं हिरव्यागार मृदु मखमली-वरूनच तुम्ही चाललां आहां असाच तेथें भास व्हावयाचा ! ' बाउंडरी 'ची हद्द तेथें पूर्ण ८० यार्डांची आंखलेली व तेथपर्यंतची सारी जमीन एकजात हिरव्या तृणांकुरांनीं आच्छादलेली ! गोलंदाजी करावयाचा मधला पट्टा ( पिच ), कठीण नव्हे, पण एकदम मऊही नव्हे असाच असे. ' पिच 'च्या या बाबतींतील तेथील परिस्थिति एकंदरीनें आमच्या येथील बॉम्बे जिमखान्याच्या क्रीडांगणासारखीच मला भासली. अशा क्रीडांगणावर गोलंदाजाला जरूर तितकी अनुकूलता लाभूं शकते आणि बॅट्स्मनचीही योग्य ती कसोटी लागते. त्यामुळें खेळही एकांगी होत नाहीं आणि खेळांत चुरस व रंग आणण्यासाठीं वेगळे उपाय शोधण्याचीही गरज भासत नाहीं !

### दोन दौरे

सिलोनला दोन वेळां माझा दौरा झाला. मीं ज्या ऑफिसमध्यें नोकरीला होतों, त्या बी. बी. सी. आय्. रेल्वेच्या ऑफिसांतील आमचे एक वरिष्ठ अधिकारी मि. डब्ल्यु. ई. ल्युकस यांच्या खटपटीनें पहिल्या दौऱ्याचा योग जमून आला. हा दौरा १९२६ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत पहिल्या पंधरवड्यांत झाला व तो खेळाच्या व पैशाच्या अशा दोन्हीं दृष्टींनीं चांग-लाच यशस्वी झाला. दुसरा दौरा १९२९ सालच्या डिसेंबर महिन्यांत एक हौसी सधन पारशी क्रिकेटर मि. जे. डी. आंटिया यांच्या प्रयत्नानें निघाला होता. आंटिया यांच्या या संघांत मी व टी. टी. बरोडावाला यांच्याखेरीज इतर सारे पारशी खेळाडूच होते; यामुळें तो संघ मुंबईच्या पारशी क्रिकेटरांचाच संघ होता. असें म्हणावयास हरकत नाहीं. हा दौरा पैशाच्या दृष्टीनें यशस्वी झाला नाहीं. ज्या दिवसांत हा दौरा निघाला, ते दिवस सिलोनी लोकांचे सणाचे व वार्षिक जत्रांचे दिवस असल्यामुळें प्रेक्षकांना क्रिकेटकडे लक्ष देण्यास फुरसद नव्हती. दुसरें म्हणजे पूर्वीच्या संघांत अखिल भारतांत नांवाजलेल्या बऱ्याच क्रिकेटरांचीं नांवें झळकत

होतीं, तशीं तीं या संघांत दिसूं शकलीं नाहींत. आंटिया संघाचे तीन सामने सिलोनमध्यें झाले, त्या तीन्हीमध्यें संघाचें नेतृत्व माझ्याकडेच सोंपविलेलें होतें. यांपैकीं सिलोनीज युरोपियन व सिलोनीज या दोन संघाविरुद्ध झालेले सामने अनिर्णीत राहिले; पण पहिल्या डावांत आमच्याच धांवा अधिक झाल्या होत्या. अखिल सिलोन-संघाशीं तिसरा सामना झाला, त्यांत सिलोन-संघाचा ९ विकेट्‌सूनीं विजय झाला. आमच्या संघापैकीं फली कापडिया हे या दौऱ्यांत चांगले खेळले. पहिल्या सामन्यांत १४५ व दुसऱ्यामध्यें ९० धांवा त्यांनीं केल्या. बाकी खेळाडूंपैकीं कोणाचा फारसा उल्लेखनीय खेळ होऊं शकला नाहीं. खेळाच्या दिवशीं पावसाच्या सरी मधून मधून पडून जात असल्यामुळें त्याचाही खेळावर बराच परिणाम झाला.

## आमचा परंपरागत अवगुण

याउलट, १९२६ सालचा दौरा फेब्रुवारी महिन्यांत झाला, त्या वेळीं उन्हाचा रखरखाट चांगलाच जाणवूं लागला होता. ही गोष्ट आमच्या क्षेत्ररक्षणाला विशेष बाधक झाली. पण याबरोबर हेंही कबूल करणें अवश्य आहे कीं सिलोनचे बहुतेक खेळाडू क्षेत्ररक्षणाच्या बाबतींत आमच्यापेक्षां वरचढ होते. किंबहुना, आमच्यावर त्यांनीं शेवटच्या सामन्यांत मात केली, ती केवळ आमचें क्षेत्ररक्षण फार ढिलाईचें झालें व याउलट त्यांनीं या बाबतींत अत्यंत कसोशीनें मेहनत केली, म्हणूनच होय. आमचा हा संघ बहुतांशीं अखिल भारतीय स्वरूपाचाच होता; पण इतकें असूनही क्षेत्ररक्षणांतील दुर्बलतेच्या परंपरागत अवगुणामुळें इतर बाजूकडील आमचें कौशल्य व परिश्रम व्यर्थच ठरले. बॅटिंग व बोलिंग या दोन्हीं बाबतींत सिलोनी खेळाडूंवर व प्रेक्षकांवर आम्ही उत्तम छाप पाडूं शकलों, पण क्षेत्ररक्षणाच्या बाबतींत मात्र त्यांच्याचकडून धडे घेण्याची पाळी आम्हांला आली! हें येथें मुद्दाम सांगण्याचें कारण असें कीं क्षेत्ररक्षणाची ही बाजू या खेळांत किती महत्त्वाची आहे हें होतकरू क्रिकेटर वाचकांच्या ध्यानीं यावें. आमच्या या संघांत आमच्या बी. बी. सी. आय्. रेल्वे क्लबापैकीं

आमचे कॅप्टन डब्ल्यु. इ. ल्युकस, वी. इ. कापडिया, परदेशी, महाले, जे. एफ्. हवेवाला, वझिफदार, गोडांबे, मी स्वतः व शिवाय जे. एस्. वॉर्डन व श्री. बाळू (यांनीं प्रत्यक्ष खेळांत भाग घेतला नव्हता) असे आम्हीं दहाजण व सी. के. नायडू, एस्. एम्. जोशी, बोटावाला, रामजी, जमशेदजी, व फली कापडिया असे बाहेरचे सहा मिळून सोळा खेळाडू होतों. कोलंबोला जातांना वाटेमध्यें या दौऱ्यांतील आमचा पहिला सामना मद्रास येथें युरोपियन व हिंदी अशा संयुक्त मद्रास संघा-बरोबर झाला. या संघांत सी. पी. जॉन्स्टन, एच्. पी. वॉर्ड, कॅरिक, गणपति, रामस्वामी इत्यादि मद्रासचे नामांकित क्रिकेटपटु होते. गाडींतून उतरल्यावर लागलीच आम्हांला सरळ क्रीडांगणावरच जाणें भाग पडलें. कारण सामना ताबडतोब सुरू व्हावयाचा होता. दोन दिवसांच्या प्रवासाचे श्रम आम्हांला झाले होते; त्यांतच प्रथम क्षेत्ररक्षण पत्करावें लागलें. यामुळें या सामन्यांत दमदारपणें खेळणें आम्हांला शक्य झालें नाहीं. मद्रास संघानें पहिल्या डावांत सुमारें १८० धांवा करून डाव समाप्त केला. या पहिल्या डावांत आमच्या अगदींच थोडया धांवा झाल्या. आमच्यापैकीं फक्त श्री. परदेशी हेच तेवढे यशस्वीपणें खेळूं शकले; सामन्यांतील व्यक्तिशः सर्वांत अधिक धावा —६१—त्यांनींच केल्या. आम्हांला दुसऱ्यांदा बॅटिंग देण्यांत आलें; पण हा दुसरा डाव पुरा होऊं शकला नाहीं व सामना अनिर्णीतच राहिला. हा सामना पाहण्यास सुमारें १०००० प्रेक्षकांचा जमाव लोटला होता. सामना संपल्यावर स्टेशनवर निरोप देण्यासाठींही या प्रेक्षकगणाची झुंबड उडाली होती. मद्रासचा प्रेक्षकगण फार उत्साही आणि चांगलाच मर्मज्ञही दिसला.

## पुन्हा 'भैरवी'!

सिलोनमधील आमचा पहिला सामना एन्. सी. सी.च्या क्रीडांगणावर डॉ. जॉन रॉकवुड यांच्या युरोपियन संघाविरुद्ध झाला. डॉ. जॉन रॉकवुड हे सिलोनमधील क्रिकेटप्रेमी व सधन गृहस्थ असून प्रस्तुत सामन्यांतील प्राथमिक आर्थिक जबाबदारी त्यांनींच उचलली होती. लॅंकेशायर काउंटीचे

सिलोनमध्यें त्या वेळीं स्थायिक असलेले एक नामांकित विकेटकीपर-बॅट्स्मन मेजर एफ्. आर्. ब्रूक यांजकडे या युरोपियन संघाचें नेतृत्व सोंपविण्यांत आलें होतें. युरोपियन गोलंदाज वेडलेक लेविस यांनीं आमचे सलामीचे बॅट्स्मन कापडिया व बोटावाला यांना लागोपाठ दोन ओव्हर्समध्यें सपशेल चीत करून आपल्या डावाची सुरुवात चांगलीच केली. त्यानंतर महाले हेही निकोल्स यांच्या गोलंदाजीवर झेल उडून बाद झाले आणि याप्रमाणें १५ धांवांत आमचे तीन खेळाडू तंबूकडे परतले. सिलोनमध्यें आमच्या संघाच्या बॅटिंगची आगाऊ जाहिरात बरीच झाली होती. पण प्रत्यक्षत: तर प्रेक्षकांना उलटच देखावा दिसूं लागला होता. तथापि यानंतर मात्र हा देखावा पार बदलून गेला. चवथ्या व पांचव्या अनुक्रमाला मीं व नायडू हे खेळावयास गेलों होतों. आम्हीं प्रथमत: धिम्मेपणानें खेळून नंतर गोलंदाजीचा यथास्थित समाचार घेण्यास सुरवात केली. नायडू यांनीं सुंदर टोलेबाजी करून प्रेक्षकांना खूष केलें. ६३ धांवा केल्यानंतर नायडू आउट झाले. मींही या डावांत ५९ धांवा केल्या. आमचे कॅप्टन ल्युकस यांनीं ६२ व गोडांबे यांनीं ४५ ( नाबाद ) धांवा केल्या. आमचा डाव ३०० धांवा केल्यानंतर संपला. यानंतर युरोपियनांचा समाचार घेण्याचें काम जोशी यांनीं यथास्थितपणें पार पाडलें. जोशीबुवांच्या या गोलंदाजीचें सिलोन टाइम्समध्यें " ऑथेंटिक " या टोपण नांवाखालीं प्रस्तुत सामन्यांतील अंपायरनें पुढील-प्रमाणें वर्णन केलें होतें,

" जोशी हे कावेबाज गोलंदाज असल्याचें आम्हीं ऐकलें होतें; पण इतकी त्यांची तयारी असेल ही मात्र आमची कल्पना नव्हती. चेंडू फेंकतांना मध्येंच गठडी वळल्यासारखी त्यांची तऱ्हा दिसते. पण ही त्यांची एक क्लृप्तिच म्हटली पाहिजे. ' चेंडू फेंकण्याची त्यांची पद्धति कांहीं सहजरम्य दिसत नाहीं, तेव्हां ते कांहीं विशेष चांगले गोलंदाज असणें शक्य नाहीं ' असें तुम्ही म्हणत आहां, तोंच असा एक चेंडू ते तुमच्यापुढें टाक-तील, कीं तुमची सारी मति गुंग होऊन जावी! कमिंग यांनीं जोशी यांच्या गोलंदाजीवर पहिले दोन तीन फटके चांगले मारले; नंतर एक चौकाराचाही फटका मारला. नंतर जोशी यांनीं " हा आणखीन् एक घ्या फटकावयाला " असेंच जणूं काय म्हणत पूर्वीसारखाच सोपा दिसणारा

आणखी एक चेंडू टाकला. कमिंग यांना वाटलें, चेंडू फटकावतां येईल आणि त्यांनीं आवेशानें बॅट फिरविली; पण काय,–चेंडू एक फूट अलीकडेच पडला आणि कमिंग चमकून धांदलीनें मागें उडी घ्यायला पाहतात तोंच कापडिया यांनीं बेल्स उडविलेल्याही त्यांना दिसल्या ! कमिंग व्यथित अंत:करणानें पण एक नवा धडा शिकून तंबूकडे परतले ! ”

जोशीबुवांनीं या सामन्यांत ६५ धांवांत आठ बळी घेतले. १६३ धांवांत युरोपियनांचा धुव्वा उडाला आणि त्यांना पुन्हां दुसरा डाव सुरू करावा लागला. या डावांतही १९९ पेक्षां त्यांना अधिक धांवा करतां आल्या नाहींत आणि अखेरीस ९ विकेट्सूनीं आम्हीं त्यांचा पराजय केला.

आमचा दुसरा सामना सिलोनीज संघाविरुद्ध झाला. यांतही मीं पहिल्या डावांत ५९ धांवा केल्या. या सामन्यांत आमच्या संघाचे ‘ दादा ’ वॉर्डन हे आमचे कॅप्टन होते व त्यांनीं पहिल्या डावांत शेवटीं जाऊन प्रेक्षणीय टोलेबाजी केली. त्यांनीं ४३ ( नाबाद ) धांवा केल्या. बोलिंगमध्येंही त्यांनीं आपल्या जुन्या कौशल्याची चुणुक दाखविली. महाले यांनींही या डावांत ४९ धांवा केल्या. पण दुसऱ्या डावांत मात्र आम्ही घसरलों, आणि पहिल्या डावांत २६९ पर्यंत जेथें मजल मारली होती, तेथें दुसऱ्या डावांत ९८ धांवांपलीकडे आम्हांला अधिक धांवा करितां आल्या नाहींत. पण पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणें आमचें क्षेत्ररक्षण चांगलें असतें, तर एवढ्याही धांवांत आम्हीं सिलोनीज संघाचा पराजय करूं शकलों असतों; पण ती बाजू लंगडी पडल्यामुळें हा सामना आम्हांला अनिर्णीत राहूं देण्यावरच समाधान मानावें लागलें.

### एक उल्लेखनीय प्रकार !

अखिल सिलोन संघाविरुद्ध झालेला आमचा तिसरा सामना आम्ही याच कारणामुळें ६ विकेट्सूनीं हरलों. तथापि सिलोनच्या या यशाचें बरेंच श्रेय त्यांचे दोघे युरोपियन बॅट्स्मन मेजर ब्रूक व ब्रिंडले यांच्या जोरदार बॅटिंगलाही दिलें पाहिजे. दुसऱ्या डावांत अडीच तासांत १९० धांवा सामना जिंकण्यासाठीं त्यांना करावयाच्या होत्या. त्या त्यांनीं फार दणकेबाज

टोलवाटोलवी करून खेळ संपण्यास दहा मिनिटें असतांना पुऱ्या केल्या! पण या सामन्यानें माझ्या स्मरणांत कायमचें स्थान मिळविलें आहे, तें त्या प्रसंगीं घडलेल्या एका विशेष प्रकारामुळें होय. सामन्याच्या आदल्या दिवशीं सायंकाळीं तामिळ युनियन या क्लबानें आमच्या सन्मानार्थ उपाहार दिला. या उपाहारप्रसंगीं यजमान मंडळीच्या आग्रहावरून शिष्टाचाराचा भंग होऊं नये म्हणून थोडें मादक पेय मीं घेतलें. तें पेय दोन तऱ्हेच्या पेयांचें मिश्रण होतें, आणि तें घेतल्यानंतर त्याचा परिणाम असा चमत्कारिक झाला, कीं माझी शुद्धबुद्धच जवळ जवळ हरपून गेल्यासारखी झाली. सकाळीं उठलों, तों डोकें इतकें भणभणूं लागलें कीं उभें राहणेंही मुष्कीलीचें वाटूं लागलें. साडेदहा वाजतां सामना सुरू व्हावयाचा आणि तोही दौऱ्यांतला सर्वांत महत्त्वाचा सामना! या सामन्यांत मीं भाग घेऊं शकलों नसतों, तर इतक्या लांबवर येऊन सर्वांचीच निराशा केल्यासारखें झालें असतें आणि माझ्या स्वतःच्या दृष्टीनें तर तो अतिशय नामुष्कीचाच प्रसंग ठरला असता. छेः, कांहीं झालें तरी आज खेळलेंच पाहिजे, असा विचार करून तशाच स्थितींत क्रीडांगणावर तर गेलोंच. मि. ल्युकस यांनीं येऊन माझी चौकशी केली. मला बरें वाटत नाहीं हें त्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें आणि मीं खेळूं शकेन कीं नाहीं अशीही शंका त्यांना वाटूं लागली. तथापि मीं त्यांना चापून सांगितलें कीं मीं आज खेळणारच आहें. मला तसेंच स्वस्थ पडण्यास सांगून ते निघून गेले. कर्मधर्मसंयोगानें त्यांनींच पुन्हां त्या दिवशीं टॉस जिंकला आणि बॅटिंग घेतलें. खेळाला आरंभ झाला. आमची पहिली जोडी परदेशी व बी. ई. कापडिया यांनीं डावाला सुरवात छानच केली. पण खेळाकडे माझें लक्षच नव्हतें; क्रीडांगणाकडे पाहिलें कीं डोळ्यांपुढें सारा नुस्ता प्रखर चकचकाट दिसावयाचा! मीं अशा या अवस्थेंत खेळूं शकणार कसा, हाच एक विचार माझ्या मनांत सारखा राहून राहून येत होता. मध्येंच टाळ्यांचा कडकडाट झाला; म्हणून मीं डोळे उघडले; तों नायडू यांनीं एक जंगी सिक्सर लगावल्याचें कळलें. हा वेळपर्यंत कापडिया उतावीळपणें रनआउट होऊन आले होते, महाले झेल उडून परतले होते आणि परदेशी यांचा सेनारत्न यांनीं त्रिफळा उडविला होता. वझिफदार आणि नायडू खेळत होते; नायडूंच्या फटक्यागणिक होणारा टाळ्यांचा

कडकडाट ऐकून मला समाधान वाटत होतें; पण एकापरी स्वतःच्या परिस्थितीमुळें विषादही वाटूं लागला. मीं माझी जबाबदारी विसरलों हा विचार पुन्हां मनांत आला. चवथ्या अनुक्रमाला मी खेळावयास येणार, अशी प्रेक्षकांची अपेक्षा होती. पण चवथा तर मीं गेलों नाहींच; पण पांचव्या आणि सहाव्या अनुक्रमालाही जाऊं शकलों नाहीं. नायडू ४३ धांवा करून परतले आणि गोडांबे हे खेळावयास निघाले. त्यांना मीं म्हटलें, 'लंचपर्यंत वेळ काढा, मग मीं आहेंच तयार !' पण दुर्दैवानें वझिफदार यांचा तितक्यांतच मिडऑफवर झेल उडाला. आणि ल्युकस यांनीं मला खेळावयास जाऊं शकतां का, म्हणून विचारणा केली. मीं तत्काळ होकार दिला. बॅट उचलली आणि क्रीडांगणावर उतरलों. कांहींही होवो, खेळलें हें पाहिजेच याच एका निर्धारानें मीं गेलों होतों; चार पांच फटके मीं चापून मारले खरे, पण लंचपर्यंतचा वेळ कसा काढला, हें माझें मलाच समजलें नाहीं ! लंचच्या वेळीं आम्ही पॅव्हिलियनमध्यें परत आलों, त्या वेळीं आमच्या ६ खेळाडू बाद १६० धांवा झाल्या होत्या आणि मीं आणि फली कापडिया खेळत होतों.

## अपुरें राहिलेलें शतक

लंचच्या अवधींत इतर खेळाडूंचा उपाहार चालला होता, तर माझ्यावर डॉक्टरांचे उपचार चालले होते ! या उपचारानंतर मात्र मला पुष्कळच बरें वाटलें; आणि लंचनंतर मीं क्रीडांगणावर उतरलों, तो पूर्वीहून बऱ्याच वेगळ्या स्थितींत ! जातांक्षणींच पहिल्याच ओव्हरमध्यें मीं दोन सणसणीत 'बाउंड्स्' मारल्या. सेनारत्न यांच्या त्या पहिल्याच ओव्हरमध्यें दहा धांवा मीं केल्या. त्यानंतर केलार्ट, ग्रेसवेल याही प्रमुख सिलोनी गोलंदाजांची तशीच गत केली. जणूं एक प्रकारचा आवेशच मला चढला होता. बोलर्स बदलत होते; पण कोणाचीही तमा मी राखीत नव्हतों. तसा धडाक्याचा खेळ आयुष्यांत मीं फारच थोड्या वेळां खेळलों असेन. माझे जोडीदार फली कापडिया हेही मधून मधून सणसणीत फटके मारीत होते. ते आउट झाल्यानंतर ल्युकस आले; त्यांनीं मला पाठिंबा देण्याचेंच धोरण ठेविलें



## एम्. सी. सी. विरुद्ध झुंज !

सिलोनच्या आमच्या दौऱ्यानंतर त्याच वर्षी म्हणजे १९२६ सालींच एम्. सी. सी. विरुद्ध खेळण्याची संधि आम्हांला मिळाली. अकरा सालच्या हिंदी संघाच्या विलायतेंतील दौऱ्यानंतर विलायतेंतील अग्रगण्य क्रिकेटपटूंच्या संघाशीं हिंदी खेळाडूंची गांठ पडण्याचा योग अनेक वर्षें जमून आला नव्हता. त्यामुळें हिंदी क्रिकेटची या पंधरा वर्षांत कितपत प्रगति झाली याची कांहींच कसोटी लागूं शकली नव्हती. एम्. सी. सी.चा हा दौरा या दृष्टीनें महत्त्वाचा तर होताच; पण शिवाय एम्. सी. सी.चा हिंदुस्थानांतील हा पहिलाच दौरा असल्यामुळें त्यामुळेंही क्रिकेटप्रेमी जनतेंत या दौऱ्यानें फार कुतूहल निर्माण केलें होतें. हा दौरा कलकत्ता क्रिकेट क्लबच्या खटपटीनें निघाला होता. सध्यांसारखें अधिकृत असें क्रिकेट कंट्रोल बोर्ड त्या वेळीं

नव्हतें. त्यामुळें हा दौरा 'अधिकृत' सदरांत पडूं शकत नव्हता. या एम्. सी. सी. संघांतून त्या वेळचे पहिल्या रांकेंतील इंग्लिश क्रिकेटर हॅाब्स, सटक्लिफ, वुली, हेन्ड्रेन, किल्नेर हेही येऊं शकले नाहींत; पण तरी देखील हा संघ चांगलाच प्रबळ होता. विशेषत: बोलिंग व क्षेत्ररक्षण या दोन्ही अंगांत हा संघ श्रेष्ठ प्रतीचाच होता. टेट, गेअरी, हे जलदगति गोलंदाज, ब्राइस, ॲस्टिल, मर्सर हे स्पिन गोलंदाज, व शिवाय स्वत: संघाचे कॅप्टन गिलिगन व वॅट, पार्सन्स हे इतर बदली गोलंदाज यांमुळें संघाच्या गोलंदाजीमध्यें विविधता चांगली होती. बॅट्स्मनमध्यें वॅट, सँडहॅम, पार्सन्स, हे त्यांचे भरंवशाचे बॅट्स्मन चिवट व बचावाच्या खेळामुळें हुकमी स्कोअर करून जात !

"आम्हीं खेळतों खेळासाठीं"

आमच्या व त्यांच्या खेळांतील फरकाबाबत एम्. सी. सी.चे कॅप्टन गिलिगन यांच्याशीं माझें एकदां बोलणें झालें होतें; त्या प्रसंगीं, हिंदी खेळाडू सर्वसामान्य क्रिकेटमध्यें, विशेषत: या धिम्मेपणाऱ्या खेळांत कच्चे असल्याचा शेरा त्यांनीं बोलतां बोलतां मारला. मीं त्यांना त्यावर लागलीच प्रत्युत्तर केलें, "आम्ही कांहीं बाबतींत कच्चे असूं; पण आम्ही तुमच्याइतक्या धांवा कशाही पद्धतीनें होईना, पण करूं शकतों, हें तुमच्या प्रत्ययाला आलेंच आहे ना ! आमच्या आणि तुमच्या खेळाडूंमधील मोठा फरक माझ्या मतें हा आहे कीं आम्हीं खेळतों तें केवळ खेळासाठीं–खेळांतील मौजेसाठीं, त्यांतील रंजकतेसाठीं. तुमच्या खेळाडूंनीं त्यांत धंद्याचें तत्त्व आणलें आहे; दिवसन् दिवस खेळत राहायचा अभ्यास त्यांना ठेवणें प्राप्तच आहे. स्वाभाविकच आमच्या व तुमच्या खेळांत हा असा फरक दिसला तर त्यांत कांहीं नवल वाटावयास नको !" गिलिगन यांना माझे हे निर्भीड उद्गार कांहींसे लागल्यासारखे दिसले. कारण त्यांनीं ताबडतोब तो विषय बदलूनच टाकला !

एम्. सी. सी. संघाविरुद्ध मीं पहिला सामना खेळलों, तो अजमीर येथें राजपुताना व बी. बी. सी.आय्. रेल्वे क्रिकेट क्लब यांच्या संयुक्त संघांतून. हा

सामना ता. २२–२३ नोव्हेंबर रोजीं झाला आणि त्यानंतर डिसेंबरमध्यें एम्. सी. सी. संघ मुंबईला आला, तो सुमारें तीन आठवडे मुंबईतच होता. अजमीरच्या सामन्यांत दुसऱ्या डावांत मीं ३१ (नाबाद) धांवा केल्या आणि त्या डावांत चार खेळाडू बाद १२६ धांवा झाल्यावर वेळ संपल्यामुळें सामना अनिर्णीत राहिला. पहिल्या डावांत आमच्या १५५ धांवा झाल्या होत्या. आणि एम्. सी. सी. नें २८६ धांवा केल्या होत्या. एम्. सी. सी. संघाचे आमच्या निवडक संघांशीं जे महत्त्वाचे सामने झाले, ते पुष्कळसे अनिर्णीतच राहिले आणि आमच्या संघाची निर्णयात्मक रीतीनें पुरी कसोटी लागण्याचा योग बहुधा आलाच नाहीं. मुंबईमध्यें ह्या संघाचे एकंदर पांच सामने झाले; त्यांपैकीं हिंदूंविरुद्ध झालेला सामना, हिंदु-मुसलमान संयुक्त संघाविरुद्ध झालेला सामना व अखिल भारत संघाचा सामना, हे तीन्ही सामने अनिर्णीत राहिले. यांपैकीं पहिल्या दोन सामन्यांमध्यें हिंदूंचें व हिंदु-मुसलमान संयुक्त संघाचें नेतृत्व माझ्याकडेच होतें आणि अखिल भारत संघाचें नेतृत्व कर्नल मिस्त्री यांजकडे सोंपविण्यांत आलें होतें. पहिल्या दोन सामन्यांत मीं दहांपलीकडे अधिक धांवा करूं न शकल्यामुळें या तिसऱ्या सामन्यांत खेळण्याची माझी साहजिकच फार इच्छा होती. माझा या संघांत समावेशही झाला होता; पण अजमीरहून सामना खेळून आल्यानंतर सर्दीच्या विकारानें मीं थोडासा आजारी झालों होतों, तो आजार पूर्वोक्त दोन सामन्यांतील श्रमांमुळें अधिक बळावला आणि अखिल भारत संघाचा सामना सुरू होण्याच्या आदल्या दिवशींच मला सडकून ताप येऊन सामना खेळणें अशक्यच झालें. आजारामुळें मला सामना खेळतां येत नाहीं असें पत्र मीं निवड समितीच्या अधिकाऱ्यांकडे पाठवून दिलें, तें त्यांना सामन्याच्या दिवशीं सकाळीं मिळालें. पण या विलंबामुळें गांवांत भलत्याच कांहीं अफवा उठल्याचें मला नंतर समजून आलें! हिंदु-मुसलमान संघाच्या सामन्यांत घडलेल्या नायडू प्रकरणामुळें (या प्रकरणाची हकीकत पूर्वी एकदां येऊन गेली आहेच.) मी खेळत नाहीं अशी एक वदंता उठली, तर दुसऱ्या वदंतेंत संघनायकत्व मला न देण्यांत आल्यामुळें मी खेळावयास तयार नाहीं, असाच आरोप माझ्यावर करण्यांत आला. ह्या दोन्ही अफवा अर्थात्‌च हास्यास्पद स्वरूपाच्या होत्या. पण त्यामुळें माझ्याविषयीं गैरसमज होऊं नये

म्हणून वृत्तपत्रांतून मला याबाबत खुलासा करणें भाग झालें आणि या खुलाशाद्वारें माझ्या अनुपस्थितीचें खरें कारण मीं जाहीर केलें.

नायडू–देवधरांचा पराक्रम

या अखिल भारत सामन्यासाठीं जो संघ निवडण्यांत आला होता, त्यांत प्रो. देवधर यांना प्रथम राखीव खेळाडूचें स्थान देण्यांत आलें होतें; कारण पहिल्या दोन सामन्यांत तेही पंचवीस धांवांपेक्षां अधिक धांवा करूं शकले नव्हते. अर्थात् ही मोठीच चूक घडत होती. कर्मधर्मसंयोगानें मीं खेळू न शकल्यामुळें देवधरांचा संघांत समावेश झाला आणि त्यांच्यासारख्या बॅटस्मनला वगळण्यांत केवढी घोडचूक होत होती हें या सामन्यानंतर सर्वांनाच कळून चुकलें. देवधरांनीं या सामन्यांत फारच सुंदर खेळ करून १४८ धांवा केल्या व हिंदी संघाच्या धांवांचा आंकडा एम्. सी. सी. पेक्षां पाउणशेंनीं अधिक वाढविण्यास मदत केली. देवधर पांचव्या अनुक्रमाला खेळण्यास आले आणि कर्नल मिस्त्री व जमशेदजी यांच्या जोडीला खेळून त्यांनीं ऐन आणीबाणीच्या वेळीं संघाची बाजू सांवरून तर धरलीच; पण उलट बाजूवर मात करण्याचें श्रेय घेतलें. जमशेदजी यांच्या जोडीनें त्यांनीं ६६ धांवा केल्या, त्यांतल्या ६३ धांवा त्यांच्या स्वतःच्याच होत्या. आणि त्यांत त्यांनीं एक 'सिक्सर'ही मारली होती. देवधरांखेरीज नवलेही या सामन्यांत फार चांगले खेळले आणि त्यांनी ७४ धांवा केल्या. एम्. सी. सी.च्या पहिल्या डावांत ३६२ धांवा झाल्या होत्या. दुसऱ्या डावांत रामजी यांनीं त्यांचे ३२ धांवांत ४ खेळाडू बाद करून त्यांच्यावर कठीण प्रसंग आणला होता. पण वेळ संपून सामना अनिर्णीत ठेवावा लागला आणि एम्. सी. सी. वर मात करण्याचा एक मोका या रीतीनें फुकट गेला!

एम्. सी. सी. विरुद्ध मुंबईमध्यें दुसरा संस्मरणीय खेळ झाला तो नायडूंचा! हिंदु विरुद्ध एम्. सी. सी. असा हा सामना होता आणि मुंबई-तील एम्. सी. सी.च्या प्रारंभींच्याच सामन्यांपैकीं हा सामना होता. एम्. सी. सी.तर्फे जी. एफ्. अर्ले यांनीं या सामन्यांत सातव्या अनुक्रमाला येऊन बरीच टोलवाटोलवी करून १३० धांवा केल्या. अर्ले यांनीं नऊ 'सिक्सर्स'चे फटके मारले. नायडूंनीं आमच्या डावांत त्यांच्यापेक्षांही जबरदस्त व

धडाक्याची टोलेबाजी करून १५३ धांवा केल्या. दोन तासांच्या अवधींतच त्यांनीं ह्या धांवा केल्या होत्या आणि त्यांत ११ सिक्सर्स त्यांनीं मारल्या होत्या. हिंदुस्थानांत तरी हा अभूतपूर्व विक्रमच होता. त्या दिवशींसारखा नायडूंचा आवेशपूर्ण खेळ फारच थोडया वेळां पाहावयास मिळाला असेल ! टेट, वॅट, बॉइस, मर्सर, साऱ्यांना त्यांनीं झोडपून काढलें. गोडांबे यांनीं त्यांना त्या प्रसंगीं चांगलाच पाठिंबा दिला. एम्. सी. सी. च्या ३९३ धांवा झाल्या होत्या. त्यापेक्षां आमच्या ७ च धांवा कमी झाल्या आणि दुसऱ्या डावाला पुरती सुरुवात होण्यापूर्वींच सामन्याचा तीन दिवसांचा अवधि संपून हाही सामना अनिर्णीत ठेवावा लागला. नायडूंना या सामन्यांतील त्यांच्या विक्रमाबद्दल हिंदु जिमखान्यानें एक मोटार बाइक साइडकारसहित पारितोषिकादाखल देऊन त्यांचें अभिनंदन केलें. यानंतरच्या हिंदु मुसलमान संयुक्त संघाच्या सामन्यांत आम्हीं पहिल्यांदा बॅटिंग घेतलें होतें. एम्. सी. सी. नें या डावांत आमच्यापेक्षां सुमारें १००–१५० नीं अधिक धांवा केल्या. पण याही सामन्याचा निकाल लागूं शकला नाहीं. जय व वझिरअल्ली हे या सामन्यांत चांगले विश्वासानें खेळले. जय यांनीं तीन्हो सामन्यांत आपलें कर्तृत्व सातत्यानें प्रकट केलें. वझिरअल्ली यांनींही मुंबईखेरीज इतर ठिकाणीं एम्. सी. सी. विरुद्ध यशस्वीपणें खेळून दोन शतकें केलीं. मुंबईंत एकंदरींत एम. सी. सी. ला चांगलीच झुंज मिळाली !

अवमानाचा प्रसंग

एम्. सी. सी. च्या या संघाशीं अजमीर व मुंबईतील सामन्यांखेरीज माझा आणखी एकदां संबंध आला, तो कलकत्ता येथील सामन्यांत होय. आणि आयुष्यांतील एकच एक अवमानाचा प्रसंग म्हणून हें प्रकरण माझ्या चांगलें लक्षांत राहिलें आहे. एम्. सी. सी. संघाचा हा दौरा कलकत्त्याच्या कलकत्ता क्रिकेट क्लब या युरोपियन क्लबानें आंखला होता, हें वर सांगितलेंच आहे. कलकत्ता येथें खेळावयाच्या सामन्यांपैकीं एम्. सी.सी.चा एक सामना अखिल भारत क्रिकेट संघाशीं व्हावा असें सुरुवातीला ठरलें होतें व तसें जाहीरही करण्यांत आलें होतें. जानेवारी महिन्यांत पहिल्याच आठवडयांत हा सामना व्हावयाचा होता आणि ह्या सामन्यांतून खेळण्यासाठीं

सुमारें महिनाभर पूर्वीच मला निमंत्रण मिळालें होतें. या निमंत्रणांत असे स्पष्ट शब्द होते कीं


*We will only be too glad to have you in the team as the Calcutta public is eager to see you perform against the M. C. C."*

हें निमंत्रण मिळाल्यानंतर त्यांत कांहीं फरक करण्यांत आल्याचें मला कांहींच कळविण्यांत आलें नव्हतें. अशींच निमंत्रणें नायडू, जमशेदजी, नाझीरअल्ली यांनाही गेलीं होतीं. याखेरीज वझिरअल्ली यांनाही आयत्या वेळीं निमंत्रण मिळालें. वरील निमंत्रणाप्रमाणें, सामन्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं कलकत्त्याला पोंचतां येईल अशा बेतानें मीं आणि जमशेदजी असे उभयतां मुंबईहून निघालों. कलकत्त्यास पोंचल्यावर विस्मयाचा मला मोठाच धक्का बसला. कारण क्लबच्या अधिकाऱ्यांकडून मला असें कळविण्यांत आलें कीं माझी निवड या संघांत झालेलीच नाहीं ! हा जो संघ निवडण्यांत आला होता, त्या संघांत कलकत्त्याच्या युरोपियन खेळाडूंचाच अधिक भरणा करण्यांत आला होता. सात युरोपियन व चार हिंदी असे खेळाडू त्यांत समाविष्ट करण्यांत आले होते; म्हणजे हिंदी खेळाडू केवळ पुरवणीखातरच-संघाचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं घेतले होते ! असा हा संघ अखिल भारतीय संघ म्हणून खपविण्यांत यावा हें अर्थातच गैर होतें आणि क्लबाला तसा कांहींच अधिकार नव्हता. मला ज्या वेळीं माझ्या निवडीसंबंधांत नकारात्मक उत्तर देण्यांत आलें, त्यावेळीं हाच मुद्दा मीं क्लबाच्या अधिकाऱ्यांपुढें मांडून माझा निषेध व्यक्त केला. यावर मग अधिकाऱ्यांनीं मला असें सांगितलें कीं सदर सामना एम्. सी. सी. विरुद्ध " अनधिकृत टेस्ट " स्वरूपाचा सामना व्हावा असें प्रथम ठरविलें होतें, तरी मागाहून कलकत्ता क्लबनें निवडलेल्या प्रातिनिधिक संघाचाच हा सामना व्हावा, असा बदल करण्यांत आला असून त्याप्रमाणें ह्या सामन्यांतील खेळाडूंची निवड केली आहे. हें समर्थन अर्थातच लंगडें आणि असमाधानकारकच होतें आणि त्यामुळें कलकत्त्याच्या स्थानिक क्लबच्या अधिकाऱ्यांवर फार टीकाही झाली. या टीकेला ' इंग्लिशमन ' या पत्रांत मि. होझी यांनीं वरीलप्रमाणेंच संघाच्या निवडीबाबतचें स्पष्टीकरण

करून सदर सामना ' अनधिकृत टेस्ट ' म्हणून खेळण्यांत येत नाहीं असें जाहीर केलें; पण याबाबत अधिक खुलासा करतांना त्यांनीं असेंही म्हटलें होतें कीं *"It is no part of the M. C. C. programme that the same players should follow the visitors round India in the hope of inclusion in other teams to the exclusion of the local players."* या उद्गारांचा रोख मुख्यतः माझ्याविरूद्धच होता. कारण निमंत्रित हिंदी खेळाडूंपैकीं मलाच वगळण्यांत आलें होतें. पण खरोखरीं पाहतां माझ्याविरूद्ध केलेला हा आरोप मूर्खपणाचाच होता. कारण अजमीरखेरीज मीं इतरत्र एम्. सी. सी. विरुद्ध कोठेंच खेळावयास गेलों नव्हतों आणि तेथेंही खेळलों तो बी. बी. सी. आय्. रेल्वे क्लबचा प्रमुख खेळाडू म्हणूनच. मुंबईला प्रमुख स्थानिक खेळाडू म्हणून माझा एम्. सी. सी. विरुद्ध खेळण्याचा हक्क वरील फतव्याप्रमाणें प्रस्थापित होत होताच. यामुळें वरील आरोपाला मी कोणत्याही प्रकारें पात्र ठरत नव्हतों. ज्यांच्याविरूद्ध असा आरोप करण्यास किंचित् जागा मिळूं शकली असती, त्या नायडू, नाझिर, वझिरअल्लींचा समावेश या क्लबच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या संघांत केलाच होता! आणि हें कसेंही असलें, तरी नांवाजलेल्या खेळाडूंना ठिकठिकाणीं जीं निमंत्रणें मिळत होतीं, व मिळत असतात, तीं प्रेक्षकांच्या दृष्टीनें सामन्यांत आकर्षण निर्माण करण्याकरितां व ' गेट मनी 'वर दृष्टि ठेवूनच नव्हे का? मला आलेल्या निमंत्रणपत्रांतील ज्या ओळी मीं वर उद्धृत केल्या आहेत, त्यांत ह्या सर्व गोष्टींचा उल्लेखच आहे. अशी सारी परिस्थिति असतांना होझी यांच्यासारख्या खेळाडूनें दुसऱ्या एका खेळाडूवर वरील प्रकारचा आरोप करण्यास सरसावावें हें त्यांच्या खेळाडू वृत्तीला साजेसें खासच नव्हतें.

माझा हा अपमान झाल्यानंतर जमशेदजी यांनीं या अपमानाच्या निषेधार्थ आपली न खेळण्याची तयारी दर्शविली, पण माझ्यामुळें त्यांचें नुकसान होऊं नये म्हणून मीं त्यांना सदर सामन्यांत खेळण्याचाच सल्ला दिला. पण त्यांनाही अपमान करून घेण्याचा प्रसंग शेवटीं आलाच! क्लबाच्या तर्फें एम्. सी. सी.ला मेजवानी देण्यांत आली, त्यांतून या चार हिंदी खेळाडूंना अचूक वगळण्यांत आलें! कलकत्त्याच्या युरोपियन खेळाडूंनीं वर्णद्वेषाचें

हें असें प्रदर्शन केलें, आणि एम्. सी. सी. चे कॅप्टन गिलिगन यांनींही या प्रकाराची दखलगिरी घेण्याचें आपलें कर्तव्य पाळण्यांत कसूर करून अप्रत्यक्ष-पणें त्याला हातभार लावला. कलकत्ता क्रिकेट क्लबचें हें सारेंच वर्तन क्षोभकारक होतें. एम्. सी. सी. संघाच्या दौऱ्याचा कार्यक्रम आंखतांनाही बहुतेक ठिकाणीं तेथील स्थानिक युरोपियन खेळाडूंच्या संघांविरुद्ध सामने ठेवण्याची जी हौस त्यांनीं भागवून घेतली होती, त्यावरून हा संघ हिंदी क्रिकेटच्या व खेळाडूंच्या प्रगतीखातर खरोखरी आणविण्यांत आला होता, कीं हिंदुस्थानांतील युरोपियन खेळाडूंची हौस पुरविण्याखातर आला होता, अशी शंका एकाद्याला उत्पन्न झाल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें! या एम्. सी. सी. संघाच्या दौऱ्याच्या साऱ्या बनावावरून हिंदुस्थानांत एकादें जबाबदार व हिंदी हिताला जपणारें मध्यवर्ति क्रिकेट कंट्रोल बोर्ड असण्याची आवश्यकता मात्र फार भासूं लागली आणि तशा स्वरूपाच्या योजनेला या गरजेमुळें चालना मिळाली, हाच एम्. सी. सी. च्या या दौऱ्याचा एक मोठा फायदा झाला असें म्हणतां येईल !



## आमचं अवगुण !

हिंदी क्रिकेटला आज जाणवत असलेला एक मोठा अवगुण म्हणजे शिथिल क्षेत्ररक्षण. याबाबत मीं यापूर्वी जेथें जेथें या दोषाचा संबंध आला त्या त्या ठिकाणीं या दोषावर मुद्दामच अधिक भर दिला आहे. बॅटिंग व बोलिंग ह्यांच्याप्रमाणें क्षेत्ररक्षणांतील गुणाची वा दोषाची आंकड्यांनीं मोजदाद होत नाहीं. कुणी किती झेल सोडले व ढिलाईमुळें किती धांवा दिल्या हें रेकॉर्डवर राहत नाहीं. यामुळें क्षेत्ररक्षणाच्या ह्या अंगाला इतर दोन अंगांइतकेंच महत्त्व आहे, याची जाणीव खेळाडूला राहत नाहीं. पण बॅटिंग व बोलिंग यांमधील दोषांमुळें संघाची जितकी हानि होऊं शकते, त्यापेक्षांही क्षेत्ररक्षणाच्या दोषामुळें ती होऊं शकते असें अनेकवार अनुभवास आलें आहे. म्हणून मीं तर असेंच म्हणेन कीं कोणत्याही संघाची निवड करतेवेळीं खेळा-

डूच्या बॅटिंगबोलिंगमधील गुणाची चौकशी करतांना क्षेत्ररक्षणांत तो कुशल व चपल आहे कीं नाहीं याचा प्रथम विचार केला पाहिजे. बॅटिंग व बोलिंग या दोन अंगांप्रमाणेंच क्षेत्ररक्षणांतही पद्धतशीर अभ्यासाची गरज आहे याची माहिती अनेक नामवंत खेळाडूंनाही नसते. १९११ सालीं विलायतेस गेलेल्या हिंदी क्रिकेट संघासंबंधानें त्यावेळचे एक प्रसिद्ध इंग्लिश क्रिकेटपटु मि. आर. एच्. स्पूनर यांनीं पुढील अभिप्राय प्रकट केला होता, तो या आमच्या दोषाचा विचार करतांना आजही उल्लेखनीय आहे. मि. स्पूनर यांचा हा अभिप्राय असा होताः

" *Fielding—Poor. The stroke was never anticipated and the men were never on their toes. Most of them seemed good at bowling and picking the ball up,* <u>if it came to them.</u>"

वरील अभिप्रायांतील अधोरेखित शब्द विशेष लक्षांत घेण्यासारखे आहेत. बॅट्स्मननें मारलेला चेंडू आपल्याकडे आला तरच तो अडवावयाचा अशाच समजुतीनें आजही पुष्कळ नामवंत खेळाडूंचेंही क्षेत्ररक्षण चाललेलें असतें ! पण हाच तर आमच्या क्षेत्ररक्षकांचा एक मुख्य दोष होय. बॅट्स्मननें चेंडू फटकावला कीं त्याची दिशा चटकन् हेरून तो पकडण्यासाठीं पुढें धांव घेणें ही क्षेत्ररक्षणाच्या कलेंतील अत्यावश्यक बाब आहे. फटका कितीही जोराचा असो, तो आपल्याकडे येण्याची वाट न पाहतां त्याची गति खुंटविण्यासाठीं लगेच पुढें सरसावलेंच पाहिजे. चेंडू अडविणें, उचलणें व फेंकणें या क्रिया देखील पद्धतशीर व्हावयास हव्यात. चेंडू अडवितांना सरळ पाय जोडून उभें न राहतां उजवा पाय कांहींसा मागच्या बाजूला टाकून चेंडू झटकन् त्या बाजूला ओढून घेऊन तो उचलावयाचा आणि तीच पोझिशन कायम ठेवून तो फेकावयाचा अशी माझी स्वतःची पद्धति असे. या रीतीनें वेळेची बचत होते व चेंडू जलद उचलून फेकतां येतो. आमच्या बी. बी. सी. आय्. रेल्वे क्लबचे एक जुने कॅप्टन मि. रॅडक्लिफ् यांनीं क्लबामधील खेळाडूंना क्षेत्ररक्षणाबाबतच्या या हालचालींचें योग्य वळण लावण्यासाठीं एक खास सूचनापत्रकच काढलें

होतें. त्याचाही आम्हांला बराच उपयोग झाला. या पत्रकाच्या शेवटीं त्यांनीं, ‘क्षेत्ररक्षक हा आपल्या संघांतील गोलंदाजांचा विश्वास वाढवितो व याउलट विरोधी बाजूच्या बॅट्स्मनचा आत्मविश्वास कमी करूं शकतो,’ असें त्याच्या महत्त्वाचें वर्णन केलें होतें. संघाच्या झुंजींत क्षेत्ररक्षकाचें स्थान कोणतें व किती महत्त्वाचें असतें याची कल्पना यापेक्षां आणखी निराळी करून द्यावयास नकोच !

## सर्वसामान्य तयारी

आमच्या क्षेत्ररक्षणांतील दोषाचा अल्प निर्देश मीं वर केला. पण क्रिकेटरच्या या दोषांची व्याप्ति बॅटिंग, बोलिंग व क्षेत्ररक्षण या तीन्हींमधील दोषांचेंच आविष्करण करून केवळ संपत नाहीं. सर्वसामान्य म्हणूनही एक प्रकरण त्याला जोडायला हवें. लढाईंतील शिपाई सर्व शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असले कीं अर्थात्‌च ते अधिक परिणामकारक रीतीनें झुंज देऊं शकतात; तीच तऱ्हा आमच्याही या खेळाची आहे. क्रीडांगणावर उतरण्यापूर्वी खेळाडूनें आपल्या सर्व साधनांची परिपूर्ण तयारी ठेवावयाला हवी ! खेळाडूचा पोषाख, लेगगार्ड्‌स्, हातमोजे वगैरे त्याचें संरक्षक कवच, बॅट, बॉल वगैरे त्याचीं आयुधें या सर्व गोष्टींकडे लक्ष पुरविणें फार जरूरीचें असतें. ह्या गोष्टी कांहीं खेळाडूंना द्रव्याभावीं मिळवाव्या तशा मिळवितां येत नाहींत आणि कांहीं खेळाडू केवळ हलगर्जीपणानेंच त्यांकडे दुर्लक्ष करतात. पण या साधनसामग्रीबाबत थोडा खर्च झाला, तरी खेळांतील यशाच्या दृष्टीनें त्याचा जो फायदा होतो, त्याकडे लक्ष देऊन हा खर्च करणें अवश्यच आहे असाच मी याबाबत सल्ला देऊं शकेन. खेळाडूला खेळतांना उत्साह वाटला पाहिजे, लवकर दमल्यासारखें वाटतां कामा नये, त्याच्या हालचाली चपलतेनें व सहजतेनें झाल्या पाहिजेत, त्यांबाबत अवघडल्यासारखें अथवा जखडल्यासारखें त्याला होतां नये, या साऱ्या गोष्टी साधावयाच्या—आणि त्या साधणें खेळाडूला जरूरच आहे—तर या साधनसामग्रीबाबत सुसज्ज असण्याची त्यानें दक्षता घेतली पाहिजे. याबाबत क्रिकेट कंट्रोल बोर्डानें साऱ्या क्रिकेट असोसिएशन्सना खास सूचना देऊन खेळाडूचा पोषाख व इतर साहित्य योग्य असतें कीं नाहीं हें पाह-

ण्याची जबाबदारी त्यांजवर टाकलेली आहे. हा नियम खरोखरच उपयुक्त आणि दूरदर्शीपणाचाच आहे. या साधनसामुग्रीच्या बाबतींत थोडीशीही झालेली उपेक्षा पुष्कळदा हानिकारकच ठरते; इतकेंच नव्हे, पण साऱ्या खेळावर त्याचा परिणाम होऊं शकतो असाही अनुभव मला आलेला आहे.

'खिळा नाहीं म्हणून...'

'खिळा नाहीं म्हणून नाल गेला. नाल नाहीं म्हणून घोडा गेला, आणि घोडा नाहीं म्हणून शिपाई गमावला अन् शिपाई गमावला म्हणून लढाईही गमावली!' अशा अर्थाची एक प्रसिद्ध इंग्रजी म्हण आहे; या म्हणीचें प्रत्यंतर क्रिकेटच्या या खेळांतही येऊं शकतें. मला आठवतें, कीं एकदां एका महत्त्वाच्या सामन्यांत जय यांना त्यांच्या फाटक्या हातमोजां-मुळें याच तऱ्हेनें डाव गमावून परत फिरण्याची पाळी आली होती. हातमोजा थोडासाच फाटला होता, तेवढ्यावर चालवून नेतां येईल, बदलण्याचा त्रास कां घ्या, अशा विचारानें जय यांनीं त्याच हातमोजानें खेळ पुढें चालू ठेवला. पण त्या हातमोजानें त्यांना अखेरीस दगा दिलाच; मारलेला फटका लागावा तसा न लागतां झेल उडून ते बाद झाले! तो सामनाही आम्ही हरलों असें मला स्मरतें.

दुसऱ्या एका सामन्यांत प्रो. देवधरांच्या बुटाची खोटच एकाएकीं निखळून पडली होती! देवधर स्लिपमध्यें क्षेत्ररक्षण करीत होते; खोट बुटापासून विलग होऊन पडली याची कांहीं मिनिटें त्यांना दादही नव्हती, इतके ते आपल्या कामांत एकाग्र होऊन गेले होते. आजूबाजूच्या खेळाडूंना हास्याची उकळी कां फुटावी म्हणून, त्या सर्वांचे डोळे ज्या ठिकाणीं वळले होते, त्या ठिकाणीं मीं पाहिलें; पहातों तर देवधरांच्या बुटाचा हील! थोडासा विनोदाचाच प्रकार झाला हा! या प्रकारा-मुळें खेळाची हानि कांहीं झाली नाहीं—आपल्या पायांजोगता बुटाचा दुसरा जोड मिळविण्याबाबत देवधरांना थोडी कोशीस पडली, तेवढीच—! पण यावरून, पायांतल्या बुटाखेरीज बुटांचा आणखी एकादा जोड आपल्यापाशीं तयार ठेवणें कसें जरूरीचें आहे याची कल्पना मात्र

खास येऊं शकेल. इतर पोषाखाबाबतही बाहेरच्या व आंतल्या कपड्यांच्या दोन दोन जोड्या असणें मोठ्या सामन्यांत तरी आवश्यकच आहे. क्रीडांगणावरील मेहनतीमुळें घामानें कपडे भिजून जातात, अंग चिकचिकल्यासारखें होतें व त्याचा त्रासही होतो. कपडे बदलले कीं तितकी हुशारी वाटते. या साध्या गोष्टी सकृद्दर्शनीं दिसावयाला क्षुल्लक दिसतात, पण त्यांचेंही महत्त्व परिणामाच्या दृष्टीनें फार असतें. हा इतका स्वतःचा बडेजाव कशाला माजवायला हवा असाही आक्षेप कांहींकांकडून येण्याचा संभव आहे; पूर्वी तर तो फार येत असे. त्या वेळीं कांहीं खेळाडू तुमान न घालतां धोतर, शर्ट असाच पेहेराव चढवून खेळत. पण हालचालींच्या सहजतेला व सुटसुटीतपणाला पँटशर्टचा अधिक उपयोग होतो हें कोणीही कबूल करील. आतां अर्थात्च तो जुना जमाना साराच मागें पडला आहे. परंतु एक उदाहरण म्हणून ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. कपड्याच्या दोन जोड्या ठेवणें व आपल्या इतर क्रिकेट साहित्यांत पूर्ण सुसज्जता राखणें यांत कसलाच बडेजाव नसून क्रिकेटच्या खेळाच्या या आवश्यक अशाच गोष्टी आहेत.

बॅटीची निवड

हातमोजे व लेगगार्ड्स् हीं दोन्हीं वापरतांना आपल्या हातापायांना तीं नीट बसतील अशाच मोजमापाचीं निवडून काढावीं. त्यामुळें अवघडल्यासारखें वाटतां नये आणि आपल्या हालचालींच्या सहजतेंत कोणत्याही रीतीनें व्यत्यय येतां नये, हा हेतु ही निवड करतांना लक्षांत ठेवला पाहिजे. हें साहित्य शक्य तों स्वतःचेंच असणें उत्तम. आमच्या अमदानींत आम्हाला हें साहित्य जिमखान्याकडून फारसें चांगलें मिळूंच शकत नसे. त्यामुळें आम्हां खेळाडूंना आमचें स्वतःचें सर्व साहित्य बरोबर घेऊन येणें सक्तीनें भागच पडे! पुढें पुढें हिंदु जिमखान्यानें हिंदुस्थानांत तयार झालेलें कॅनव्हास गार्ड्स् खेळाडूंच्या वापराकरितां दिले होते. पण आम्ही वापरीत असलेल्या बकस्किन गार्ड्स्पेक्षां हे कॅनव्हास लेगगार्ड्स् बोजड व हलक्या प्रतीचेच होते; त्यांच्यामुळें फायदा होण्यापेक्षां तोटाच होण्याची भीति अधिक! प्रसिद्ध इंग्लिश बॅट्समन हॉब्स यानें दिलेल्या नमुन्याबरहुकुम

हॉब्स गार्ड्स् व हॉब्स ग्लव्हज् तयार करण्यांत आले आहेत. सोय व सहजता या दृष्टींनीं ते श्रेष्ठ प्रतीचेच आहेत. अर्थात् त्यांचें मोलही तसेंच इतरांहून अधिक असल्यास त्यांत नवल नाहीं. लेगगार्ड्स् स्वतःचे असावे हें सांगितल्यानंतर खेळाडूंची बॅटही स्वतःची असावी हें सांगणेंच नको! बॅटीचीही निवड करतांना आपल्याला सहजतेनें पेलतां येईल, अशीच बॅट घेणें युक्त होय. साधारणपणें बॅटचें वजन २ पौंड ४ औंस इतकें असतें. मी स्वतः दोन औंस कमी वजनाची म्हणजे २ पौंड २ औंस वजनाची बॅट वापरीत असें. बॅटीचें वजन सबंध पात्याला सर्व ठिकाणीं सारखेंच आहे किंवा नाहीं, हेंही पारखून घेणें अवश्य आहे. कांहीं बॅटी खालीं टोंकाकडे जड लागतात, तर कांहीं वरच्या बाजूला जड लागतात, आणि त्या सुलभपणें फिरवितां येत नाहींत. बॅट आपल्याला पेलतां येईल त्यापेक्षां किंचित् जड अशीच घ्यावी, असा बॅटीबाबतचा सर्वसाधारण नियम सांगतां येईल. स्वतःच्या उंचीप्रमाणेंही बॅटीची निवड करावी लागते. नायडू आणि बगोरिया किंवा आमच्या रेल्वे क्लबचे खेळाडू सी. एम्. राणा यांना सारखीच बॅट दिल्यास त्यांची स्थिति केविलवाणीच व्हायची! मीं स्वतः 'फुल हँडल' ची—अथवा भरपूर लांबीच्या मुठीची बॅट वापरीत असें. याउलट जय हे त्यांच्या मोईप्रमाणें 'शॉर्ट हँडल' बॅटीनें खेळत असतात. बॅटीला ऑइलिंग वगैरे करून ती सुस्थितींत ठेवण्याची खबरदारी घेणें हेंही फार अगत्याचेंच असतें हें सांगणें नकोच!

'गेट इन् क्रिकेट'

'गेट इन क्रिकेट' म्हणून इंग्लिश खेळाडू ज्या गुणाचा उल्लेख करतात व ज्यावर त्यांचा विशेष कटाक्ष असतो, तोही गुण आमचे खेळाडू अजूनही शिकले नाहींत असें म्हणणें प्राप्त आहे. खेळाडू क्रीडांगणावर उतरला कीं त्याचें एकंदर चालणें वागणें, टापटिपीचें, सफाईदार व शिस्तपूर्ण असलें पाहिजे. कांहीं बॅट्स्मन तंबूंतून क्रिझकडे येत असतांना उगाचच बॅट गरगर फिरवीत अथवा बॅटीनें भुई थोपटीत येत असतात. कांहींना पिचकन् थुंक-

ण्याची, तपकीर ओढण्याची किंवा वेडेंवाकडें चालण्याची संवय असते. कांहीं उगाचच थिल्लरपणा व टिवल्याबावल्या करीत असतात व आपण मोठी मौज करीत आहोंत असेंच त्यांना वाटत असतें. क्रिकेट हा खेळ खरा, पण त्यांतही शिस्त ही आहेच. लष्करी कवाईतीइतकी कडक शिस्त येथें कदाचित् नसेल; पण क्रीडांगणावरील चालण्या-वागण्यांतील शिस्तीचीं बंधनें खेळाडूनें अवश्य पाळावयास हवींत. क्रिकेटर म्हटला कीं तो तरतरीत, व्यवस्थित, चपळ, आणि क्रीडांगणावर असतांना खेळाकडेच सर्वस्वी लक्ष पुरविणारा असला पाहिजे. तसा तो नसेल, तर त्याच्या खेळांतही व्यत्यय येण्याचा संभव असतोच; पण शिवाय प्रेक्षक व इतर खेळाडू यांनाही त्याच्या-विषयीं आदरभाव राहत नाहीं. उमद्या खेळाडू वृत्तीला येथें वाव असला, तरी थिल्लरपणाला येथें बिलकुल थारा मिळतां कामा नये. क्रीडांगणावर सर्व खेळाडू आपापल्या कामांत अतिशय दक्ष असले पाहिजेत, किंबहुना त्याच कामीं त्यांची एकाग्रता झाली पाहिजे, तरच त्यांना त्यांच्या कामगिरींत यश येऊं शकेल. एकाग्रता, तत्परता या गुणांची बॅट्स्मन, गोलंदाज, क्षेत्ररक्षक व यष्टिरक्षक या सर्वांनाच सारखी गरज आहे. क्षेत्ररक्षक दक्ष नसेल तर एकादा झेल सुटून त्याचा परिणाम साराच सामना गमविण्यांतही केव्हां केव्हां होत असतो. तीच गोष्ट बॅट्स्मनची. बॅट्स्मन तंबूबाहेर पडला कीं त्याचें सारें लक्ष मुख्यत: गोलंदाजाच्या हातांतील चेंडूकडेच असलें पाहिजे. गोलंदाजानें चेंडू कोणत्या तऱ्हेनें धरला आहे, यावरून तो तो कोणत्या प्रकारें फेकणार आहे याची कल्पना येऊं शकते. दुसऱ्या एका छोट्याशाच पण बॅट्स्मनच्या दृष्टीनें फार महत्वाच्या गोष्टीचा उल्लेख येथें करावासा वाटतो. मीं तंबू-बाहेर बॅटिंगसाठीं ज्या ज्या वेळीं बाहेर पडत असें, त्या त्या वेळीं प्रथम क्षणैक सूर्याकडे नजर फेकावयाची अशी संवयच मीं लावून घेतली होती. माझी ही संवय कांहीं माझ्या मित्रांच्या लक्षांत येऊन ते चेष्टेनें मला म्हणत, "का हो, सूर्यनारायणाला वंदन करून त्याच्या कृपेची याचना करतां का?" मीं त्यांना हंसून म्हणें, "होय ना! सूर्यनारायण ही आपली देवताच आहे नव्हे का? त्यानें मला यश द्यावें अशी मीं प्रार्थना करतों." पण या भाविक हेतूखेरीज दुसराही एक हेतु माझ्या या कृतींत असे. तंबूत अथवा पॅव्हिलि-यनमध्यें म्हणा बसून राहिल्यामुळें बॅट्स्मनचे डोळे तेथील अपुऱ्या प्रकाशाला

सरावलेले असतात; क्रीडांगणावर उतरतांच एकदम चक्क प्रकाशांत त्याला यावें लागतें व त्याची डोळ्यांना चटकन् संवय होणें बॅट्स्मनला अत्यंत जरूरीचें असतें. सूर्याकडे अथवा आकाशाकडे क्षणैक दृष्टिक्षेप करण्यांत हाच माझा मुख्य हेतु असे. माझ्या या सूर्यवंदनानें माझा हा हेतु फलद्रूपही होत असे.

आमच्या बॅट्स्मनचा एक उल्लेखनीय दोष म्हणजे धांवा काढतांना उभयतां बॅट्स्मनमध्यें जो एकनिर्णय अथवा परस्पर–समजूत ( understanding) साधावयास पाहिजे, त्या निर्णयाच्या अभावाचा ! हें धांवणें असावें तितकें जलद असत नाहीं हें तर खरेंच ! पण धांव घ्यावयाची किंवा नाहीं, याबाबतची जी सूचना एका बॅट्स्मनकडून दुसऱ्याला दिली जाते, त्याबाबतही पुष्कळदां फार चुका केल्या जातात. 'नो, वेट,' 'यस्, वेट' अशा तऱ्हेच्या उद्गारांनींही पुष्कळ वेळा बॅट्स्मनचा घोटाळा व गैरसमजूत होत असते आणि दुसऱ्या बॅट्स्मनला निरर्थक रन्आउट होण्याची पाळी येते. ' वेट ' या गोंधळ करणाऱ्या शब्दाचा मुळींच उपयोग न करतां केवळ ' यस् ' किंवा ' नो ' या शब्दांवर भागवितां येण्यासारखें आहे. आणि एकदा एक जी सूचना दिली, तिलाच निश्चितपणें चिकटून राहण्यांत फायदाच आहे. अनिश्चितता किंवा संशयपूर्णता ठेवल्यानें समजुतीचा सर्वच घोटाळा उडून जातो. कांहीं बॅट्स्मन चांगला जोराचा फटका मारला तरी धांव घ्यावयाचें नाकारतात. ह्याही तऱ्हेचा अनुभव मला पुष्कळदां आला आहे. एकाद्या सामन्यांत तसाच अटीतटीचा प्रसंग येऊन बाजू सांवरण्याची जबाबदारी अंगावर पडलेल्या बॅट्स्मनला तसें धोरणाकरितां करावें लागत असेलही; पण इतर वेळीं असें न धांवण्याचें धोरण पत्करणें एकापरी स्वार्थीपणाचें तर ठरतेंच, पण जोडीदार–बॅट्स्मनचाही त्यामुळें अपेक्षाभंग होतो व क्वचित् त्यामुळें तो चिरडीसही जातो.

### आमचीं क्रीडांगणें

क्रीडांगणाची ही बाब खेळाडूंच्या यशापयशांत महत्त्वाची असते. क्रीडांगणाच्या स्वरूपाप्रमाणें खेळाडूंच्या खेळावरही परिणाम होत असतो. हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणीं मॅटिंग विकेट्सूवर खेळ चालत असतो. या

ठिकाणच्या बॅट्स्मनचा बचावाच्या खेळावर भर देण्याकडे कल असतो. आमच्याकडील कांहीं हिरवळीचीं क्रीडांगणें बरीच कठीण (Hard) करून ठेवलेलीं असतात. अशा क्रीडांगणावर खेळण्याची संवय असलेल्या बॅटस्मनला मृदु हिरवळीवर खेळण्याचा प्रसंग आला म्हणजे त्याची कांहींशी गडबडच उडून जाते. सिलोनच्या दौऱ्यावर गेलेल्या हिंदी खेळाडूंना पुष्कळदां हाच अनुभव आला आहे. येथील क्रिकेट क्लब ऑफ् इंडियाची ब्रेबर्न स्टेडियमची ग्राउंड आणि पुणें येथील पुना क्लबची ग्राउंड या दोन्हीही खूप खटपट करून तयार केल्या आहेत. ब्रेबर्न स्टेडियमचें क्रीडांगण तयार करण्याकरितां ऑस्ट्रेलियांतून खास तेथील हरळीचें बीं आणविण्यांत आलें होतें, असेंही ऐकिवांत आहे. वरील दोन्हींही क्रीडांगणें बॅट्स्मनला अनुकूल अशींच आहेत आणि गोलंदाजाचें काम तेथें कठीणच होऊन बसतें. डेनिस कॉम्प्टन या इंग्लिश क्रिकेटपटूनेंही आमच्या या क्रीडांगणाविषयीं हाच अभिप्राय प्रकट केल्याचें अनेकांनीं वाचलें असेल. हीं क्रीडांगणें बॅट्स्मनला तात्पुरतीं फायदेशीर वाटलीं, तरी त्यावरून त्याच्या खऱ्या खेळाची कसोटी लागत नाहीं, आणि यामुळें येथें खेळण्याची संवय झालेल्या बॅट्स्मनचा यामुळें एक प्रकारें तोटाच होतो. मुंबईतील महत्त्वाचे सामने पूर्वी ज्या क्रीडांगणावर होत, तें बॉम्बे जिमखान्याचें क्रीडांगण या दृष्टीनें अधिक सरस आहे. मुंबईतील हिंदु जिमखान्याचेंही क्रीडांगण फार चांगलें होतें. गोलंदाज व बॅट्स्मन दोघांनाही तेथें विकेटचा सारखाच फायदा मिळूं शकत असे. खेळाडूंचा खेळ सुधारण्यासाठीं अशाच क्रीडांगणाची आज फार जरूरी आहे. खेळांतील मौज व चुरस कायम राखण्यासाठींही अशींच क्रीडांगणें हवींत. बॅट्स्मनला आपल्या स्वतःच्या खेळाविषयीं भलत्याच मोठ्या कल्पना करून देणारीं ब्रेबर्न स्टेडियमसारखीं क्रीडांगणें हिंदी क्रिकेटची प्रगति घडवून आणण्यास उपयोगी पडणार नाहींत, हें येथें स्पष्ट सांगणें मला कर्तव्यच वाटतें.

आणखी एक महत्त्वाचा--अतिच महत्त्वाचा मुद्दा सांगायचा राहिला, तो संघभावनेचा. संघभावनेला क्रिकेटमध्यें अतिशयित महत्त्व आहे. स्वतःच्या खेळासाठीं अथवा लौकिकासाठीं तुम्ही खेळत नसून एकंदर संघाच्या

यशाकरितां खेळत आहां ही जाणीव खेळाडूनें सतत मनांत वागविली पाहिजे. बॅट्‌स्‌मन काय, गोलंदाज काय अथवा क्षेत्ररक्षक काय, साऱ्यांचेच हात संघाचें यश साधण्यास लागत असतात; त्यांत एकाद्यानें आपली कामगिरी योग्य रीतीनें बजावली नाहीं, किंवा वैयक्तिक लौकिकावरच दृष्टि ठेवून बजावण्याचें मनांत आणलें कीं इतर साऱ्या खेळाडूंच्या श्रमावर पाणी पडण्याचा प्रसंग येतो. या संघभावनेचें महत्त्व व्यक्तिशः खेळाडूनें तर ओळखलें पाहिजेच, पण खेळाडूंमध्यें ही भावना राखण्याची व त्या भावनेनें त्यांना राबवून घेण्याची जबाबदारी संघनायकांवरही बरीच असते.



## माझें संघनायकत्व

क्रिकेटसंबंधीं कोणाही तिऱ्हाइताशीं गप्पा निघाल्या कीं तो एक ठराविक प्रश्न मला हटकून विचारीत असतो, " कॅप्टनच्या जागेची जबाबदारी पार पाडतांना तुम्हाला कोणते विशेष अनुभव आले ? " या विशेष अनुभवांपैकीं अनेक अनुभवांचा निर्देश आतांपर्यंतच्या प्रकरणांत येऊन गेलाच आहे. पण या अनुभवांची सांगण्यासारखी एक बाजू मात्र अद्याप राहिली आहे आणि ती म्हणजे संघांतील खेळाडू व कॅप्टन यांमधील परस्परसंबंधांची ! या बाबतींत सुरुवातीलाच मीं हें सांगूं इच्छितों कीं माझ्या नेतृत्वाखालीं जे जे खेळाडू खेळले, त्या सर्वांनीं मला उत्तम सहकार्य व पूर्ण पाठिंबाच दिला. क्वचित् एकादा मतभेदाचा प्रसंग एकाद्या खेळाडूशीं उपस्थित झाला असेलही; –आणि व्यक्ति तितक्या प्रकृति हा नियमच असल्यामुळें तसें न झालें तरच

आश्चर्य मानावें लागेल !–पण तशाही प्रसंगामुळें त्या खेळाडूच्या सहकार्यांत न्यूनता कधींच निर्माण झाली नाहीं! कॅप्टनला खेळाडूचें असें मनःपूर्वक सहकार्य लाभणें हें त्याचें एकापरी भाग्यच म्हणावें लागेल आणि हें भाग्य आमच्या संघांतील साऱ्याच खेळाडूंनीं मला लाभूं दिलें हें मीं येथें कृतज्ञता-पूर्वक सांगतों. नायडू, देवधर, जोशी, जय, गोडांबे, नवले, परदेशी, रामजी, वगैरे सर्वांनींच माझ्या साऱ्या योजनांत किंवा डावपेंचांत पूर्ण सह-कार्याचा मला हात दिला व मी जें कांहीं अल्पस्वल्प यश या कामगिरींत मिळवू शकलों, त्याचें बरेंचसें श्रेय या त्यांच्या सहकार्याला व संघभावनेलाच दिलें पाहिजे. हिंदु संघाखेरीज मुसलमान व पारशी खेळाडूंचेंही नेतृत्व स्वीकारण्याचा योग मला कांहीं वेळां आला आणि त्या वेळीं त्याही खेळाडूंनीं मला आदरपूर्वक सहकार्य दिलें. या सर्व सहकारी खेळाडूंचे मी या ठिकाणीं प्रकट हार्दिक आभार मानतों. या खेळाडूंखेरीज या बाबतींत माझे बंधु रा. बाळू यांच्याही मजवरील ऋणाचा अवश्य निर्देश केला पाहिजे. त्यांच्या सल्ल्याचा व सूचनांचा नेहमींच मला फायदा मिळत असे आणि त्यांचें खेळाविषयींचें सूक्ष्म ज्ञान माझ्या अनेकदां उपयोगीं पडत असे.

### एक महत्वाचा नियम

आपली कमींत कमी हानि होऊं देऊन जास्तींत जास्त फायदा पदरांत पाडून घेणें हा काटकसरीचा अथवा व्यवहारशास्त्राचा एक मोठा नियम सांगतां येईल. क्रिकेटच्या सामन्यांतही कॅप्टनला हाच नियम सतत डोळ्यांपुढें ठेवावा लागतो. क्षेत्ररक्षणाची व्यवस्था लावतांना, गोलंदाजांमध्यें बदल करतांना, बॅट्स्मनचा क्रम आंखतांना, या प्रत्येक बाबतींत हीच दृष्टि वापरावी लागते. क्षेत्ररक्षकांना निष्कारण अधिक श्रम पडूं न देण्याविषयीं दक्षता बाळगणें, गोलंदाजाच्या ताकदीपलीकडे त्याला राबवून घेण्याचें टाळणें, भलत्याच क्रमाला पाठवून बॅट्स्मनचा निरर्थक बळी न देण्याची खबरदारी बाळगणें इत्यादि बाबी कॅप्टनच्या प्राथमिक कर्तव्यांतीलच बाबी म्हणतां येतील; पण या प्राथमिक गोष्टींकडेही अनेक संघनायकांचें दुर्लक्ष झाल्याचें माझ्या पाहण्यांत आलें आहे. दर ओव्हरच्या समाप्तीवेळीं क्षेत्ररक्षकांनाही आपल्या जागा बदलाव्या लागतात; अशा वेळीं लॅगवर प्रथम ठेवलेल्या क्षेत्ररक्षकाला फिरून

दुसऱ्या बाजूकडेही लँगवर क्षेत्ररक्षणासाठीं पाठविणें फायदेशीर होणार नाहीं; एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत दर वेळीं जागा बदलण्याची पाळी आल्यामुळें खेळाडूचे श्रम निष्कारण वाढत राहतात; तो त्रासल्यासारखा होतो आणि थकून गेल्यामुळें नंतर बॅटिंग करतांना जरूर तितका जोम, आवेश, उत्साह त्याला कायम राखतां येत नाहीं. यासाठीं क्षेत्ररक्षकांना जागा नेमून देतांना व त्याला त्या बदलावयास लावतांना त्या हालचालींपायीं प्रत्येक वेळीं लांब पल्ल्याच्या फेऱ्या त्यांना माराव्या लागणार नाहींत, याकडे जरूर लक्ष पुरविलें पाहिजे. उदाहरणार्थ, लँगवरील क्षेत्ररक्षकाला ओव्हर संपली कीं पुन्हां दुसऱ्या बाजूकडे लँगवरच किंवा इतर लांबच्या ठिकाणीं न पाठवितां त्याला नजीक असलेल्या 'थर्ड मॅन' सारख्या जागेवर त्यानें राहावें अशी व्यवस्था नेमून दिल्यास खेळाडूचे पुष्कळ श्रम वांचवितां येतली. क्षेत्ररक्षणाच्या जागा नेमून देतांना बॅट्स्मनला आपला हेतु अथवा डावपेंच यांचा सुगावा लागूं न देण्याचीही खबरदारी शक्य तितकी घेतली पाहिजे. याकरितां हालचाली शक्य तों निमूटपणेंच झाल्या पाहिजेत. निष्कारण गडबड अथवा देखावा करण्यांत कांहींच अर्थ नसतो. बॅट्स्मनच्या नकळत एकाद्या विशिष्ट ठिकाणीं क्षेत्ररक्षकाची योजना करण्याचा डाव अनेकदां फार फायदेशीर ठरल्याचा अनुभव मला आला आहे. अर्थात् यासाठीं क्षेत्ररक्षकही तसेच पूर्ण सावधान आणि कॅप्टनचें मनोगत चटकन् उमगूं शकतील असे चलाख हवेत हें सांगावयास नकोच !

## गोलंदाज व कॅप्टन

गोलंदाजाचा उपयोग करून घेतांनाही वरील नियमाचेंच अवलंबन करणें जरूर असतें. गोलंदाज चांगला कुशल असला, तरीही त्याला तो पार दमून जाईपर्यंत राबवून घेण्यांत कांहींच फायदा न होतां उलट त्यामुळें हानिच होण्याचा संभव अधिक ! थकलेल्या गोलंदाजाला सुरुवातीइतक्याच कौशल्यानें गोलंदाजी करणें शक्य होत नाहीं. त्यामुळें बॅट्स्मनला निष्कारण धांवांचा अहेर केल्यासारखें तर होतेंच, पण गोलंदाजाची ताकद कायम राहिल्यास त्याचा पुढें जो उपयोग होण्यासारखा असतो, त्यालाही मुकावें लागतें आणि शिवाय अपेक्षाभंगामुळें गोलंदाजाला मानसिक ताप सहन करावा

लागतो तो निराळाच ! याकरितां गोलंदाजांना मधून मधून विश्रांति देण्याचें धोरण ठेवणें युक्त ठरतें. पण याउलट जरूरी भासत नसतांनाही गोलंदाजींत निष्कारण वारंवार बदल करीत राहणें हेही तितकेंच हानिकारक आहे. गोलंदाजाला आपलें कौशल्य प्रकट करण्याला पुरेशी संधि यामुळें मिळूं शकत नाहीं आणि तो त्यामुळें चिडल्यासारखाच होतो. संघनायक व गोलंदाज यांचीं कामें परस्पर सहकार्यानें व समजुतीनें चालणें फार अगत्याचेंच आहे. बॅट्स्मनला कोणत्या तऱ्हेनें लवकर आउट करतां येईल हें चटकन् उमगण्याची कुवत कॅप्टनच्या अंगीं असली पाहिजे आणि कोणत्या गोलंदाजाचा मारा बॅट्स्मनवर परिणामकारक ठरूं शकेल हें ओळखून त्याप्रमाणें गोलंदाजांची योजना त्यानें केली पाहिजे. पण अशी नुसती योजना केल्यानेंच त्याचें काम संपत नाहीं; पुष्कळ वेळां कोणत्या तऱ्हेनें व कोणत्या ठिकाणीं चेंडू अचूक फेकला म्हणजे बॅट्स्मन आउट होऊं शकेल, याबाबतच्या विशिष्ट सूचनाही गोलंदाजाला देणें अवश्य होत असतें; अर्थात् याबाबतचेंही पूर्ण ज्ञान कॅप्टनला असणें जरूरीचेंच आहे. चौरंगी सामन्यांपैकीं एका सामन्यांत गोडांबे हे एकदा गोलंदाजी करीत असतांना अशाच सूचना देणें अवश्य झालें होतें. गोडांबे यांनीं निरनिराळ्या प्रकारें चेंडू फेकून पाहिले, पण बॅट्स्मन आउट होण्याचा रंग दिसेना. शेवटीं गोडांबे यांनीं स्वतःच आपली गोलंदाजी बदलावी अशी सूचना केली. पण बॅट्स्मन कोणत्या तऱ्हेच्या चेंडूला बिचकत आहे हें माझ्या लक्षांत येऊन चुकलें होतें आणि त्याप्रमाणें गोडांबे यांना मी म्हणालों कीं “ बोलिंग बदलण्याचें कांहीं कारण नाहीं, विशिष्ट ठिकाणीं चेंडू ‘ पिच ’ करण्याचा प्रयत्न करून पाहा; तुम्हांला खास विकेट मिळेल. बॅट्स्मननें कांहीं फटके मारले तरी डरूं नका ! ” माझी ही सूचना त्यांनीं लगेच मान्य केली. आणि त्याप्रमाणें चेंडूफेक करण्याचा प्रयत्न सुरू केला. प्रथमचे कांहीं चेंडू योग्य स्थळीं पडूं शकले नाहींत; पण नंतर ती जागा जेव्हां सांपडली, त्या वेळीं मीं हेरल्याप्रमाणेंच झेल उडून बॅट्स्मनला तंबूची वाट धरावी लागली आणि गोडांबे यांना विकेट मिळाली !

### मतभेदाचे प्रसंग

गोलंदाज व कॅप्टन यांच्यामध्यें मतभेद होण्याचे प्रसंग क्षेत्ररक्षणाच्या रचनेबाबत पुष्कळ वेळां येत असतात. कांहीं गोलंदाजांचा असाच आग्रह असतो कीं आपल्या गोलंदाजीच्या वेळीं आपण सांगूं त्याप्रमाणेंच क्षेत्ररक्षणाची रचना कॅप्टननें केली पाहिजे. हिंदु संघाच्या एका प्रसिद्ध बोलरशीं माझा एकदा याच मुद्द्यावर मतभेदाचा प्रसंग उद्भवला होता. १९२५ सालचा चौरंगी सामना असावा तो ! सामन्याच्या आदल्या दिवशीं त्यांनीं माझ्याकडे अशी मागणी केली कीं आपण सांगूं त्या विशिष्ट ठिकाणींच तुम्ही क्षेत्ररक्षक ठेवले पाहिजेत; इतर रचना आपल्याला चालणें शक्य नाहीं. मीं या त्यांच्या म्हणण्याला साफ नकार दर्शविला. मीं म्हटलें, "या गोष्टी उभयतांच्या समजुतीनेंच होत असतात. पण याबाबतचा शेवटचा अधिकार कॅप्टनचाच असला पाहिजे व तो तसा सर्व ठिकाणीं असतोही ! गोलंदाजाला अशा वेळीं कॅप्टनची आज्ञा प्रमाण मानलीच पाहिजे." आमच्यामध्यें चाललेला हा वादविवाद, आमच्यामागें 'कर्नल' दादरकर (हिंदु जिमखान्यांतील एक प्रसिद्ध क्रिकेटप्रेमी गृहस्थ–'कर्नल' हें टोपणनांव त्यांना दिलेलें होतें.) हे त्या वेळीं बसले होते, त्यांनीं ऐकला व माझे बंधु रा. बाळू यांच्याकडे सहज बोलतां बोलतां निवेदन केला. उपरिनिर्दिष्ट बोलरनींही रा. बाळू यांजपुढें आपला मुद्दा मांडून त्यांचा अभिप्राय विचारला. त्याप्रसंगीं रा. बाळू यांनीं १९११ सालच्या आपल्या विलायतेंतील दौऱ्यांत अशाच स्वरूपाच्या उपस्थित झालेल्या एका प्रसंगाची हकीकत सांगितली. त्या संघाचे कॅप्टन डॉ. कांगा हे होते. एका सामन्यांत बाळू यांना एका विशिष्ट स्थळीं क्षेत्ररक्षक ठेवणें जरूरीचें भासत होतें. डॉ. कांगा यांना त्यांनीं एकदोनदां तसें सुचवून पाहिलें, पण कांगा यांनीं ती मागणी फेटाळून लावली. आणखी एकदां सूचना करतांच कांगा थोडेसे चिडले व म्हणाले, "ही सूचना तुम्ही मला करावयाला नको; संघनायक जी जी रचना करील, त्याला मान्यता देणें हेंच तुमचें कर्तव्य आहे." इतकें झाल्यावर बाळू यांनीं पुढें एक शब्द न बोलतां गोलंदाजीला सुरुवात केली. बॅट्स्मनचे दोन झेल त्यांच्या बोलिंगवर लागोपाठ उडाले व ते त्यांना ज्या ठिकाणीं क्षेत्ररक्षक हवा होता, त्याच ठिकाणीं अचूक जाऊन

आणि सदर बॅट्समनची विकेट बाळू यांना मिळूं शकली. हा आपला अनुभव सांगून रा. बाळू यांनीं उपरिनिर्दिष्ट गोलंदाजांना म्हटलें, " या प्रसंगीं माझ्यासारख्या गोलंदाजाची काय मनःस्थिति व्हावी, याची कल्पना तुम्हीच करा ! पण अशाही परिस्थितींत कॅप्टनचें म्हणणें ऐकणें हें कर्तव्यच होतें. हा तर संघाच्या शिस्तीचा पहिला नियम आहे ! कॅप्टनच्या हातून चूक घडत असो वा नसो, कोणत्याही परिस्थितींत कॅप्टनचा आदेश हा प्रमाण मानलाच पाहिजे ! तुमच्या परिस्थितींत तर याबाबत बरीच सवलत तुम्हांला मिळूं शकते. तेव्हां याबाबतचा भलताच हेका तुम्ही धरणें मुळींच रास्त होणार नाहीं." हें ऐकल्यावर त्या गोलंदाजांनीं याबाबत आणखी अधिक आग्रह धरला नाहीं. आमच्यामधील वादामुळें ते कदाचित् संघाशीं असहकार पुकारतील अशी भीति कांहींनीं व्यक्त केली होती. पण तसें कांहीं घडलें नाहीं.

क्रीडांगणावरील वागणूक

संघनायक हा क्रीडांगणावर हाताखालच्या खेळाडूंवर अधिकार गाजवूं शकतो हें खरें असलें, तरी संघनायकानें कडकपणें हा अधिकार गाजवूं म्हटलें तर तें चुकीचेंच होईल. या बाबतींत कठोरतेपेक्षां सौजन्यशीलतेचाच अधिक उपयोग होऊं शकतो व खेळाडूंचा विश्वास व आदरही याच तऱ्हेनें संपादतां येतो. एकाद्या खेळाडूच्या हातून झेल सुटतांच त्याला तेथल्या तेथेंच खडसावण्याची संवय कांहीं संघनायकांना असल्याचें मीं पाहिलें आहे. खेळाडूच्या हातून जाणूनबुजून हलगर्जीपणा होत असल्यास त्याला त्याबाबत सूचना देणें कॅप्टनचें कर्तव्य ठरेल; पण केवळ एकादी चूक घडली म्हणून लगेच त्याबद्दल खेळाडूची हजेरी घेणें हें कोत्या मनाचेंच लक्षण मानावें लागेल. कर्तव्याची भावना खेळाडूंना असत नाहीं असें अशा प्रसंगीं मानून चालणें गैरच होय. दुसरें असें कीं झालेली चूक खेळाडूला त्याबद्दल बोल लावल्यानें कांहीं भरून येत नाहीं. उलट तसा बोल लावीत राहिल्यास खेळाडूच्या हातून त्याच्या मनाचा तोल सुटून आणखी चुका होण्याचाच संभव अधिक ! या साध्या वागणुकीच्या गोष्टी आहेत. क्रिकेटमधील खेळाडू-पणाच्या मूळ भावनेला अनुसरून त्यांत मनाचा उदारपणाच व्यक्त करणें

श्रेयस्कर होय. विरोधी संघांच्या संघनायकांनींही परस्पराशीं वागतांना हीच भावना ठेवून वागलें पाहिजे. मला याबाबतचा पुढील एक प्रसंग आठवतो. त्यांत पारशी संघाचे कॅप्टन डॉली कपाडिया यांनीं आम्हीं मागितलेला बदली क्षेत्ररक्षक, केवळ तो क्षेत्ररक्षणांत कुशल आहे एवढ्याच कारणानें आम्हांला घेऊं देण्याचें नाकारलें होतें ! त्या सामन्यांत चंदाराणा यांना कांहीं दुखापत झाल्यामुळें कांहीं वेळ विश्रांति घेणें भाग पडलें होतें. त्या अवधींत संघांतील राखींव खेळाडू चंपक मेहता यांना बदली क्षेत्ररक्षक म्हणून घेऊं देण्यास मुभा असावी अशी मीं विरोधी संघाचे कॅप्टन डॉली कपाडिया यांना विनंती केली. पण या एवढ्या सरळ विनंतीला त्यांनीं साफ नकार दर्शविला आणि तोही अशा शब्दांत कीं मीं तें ऐकून कांहींसा थक्कच होऊन गेलों ! डॉली कापडिया यांच्या या अनुदार वागणुकीबद्दल पारश्यांमधील डॉ. कांगा वगैरे ज्येष्ठ क्रिकेटपटूंनीं त्यांना दोषच दिला आणि विरोधी कॅप्टननें मागितलेला क्षेत्ररक्षक त्यांनीं घेऊं देण्यांतच खरी खेळाडू वृत्ति प्रकट झाली असती असाही अभिप्राय व्यक्त केला. या प्रसंगाचा उल्लेख मीं एवढ्याचकरितां करीत आहें कीं, क्रिकेटचे म्हणून कांहीं शिष्टाचार आहेत आणि ते पाळण्याची तत्परता खेळाडूनें दाखविणें हें त्याचें कर्तव्यच आहे, ही गोष्ट येथें स्पष्ट व्हावी.

असो. एथवर माझ्या क्रीडाजीवनांतील, अर्थातच क्रिकेटक्षेत्रांतील मला आलेले बरेवाईट अनुभव माझ्या अल्पमतीप्रमाणें वाचकांसमोर मांडले आहेत. मीं स्वतः जमा करून ठेवलेली कांहीं जुनी माहिती व माझीं स्मृतिचित्रें यांच्याच आधारें हें माझें क्रीडाजीवन रेखाटण्याचा मीं प्रयत्न केला आहे. त्यांत क्वचित् कांहीं ठिकाणीं दोष राहून गेले असतील यांची मला जाणीव आहे. आठवण देतांना कोठें व्यक्तिविषयक अधिकउणा शब्द लिहून गेलेला असल्यास त्याबद्दल क्षमेची मी याचना करतों. माझ्या या क्रीडाजीवनांत माझ्याशीं तीव्र मतभेद झालेल्या व्यक्ति मला भेटल्याच नाहींत, असें म्हणतां येणार नाहीं; पण माझ्या सुदैवानें अशा व्यक्ति फारच थोड्या असून जेथें तेथें मला चाहतेच अधिक भेटले. क्रिकेटच्या प्रेक्षकवर्गानें तर माझ्याविषयीं निरतिशय लोभ दाखविला. त्याच वर्गाच्या प्रेमामुळें व उत्तेजनामुळें मला या क्षेत्रांत पुढें पाऊल टाकण्यास हुरूप आला हें मी कदापि विसरूं शकणार

नाहीं. मुंबईचा प्रेक्षकवर्ग तर माझ्याकडे आत्मीयतेनेंच पाहत असे; मी त्यांचाच खेळाडू होतों. हिंदु जिमखाना, शेटये बंधूंचा फ्रेंड्स् युनियन क्रिकेट क्लब, डब्ल्यू. एल्. मसुरकर यांचा संघ (यालाच पुढें न्यू हिंदु क्रिकेट क्लब असें नांव मिळालें), जी. आय्. पी. रेल्वे क्रिकेट क्लब, बी. बी. सी. आय्. रेल्वे क्रिकेट क्लब या ज्या पांच क्लबांचा मी नियमित सभासद होतों, ते सारे मुंबईचेच! तेव्हां मुंबईच्या प्रेक्षकांच्या नजरेसमोर मीं नेहमींच होतों. पण मुंबईखेरीज इतरही ठिकाणीं लोकप्रियता ही काय चीज आहे याची चव मला चाखायला मिळाली. राजकोट येथें रणजितसिंहाच्या संघांतून मी खेळण्याकरितां गेलों होतों त्या वेळीं 'हा विठ्ठल कसा काय दिसतो?' हें पाहण्यासाठीं तंबूजवळ प्रेक्षकांनीं गर्दी केली. तें पाहून रणजितसिंहांनीं मला बोलावून एका छोट्या टेबलावर उभें राहण्यास सांगितलें आणि मग ते जमा झालेल्या प्रेक्षकांना उद्देशून हंसत म्हणाले, "हा पाहा विठ्ठल!—" कलकत्ता येथेंही याच कारणासाठीं तेथील युरोपियन जिमखान्यासमोर लोकांनीं 'आशो' 'आशो' म्हणत इतका गिल्ला केला कीं तेथून बाहेर पडण्यासाठीं वाव नसल्यामुळें मागच्या दारानें निसटून जाणें मला भाग पडलें.

दिल्ली नजीक मिरत टुर्नमेंटमध्यें एका संस्थानिकाच्या संघांतून खेळण्यासाठीं शिवराम गणपत व मीं असे आम्ही तिघे बंधु व एस्. एम्. जोशी असे चौघे-जण गेलों होतों, त्यावेळीं तेथील अशिक्षित प्रेक्षकवर्गानें आमच्या खेळा-विषयींची आपली गुणग्राहकता मोठ्या मजेदार रीतीनें व्यक्त केली, तो प्रसंग उल्लेखनीय आहे. या सामन्यांत आम्ही पहिल्यांदा बॅटिंग घेतलें; पण आमच्या शंभर सव्वाशें पेक्षां अधिक धांवा झाल्या नाहींत. आमच्याविरुद्ध असलेला भोपाळ संघ बलवान् होता. अर्थातच आमच्या बाजूच्या प्रेक्षकांना आम्ही कसे जिंकतों याबद्दल चिंता वाटूं लागली. आणि विरुद्ध संघांतील खेळाडूंनींही टोलवाटोलवीला सुरवात केली होती, पण जोशीबुवांच्या गोलं-दाजीला हीच अनुकूल संधि होती; त्यांच्या गोलंदाजीला एकेक खेळाडू बळी पडूं लागला; त्यावेळीं प्रेक्षकांचा उत्साह इतका वाढला, कीं जोशीबुवांनीं विकेट घेतांच, प्रेक्षक वर्गांतून एकादा असामी पुढें यावयाचा आणि त्यांच्या करामतीबद्दलची गुणग्राहकता व्यक्त करण्यासाठीं एकादें फाऊंटन पेन अथवा पेन्सिल किंवा हातरुमालही त्यांच्या खिशात कोंबून परत जावयाचा! पण केवळ

जोशीबुवांवरच हा असा बक्षिसांचा पाऊस पडला नाहीं, तर आमच्यापैकीं कुणी क्षेत्ररक्षकानें चेंडू झेलला किंवा नुसता अडविला तरीही त्याच्या खिशांत अशींच बक्षिसें पडूं लागलीं. अखेरीस ८० धांवांत प्रतिपक्ष्याचा फडशा उडवून हा सामना आम्हीं जिंकला. पण त्या विजयामुळें क्रीडांगणावरून आम्हांला पळच काढणें भाग पडलें, कारण आमच्या बाजूचे प्रेक्षक आम्हांला प्रेमाचीं बक्षिसें देत होते, तर विरुद्ध बाजूच्या प्रेक्षकांनीं वेगळेंच बक्षिस देण्याची तयारी चालविली होती !

माझ्या चाहत्या मंडळींपैकीं एकदोन व्यक्तींच्या आठवणींचा येथें निर्देश करावासा वाटतो. यांपैकीं एक म्हणजे वर ज्यांचा एकदां उल्लेख केला आहे ते 'कर्नल' दादरकर होत. चौरंगी सामन्यामध्यें मी खेळावयास निघतेवेळीं ही स्वारी कुठून तरी चटकन् अवतीर्ण व्हावयाची आणि माझ्याशीं जोरजोरानें हस्तांदोलन करून "वुइश यू गुड लक" असें म्हणून स्वस्थानीं परत जावयाची. ह्या त्यांच्या कार्यक्रमांत कधींच खंड पडला नाहीं. दादरकर हे आमच्या हिंदु जिमखान्यांतलेच सभासद होते. पण हिंदु जिमखान्याच्या क्रीडांगणावर क्रिकेटबद्दल चर्चा करण्यासाठीं जी कांहीं हौसी मंडळी रोज जमत असे, त्यांपैकीं देशपांडे या नांवाचे एक साधेसुधेच पण प्रेमळ स्वभावाचे गृहस्थ दर चौरंगी सामन्याच्या वेळीं आपल्या देव्हाऱ्यांत एक रुपया ठेवीत आणि आमचा विजय झाला कीं तो मला बक्षिस देत ! या प्रेमळ गृहस्थांची आठवण झाली कीं माझें अंतःकरण अजूनही भरून आल्याखेरीज राहत नाहीं !

क्रिकेट !—या क्रिकेटच्या खेळानें मला सोबत केली नसती, तर मीं आज कोठें काय करीत राहिलों असतों हा विचार माझ्या मनांत अनेकदां येतो. या क्रिकेटमुळें मी लोकांसमोर आलों, साऱ्या देशभर लोकांच्या तोंडीं नांव गाजण्याचें भाग्य मला लाधलें, राजेमहाराजे, संस्थानिक, गव्हर्नर, व्हाइसरॉय इतक्यांच्या खुर्चीला खुर्ची भिडवूनही मीं बसूं शकलों—यःकश्चित् एका गरीब कुटुंबांतील आणि तोही मागसलेल्या जातींतल्या कुटुंबांतील इसम हें एवढें यश या खेळामुळें मिळवूं शकतो ही वस्तुस्थिति मनांत येतांच या माझ्या आवडत्या खेळाबद्दल मला एक प्रकारचा भक्तिभावच वाटूं लागतो. ज्यानें ही क्रांति माझ्या जीवनांत घडविली, त्या क्रिकेटला या क्रीडाधिराजाला पूज्य भावानें प्रणाम करून हीं स्मृतिचित्रें मीं आटोपतीं घेतों.

# व्यक्ति-सूचि


अमरसिंग १२६; १२७
अब्दुस सलाम ४७;४९;७१;७२;१०४;११८
अर्ल जी. एफ्. १४१
अल्वारचे महाराज (जयसिंगजी बहादूर) ३६
अलेक्झांडर (कॅ.) ११४;११५
ॲस्टिल १३९
अस्टे, जी. ११९
आगासकर, आर्. व्ही. ६६;६७
आगाशे ८
आपटे ८
आंटिया, जे. डी. १२९
इब्राहिम रहिमतुल्ला ७९;८०
इराशा ६६
इव्हान्स ५७
एलचीदाणा २४;२५
एलाव्हिया ६५;११२;१२४
ओघडशंकर ३०; ३१; ५१; ६६; १०१;१०२; १०४;१०५
ओल्डफिल्ड ७२
कफ (डॉ.) ३४;३५
कमांडर जिलेस्पी ९३
कमिंग १३२;१३३
कापडिया, डॉली २४;२५;३४;३५;४५;४७; ४९;५७;५८;१२४;१६२
कापडिया, फली १२३;१२४;१३०;१३१;१३२; १३३;१३५
कापडिया, बी. ई. १३१;१३४
कार्टर १६
कालपेसी ११२
काश्मीरचे महाराज (माजी) (सर प्रतापसिंग) ३८
कांगा (डॉ.) १९;२५;३२;३६;६५;७८;१२४; १६०;१६१;१६२
किलिक ३१
किलनर, रॉय ५५;८७;९०
कीर्तिकर ६;१५;६६;६७
कुचबिहार, महाराज (श्री जितेंद्रनारायण) ३०;५६;५७
केलार्ट १३५
कोल्हा १२३;१२४
कंटक, व्ही. व्ही. १०२
कृष्णा २३
क्लार्क २६;८३
कॅम्बेल, आय्. पी. एफ्. ११३;११४
कॅरिक १३१
कॉम्प्टन, डेनिस १५४
क्लिफ १३९
खटाव, गोवर्धन ६६
गणपत २१; २२; २३; ५२; ५७
गणपति १३१
गायकवाड ६४
गिलिगन ४७; ८३; १३९; १४५
गुलाम रसूल १०४
गेअरी १३९
गोडबोले १२०
गोडांबे, एस्. आर्. १०१;११५;११६;११७; १२०;१२२;१३१; १३२;१३५;१४२; १५७; १५९
गोपालदास, नथुभाई ९९
गोल्डी ४८
ग्रॅहॅम ३
ग्रेग (कर्नल) ४; १२; १३; २९; ४८; ७४
ग्रेसवेल १३५
घनःश्यामसिंहजी ५५; ५६
चिचेस्टर कॉन्स्टेबल ७९; ८०
चोणकर, डी. एम्. ६६; ६७
चोथिया, एस्. एम्. २४; २५; २८; ४७; ४९
चंदाराणा ३; ७७; ८६; ९३; ९७; ९९; १०१; १११; ११५; ११६; ११७; ११८; १२०; १२२; १२५; १२६; १६२
चंदावरकर, सर विठ्ठल २६
जमशेटजी ११२; १२३; १३१; १३६; १४१; १४३; १४४
जय, एल्. पी. ६३; ९३; ९७; १०१; १०५; १०६; ११२; ११६; ११७; १२३; १४२; १४९; १५१; १५७
जार्डिन ८३; ११४

जोशी, एस्. एम्. ३; ४७; ५०; ५७; ५८; ७७; ९१; ९२; ९३; ९७; ९८; १०१; १११; ११५; १२०; १२६; १३१; १३२; १३३;१३६;१५७
जोशी, प्रो. एस्. एस्. ९३; ९४; ९६; १०५; १०६;११५;११६;११७; १२०; १२२;१२६
जॉन्स्टन, सी. पी. १३१
जॉय ६८
टर्नर ३२
टाटा, सर दोराब १७
टिळक (लोकमान्य ) १४
टेट ४७; १३९; १४२
टॅरंट ४८; ५०; ५५; ५७; ८३; ८४; ८५; ८६; ८७
ट्रॅव्हर्स ७६; ७७; ८३; ८४; ९३; ९४; ९६; ९७; ९८; ११०; ११३; ११५; ११६
ट्रॉस १२
ठाकूरसाहेब लखाजीराज (राजकोट) ६४;६५
डिआस १४
डेनवी, ए. १२५
डोंगरपूर महाराज ५६
डोंगरे, एस्. एस्. १०१; १०५; १०६
डॅनियल, जॉन १९; ५७
तय्यबजी, हादी १०८
तेजपाल, गोकुळदास ६६
तेलंग, दीनानाथ २५; ६८
तेलंग, पंढरीनाथ ३२;.३८; ६६;६७;६८;८९
तेरसी ८०; ८९
दळवी, एस्. एम्. ९७; १२०
दाते, के. ए. ६; १३; २५; ३१; ६५; ६६;६७
दादरकर १६०; १६४
दावर ७६; ७७; १२४; १२५
दिवेकर, आर्. के. १३; ६६; ६७; ७३; ७४
दिवेचा ३६
दुलिपसिंह ४१; ४२; ४३; ५५; १२२; १२३; १२४; १२५; १२६
देवधर, प्रो. २८;७७;८८; ८९;९३; ९६; ९९; १०३; १०४; १०५; १०६; ११२; ११६; ११७; १२२; १२३; १४१; १४९; १५७
देशपांडे १६४
देशमुख, एम्. ए. १२२
देसाई, व. शां. ८८
नरसण्णा १३
नवमल जेऊमल १२०
नवले ३; ७२; ७३; ९३; ९५; ९७; ९८; १०२; १०३; १०५; १०६; ११६; ११७ १२३; १४१; १५७
नाझिरअली १०४; १०५; १०६; १२६ १४३; १४४
नाटोरचे महाराज ३०
नायडू, सी. के. ४७; ४९; ६०; ७१;७४;७८; ८५; ९३; ९५; ९६; ९८; ९९; १०१; १०३, १०४; १०५; १०६; १०९; ११७; १२०; १३१; १३२; १३४; १३५; १४०; १४१; १४२; १४३; १४४; १५१; १५७
निकोल्स १३२
निस्सार १२६
नूरइलाही १७
न्यूमन ४८; ५६; ५८
पतियाळा महाराज ( राजेंद्रसिंग ) ५०
पतियाळा नरेश (माजी भूपींद्रसिंग ) ३६; ४६;४७;४८;४९;५०;५३;८४
पतियाळा नरेश ( सध्यांचे ) ५५
पतौडी नबाब ४१;४२;४३;४४
परदेशी, के. जी. २१;९३;९५;९८;९९; १०१; १०२;११७;१२३;१२५;१३१;१३४;१५७
परमानंददास जीवनदास ६६
परांजपे १३
पल्सेटिया १२३
पारसन्स, जे. एच्. ५०;८६;९३;९४;१३९
पारेख, एम्. डी. २८;६५
पालवणकर ११
पालिया १२३
पावरी, एम्. इ. (डॉ. ) १६;१७
पै, एम्. डी. ३४;६६;६९;७०;७४;८८
पोकॉक ९३;९५;९६;१०३
पोरबंदर महाराज ५५
पॅंक ४८;४९

प्रभाकर (डॉ.) ९०
फिल्ड २०
फिलिप्स, जी. सी ९३;९४; ९७; ११३;११५;
११७
फेभरसर्व्हिस ७१
फेरोझखान १०४
फॉस्टर २०
फ्राय, सी. बी. २२
बजाना एम्. पी. १९;५७
बडोद्याचे महाराज (श्रीमंत प्रतापसिंह) ४५
बपोरिया १५१
बरोडावाला, टी. टी. १२९
बलसारा १८;२८;३४
बर्ड, एम्. सी. ५६;५७;५८
बानर्जी १२६
बापट १३
बाळू, पी. ७;११;१२;१३;१४;१५;१६;१७;१८;
१९;२१;२२;२९;३०;३१;३४;६५;६६; ६८;
१२६;१२७;१३१;१५७;१६०;१६१
बार्टन १२
बार्न्स् १६
बोटावाला ए. यू. १०४,१०५;१०६;१३१;१३२
बंडा, जी. आर्. ६६;६७
बॅटरस्बी ९३;९७
बॉइस १३९;१४२
ब्राउन ७८;७९
ब्रिडले १३३
ब्रूक, एफ्. आर्. १३२;१३३
ब्रॉकवेल ५०
भांडारे, एल्. एस्. ६६;६७
भिडे १३
भुताराम ७४;७५
भुसारी ७३;७४
मणिदास ५७
मसूरकर, डब्ल्यू. एल्. १६३
महाले २१;७६;११७;१३१;१३२;१३४
मर्चंट, जाल १२५
मर्सर ७८;१३९;१४२
माणचंद १७
मार्टिन १४
मिनन ५१;५२
मिलन २९
मिस्त्री १९;३६;५४;१४०;१४१
मुकर्जी, बी. ३१;५७
मुराद ४७
मुल्ला २८
मेयर २;११९;१२१
मेहता, सर चुनिलाल व्ही. २७;६५;६६;६७;
६८;६९;८०
मेहता, चंपक १६२
मेहता, जानी १७
मेहता, देवीदास ६६
मेहेरोमजी, आर्. पी. १९;२८;३४
मेहेंदळे ६५;६६
मॅकिनन १२१
मॅक्डोनल्ड ९३
युसफ बेग ४७
रणजितसिंह (रणजी) २९;३०;३१;३२;३३;
३६;४१;४५;४८;५०;११८;१६३
राणा, सी. एम्. १५१
रानडे (न्या. मू.) १४
रामजी, एल्. ३;९३;९७;९८; १०१; १०३;
१०६;१२०;१२१;१२२;१२६; १३१; १४१;
१५७
रामस्वामी १३१
रीडिंग (लॉर्ड) १०७;१०९
रुबी, सी. बी. ९३;९४;९७
रेल्फ, ए. इ. ३१
रेल्फ, रॉबर्ट २०;३१
रॅडक्लिफ १४७
रॉकवुड जॉन १३१
रॉजर्स, एफ्. १०३;१०४
रॉबसन ५७
रॉबिन्सन २२
ऱ्होड्स् १६;२२;५०;६४;८६;८७;९३;९४
ग्राम ८०
ग्रायन्स १०३; १०४

लिवलीन १६
लिव्हसे ५०; ५७
लिलंड ५०
लिस्टर, के. ८६; ८७
ली, एच्. ४८; ४९; ५६; ५७; ५८
लेविस ५७; १३२
लॅव्हर्टन ४८; ४९
लाइड १०३
लॉइड, सर जॉर्ज ११०
लॅाकवुड ६
ल्युकस, डब्ल्यू. इ. १२९; १३१; १३२; १३४; १३५
वझिफदार २५; ४७; ५०; ११२; १३१; १३४; १३५
वझिरअली १०१; १०४
वझिर अहमद १०४; १०५; १०६; १४२; १४३; १४४
वायगल ५०
विठ्ठल, पी. ३५; ३७; ७६; ७९; ८०; ८३; ९९; १११; १३६; १३७; १६३
विजयनगरम् महाराजकुमार ५५
विलिंग्डन (लेडी) ५०; ११०
विलिंग्डन (लॉर्ड) ४७; ५७; ७५; ११०
विल्सन २६
विल्सन, सर लेस्ली ८३; ८४; ११०; ११२
विल्किन्स १४
विग्रॅम १४
वुडहाउस, आर्. एल्. डी. ९३; ९७
वुली १३९
वेझी ११७
वेस्ट एस्. इ. ९३; ९७
वॅट १३९; १४२
वॉर्ड. एच्. पी. ११४; १३१
वॉर्डन, जे. एस्. १८; २५; २८; ३१; ३४; ३९; ५८; ६५; ७९; १३१; १३३
व्हिक्टर नारायण, प्रिन्स ५७
व्हिडलर ३१
शफकत हुसेन ३३; ३४
शिवराम, पी. ७; ११; १२; १३; १७; १८; १९; २०; २१; २२; २३; ३१; ३४; ३५; ६६; ८८; ९३; १०५; १०६; १६३
शिवलाल ६६
शिवशंकर ३०
शिवाजीराव, प्रिन्स ४५; ४६
शेख, एम्. इ. १०४
शेटये १६३
शेषाचारी, के. ३१; ६६; ६७; ७२; ७३
सलामउद्दीन १८
सिम्स, एच्. एल्. ३१;८४;८५
सिवेल, इ. एच्. डी. २०
सेनारत्न १३४;१३५
सॅप्रे, एच्. एल्. ३१
स्वामी, के. आर्. ७४
सॅण्डहॅम १३९
सॉल्टर, एम्. जी. ११३;११५;११७
स्पूनर, आर्. एच्. १८;२०;१४७
स्प्राट २९
स्टडविक ७२
हवेवाला, जे. एफ्. १२३;१३१
हसनशहा १०४
हर्न ५०
हर्स्ट ५०;६४;८६;९४;१०५
हार्डिंग्ज (लॉर्ड) १०९;११०
हिगिन्स, जे. ८६;९३;९७
हिटी (प्रिन्स हितेंद्रनारायण) ४५;५७
हिंदळेकर ७२
हीथ ४८;८५;८६
हेंड्रेन १३९
होझी ३;४;५८;८६;९३;९४;९५;९७;१०१;१०३;१०४;१०८;११३;११५;११७;१४४
हंसराज, लाला १११
हॅरीस ६६;११०
हॅरिसन, पी. टी. ११४;११७;११८
हॉब्स, जॅक ८२;१३९;१५०
हॉवलेट, बी. २;३; ११४; ११६; ११७;११८; ११९
ह्युजेस हॅलेट ८२; ११४;११५;११७

REFBK-0007005